

म. ग्रं. सं. ठाणे
विषय भू-प्रवास
सं. क्र. २६५

REFBK-0011406

# बृहत्तर भारत

- प्रा. र. शं. गुप्ते

बहि:शाल शिक्षण मंडळ ग्रंथमाला : क्र. १

# बृहत्तर भारत

मराठी ग्रंथ सं. ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ................ वि: ..................
क्रमांक १..................... नों: दि: ..................

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ११४०६
(स्थल प्रत)

लेखक
रमेश शंकर गुप्ते, एम्. ए.
इतिहास विभाग प्रमुख
औरंगाबाद.

दे
REFBK-0011406
REFBK-0011406

मराठवाडा विद्यापीठ

बहि:शाल शिक्षण मंडळ

प्रकाशन : ऑक्टोबर
१ ९ ६ ०
मूल्य : दोन रुपये

(c) बहि:शाल शिक्षण मंडळ,
मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

प्रकाशक : प्रा. र. शं. गुप्ते
सचिव, बहि:शाल शिक्षण मंडळ
मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

मुद्रक : जयहिंद प्रिंटिंग प्रेस
मालक व संचालक :
भारत मुद्रक आणि प्रकाशक लि.
सराफा, औरंगाबाद.

# प्रकाशक निवेदन

इ. स १९५८ सालीं मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली. मुंबई सरकारच्या मराठवाडा विद्यापीठ कायद्यांतील २७ व्या कलमान्वयें विद्यापीठानें बहि:शाल मंडळाची स्थापना इ. स. १९५९ मध्यें केली. आजच्या लोकशाही युगांत विद्यापीठें जनताभिमुख होणें अपरिहार्य आहे. विद्यापीठास जनतासंपर्काची अत्यंत आवश्यकता आहे. मराठवाड्यांतील सर्वसामान्य जनतेसाठीं उपयुक्त अशा वेगवेगळ्या विषयांवर व्याख्यानें घडवून आणणें, हा या मंडळाचा प्रमुख उद्देश असून अशा विषयांवर अधिकारी व्यक्तींकडून ग्रंथ लिहून ते अल्प किंमतींत जनतेस उपलब्ध करून देणें हाहि मंडळाच्या बहुविध उद्देशांपैकीं एक उद्देश आहे. त्याप्रमाणें मंडळानें प्रा. र. शं. गुप्ते, एम्. ए. यांच्याकडून 'बृहत्तर भारत' हा ग्रंथ लिहवून घेतला आहे. मंडळातर्फे प्रसिद्ध होत असलेला हा पहिलाच ग्रंथ असून बहि:शाल मंडळाचे सदस्य व सर्वसामान्य जनता या ग्रंथानें स्वागत करील अशी अपेक्षा आहे

दिनांक २-१०-१९६०
मराठवाडा विद्यापीठ,
औरंगपुरा, औरंगाबाद.

सचिव,
बहि:शाल शिक्षण मंडळ

# निवेदन

'बृहत्तर भारत' या विषयावर मराठीमध्यें कोणताहि ग्रंथ उपलब्ध नाहीं. भारतीय इतिहासांतील हें एक अत्यंत उपेक्षित असें अंग आहे. भारतीय इतिहासांतील ही उणीव अल्पांशानें कां होईना, भरून काढण्याचा प्रयत्न या पुस्तकांत केला आहे.

या पुस्तकांत भारतीय संस्कृतीच्या आग्नेय आशियामधील प्रवासाचा व प्रसाराचा थोडक्यांत आढावा घेतला आहे. भारतीय संस्कृति आजच्या इंडोचीन, लाओस, थायलंड, ब्रह्मदेश, मलाया, सुमात्रा, जावा, बाली, बोर्निओ वगैरे ठिकाणीं कशी प्रसृत झाली याविषयीं प्रस्तुत ग्रंथांत थोडक्यांत विवेचन केलें आहे

या विषयाविषयीं डच व फ्रेंच पुरातत्त्व खात्यांतील विद्वानांनी अत्यंत परिश्रमपूर्वक संशोधन केलें आहे. श्रीविजयविषयक अभ्यासाला जॉर्ज कोडेझ या फ्रेंच विद्वानानें चालना दिली. इ स. १९१८ सालीं त्यांचा श्रीविजयविषयीं लेख प्रसिद्ध झाला. क्रोम यांनी डच पुरातत्त्व खात्यांत डायरेक्टर म्हणून काम करीत असताना जावाचा इतिहास व तेथील पुरातन स्मारकांचें संशोधन करून अनेक ग्रंथ लिहिले. याच खात्यांत काम करणाऱ्या नंतरच्या स्टटरहीम, बॉश या डायरेक्टरांनीं व व्होगेल या डच विद्वानानें या विषयावर अत्यंत परिश्रमपूर्वक कार्य केलें. फेरांड ( फ्रेंच ) कर्न ( डच ), वर्ग, क्वेरीच वेल्स, मोअेन्स वगैरे अनेक विद्वानांनी या विषयावर संशोधनपर लेखन केलें आहे.

कर्न यांना तर कंबुजदेशाच्या शिलालेखादि प्राचीन साहित्याचे प्रमुख संशोधक म्हणून मानाचें स्थान दिलें जातें. फुनान व कंबुजदेश या दोनहि देशांच्या प्राचीन संस्कृतीविषयींचें संशोधनपर लेखन कर्न, लुने द लाजोंक्वेर, इमोनिअेर, लुई फिनो, जॉर्ज कोडेझ, पार्मेंटीयर, गोलोबेव्ह, रेजिनाल्ड ली मे, व ग्रोस्लीअेर वगैरे फ्रेंच विद्वानांनी केलें आहे. चंपा या देशाविषयीं मास्पेरो यांनीं एक संशोधनात्मक प्रचंड ग्रंथ लिहिला. त्यांनी चिनी इतिहासांतून चंपाविषयीं माहिती मिळविली. द्वारावतीच्या पुरातन इतिहासाविषयीं कोडेझ यांनी माहिती उपलब्ध करून दिली.

द्वारावती म्हणजे हल्लीचा सयाम अथवा थायलँड. कोडेझ यांच्या संशोधनानें सयामी संस्कृतीचे प्रत्येक अंग प्रकाशांत आलें आहे. सयामी राजघराण्यांतील राजपुत्र डांगरोंग यांनी द्वारावतीच्या पुरातन संस्कृतीसंबंधी बरेच संशोधनपर ग्रंथ लिहिले आहेत. याशिवाय साल्मीनी, क्ले, डुपोंट या विद्वानांनीं सयामच्या पुरातन संस्कृतीवर बराच नवा उजेड टाकला आहे. या विषयावर नव्यानें संशोधनात्मक ग्रंथ रेजिनाल्ड ली मे, क्वेरीच वेल्स यांनी लिहिले आहेत.

ब्रह्मदेशांतील जुन्या शिलालेखाचें वाचन करण्यांत ब्लॅगडेन यांनी चांगलेच यश संपादन केलें. ब्रह्मदेशाच्या पुरातत्त्व खात्याचे डॉ सीन को यांनीं पगानच्या स्मारकांचें वर्णन लिहून काढलें. चार्लस् डुरोसील यांनी बरेच शिलालेख मिळवून त्याचें संपादन केलें. त्यांनीं मावझा व पगान येथें उत्खनन करून जुने अवशेष शोधून काढलें. निहर रंजन रे यांनी ब्रह्मदेशामधील हिंदु व बौद्ध देवताचा अभ्यास करून त्यावर लेख लिहिले.

आग्नेय आशियाचा पुरातन इतिहास अशा तऱ्हेनें पाश्चिमात्य विद्वानांच्या संशोधनानें तयार झाला आहे. याबाबतींत डच व फ्रेंच पुरातत्त्व खात्याने प्रचंड संशोधनपर काम करून या भागाचा पुरातन इतिहास उपलब्ध करून दिला आहे.

भारतामध्यें या विषयावर डॉ. मुजुमदार यांनीं परिश्रमपूर्वक अभ्यास करून सुवर्णद्वीप, कंबुजदेश, चंपा, यांसारखे उत्कृष्ट ग्रंथ लिहिले आहेत. नीळकंठशास्त्री यांनी देखील या विषयावर श्रीविजय-सारखे ग्रंथ लिहिले आहेत.

हें पुस्तक लिहितांना ज्या संदर्भ ग्रंथांचा उपयोग केला आहे त्यांची यादी शेवटीं दिली आहे. या पुस्तकांत वेगवेगळ्या शिल्पांचा व देवालयांच्या छायाचित्रांचा उपयोग करूं दिल्याबद्दल जॉर्ज ॲलन अँड अन्वीन, लंडन, व डॉ. रेजिनाल्ड ली मे यांचा मी आभारी आहे. रेजिनाल्ड मे यांच्या The Culture of South East Asia या ग्रंथांतील २६ छायाचित्रांचा उपयोग या पुस्तकांत केला आहे.

उरलेली १३ छायाचित्रें आंतरराष्ट्रीय कीर्तीचे भारतीय इतिहासकार डॉ. मुजुमदार यांच्या ' सुवर्णद्वीप ' या ग्रंथांतून घेतलीं आहेत. त्यांनी यासाठी परवानगी दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे,

या पुस्तकांत कांहीं उणीवा राहिल्या आहेत याची मला जाणीव आहे. अशा प्रकारचा व या विषयावरील हा पहिलाच ग्रंथ असल्यानें तसेंच स्थलमर्यादा लक्षांत घेणें आवश्यक असल्यानें या उणीवा राहणें साहजिक होतें. प्रस्तुत पुस्तकांतील विवेचन मराठींत प्रथमच होत असल्यानें तें करतांना बऱ्याच अडचणी निर्माण झाल्या. तथापि विषयाची स्पष्ट कल्पना येण्यासाठीं व विषय सुलभ करण्याच्या दृष्टीनें शक्यतों तपशीलवार विवेचन केलें आहे. राजकीय इतिहास सारांशरूपानें लिहिण्याच्या उपक्रमांत निरनिराळ्या राजांची जंत्री फार मोठी झाली आहे याची मला जाणीव आहे. बृहत्तर भारताचा नकाशादेखील स्थलाभावीं देतां आला नाही याबद्दल वाचक मला क्षमा करतील अशी आशा बाळगतो.

मराठवाडा विद्यापीठाचे उपकुलगुरु श्री. सुं. रा. डोंगरकेरी व कार्यवाह श्री. म. भि. चिटणीस यांनी वेळोवेळीं प्रोत्साहन दिल्यामुळेंच मी हें पुस्तक हातावेगळें करूं शकलों. त्यांनी अत्यंत आपुलकीनें दिलेल्या प्रोत्साहनाबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

हें पुस्तक लिहितांना मराठवाडा विद्यापीठांतील मराठी विभागाचे प्राध्यापक डॉ. यू. म. पठाण यांनी आपला अमूल्य वेळ खर्चून मला खूपच मदत केली आहे. त्याचप्रमाणें प्रा. भालचंद्र फडके व श्री. बेनोडेकर यांनी देखील मला सहकार्य दिलें आहे.जयहिंद प्रि प्रेसचे उत्साही संचालक श्री. बर्दापूरकर, त्यांचे सहकारी श्री. किसनराव यांच्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे

माझा हा अल्पसा प्रयत्न वाचकांना आवडेल अशी आशा आहे.

देवगिरी महाविद्यालय,
औरंगाबाद.

र. शं. गुप्ते.

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | उपोद्घात | १ – ९ |
| २ | फुनान | १० – १४ |
| ३ | कंबुजदेश | १५ – २९ |
| ४ | चंपा | ३० – ३५ |
| ५ | सयाम (द्वारावती) | ३६ – ४२ |
| ६ | ब्रह्मदेश | ४३ – ५६ |
| ७ | श्रीविजय व शैलेन्द्र साम्राज्य | ५७ – ७८ |
| ८ | मतराम, केदिरी, सिंघसरी व मजपहित (जावा) | ७९ – ९२ |
| ९ | बोर्निओ | ९३ – ९५ |
| १० | बाली | ९६ – ९९ |
| ११ | मलाया | १०० – १०५ |
| १२ | मध्य व पूर्व जावामधील स्थापत्य | १०६ – १२१ |
| १३ | जावाचें वाङ्मय | १२२ – १२९ |
| १४ | धर्म (जावा, बाली, सुमात्रा, मलाया) | १३० – १४१ |
| १५ | उपसंहार | १४२ – १४८ |

अनुक्रम २८.३७ ... वि. ... 
११८०६

# बृहत्तर भारत

## उपोद्घात

भारताचा प्राचीन इतिहास उज्ज्वल आहे. भारतीय इतिहासाचीं पानें चाळून पाहतां भारतीय संस्कृतीचीं पाळेंमुळें किती खोलवर पसरलीं आहेत याचा मागोवा घेतां येतो. पुरातन काळापासून भारतीय ऋषिमुनींनीं या संस्कृतीची प्रकृति घडविली होती. वैदिक काळामध्यें लिहिलेल्या वैदिक संहिता, या संहितेवरील ब्राह्मणें, अरण्यकें व भारताला ललामभूत ठरलेलीं उपनिषदें यांनीं भारतीय तत्त्वचिंतनाला व ईश्वरासंबंधीच्या कल्पनेला रूप दिलें व या वेदाभ्यासाकरितां शिक्षा, छन्द, व्याकरण, निरुक्त, ज्योतिष व कल्प हीं वेदांगें जन्माला आलीं. या वेदांगांबरोबरच आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्ववेद व शिल्पवेद हे चार उपवेद आले. भारतीय संस्कृतीचा आत्मा तयार झाला, तिला 'शरीर' प्राप्त झालें. हें शरीर तेजोमय होतें. भारतीय ज्ञानज्योतीनें भारतवर्ष प्रकाशमान झाला. संस्कृतीचीं पाळेंमुळें सर्वदूर पसरलीं.

या भूमीमध्यें व्यासमुनीचें महाभारत घडलें. वाल्मीकीचें रामायण जन्माला आलें. महाभारतामध्यें श्रीकृष्णाने गीता गाइली. कर्मयोगाचें तत्त्वज्ञान सांगितलें. या दोन महाकाव्यांनीं भारतीय जनतेला सातत्यानें स्फूर्ति दिली, चैतन्य दिलें, एकत्वाच्या भावनेची पार्श्वभूमि दिली, दु:खामध्यें सुख दिलें, निराशेंत आशेचा किरण दाखविला.

भारतामध्यें विचार हा नेहमीच 'मुक्त' राहिला व म्हणूनच कपिलाने सांख्य तत्त्वज्ञान कथिलें, व कणादानें वैशेषिक तत्त्वज्ञानाचा पुरस्कार केला. पातंजलीचें 'योग–दर्शन' आणि गौतमाचा 'न्याय' हे भारतीय तत्त्वचिंतनाचे आणखी दोन आविष्कार. कपिलाच्या सांख्य तत्त्वज्ञानाला, व कणादाच्या वैशेषिकाला जैमिनीच्या पूर्वमीमांसेनें व व्यासांच्या उत्तरमीमांसेनें उत्तर दिलें. वेदान्त उचलून धरला. जग ही माया

आहे. सत्य फक्त ब्रह्म, हें व्यासांनीं सांगितलें. "ब्रह्म सत्यं, जगन्मिथ्या, जीवो ब्रह्मैव नापरः" हा सिद्धान्त त्यांनी मांडला व ज्ञानमार्ग हाच मोक्षाप्रत नेतो, हें आग्रहाने प्रतिपादिलें.

इ. स. पूर्व सातव्या शतकांत गौतमबुद्धाने बुद्धधर्माची स्थापना केली. गौतमबुद्ध हा कपिलवस्तु येथील साक्यांच्या गणराज्यांतील एका प्रमुख सरदाराचा पुत्र. साक्य हे हिंदु होते. सिद्धार्थाने हिंदुधर्माचें अध्ययन केलें होतें. वयाच्या तिसाव्या वर्षी त्याने गृहत्याग केला व तो बोधीवृक्षाखाली ध्यानस्थ बसला असतां त्याला ज्ञानप्राप्ति झाली. वाराणशीच्या आसमंतांत धर्मचक्र फिरूं लागलें. बौद्धधर्माचा पाया रोवला गेला.

जैनधर्म हा तर फार प्राचीन. जैनांचा पहिला तीर्थंकर ऋषभदेव याचा उल्लेख विष्णु व भागवतपुराणामध्यें सांपडतो व या पुराणांत तो फार प्राचीन काळीं होऊन गेला असाच उल्लेख आहे. यजुर्वेदामध्यें ऋषभ, अजित व अरिष्टनेमी या तीन तीर्थंकरांचा उल्लेख आहे. त्यांचा २२ वा तीर्थंकर नेमिनाथ हा श्रीकृष्ण यादवाकालीन तर पार्श्वनाथ हा २३ तीर्थंकर इ.स. ८०० पूर्वीचा. वर्धमान महावीर सहाव्या शतकांतला.

भारतवर्षामधील संस्कृतीचा पिंड अशा प्रकारें तयार झाला. महाभारतामध्यें व रामायणामध्यें चित्रशाळांचीं वर्णनें आलीं आहेत. नृत्याचीं, गायनाचीं वर्णनें आलीं आहेत. संस्कृतीच्या या अंगांचा उदय देखील पुरातन काळापासून झाला. भारतीय संस्कृतीला बहर आला. सर्व भारतवर्ष या बहरानें फुलून गेला, उजळून निघाला.

वेदान्तामध्यें जी ईश्वराची कल्पना केली आहे ती निराकार, निर्गुण व निर्लेप अशा ईश्वराची कल्पना आहे. पण अशा प्रकारच्या देवाचें साधारण माणसाला आकलन होत नाहीं. आर्यांचा आर्यधर्म साधारण माणसाच्या आकलनशक्तीपलीकडचा होता. बौद्धांनीं हें ओळखलें व ईश्वरचिंतनांत अथवा आध्यात्मिक चिंतनांत न शिरतां त्यांनी साधारण माणसाला रुचेल आणि समजेल असा अष्टांग मार्ग सांगितला. निर्वा-

णाचा मार्ग इतका सोपा केल्यावरहि आर्यधर्माची भारतीय मनावरची पकड कांहीं कमी झाली नाहीं.

इ स. पूर्वीच्या तिसऱ्या शतकांत अशोक हा मौर्य राजा, मगध राज्याचा सम्राट झाला. यानें आपलें सर्वस्व बौद्धधर्माच्या प्रसाराकरितां अर्पण केलें. बौद्धधर्माचा प्रसार सर्वदूर झाला. बौद्धधर्माचे धर्मप्रसारक भारताबाहेर गेले.

भारतीय कलेचा ज्ञात इतिहास अशोककाळापासून सुरूं होतो. अशोककाळामध्यें बरेचसे स्तूप निर्माण झाले, अशोकस्तंभ निर्माण झाले व मग बौद्ध विहार व बौद्ध चैत्य हे बौद्ध स्थापत्याचे प्रमुख प्रकार अस्तित्वांत आले. भारतामध्यें स्थापत्य, शिल्प व चित्रकला यांचा वाढत्या प्रमाणांत धर्मप्रचारार्थ उपयोग करण्यांत येऊं लागला, मूर्तिपूजा सुरूं झाली.

मूर्तिपूजेच्या उदयापासून भारतीय कलेचें एक आगळेंच असें पर्व सुरूं झालें. आगळें एवढ्याचकरितां कीं पहिल्या प्रथमच येथें अव्यक्ताला व्यक्त स्वरूप द्यावयाचा प्रयत्न सुरूं झाला. अमूर्ताला मूर्तात व्यक्त करावयाचें ही साधी गोष्ट नव्हती. भारतीय शिल्पकार या कल्पनेनें नेहमीच भारावून जावयाचा. देवाची प्रकृति ही निराकार, निर्गुण व निर्लेप. मग या निराकार देवाला आकार कसा द्यावयाचा, त्याला रूप कसें द्यावयाचें, या निर्गुणाला सगुण कसा करावयाचा, त्याला गुण देऊन त्या गुणांना स्वरूप कोणतें व कसें द्यावयाचें ? आपण अव्यक्ताला व्यक्त स्वरूप देत आहोंत, निराकाराला साकार करीत आहोंत, निर्गुणाला सगुण करीत आहोंत ही भावना सातत्यानें भारतीय कलाकारांत असे. आपणाहून मोठी, कांहीं तरी विलक्षण अशी शक्ति, आपल्याला सहजासहजीं आकलन न पावणारी शक्ति आपण निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहोंत ही जाणीव शिल्पकाराला असे. म्हणूनच ईश्वरी कल्पनेचें हें ‘अव्यक्तत्व’, ‘निराकारत्व’, ‘निर्गुणत्व’ त्यांच्या शिल्पांत इतक्या प्रकर्षानें दिसून येतें. ग्रीकांनी ईश्वराची कल्पना करीत असतांना देव म्हणजे अगदीं परिपूर्ण असा पुरुष अशी कल्पना केली. त्यांनी देवाला

मानवी आकृतींत बंदिस्त करून टाकलें. देवाच्या कल्पनेला मर्यादित केलें. देवाची आकृति व प्रकृति मानवी स्वरूपांत जखडून टाकली. आपण 'अव्यक्ता' ला 'व्यक्त' स्वरूप देत आहोंत ही कल्पना ग्रीक कलाकारांना शिवली नाहीं व म्हणून पाश्चिमात्य कलेमध्यें भारतीय कलेमधली खुमारी नाहीं, 'अव्यक्तत्व' नाहीं. भारतीय कलेमध्यें साकार झालेलें दिव्यत्व, आध्यात्मिकता पाश्चिमात्य कलेंत नाहीं.

अशोककालापासून बौद्ध कलेला प्रारंभ झाला. अशोकस्तंभ हे भारतीय स्थापत्याचे एक प्रमुख व वैशिष्टयपूर्ण असें अंग बनलें. इ. स. पूर्व दुसऱ्या शतकापासून ते इ. स. च्या तिसऱ्या शतकापर्यंत सांची, भार्हुत येथें मध्य-प्रदेशांत, व पश्चिम महाराष्ट्रामध्यें भोरघाट, नानाघाट व थालघाटामध्यें बौद्ध विहार, चैत्य व स्तूप बांधून अथवा कोरून काढण्यांत आले. पांचव्या शतकापासून ते सातव्या शतकापर्यंत महायान पंथीयांनी आपल्या कलाकृति याच भागांत निर्माण केल्या.

मौर्यांच्या नंतर शुंग राजे आले. त्यांच्या काळापासून हिंदु कलेचा प्रादुर्भाव झाला. इ.स. पूर्व दुसऱ्या शतकापासून इ.स.च्या दुसऱ्या शतकापर्यंत दक्षिणेमध्यें अमरावती व नागार्जुनकोंडाला बौद्ध कलेला बहर आला. इ. स. पूर्व दुसऱ्या शतकापासून इ. स. च्या पाचव्या शतकापर्यंत शातवाहन राजे, वाकाटक राजे यांच्या काळांत अजिंठ्याचीं कांहीं लेणीं तयार झालीं. इ. स. ३२० मध्यें गुप्त साम्राज्य अस्तित्वांत आल्यावर हिंदु स्थापत्य व शिल्प यांचें एक नवें पर्व सुरूं झालें. हिंदु व बौद्ध या दोनहि प्रकारच्या शिल्पाचा हा उत्कर्ष काल. या काळांत बुद्ध-'मूर्ति' परिपूर्ण झाली. या काळांतील अजिंठ्यामधील बुद्धमूर्ति म्हणजे बौद्ध शिल्पकलेचें उत्कर्षस्थळ आहे. या काळच्या शिव-विष्णु यांच्या मूर्तींचें सौंदर्य प्रकर्षानें जाणवणारें आहे. भितरगांवचें देवालय आज बऱ्याच पडीक अवस्थेंत आहे पण त्याचें शिल्प आजसुद्धां मन आकर्षून घेतें. देवगड हें मध्यप्रदेशमधील दुसरें गुप्त देवालय. या दोनहि ठिकाणीं पुढें हिंदु व बौद्ध स्थापत्याचें एक अविभाज्य अंग बनलेल्या गंगा-यमुनेचीं शिल्पें प्रथमतःच दिसतात. या दोन देवता गर्भ-गृहाच्या दोन बाजूला

कोरण्याचा प्रकार गुप्तकालापासून सुरू झाला. गुप्तकलेचा परिणाम भारताबाहेर मलाया, जावा, सुमात्रा, बाली, बोर्निओ, आनाम व कंबोडिया या अतिपूर्वेकडील भागांत दिसून येतो.

आठव्या शतकांत बिहार, बंगाल भागांत पाल राजांचा उदय झाला व याच सुमारास दक्षिणेमध्यें चोल व पल्लव राजांचा उदय झाला. या काळांत दक्षिण भारतीय स्थापत्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. आठव्या व नवव्या शतकांत दक्षिण भारतामध्यें सर्वदूर शिवमंदिरें बांधण्यांत आलीं. दक्षिण भारतानें भारतीय स्थापत्यांत एक नवीनच क्रांति घडवून आणली. त्यांचीं प्रवेशद्वारें (गोपुरें), त्यांचीं उत्तुंग शिखरें यांनीं भारतीय स्थापत्यामध्यें नवें चैतन्य ओतलें. चोल स्थापत्याविषयीं लिहितांना फर्ग्युसन म्हणतो कीं चोल हे स्थापत्याची प्रचंड कल्पना करीत आणि एकाद्या जवाहिऱ्याप्रमाणें ती कल्पना प्रत्यक्षांत नीटसपणें उतरवीत असत.

चोल स्थापत्याप्रमाणें चोल शिल्प पण वैशिष्ट्यपूर्ण आहे व या शिल्पाचा प्रभाव अति पूर्वेकडील राज्यांत दिसून येतो. पल्लवाचें शिल्प पण अगदी डोळ्यांत भरण्यासारखें व अत्यंत आकर्षक व भावपूर्ण आहे. पातळ व सडसडीत बांध्याच्या मूर्ति व रेखीव चेहरे हे पल्लव शिल्पांचें वैशिष्ट्य आहे.

याच सुमारास उत्तर भारतीय स्थापत्याचाहि आविष्कार झाला. उत्तर भारतीय शिल्प तर गांधार व कनिष्क काळाइतकें पुरातन आहे. त्याचा इतिहास पण तितकाच उज्ज्वल आहे.

भारतीय चित्रकलेची परंपरा ही अशीच पुरातन व उज्ज्वल आहे. महाभारत व रामायणांतील चित्रशाळा सोडल्या तरी इतर संस्कृत वाङ्मयामध्यें पण या कलेचा विकास झाला आहे. अजिंठ्यामध्यें तर भारतीय चित्रकलेचा इ. स. पूर्व दुसऱ्या शतकापासून इ. स. सातव्या शतकापर्यंतचा इतिहास चित्रित केला आहे. या चित्रकलेंतच भारतीय नाट्य-शास्त्र, नृत्य-शास्त्र व संगीत-शास्त्र यांचा इतिहास रंगविलेला

आहे. अजिंठ्यामधील पहिल्या लेण्यांतील नृत्यांगना, औरंगाबाद लेण्यांतील नृत्यांगना, कार्ल्याच्या चैत्यावरचीं नाच करणारीं युगुलें हीं याला साक्ष आहेत.

भारतीय संस्कृति ही अशा प्रकारें सजीव बनली होती. तिला मूर्त रूप प्राप्त झालें होतें. हें रूप ओजस्वी होतें. प्रकाशमान होतें. विष्णुपुराणांत म्हटल्याप्रमाणें,

"गायन्ति देवा: किल गीतकानि
धन्यास्तु ते भारतभूमिभागे ।
स्वर्गापवर्गा स्वदमार्गभूते
भवन्ति भूय: पुरुषा: सुरत्वात् ॥"

"देव सुद्धां भारतवर्षाची या शब्दांत स्तुति करतात. जेथें स्वर्गाचा मार्ग आहे. अशा भूमींत जे जन्मतात, ते आमच्यापेक्षां भाग्यवान् आहेत." या भारतवर्षाच्या संस्कृतीचे स्रोत आजूबाजूला इतर प्रदेशांवर पडणें केवळ अपरिहार्यच होतें.

× × ×

भारत हें जागतिक सांस्कृतिक केन्द्रामधील एक प्रमुख केन्द्र होतें. विशेषत: आशियाच्या भूगोलांत भारताला एक अनन्यसाधारण स्थान आहे. भारत म्हणजे आशियाचा मध्यबिंदु. आशिया हें जर एक चक्र मानलें तर भारत या चक्राचा मध्यबिंदु होतो. या चक्राचे आरे: पश्चिमेला ईराण व अफगाणिस्थान, उत्तरेला मध्य आशिया तिबेट व चीन, पूर्वेला ब्रह्मदेश, आसाम, इंडो-चीन व इंडोनेशिया व दक्षिणेला सिलोन.

भारताचा भूगोल हा असा आहे. आशियाच्या मध्यावर असलेल्या या भागांत एक तेजस्वी व चैतन्यमय अशी संस्कृति निर्माण झाली होती व या संस्कृतीचा प्रसार आजूबाजूच्या या भूभागांत होणें अगदीं अपरिहार्य होतें. भारताच्या इतिहासपूर्व काळांत व ऐतिहासिक काळांत भारतीय संस्कृतीचा प्रसार अखंडपणें चालू राहिला. या संस्कृति-

प्रसाराला हिमालयासारखा उत्तुंग पर्वतराज देखील आडवा आला नाहीं. भारताच्या तीन बाजूला असलेल्या सागरानें पण याला अडथळा आणला नाहीं. सर्व नैसर्गिक अडचणींतून भारताची इतर राष्ट्रांशीं व्यापार व सास्कृतिक देवाण–घेवाण चालूंच होती.

हिमालय दिसतो तेवढा अनुल्लंघनीय नाहीं. त्याच्या उत्तुंग शिखरांतून तिबेटमध्यें जावयास वाटा आहेत. आसाममध्यें वाहात असलेल्या ब्रह्मपुत्रेंतून थेट चीनला जातां येतें. सिलोनमधून पण तिबेटमध्यें जावयास वाट आहे. काश्मीरमधून तुर्कस्थानांत जातां येतें

भारताचा किनारा अवाढव्य आहे. पण या किनाऱ्यावर बंदरें कमी आहेत. पश्चिम किनाऱ्यावरचीं बंदरें भडोच, क्रँगनोर व पोरकड. 'पेरीप्लस ऑफ दि अेरीथ्रन सी' मध्यें पश्चिमेकडील कांहीं जहाजें पूर्व किनाऱ्यावरील बंदरांत जात असल्याचा उल्लेख आहे. पूर्वेकडील बंदरें म्हणजे कावेरीपटणम्, पाँडीचरी व सोपत्म (हल्लीचें मार्कानुम्.) येथून भारतीय जहाजें सुवर्णद्वीपाकडे जात व पुढें चिनी समुद्रांतून चिनी बंदरांत जात. वर निर्देशिलेल्या ग्रंथांत पूर्वेकडील बंदरांतून हीं जहाजें 'क्राअीस' नांवाच्या बंदरांत जात असत असा उल्लेख आहे. या 'क्राअीस चेर्सोनिसस' चा उल्लेख टॉलेमी याने पण आपल्या ग्रंथांत केला आहे. हा उल्लेख इंडोनेशियाचा असावा असें, अभ्यासकांचें मत आहे. एकंदरींत जावा, सुमात्रा वगैरे मलायाच्या द्वीपकल्पांतील भागाशीं भारताचा फार पुरातन काळापासून संबंध आला.

★ ★ ★

या पुस्तकाची मर्यादा पूर्वेपुरती मर्यादित ठेवली आहे. वास्तविक पाहतां इराण, अफगाणिस्थान, मध्यआशिया वगैरे भागांशीं भारताचे संबंध फारच जुने आहेत. त्यांचा परामर्श इतर केव्हां घेतला जाईल. येथें मात्र आग्नेय आशिया एवढी मर्यादा घातलेली आहे. आग्नेय आशिया या संज्ञेंत फुनान, चम्पा व कंबोडिया, ब्रह्मदेश, जावा, सुमात्रा व बाली एवढेच प्रदेश अभिप्रेत आहेत. या भागांतील भारतीय अवशेष आज सर्व जगाला ललामभूत होऊन राहिलेले आहेत. पण भारतीय

संस्कृतीच्या या अंगाची माहिती भारतामध्यें विशेष उपलब्ध नाहीं. बृहत्तर भारताच्या विषयावर डॉ. मुजुमदार, प्रा. नीळकंठशास्त्री यांसारख्या थोर विद्वानांनी खूप कार्य केलेलें आहे. पण एकंदर भारताच्या इतिहासांत 'बृहत्तर भारत' हा एक उपेक्षित भाग आहे, यांत शंका नाहीं. भारतीय इतिहासाच्या या उपेक्षित अंगाची माहिती सर्वसामान्य जनतेला उपलब्ध होणें अगत्याचें आहे.

भारतीय संस्कृतीच्या आग्नेय आशियामधील प्रसाराविषयीं बोलतांना पौर्वात्य व पाश्चिमात्य 'हिंदुत्वकरण' (Hinduisation) हा शब्द वापरतात. याचा अर्थ 'भारतीय' या अर्थानें घ्यावयाचा. कारण भारताबाहेर पसरलेल्या या संस्कृतींत बौद्धधर्माचा मोठा भाग होता. अर्थात् निदान कांहीं ठिकाणीं तरी या दोन धर्मांची गफलत होणें साहजिक होतें. कारण तेथें प्रचलित असलेला तंत्रयान बौद्ध धर्म व हिंदु धर्म यांतला भेद सहजासहजीं उलगडणारा नाहीं. कारण तंत्रयान बुद्ध धर्मांत हिंदु देव-देवता व विधि यांचें एवढें प्राबल्य आहे कीं हा धर्म हिंदु नाहीं, हें जाणवतच नाहीं. तीच कथा हीनयान पंथीयांची. या पंथांची मंडळी आपले धार्मिक विधि हिंदु ब्राह्मणांच्या हातूनच पार पाडीत. या दोनहि पंथीयांना सरकार-दरबारीं पण धार्मिक विधीकरितां ब्राह्मणच लागत आणि आजहि ब्रह्मदेश, सयाम व कंबोडियामध्यें हीच परिस्थिति आहे.

भारत व आग्नेय आशिया यांमधील संबंध इ. स. पूर्वीच्या काळापासून आहेत. प्राचीन काळापासून भारताचे अतिपूर्वेकडील द्वीपकल्पांशीं, चीनशीं, व इंडो-चीन भागाशीं संबंध होते. भारतीय व्यापारी व्यवसायानिमित्त या ठिकाणीं जाऊन स्थायिक होत व या भागाचे व्यापारी भारतामध्यें स्थायिक होत. बंगाल व कोरोमांडलच्या किनाऱ्यावर आग्नेय आशियाई लोकांच्या वसाहती होत्या. हा संबंध बऱ्याच काळापर्यंत चालूं राहिला. या संबंधांतूनच पुढें सांस्कृतिक संबंध निर्माण झाले. भारतीय संस्कृतीच्या सान्निध्यांत आल्यावर हे आग्नेय आशियाई लोक त्या संस्कृतीनें भारावून गेल्यास आश्चर्य नाहीं. या लोकांनीं ही संस्कृति

आत्मसात् केली. आग्नेय आशियाअी लोकांवर या संस्कृतीचा एवढा जबरदस्त पगडा बसला की थोड्याच काळांत मलाया, सुमात्रा, जावा, बाली, बोर्निओ वगैरे ठिकाणीं हळूहळू भारतीय धर्मीय हिंदु अथवा बौद्ध राज्यें अस्तित्वांत येऊं लागलीं. यांची कला, यांच्या सामाजिक रूढि, यांचा धर्म, यांची भाषा, भारतीय बनली. संस्कृत भाषेचा प्रसार येथें झपाट्याने झाला. संस्कृत भाषेच्या माध्यमद्वारां ते वाङमयनिर्मिति करूं लागले. रामायण येथें परत घडलें. महाभारताचा दुसरा जन्म झाला. सर्व कथा–पुराणें येथें परत जन्म पावलीं. मनूचें धर्मशास्त्र त्यांनी आपलें केलें, भारतीय शासनपद्धतीचें अनुकरण केलें. मलायांतील द्वीपसमूहाचें स्वरूपच भारतीय बनलें.

* * *

भारतीयांना इतिहासाचें महत्त्व कधींच वाटलें नाहीं. त्यांना ऐतिहासिक दृष्टीच नव्हती. म्हणूनच भारतीय परंपरेमध्यें 'वृहत्तर भारता'ची नोंद कुठेंच मिळत नाहीं. भारतीय संस्कृतीच्या परदेशगमनाची माहिती मिळते ती चिनी इतिहासावरून. भारतीय संस्कृतीची पहिली नांदी, फुनान (इंडो–चीनमध्यें) येथें झाली असें चिनी इतिहास सांगतो. या माहितीप्रमाणें फुनानचें हिंदु राज्य भारतामधील कौण्डीण्य नांवाच्या ब्राह्मणाने इ. स. च्या पहिल्या शतकांत स्थापन केलें.

चंपाचाहि पहिला उल्लेख 'चिनी' वंशाच्या इतिहासांत सांपडतो. टॉंकिंगचा चिनी गव्हर्नर आपल्या बादशहाकडे लीन–यी च्या राज्याविषयीं तक्रार करतो. या राज्यांतील लोक आपल्या राज्यावर सारखे हल्ले करतात व यांचा बंदोबस्त व्हावा, अशी तो मागणी करतो. 'लीन–यी' हेच हिंदु चंपा. याच चंपाचा पुढें कंबुजदेश झाला.

ब्रह्मदेशाचा प्राचीन इतिहास इ. स. च्या पांचव्या शतकांत सुरू होतो. या सुमारास दक्षिण भारतांत कांजीवरम् येथें हीनयान पंथीयाचें वर्चस्व स्थापन झालें व येथून भारतीय संस्कृतीचा ब्रह्मदेशांत प्रवेश झाला. ब्रह्मदेशांत बौद्ध धर्माचा प्रसार झाला.

वृहत्तर भारताची परंपरा निर्माण झाली.

# फुनान

भारतीय संस्कृतीचा पहिला आविष्कार झाला तो फुनान या इंडो-चीनमधील भागांत. यासंबंधीची माहिती नमूद केली आहे ती चिनी इतिहासकारांनीं. भारतीय संस्कृति येथें आली त्या वेळीं आग्नेय आशिया-मधील संस्कृति प्रगत नव्हती. हा सर्व भाग नव-पाषाणयुगांत होता. या भागांत संस्कृतीचीं बीजें नेलीं तीं भारतीयांनीं.

फुनान हा 'बीऊ-नाम्' चा आधुनिक चिनी उच्चार. याच नांवानें चिनी या पूर्वख्मेरकालीन राज्याला ओळखीत होते. हें हिंदु राज्य मेकोंग नदीच्या खोऱ्यांत वसलें होतें. पूर्वीचें फुनान म्हणजे हल्लीच्या कंबोडियाचा एक भाग 'नाम्' म्हणजे पर्वत. ते स्वतःला पर्वतराज अथवा 'शैलराज' म्हणवीत असत.

फुनानची राजधानी व्याधपूर. प्रीवेंग प्रांतातील 'बानम्' हें खेडें. चिनी इतिहासकार सांगतात कीं हें 'ओक् ओ' च्या बंदरापासून १२० मैल आंत होतें. हें बंदर इ. स. च्या पहिल्या शतकापासून व्यापाराचें केन्द्र होतें. या प्रदेशांत कालव्याचें जाळें होतें व म्हणून एका टोका-पासून दुसऱ्या टोकापर्यंत जलमार्गानें प्रवास करतां येत असे. चिनी प्रवासी फुनानमधून जलमार्गानें मलायाला जावयाचें असा उल्लेख चिनी इतिहासांत सापडतो. फुनान हें भारत आणि चीन या दोहोंच्या मार्गावर असल्यामुळें व्यापाराचें मोठें केन्द्र होतें.

एवढें असूनहि फुनान अद्याप नवपाषाणयुगांतच होता. त्याला संस्कृ-तीचा गंधहि लागला नव्हता. तिसऱ्या शतकाच्या मध्यावर चिनी बाद-शहानें 'कांग-ताई' व 'चुयींग' या दोघांना फुनान येथें पाठविलें. कांग-ताई यानें या भेटीची माहिती नमूद केली आहे. फुनानचें राज्य इ. स. च्या पहिल्या शतकांत कौण्डीण्य नांवाच्या ब्राह्मणानें स्थापन केलें. हा कौण्डीण्य भारत अथवा मलायामधून आला असावा. यासंबंधीची आख्यायिका तो सांगतो. कौण्डीण्याला स्वप्न पडलें व त्याला फुनानला येण्याबद्दल ईश्वरी साक्षात्कार झाला. त्याप्रमाणें तो येथें आला. तेथील

अनुक्रमांक ........ दि: ........
क्रमांक ....260.... नों दि: ....

लोक कपडे घालीत नसत. फुनानला आल्यावर तेथील राणी लीऊ-येह (वीलो लीफ) हिने त्याच्याशी युद्ध करण्याचा प्रयत्न केला. पण त्याने जादूने तिला जिंकिलें. व तिच्याशीं लग्न करून तो फुनानचा राजा झाला. त्यानें लीऊला कपडे घालावयास शिकविलें व तेथील रानटी लोकांना सुसंस्कृत करण्याचा प्रयत्न सुरू केला.

या कौण्डीण्याबद्दलची आणखी माहिती चंपा देशांतील 'मिस्मेन' येथें मिळालेल्या शिलालेखांत मिळते. यांत उल्लेखिल्याप्रमाणें कौण्डीण्य हा भारतीय होता. याला द्रोणाचार्यांचा पुत्र अश्वत्थामा याने एक मंतरलेला भाला दिला. त्यानें तो आपल्या हातानें दूर फेकला व तो जिथे पडला ती जागा आपल्या राजधानीकरितां निवडली. त्याने नाग राजाची कन्या सोमा हिच्याशीं विवाह केला व एका नव्या वंशाची स्थापना केली. सोमा ही चिनी लीऊ-येह.

आपल्या पूर्वजांविषयीं माहिती देतांना पुढें ख्मेर राजांनीं याच कथेचा उल्लेख केला आहे. अंकोरच्या ख्मेर दरबारांत ख्मेर राजा व नाग राजकन्या यांची युति दर्शविणारा एक समारंभ मोठ्या थाटामाटानें साजरा करीत. हा समारंभ केवळ प्रतीकात्मक स्वरूपाचा असे. यांतील नाग-कन्येला नऊ फणा असल्याचें दाखवीत असत. ख्मेर शिल्पामध्यें या फण्याच्या नागाचें फार प्राबल्य दिसून येतें.

चीनच्या लीआंग वंशाच्या इतिहासांत कौण्डीण्याचा एक वंशज 'हुन पान हुआंग' याने ९० वर्षांचा होईपर्यंत राज्य केलें असा उल्लेख आहे. याच्या नंतर याचा दुसरा मुलगा 'पान-पान' हा गादीवर आला. याने सर्व राज्यकारभार आपला सेनानी 'फान-शी-मान' याच्यावर सोपविला. फान् हें भारतीय 'वर्मन्' चें चिनी रूपांतर. चीनच्या 'त्सी' च्या इतिहासाप्रमाणें पानमान्च्या मृत्यूनंतर लोकांनीं याला राजा केलें. हा फार पराक्रमी राजा निघाला. तो इ.स. च्या तिसऱ्या शतकाच्या सुरुवातीला गादीवर बसला. त्याने आपली सत्ता बरीच वाढविली. आरमार वाढविलें व आपला दरारा सर्वत्र प्रस्थापित केला. लीआंगच्या इतिहासाप्रमाणें याने दहा राज्यांवर आक्रमण करून त्यांना आपलें

मांडलीकत्व पत्करावयास लाविलें. हीं राज्यें कोणतीं, तें मात्र सांगता येणें कठीण आहे. पण त्यांतलीं कांहीं 'मेकोंग-दोन्नाओी दोआब' व कामरानचा उपसागर यामध्यें असावींत. यांतील 'कीऊ-टु' म्हणजे टॉलेमीचे कत्तिगर. हें कोचीन-चीन मध्यें आहे. 'तिअेन-सुअेन' हें मलायामध्यें असावें. विजयी फान-शी-मानने आपल्याला 'फुनानचा मोठा राजा' अशी उपाधि लाऊन घेतली. चिनी इतिहासावरून याने जवळ जवळ सर्व सयाम, कंबोडिया व लाओस व मलायाचा कांहीं भाग जिंकून घेतला असावा असें दिसतें.

फान-शी-माननंतर त्याचा पुतण्या व सेनानी फान-चान यानें राज्याच्या औरस वारसाला बाजूला सारून राज्य बळकाविलें. यानें २५ वर्षं राज्य केलें (इ. स. २२५ ते २५०). याने आपले वकील भारतामध्यें पाठविले. भारतामधून याच्याकडे कांहीं वकील आले. याने इ. स. २४३ मध्यें चीनला देखील आपले वकील पाठविले. यांच्याबरोबरच बादशहाकडे आपल्या पदरचे कांही गवय्ये पाठविले.

या राजाचा इ. स. २५० मध्यें 'फान-चांग' याने खून करून राज्य बळकाविण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा सेनानी फान-सुन यानें त्याचा खून करून आपणच राज्य बळकाविलें. याच्या काळांत चीनच्या बादशहानें आपले वकील कांग-ताई व त्रु-यींग याच्या दरबारांत पाठविले. कांग-ताईनें फुनानची माहिती लिहून ठेविली आहे. ''फुनानच्या सर्व शहरांना कोट आहेत. शहराच्या आंत अनेक राजवाडे व प्रासादतुल्य वाडे आहेत. पण येथील लोक मात्र कुरूप, काळे व कुरळ्या केसाचे आहेत. ते नागडे फिरतात. पण साधे आहेत. चोऱ्या करीत नाहींत. ते शेती पुरातन साधनांनीच करतात. त्यांना नक्षीकाम केलेले दागिने फार आवडतात. छन्नीने करावयाचें काम ते मोठचा आवडीने करतात. त्यांची जेवण्याचीं भांडीं बहुधा चांदीचीं असतात. ते कर सोनें, चांदी, मोतीं, अत्तरें वगैरे स्वरूपांत देतात. त्यांच्याकडे ग्रंथ आहेत, ग्रंथालयें आहेत व दफ्तरखाने आहेत.''

कांग-ताईने राजाला लोकांना कपडे सक्तीने घालावयास लावणारा कायदा करावयास सांगितला. राजाने सक्ती करून लोकांना कमरे-भोवतीं कापड गुंडाळावयास लाविलें. आजहि कंबोडियामध्यें 'संपोत' कमरेभोंवती गुंडाळायची पद्धत आहे.

कांग-ताईच्या वर्णनावरून एका प्रगत अशा संस्कृतीचें चित्र डोळ्यांसमोर येतें. ज्या राज्यामध्यें ग्रंथ व ग्रंथालयें आहेत तेथें ते वाचणारे लोकहि आहेत असें मानावयास हरकत नाहीं. फुनानच्या राज्यामधील लोक चांदीचीं भांडीं वापरतात, अत्तरें वापरतात, कर चांदी, सोनें, मोतीं यांच्या स्वरूपाने देतात. स्त्रिया नक्षीकाम केलेले दागिने घालतात. पण कपडे मात्र कोणी घालत नाहीं, हें पटण्यासारखें नाहीं.

फान-सुनने इ. स. २८७ पर्यंत राज्य केलें. इ. स. २६८ ते २८७ मध्यें याने चीनला चारदा वकील पाठविले. मात्र चीन व फुनानचे संबंध नेहमीच कांहीं सलोख्याचे राहिले नाहींत. इ. स. २७० मध्यें फान-सुनने लीन-यी (चंपा) चा राजा 'फान सीअुंग' याच्याशीं सख्य करून टोंकिंग या चिनी प्रांतावर आक्रमण केलें. इ. स. २८० मध्यें टोंकींगच्या गव्हर्नरानें बादशहाकडे याबद्दल तक्रार केली. 'चीन' वंशाच्या इतिहासांत हें लीन-यीचें राज्य एका शतकापूर्वीं 'किऊ लीएन' यानें स्थापन केलें असल्याचा उल्लेख आहे. हेंच इतिहासप्रसिद्ध चंपा.

येथपासून सुमारें पाऊणशें वर्षेपर्यंत फुनानचा उल्लेख सापडत नाहीं. पाऊणशें वर्षांनंतर फुनानमधील वकीलातीचा उल्लेख सापडतो. हे वकील 'तीएन-चु चन-टन' याने पाठविले. 'तीएन-चु' म्हणजे भारत. 'चन-टन' म्हणजे चन्दन. या राजाचें नांव चन्दन असावें. यानंतर चवथ्या शतकामध्यें कौण्डीण्य नांवाचा दुसरा ब्राह्मण फुनानला येतो. पहिल्या कौण्डीण्याप्रमाणें हा देखील 'ईश्वरी संकेत' मिळाल्या-मुळें फुनानला येतो. फुनानचे लोक त्याला राजा करतात. हा देखील भारतामधून आल्याचा उल्लेख मिळतो.

भारताची फुनानमधील ही दुसरी वसाहत. पहिली वसाहत इ. स. च्या पहिल्या शतकांतील. या दुसऱ्या हिंदु वसाहतीनंतर फुनानमध्यें भारतीय संस्कृतीची दुसरी मोठी लाट आली, व हिने फुनानला संपूर्णतया भारतीय करून टाकलें. येथून पुढील राजांचीं नांवें भारतीय आहेत. इ.स.४३४, ४३५ व ४३८ मध्यें श्री. 'ईन्द्र-वर्मन्' अथवा 'श्रेष्ठ-वर्मन्' याने चिनी बादशहाकडे वकील पाठविले. याला चिनी भार्षेत 'चे-ली-टो-पा-मो' असें म्हटलें आहे. यानंतरचा चिनी इतिहासांत नमूद झालेला दुसरा राजा म्हणजे 'चो-चे-पा-मो' अथवा 'जय-वर्मन्'. याचें नांव संस्कृत शिलालेखांत सांपडतें. याने इ. स. ४८४ ते ५१४ पर्यंत राज्य केलें, असें चिनी इतिहास सांगतो.

# कंबुज – देश

पुरातन कंबुज देश म्हणजे हल्लीचा कंबोडिया व कोचीन–चीन हा ख्मेर लोकांचा प्रदेश. या प्रदेशावर इ. स. ५५० ते १४५० पर्यंत हिंदु राजे राज्य करीत होते. या काळांतील तेथील संस्कृति अतिशय प्रगत अशा अवस्थेंत होती. कंबुजदेशामधील अमर स्मारकें याला साक्ष आहेत. परंतु कंबुज देश हें येथील भारतीय संस्कृतीचे पहिलें केन्द्र नाही. याच्याहि पूर्वी याच भागांत दुसरें मोठें हिंदु राज्य होतें. तें म्हणजे फुनान.

हें फुनानचें राज्य सहाव्या शतकाच्या मध्यावर नाहीसें झालें. याचें कारण कीं फुनानचे ' चेन–ला ' चे मांडलीक राजे फार बलवान् झाले व त्यांनी फुनानची सत्ता नामशेष केली. याची माहिती चीनच्या 'सुई' वंशाच्या इतिहासांत अशी दिली आहे. "चेन–लाचें राज्य लीन–यी हें नैर्ऋत्येला आहे. हें फुनानचें मांडलीक राज्य होतें. येथील राजवंशाचें नांव ' चा–ली ' असें होतें व राजाचें नांव ' चे–तो–स्सेऊ–न ' होतें. याच्या पूर्वजांनीं आपलें राज्य बळकट करून ठेविलें होतें. 'चे–तो–स्सेऊ–न ' नें फुनानवर हल्ला केला व तें जिंकून घेतलें." लीन–यी म्हणजे चंपा. ' चा–ली ' म्हणजे 'क्षत्रिय' व 'चे-तो-स्सेऊ-न' म्हणजे 'चित्रसेन'.

फुनान हें दक्षिण कंबोडिया व कोचीन–चीन एवढें पसरलें होतें. चेनला याच्या उत्तरेला होतें. हें मेकोंग नदीच्या खोऱ्यांत ' स्टुंग गॅंग ' पासून उत्तरेकडे पसरलें होतें. हा भाग म्हणजे हल्लीचा उत्तर कंबोडिया व लाओसचा दक्षिण भाग. याची राजधानी ' लींग–कीआ–जो–जो ' म्हणजे ' लींगपर्वत ' ही होती. या राजधानीच्या शहरांत ' जो-तो-ली ' म्हणजेच भद्रेश्वर नांवाचें देवालय होतें.

दहाव्या शतकाच्या एका ख्मेर शिलालेखांत या राज्याची स्थापना ' कंबु स्वयंभू ' ने केली असें म्हटलें आहे. हा भारतामध्यें राजा होता. त्याची प्रिय पत्नी मेरा हिच्या मृत्यूनें त्याला फार दुःख झालें व तो राज्य सोडून कंबोडियामध्यें जीव देण्याच्या हेतूने गेला. हा मोठा

शिवभक्त होता. कंबोडियाच्या अरण्यांत त्याला एक नागराजा भेटला व त्याने कंबूला जीव देण्यापासून परावृत्त केलें व त्याचा विवाह आपल्या कन्येशीं लावला. या दोहोंनी एक नवा वंश स्थापन केला.

कंबोडियाचा संस्थापक म्हणून कौण्डीण्याला मानतात. चवथ्या शतकांत आलेला कौण्डीण्य व त्याची नागपत्नी यांना पण कंबुज देशाचे संस्थापक मानतात. कंबुजची ही आख्यायिका कंबुज देशाचें नांव समर्थन करण्याकरितां जन्माला आलेली दिसते. चेनलामधील ज्या दोन भावांनी फुनानविरुद्ध बंड पुकारलें होतें, त्यांपैकीं थोरला बंधु भववर्मन चेनलाच्या गादीवर आला. याने 'कंबु-मेरा' वंशाची राजकन्या लक्ष्मी हिच्याशीं विवाह केला. भववर्मनाच्या कारकीर्दींत राज्याच्या सीमा वाढूं लागल्या. याच्यानंतर त्याचा धाकटा भाऊ चित्रसेन हा 'महेन्द्रवर्मन्' ही उपाधि लावून गादीवर बसला. हा मोठा पराक्रमी होता. याने आपले विजय साजरे करण्याकरितां लिंग-मंदिरें बांधलीं व तीं गिरीशाला अर्पण केलीं. याचा पुत्र ईशनवर्मन् हा इ. स. ५११ मध्यें गादीवर आला. याने आपलें राज्य पश्चिमेकडे वाढविलें. याने कौण्डीण्य-सोमा वंशाच्या 'स्टुंग-सेन' राज्यावर राज्य करणाऱ्या बालादित्याचा पराभव करून तें राज्य आपल्या राज्याला जोडलें. त्याने येथें नवें शहर बांधून त्यास 'ईशानपूर' असें नांव दिलें. यानंतर त्यानें चक्रंकपुरा, अमोघपुरा व भीमपुरा या वायव्य कंबोडियामधील तीन राज्यांवर आपलें वर्चस्व बसविलें. याने पश्चिमेला आपलें राज्य थेट द्वारावतीपर्यंत आणलें. याने इ. स ६३५ पर्यंत राज्य केलें. याच्यानंतर दुसरा भववर्मन् हा गादीवर आला. त्याच्यानंतर पहिला जयवर्मन् याने ४० वर्षें राज्य केलें. याचे बरेचसे शिलालेख उपलब्ध आहेत. यानें लाओसचा बराच भाग जिंकून घेतला. याच्या मृत्यूनंतर जवळ जवळ एक शतकपर्यंत अराजक माजलें.

या शंभर वर्षांत चेनलाचे दोन तुकडे होऊन हीं दोन राज्यें वेगळीं झालीं. या काळांत उत्तर चेनलांतून चीनमध्यें वकील गेले व हें राज्य बरेंच तग धरून राहिलें. दक्षिण चेनलांत कौण्डीण्य-सोमा वंशाच्या

दोन राजघराण्यांत कलह माजले. यांत अनिंदितपूरचा बालादित्य वंश वरचढ ठरला. या वंशाचा राजेन्द्रवर्मन् इ. स. च्या आठव्या शतकाच्या उत्तरार्धांत येथें राज्य करीत होता. या शतकांत दक्षिण चेनलावर 'झबग' च्या राजानें हल्ला केला. याचें कारण चेनलाचा महीपतीवर्मन् याने झबग (श्रीविजय) च्या राजाचें शीर आपल्याला ताटांत घालून नजर करावे अशी इच्छा प्रदर्शित केली. ही बातमी श्रीविजयाच्या राजाच्या कानांवर पोहचताच त्याने ख्मेरवर हल्ला चढवून याचाच शिरच्छेद केला व त्याचें डोकें त्यानें त्याच्यानंतर राज्यावर आलेल्या राजाकडे पाठविलें.

इ. स. ८०२ मध्यें दुसरा जयवर्मन् राज्यावर आल्यावर चेनलाच्या राज्याची विसकटलेली घडी परत नीट बसली. याने शिवकैवल्य नामक ब्राह्मणाला आपला धर्मगुरु करून देवराजपंथाची स्थापना केली. याने 'इन्द्रपूर' ही आपली राजधानी केली. याने कंबुजदेशामधील मोठ्या तलावाजवळ 'हरीहरलय' नांवाचें दुसरें नगर वसविलें व तें राजधानीचें शहर बनलें. याच्यानंतर आलेल्या तिसऱ्या जयवर्मनानें २७ वर्षे राज्य केलें. याच्यानंतरचा महत्त्वाचा राजा म्हणजे यशोवर्मन्, याने अंकोर हें नगर वसविलें व शिव व विष्णूचीं बरींच देवालयें बांधलीं.

दहाव्या शतकांतील ख्मेरचा इतिहास हा स्थापत्याचा इतिहास आहे. हा ख्मेर संस्कृतीचा उत्कर्षकाल. या काळांतील सर्व राजांनी मंदिरें उभारलीं. या मंदिरामध्यें देवराजपंथाला अनुसरून राजा, राणी यांचीं शिल्पें तयार केलीं जात व तीं या मंदिरांत ठेवलीं जात. या वेळचीं शिव, विष्णु, हरिहर, लक्ष्मी, पार्वती आणि बोधिसत्त्वाची जीं शिल्पें आहेत तीं तत्कालीन राजे, राण्या, त्यांचे सरदार वगैरेंचीं आहेत.

नवव्या व दहाव्या शतकांत येथें शैवपंथाचें प्राबल्य फार होतें. बाराव्या शतकांत विष्णूचें महत्त्व वाढलें व येथील सर्वांत मोठें स्मारक 'अंकोर वाट' चें देवालय हें विष्णूचें देवालय म्हणून बाराव्या शतकांत जन्माला आलें. शिव आणि विष्णु यांच्याबरोबरच बौद्धधर्मीय सुद्धां

लोक होते. पण बहुसंख्य लोक हिंदु होते. सरकार-दरबारीं मनूच्या धर्मशास्त्राःप्रमाणें चालत असत. पांचव्या जयवर्मन्ने (इ. स. ९६८ तें १००१) बांटी श्री' चें सुंदर देवालय बांधलें.

बाराव्या शतकांत दुसऱ्या सूर्यवर्मनानें 'अंकोर वाट' ची अमर कलाकृति निर्माण केली. अंकोर वाटच्या देवालयाएवढें मंदिर सबंध जगात कोठेहि नाहीं. ख्मेर काळाच्या वैभवाचें हें चिरस्मरणीय व अत्यंत सुंदर असें स्मारक आहे.

याच काळांत चंपा व कंबोडिया यांचे संबंध बिघडले. इ. स. ११६७ मध्यें चंपाने कंबोडियावर हल्ले करावयास सुरुवात केली. त्यानीं अंकोर जिंकून घेतलें व तें लुटलें. कंबोडियाच्या राजांनीं आपली सत्ता बळकट करून चंपाचा पराजय केला. सातव्या जयवर्मनानें आपण बांधलेल्या 'बयोन' देवालयाच्या भिंतीवर त्याचें चंपाशीं झालेलें युद्ध कोरून ठेवलें आहे.

या सुमाराची एक महत्त्वाची घटना म्हणजे सातव्या जयवर्मनाचा पुत्र ब्रह्मदेशामध्यें गेला असता हीनयान बौद्ध पंथीय झाला. तेराव्या शतकात याचा परिणाम ख्मेरमध्यें दिसून आला. कंबोडियांत बौद्ध धर्माचा प्रसार झाला.

पंधराव्या शतकांत सयामच्या ताय लोकांचें आक्रमण सुरूं झाल्यावर या राज्याचा ऱ्हास झाला.

**कंबुज-देशांतील भारतीय कला**

कंबुज देश हें भारतीय कलाकृतीचें एक प्रमुख केन्द्रस्थान झालें. हिंदु व बौद्ध धर्मीयांच्या कलाकृति येथें सापडतात. बुद्धाच्या व विष्णूच्या मूर्ति कंबोडिया, कोचीन-चीन, ईशान्य सयाम व मलाया या सर्व ठिकाणीं मिळतात.

दक्षिण फुनानमध्यें सांपडलेल्या हरिहराच्या (विष्णु व शिव) दोन मूर्ति नोपेनच्या वस्तुसंग्रहालयांत ठेविल्या आहेत. (आकृति क्र. १ व २) या दोनहि मूर्ति शिल्पकाराचें कौशल्य दाखविणाऱ्या आहेत. या दग-

डाच्या मूर्ति घडविण्यांत शिल्पकाराने त्यांना सजीव केलें आहे. या मूर्ति बोलक्या आहेत. त्यांच्या अंगांत रक्त सळसळतें आहे. जीवनरस ओतप्रोत भरला आहे असें वाटतें. स्थानिक कलाकारांच्या कलेचा हा आविष्कार असला तरी या कलेचें स्फूर्तिस्थान मात्र भारतच आहे. या मूर्ति सातव्या शतकांतील, अंकोरपूर्वकालीन असाव्यातसें वाटतें.

शिवाचें अर्धनारीरूप दाखविणारें एक शिल्प फुनानमध्यें सापडलें आहे. हें शिल्प बैठें आहे. त्याची उंची २ फूट व ४ इंच इतकी आहे. हें शिल्प अंकोर-पूर्व-कालांतील आहे. कंबोडियांत श्रीदेव या ठिकाणीं आणखी कांही हिंदु देवतांचीं शिल्पें मिळालीं आहेत. श्रीदेवला एक संस्कृत शिलालेख पण मिळाला आहे. पण तो पूर्ण नसल्यामुळें त्याचा अर्थ लावतां येत नाहीं. या सर्व मूर्तींचें एक वैशिष्टय म्हणजे त्या त्रिभंगी आहेत. या मूर्ति आपल्याला पल्लव अथवा चालुक्य शिल्पांची आठवण करून देतात.

पूर्व-अंकोरकाळांत बौद्ध कला पण खूप प्रगत पावली होती. फुनानमधील बुद्धाच्या मूर्ति अत्यंत सुबक आहेत. दक्षिण कंबोडिया-मध्यें अशा बऱ्याच मूर्ति सापडल्या आहेत. येथील एक मूर्ति उभी आहे व दुसरी सिंहासनावर अधिष्ठित झाली आहे. या मूर्तींच्या वर निःसंशय गुप्त कलेची छाप आहे.

फुनानच्या शिल्पावर जसा भारतीय कलेचा ठसा दिसतो त्याप्रमाणें तेथील स्थापत्यावर सुद्धां भारतीय छाप पडली असल्याचा संभव आहे. दुर्दैवानें फुनानकाळांतील स्थापत्य आता अस्तित्वांत नाहीं या काळां-तील इमारती लाकडी असल्यामुळें त्यांचे अवशेष आता उपलब्ध नाहींत. परंतु नंतरच्या ख्मेरकाळामध्यें मात्र भारतीय स्थापत्याची छाप दिसून येते. कंबोडियामध्यें लोपबुरी येथें एक ख्मेर देवालय आहे. त्याचें शिखर मध्यप्रांतांतील खरोद येथील गुप्त देवालयाशीं खूप मिळतेंजुळतें आहे (आकृति क्र. ३ व ४). दुसऱ्या जयवर्मनाच्या पूर्वी राजधानीचें शहर मेकोंग नदीच्या कांठावर संभोर येथें होतें. येथें ख्मेर संस्कृतीचीं देवालयें आहेत. तीं सर्व हिंदु आहेत. येथें एका देवालयांत

तीन तीन गर्भगृहें आहेत. हीं आकारानें लंबचौकोनी आहेत. गर्भगृहावर त्रिकोणी आकाराचें शिखर आहे. हें शिखर एकावर एक विटा ठेवून तयार केलेलें आहे. कोठल्याहि शिखराला खरी कमान नाहीं. गर्भ-गृहाला एकच दरवाजा आढळून येतो. हीं सुरुवातीचीं देवालयें गुप्त पद्धतीचीं आहेत व तीं सर्व विटांचीं आहेत. सातव्या शतकापासून तीं नवव्या शतकापर्यंतचीं येथील देवालयें विटांचीं आहेत. दहाव्या शत-कांतहि इमारती बांधण्याकरितां विटा वापरण्याची पद्धत होती. अकराव्या शतकांत मात्र विटांच्या ऐवजीं वाळूच्या खडकांचा उपयोग इमारती बांधण्याकरितां होऊं लागला.

ख्मेरमधील देवालयाचीं शिखरें भारतीय छापाचीं आहेत. भारतीय शिखराचें वैशिष्टच म्हणजे असें कीं, त्यांना खरी कमान कधींच नसते. विटा रचत वरपर्यंत जावयाचें. वरपर्यंत जाण्याच्या या प्रवासांत सहा-जिकच वरचा भाग निमुळता होत जातो. या पद्धतीचा दोष असा कीं या पद्धतीमुळें शिखर नेहमीं अरुंद होतें. त्याला जास्त रुंदीच येत नाहीं. याउलट पाश्चिमात्य स्थापत्यामध्यें कमानी रुंद घेतल्यामुळें मुख्य देवालय हवेंतितकें रुंद करतां येतें. ख्मेरमधील पहिल्या तीन शतकां-तील देवालयांचीं शिखरें भारतीय पद्धतीचीं आहेत व म्हणून लहान आहेत. खऱ्या कमानीच्या अभावीं शिखरांना भव्य आकार देण्याकरितां येथें निराळीच युक्ति वापरली. ती म्हणजे मधल्या मुख्य शिखराभोवतीं बरीचशीं लहान लहान शिखरें घ्यावयाचीं व या शिखरांना, मूळ देवा-लयाला लागून आणखीं गर्भगृहें काढून अधिष्ठान द्यावयाचें.

### ख्मेर स्थापत्य व शिल्प

कंबोडियामधील ' अंकोर टोम ' म्हणजे ख्मेर संस्कृतीचा गौरव आहे. जुन्या ख्मेरचें अमर वैभव येथें साक्षात् रूप धारण करून उभें आहे. अंकोर टोमचीं देवालयें ही ख्मेर कलेची अमर अशी कलाकृति आहे. अंकोर टोम हें जगांतील अत्यंत वैभवसंपन्न असें स्मारक आहे, ख्मेर संस्कृतीचा सोनेरी कळस आहे.

काळाच्या विस्मृतींत हें वैभव कांहीं काळपर्यंत अज्ञात झालें होतें. परंतु फ्रेंच अभ्यासकांच्या व फ्रेंच पुरातत्त्व खात्याच्या प्रयत्नानें, पुरातन ख्मेर संस्कृतीचें हें अविस्मरणीय स्मारक जगाला ज्ञात झालें.

अंकोरचें हें जुन्या वैभवाचें चिरंतन प्रतीक १०,००० एकर इतक्या विशाल भूभागावर पसरलें आहे. या एवढ्या जमिनीवर काळाच्या जबड्यांतून निसटून वीस तरी अमर कलाकृति नेटक्या उभ्या ठाकल्या आहेत. या एवढ्या विशाल भूमीवर पसरलेल्या देवालयांत अंकोरचें प्रमुख देवालय अगदीं उठून दिसतें. मानवी हातानें इतकी भव्य, इतकी उदात्त व इतकी सुंदर कलाकृति कशी निर्माण झाली याचा विस्मय वाटतो !

यापैकीं कांहीं देवालयें फ्रेंच पुरातत्त्व खात्यानें परत त्यांच्या मूळ स्वरूपात उभी करण्यांत यश मिळविलें आहे. अंकोरच्या ईशान्येला १५ मैलांवर 'बांटी श्री'चें एक सुंदर देवालय आहे. हें शिवमंदिर आहें. तें आकारानें मोठें नाहीं, पण तें ख्मेर संस्कृतीचें एक सुंदर स्मारक आहे एवढें निश्चित. या देवालयाचें प्रमुख वैशिष्टय म्हणजे त्रिकोणी पानामध्यें काढलेल्या चित्तवेधक कलाकृति. त्रिकोणी पर्णाकृतीमध्यें अत्यंत सुंदर कलाकुसर केलेली दिसते. या कलाकृतीच्या आंत महाभारतामधील एक प्रसंग कोरला आहे, पहिल्या चित्रामध्यें तिलोत्तमा उभी असून तिच्या दोन बाजूला सुंद व उपसुंद हे राक्षस उभे आहेत (आकृति क्र. ५). त्यांची लढाई दुसऱ्या पर्णाकृतींत दाखविली आहे (आकृति क्र. ६). तिसऱ्या पर्णाकृतींत रावण कैलास पर्वत हलवीत असल्याचें दृश्य दाखविलें आहे.

'बांटी श्री'च्या मंदिरांत दोन भाग एकत्र आले आहेत. आंतल्या आवारांत गर्भगृहें आहेत. या आवाराला पूर्व-पश्चिमेला अशीं दोन गोपुरें आहेत मधलें गर्भगृह बाजूच्या दोन गर्भगृहांपेक्षां मोठें आहे. या आवाराभोवतीं आणखी मोठें आवार आहे.

ख्मेरचें दुसरें अविस्मरणीय स्मारक म्हणजे डांग्रेक डोंगरावर बांधलेलें 'प्रा विहार'चें देवालय. मुख्य देवालयापर्यंत पोहोंचण्या-

करितां वरीलचशीं गोपुरें ओलांडून जावयाला लागतें. गोपुरावर व देवालयाच्या पडक्या भिंतीवर सुंदर शिल्पें आहेत. हें शिवमंदिर आहे.

पण अंकोर टोमचें खरें वैभव म्हणजे 'अंकोर वाट' चें देवालय (आकृति क्र. ७). या देवालयाची भव्यता, ऐश्वर्य, सौंदर्य व स्थापत्या-मध्यें प्रतीत होणारी एकात्मता व संवादित्व अवर्णनीय आहे. सर्वंच अवनीतलावर मानवानें एवढी प्रचंड कलाकृति कधी निर्माण केली नाहीं. मानवी हातानें हें घडविलें कसें याचें आश्चर्य वाटल्याशिवाय राहात नाहीं व म्हणूनच अंकोर वाटचें हें देवालय मानवी हातानें बांधलें नसून तें बांधण्याकरितां खुद्द स्वर्गांतून देव आले होते, अशी आख्यायिका येथें प्रचलित आहे.

अंकोर वाटच्या देवालयासभोंवतीं एक प्रचंड तट आहे. या तटाच्या चारहि बाजूंची एकंदर लांबी अडीच मैल आहे. या तटाभोंवतीं जो पाण्यानें भरलेला खंदक आहे त्याची रुंदी ६५० फूट आहे. या खंदका-मधून एक दगडी रस्ता बांधला आहे. हा रस्ता तटाच्या दरवाजापाशीं जातो. पश्चिमेकडील दरवाज्यापासून पहिल्या सज्जापर्यंतचा जो रस्ता आहे तो १५६० फूट लांब असून ७ फूट उंच आहे. देवालयाचा पहिला सज्जा पूर्व ते पश्चिम ७९५ फूट असून उत्तर ते दक्षिण ६७२ फूट आहे. मुख्य शिखर तिसऱ्या सज्जावर असून त्याची उंची २१० फूट आहे.

अंकोर वाटमध्यें शिरतांना लागणारा कठडा हा देव आणि दान-वांचा बनला आहे. देव व दानव समुद्रमंथन करताहेत, असें दृश्य या कठड्यांत दाखविलें आहे (आकृति क्र. ८). यांतील देव-दानवांची उंची २० फूट आहे.

अंकोर वाटचा तिसरा सज्जा ७५० फूट चौरस आहे. याच्या चार कोपऱ्याच्या टोकांना चार मनोरे उभारले आहेत. हे सर्व मनोरे सज्जा-मुळें एकमेकांना मिळतात. येथून मुख्य गर्भगृहांत देखील जातां येतें. कारण या मनोऱ्यापासून तेथें जाण्याकरितां छप्पर असलेले प्रवेशमार्ग

आहेत. या तिसऱ्या व सर्वांत वरच्या सज्जाभोंवतीं चारहि बाजूला वेढणारा उंच प्रचंड सज्जा आहे. या सज्जाच्याहि चार बाजूंच्या टोकाला मनोरे आहेत. याभोंवतीं आणखी एक आवार आहे व या आवारा-भोंवतीं लॅटेराइट दगडांचा व वाळूच्या खडकाचा तट आहे.

अंकोर वाटचीं शिखरें विष्णूच्या करंड–मुकुटाची आठवण करून देतात. विष्णूचें शिरोभूषण एकावर एक करंडक ठेवल्याप्रमाणें असतें. वर जातांना हे करंडक लहान लहान किंवा निमुळते होत जातात. येथूनचीं शिखरें. करंडक एकावर एक ठेवल्याप्रमाणेंच वाटतात. हें देवालय विष्णूचें आहे म्हणून हा संबंध असावा.

मुख्य देवालयाच्या चारहि बाजूंना ओवऱ्यांच्या भिंतीवर थोडेसें वर आलेलें कोरीव काम केलेलें आहे. बाहेरील भिंतीवर जागोजागीं मानवी आकाराएवढ्या अप्सरांचीं शिल्पें कोरलीं आहेत. येथें अप्सरांचीं १७५० शिल्पें आहेत व या शिल्पांचें वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक अप्सरेची केशरचना व टोप वेगळा व अत्यंत प्रेक्षणीय आहे (आकृति क्र. ९). देवालयाच्या भिंतीवर त्रिकोणी पर्णाकृतींत, गणेशपट्टयावर व खोट्या दरवाज्यांवर विविध प्रकारचें नक्षीकाम आहे, कलाबुति आहेत व यामध्यें सुंदर सुंदर शिल्पें कोरलीं आहेत. अंकोरवाटविषयीं लिहितांना सर सिटवेल म्हणतात की "अंकोर हें जगांतलें एक मोठें आश्चर्य आहे. मानव हा पृथ्वीवरील सर्वांत अलौकिक प्राणी खरा. पण तो दगडांतून एवढें वैभव, एवढें सौंदर्य निर्माण करूं शकतो याबद्दल विस्मय वाटल्याशिवाय राहात नाहीं." रेजिनाल्ड मे म्हणतात कीं "अंकोर वाटचें देवालय पाहिल्यावर बारा-बुधरचें भव्यत्व चटकन् नजरेंत भरतच नाहीं."

अंकोर टोमचें दुसरें महत्त्वाचें देवालय म्हणजे 'बयोनचें' देवालय. हें बाराव्या शतकांत बांधलें. हें देवालय आहे असें चटकन् ध्यानांतच येत नाहीं. याच्या अवतीं-भोंवतीं खूप दाट झाडी आहे. या देवालयाचीं शिखरें आजूबाजूच्या अरण्याचाच एक भाग आहे, असा आभास होतो. या देवालयावर शिखरांची इतकी गर्दी झाली आहे कीं हीं शिखरें नसून दगडांच्या राशीच्या राशी रचून ठेवल्या आहेत असें वाटतें. या देवा-

त्याच्या मुख्य गर्भगृहाभोंवतीं आणखीहि गर्भगृहें बांधलीं आहेत. मंदिर बांधल्यानंतर त्याला भव्यता आणावयाची म्हणजे शिखर रुंद पाहिजे. पण देवळांत खरी कमानच नसल्यामुळें शिखर रुंद करण्याची सोय नव्हती. मग मुख्य गर्भगृहाच्या भोंवतालीं आणखीं गर्भगृहें बांधणें अपरिहार्यच होई. मग या बाजूच्या गर्भगृहांवर आणखीं शिखरें चढविता येत. अशा तऱ्हेनें बाजूला वरीचशीं गर्भगृहें बांधून वर शिखरांची गर्दी करता येई. बाजूचीं लहान करून मधले शिखर मोठें करावयाचें. यामुळेंच की काय बयोन येथें शिखरांची गर्दी झाली आहे. हें बौद्ध देवालय आहे. येथील एका शिलालेखावरून तें सातव्या जयवर्मनाने बांधलें हें कळतें.

## फुनान व कंबोडियामधील वाङ्मय, भाषा व धर्म

### वाङ्मय

भारताबाहेर जी भारतीय संस्कृति पसरली तिची सुरुवात संस्कृत भाषेच्या अभ्यासापासून सुरू व्हायची. फुनान, कंबुज-देश व चंपा या तीनहि ठिकाणीं संस्कृत भाषेचा प्रसार झाला व येथील शिलालेख संस्कृतांतच लिहिलेले आढळतात. चंपा येथें सापडलेला व्हो-चान्हचा शिलालेख संस्कृतांत आहे. यांतला कांहीं भाग गद्य आहे. पद्य भाग वसंततिलका वृत्तांत आहे. चंपाचा राजा शंभु-वर्मन् याचा शिलालेख जास्त काव्यमय आहे.

फुनानचा सर्वात जुना शिलालेख इ. स. च्या पांचव्या शतकांतील आहे. हा सर्व काव्यांत आहे. यांतील चार अथवा पांच श्लोक शार्दूलविक्रीडित वृत्तांत आहेत. त्यांच्या शिलालेखावरून त्यांना हिंदु देवदेवतांची चांगली माहिती होती हें स्पष्ट होतें. उदा०

"शक्रस्येव शाची नृपस्य कचिता स्वाहेव सप्तर्षिशः
रुद्रान् हव हरस्य लोकविदीता शा श्रीरीव श्रीपते : ।।"

चवथ्या ते सातव्या शतकामध्यें कोरलेले अनेक संस्कृत शिलालेख ब्रह्मदेश, सयाम, मलाया, सुमात्रा, जावा व बोर्निओ वगैरे ठिकाणीं सांपडले आहेत. यावरून या सर्व ठिकाणीं लोकांचा या भाषेशीं चांगला परिचय झाला होता असें दिसतें. येथील कवि अत्यंत अवघड प्रकारची काव्य-रचना देखील मोठ्या लीलेने करीत.

चंपाच्या लहानशा राज्यांत पन्नासाहून अधिक संस्कृत शिलालेख उपलब्ध झाले आहेत. हे गद्यांत व पद्यांत दोहोंतहि आहेत व यांची भाषाशैली ही अत्यंत प्रगत अशी आहे. या काळांत भारतामध्यें संस्कृत भाषा उपमा, उत्प्रेक्षादि अलंकारांनीं नटली-सजली होती. भाषेचा हा सर्व साज चंपामधील शिलालेखांत आढळतो.

कंबुज देशांमध्यें तर अगणित संस्कृत शिलालेख आहेत. डॉ. मुजुमदार यांनीं येथील १५० हून अधिक शिलालेखांचा संग्रह आपल्या ग्रंथांत केला आहे. यांतील बरेच शिलालेख अत्यंत काव्यमय आहेत. कांहीं बरेच विस्तृत आहेत. यशोवर्मन्च्या एका शिलालेखांत ५० श्लोक आहेत व या शिलालेखाच्या ११ प्रती जागोजाग सांपडल्या आहेत. दुसऱ्या एका शिलालेखांत १०८ श्लोक आहेत. याच्या ७ प्रती सापडल्या आहेत. आणखी एका शिलालेखांत ९३ श्लोक आहेत. ५० श्लोक असलेले बरेच शिलालेख उपलब्ध झाले आहेत. परंतु या सर्वां-पेक्षां राजेन्द्रवर्मन्चा शिलालेख म्हणजे एक महाकाव्यच आहे. त्यामध्यें २१८ श्लोक असून कांहीं बरेच मोठे आहेत. हे 'शार्दूलविक्रीडित' अथवा 'स्रग्धरा' वृत्तांत लिहिले आहेत.

हें काव्य निर्माण करणाऱ्या कवींनीं संस्कृत भाषेला माहीत असलेल्या प्रत्येक वृत्ताचा उपयोग केला आहे. त्यांना संस्कृत भाषेच्या प्रत्येक छंदाची बारीक माहिती होती. संस्कृत भाषेचे सर्व बारकावे त्यांनीं आत्मसात् करून घेतले होते. महाभारत, रामायण, पुराणें, इतर सर्व प्रकारचें संस्कृत वाङ्मय, भारतीय तत्त्वज्ञानांतील वेगवेगळे प्रवाह हे त्यांच्या पूर्ण परिचयाचे होते. हे सर्व प्रकार त्यांनीं आपलेसे करून घेतले होते. भारतीय संस्कृतीचीं सव

अंगें त्यांना परिचित होतीं. पाणिनीचें व्याकरण त्यांना भारतीयांइतकेंच अवगत होतें. त्यांना भारतीय वाङमयाविषयीं फार जिव्हाळा होता. प्रवर्सेनाचा ' सेतुबंध ' व मयुराचा ' सूर्यशतक ' यांचा उल्लेख त्यांच्या शिलालेखांत सांपडतो. प्राकृतचा खंदा लेखक गुणाढ्य हा त्यांना माहीत होता. एका शिलालेखांत कालिदासाच्या 'रघुवंशा' चा उल्लेख आहे व दुसऱ्या शिलालेखांत 'भारावी' चा आहे.

पाणिनीशिवाय पातंजलीच्या 'महाभाष्याचा' देखील उल्लेख आहे. राजा यशोवर्मन् याने महाभाष्यावर एक टिका लिहिल्याचा उल्लेख आहे. यशोवर्मनाचा एक मंत्री होराशास्त्राचा अभ्यासक होता. वात्सायनाचें 'कामसूत्र', विशालक्षाचें 'नीतिशास्त्र' व सुश्रुताचे 'आयुर्वेदहि' त्यांच्या परिचयाचे होते.

येथील शिलालेखांत त्रयी अथवा वेद, वेदान्त, स्मृति, रामायण, महाभारत बौद्ध व जैन यांचे पवित्र ग्रंथ भारतीय तत्त्वज्ञानाचीं षट्दर्शनें, मनूचें धर्मशास्त्र वगैरे सर्वांचा उल्लेख मिळतो.

' सिंहावलोकोतन्याय ' गौतमाचें ' न्यायशास्त्र ' व ' योगचार ' तत्त्वज्ञान यांना परिचित होतें.

या भागांतील शिलालेखांत पावलोपावलीं महाभारत रामायण व पुराणांतील कथा यांचा उल्लेख केलेला आढळतो. त्यांची लेखनशैली अनुप्रास, उत्प्रेक्षा, अतिशयोक्ति वगैरे अलंकारांनीं नटलेली दिसून येते.

थोडक्यांत म्हणजे कंबुज-देश जणू संस्कृतचें माहेरघर झालें होतें. येथील जीवन संपूर्णपणें भारतीय झालें होतें. यांच्या देव-देवता, यांचें वाङमय व व्याकरण, यांचीं देवालयें, यांचे संस्कार, यांची शासन-पद्धति, यांचे धार्मिक विधी हे सर्व भारतीय होते. येथील राजे-रज-वाड्यांनी यामध्यें पुढाकार घेतला. कंबुज देशामधील कितो तरी राजे आपला वेळ ज्ञानसंपादनांत घालवीत. कंबुज देशामधील दुसरा जयवर्मन् व यशोवर्मन् हे अशा प्रकारचे राजे होऊन गेले. चंपाचा राजा भद्रवर्मन् हा चारहि वेदांत पारंगत होता. श्री ७ वा जय-इन्द्रवर्मदेव हा व्याकरण,

ज्योतिष, महायानधर्म व धर्मशास्त्र वगैरेचा मोठा अभ्यासक होता. चंपाच्या तिसऱ्या इन्द्रवर्मनाविषयीं श्लोक आहे. त्यामध्यें त्याच्या विद्वत्तेची महती वर्णिली आहे.

" मीमांसा–शत्-तर्क–जीनेंद्र–सूर्मिस् –
स – काशिक-व्याकरणोदक्–अुध: ।
आख्यान–शैवोत्तर–कल्पमिना :-
पथिस्था एतेश्व–इति सत्कविनाम् ।।"

"राजा इन्द्रवर्मन् याची अनेक ज्ञानशाखांत गति आहे ज्याप्रमाणें मासा पाण्यामध्यें मुक्तपणें संचार करतो त्याप्रमाणें हा राजा विविध ज्ञानशाखांमध्यें मुक्तपणें संचार करतो. विद्वज्जनांमध्यें सुद्धां तो चमकून दिसतो. या राजाला पाणिनीचें व्याकरण, शैवांची काशिका, आख्यान, उत्तरकल्प व मीमांसा–शत्–तर्क वगैरे सर्व अवगत होते." मीमांसा शत्-तर्क म्हणजे पूर्व व उत्तर मीमांसा व बौद्ध, जैन, चार्वाक, सांख्य, न्याय व वैशेषिक हीं षड्दर्शनें. तिसरा इन्द्रवर्मन् चंपामध्यें दहाव्या शतकाच्या सुरुवातीला राज्य करीत होता. याचा वेदाभ्यास किती प्रगत होता हें वर निर्देशिलेल्या शिलालेखावरून स्पष्ट होतें.

फुनान, चंपा व कंबोडिया येथील राजे–रजवाड्यांनीं भारतीय संस्कृतीची परंपरा अशा तऱ्हेनें भारताबाहेर चालू ठेवली.

**भाषा व लिपि.**

भारतीय संस्कृतीची ही जी परंपरा परदेशांत गेली ती आपली सर्व साधन-सामग्री घेऊनच. भाषा हें तर विचारांच्या देवघेवीचें प्रमुख साधन. भारतीय तत्त्वज्ञानामधील प्रगल्भ विचार समजून घ्यावयाला भाषाहि तितकीच प्रगल्भ असणें आवश्यक होतें व म्हणून संस्कृतचा उपयोग अपरिहार्य होता. भाषेबरोबर लिपीहि गेली. आग्नेय आशियाच्या सर्व भाषा ब्राह्मीपासून तयार झाल्या आहेत. ज्या वेळीं हिंदु वसाहत करावयास या भागांत गेले तेव्हां पुष्कळ ठिकाणीं लिपि

अस्तित्वांतच आली नव्हती. तेव्हां भारतीय लिपीचा येथें प्रसार होणें अपरिहार्य होतें.

**धर्म :–**

भारतीय संस्कृति आग्नेय आशियांत गेली ती धर्माच्या हातांत हात घालूनच. धर्म व संस्कृति यांचा फार निकटचा संबंध आहे. धर्म हें संस्कृतीचें अधिष्ठान आहे. या काळांत येथील प्रमुख धर्म दोन. हिंदु व बौद्ध. हिंदूमध्यें शैव होते व वैष्णव होते. शिव व विष्णूचीं शिल्पें बौद्ध शिल्पानंतरचीं आहेत. कारण मूर्तिपूजा प्रथम बुद्धांनी आणली व त्याच्यानंतर हिंदूंनीं त्यांचें अनुकरण केलें. येथें गुप्तकाळापूर्वीचीं शिल्पें मिळत नाहींत. याचा अर्थ या भागांत बौद्ध धर्म अगोदर शिरला असा नाहीं.

चिनी इतिहासामध्यें यासंबंधींचा एक उल्लेख सांपडतो. फुनानचा राजा जयवर्मन् याने कांहीं व्यापारी कँटोन येथें पाठविले. तेथून ते परततांना नागसेन नांवाचा एक बुद्ध भिक्षु त्यांच्याबरोबर फुनान येथें आला. याला इ. स. ४८४ मध्यें जयवर्मनाने आपला वकील म्हणून चीनला पाठविलें. तेथें फुनानचें वर्णन करतांना त्यानें आपल्या देशाचा प्रमुख पंथ 'महेश्वरा'चा आहे असें सांगितलें. यावरून फुनानमध्यें कोणत्या धर्माचें प्राबल्य होतें, तें कळतें. फुनानचे सर्वांत जुने शिलालेख वैष्णव पंथीयांचे आहेत. एकामध्यें विष्णूची प्रार्थना केली आहे व राजा जयवर्मनाच्या पट्टराणीने केलेल्या धार्मिक दानाचा निर्देश केला आहे. दुसऱ्या शिलालेखांत जयवर्मनाचा पुत्र गुणवर्मन् याने विष्णूच्या पादुकांची स्थापना केल्याचें वर्णन आहे. कंबुजामध्यें शिवाच्या पादुकांना विष्णूच्या पादुकांएवढेंच महत्त्व होतें. एका ब्राह्मणाने शिवाच्या पादुकेची एका डोंगरावर स्थापना केल्याचा उल्लेख एका ठिकाणीं आहे. शिवमूर्ति तर सर्वच ठिकाणीं घडविली जात होती. लिंगाचे उल्लेख तर जागोजाग आहेत. सहाव्या शतकामधील एका कंबुजामधील शिलालेखांत भागवत-धर्माचादेखील उल्लेख आलेला आहे. सातव्या शतकामधील एका लेखांत 'श्री त्रैलोक्यसाराचा' उल्लेख आहे. पाशुपतांचा

उल्लेख सहाव्या शतकाच्या सुरुवातीलाच सापडतो. एका शिलालेखांत पाशुपतांच्या एका शिवमंदिराचा उल्लेख आढळतो.

देवालयें बांधतांना वर्षासनें द्यावयाची पद्धत होती. या वर्षासनामुळें या मंदिरांची नीट जोपासना होई. एका शिलालेखांत एका देवालयाला ७ गुलाम, ६० बैल, ३ म्हशी, १० शेळया, ४० नारळीची झाडें व कांहीं भाताचीं शेतें असें वर्षासन दिलें असल्याचा उल्लेख आहे. हें देवालय 'पोन कमरताण' नांवाच्या देवाचें आहे. दुसऱ्या देवालयाच्या वर्षासनांत ७ नृत्यांगना, ११ गाणाऱ्या मुली, चार वीणावादक, भाताच्या शेताकरतां ५७ गुलाम, १०० बैल, २० म्हशी व भाताचीं शेतें दिल्याचा उल्लेख आहे. हीं झालीं साधीं वर्षासनें. ज्या वेळीं कंबुज देशचे राजे वर्षासनें देत तेव्हां तीं राजेशाहीच असत. 'ता प्रोम' चें देवालय राजानें आपल्या प्रिय मातेकरितां बांधलें. या देवालयाच्या देवतांची पूजा-अर्चा करावयाला, त्यांची नीट निगा राखावयाला राजानें ६६,६२५ माणसें ठेवलीं व या देवालयाचा खर्च चालविण्याकरितां ३,४०० गांवें वर्षासन म्हणून दिलीं.

# चंपा

फुनान व कंबुजाच्या पूर्वेला चंपाचें राज्य वसलें होतें. पूर्वीचें चंपा म्हणजे हल्लीच्या आनामचा मध्य व दक्षिण भाग. चंपाचें राज्य कोणी स्थापिलें याचा पुरावा उपलब्ध झाला नाहीं. पण हें हिंदु राज्य होतें एवढें मात्र निश्चित. साधारणपणें इ. स. च्या पहिल्या शतकांत 'क्वांग नाम' या प्रांतामध्यें हिंदु राज्य स्थापन झालें असावें असें वाटतें. आनामच्या पूर्वेला चीनचा टोंकिंग प्रांत होता. चिनी इतिहासावरून असें दिसतें कीं इ. स. १३७ मध्यें टोंकिंगच्या दक्षिणेकडील भागावर आनामच्या 'किअु-लीन' नांवाच्या अधिकाऱ्यानें आक्रमण केलें व त्याचा हल्ला टोंकिंगच्या गव्हर्नरानें कसावसा परतवला. इ स. १९२ मध्यें 'सिआंग लीन' चा अधिकारी 'किअु-लीन' यानें चिनी साम्राज्याविरुद्ध बंड पुकारून लीन-यी नांवाचें राज्य स्थापन केलें. लीन-यी म्हणजेच हिंदु चंपा.

चंपाचे मूळचे रहिवाशी 'चाम'. पहिल्या शतकांत यांच्यामध्यें एक नवा उत्साह, एक नवें चैतन्य निर्माण झालें. याचें कारण बहुधा पहिल्या शतकांतील हिंदु वसाहती असाव्यात. या भागांत एक बुद्धाची सुंदर मूर्ति सापडली आहे. ती तांब्याची असून तिची बनावट अतिशय मुलायम अशी आहे. ही मूर्ति 'अमरावती' पद्धतीची असून ती दुसऱ्या अथवा तिसऱ्या शतकांतील आहे. किअु-लीननें दुसऱ्या शतकांत स्थापन केलेलें लीन-यी हेंच चंपा, याबद्दल विद्वानांमधे वाद नाहीं. या अनुषंगानें विचार करतां इ. स. २८० मध्यें टोंकिंगचा गव्हर्नर यानें या नव्या राज्याबद्दल आपल्या बादशहाकडे जी तक्रार केली ती नमूद करण्यासारखी आहे. 'लीन-यीची सरहद्द आता फुनानच्या सरहद्दीला भिडली आहे, हीं दोन राज्यें एकत्र होऊन चिनी भूमीवर सारखीं आक्रमण करीत आहेत याचा बंदोबस्त व्हावा" अशा प्रकारची ही तक्रार आहे. यावरून चंपा व फुनान यांचे या वेळचे संबंध अत्यंत सलोख्याचे होते हें स्पष्ट दिसतें.

फुनान व चंपा यांची सरहद्द कोठे भिडली होती हें सागणें कठीण आहे. दक्षिण आनाममध्यें 'खान्ह-होआ' प्रांतांत, 'न्हा-त्रांग' जवळ 'व्हो-चान्ह' नांवाचें एक खेडें आहे. येथें एक शिलालेख सापडला आहे. हा लेख संस्कृतमध्यें असून त्याची लिपि भारतीय आहे. ती दुसऱ्या अथवा तिसऱ्या शतकांतील आहे. यांतल्या पहिल्या सात ओळी नष्ट झालेल्या आहेत. या लेखाचे जे अवशेप वाचतां येतात त्यामध्यें 'श्री-मार' याच्या वंशाचा उल्लेख असून या वंशाच्या एका राजानें आपल्या मित्रांना व नातेवाईकांना दान दिल्याचा उल्लेख आहे. या राजाच्या नांवाचा उल्लेख नाहीं. पण त्याच्या 'सदसी' चा (सभा अथवा समितीचा) व 'प्रथम विजयाचा' उल्लेख आहे. व्हो चान्ह हें किअु-लीनने स्थापन केलेल्या भागांतच होते. तेव्हां 'श्री·मार' हा चंपाचा हिंदु राजा असावा असें मानावयास हरकत नाहीं. कोडेज्ञ मात्र श्री-मार हा फुनानचा राजा फान-ची-मान असावा असें म्हणतो.

यासंबंधीं विचार करतांना चिनी इतिहासाचा उल्लेख करणें प्राप्त आहे. दुसऱ्या शतकापासून लीन-यीचें राज्य फुनानच्या मदतीनें चिनी प्रदेशावर सारखें आक्रमण करीत असल्याची तक्रार चिनी दरबारीं नमूद झाली होती. इ. स. २२० ते २३० मध्यें चंपाचा वकील टोंकिंग च्या गव्हर्नराकडे गेला. इ. स. २४८ मध्यें चामच्या आरमाराने टोंकिंग वर चाल केली. तेथील मोठीं गांवें उध्वस्त केलीं. टोंकिंगची राजधानी उध्वस्त केली, चिनी आरमाराचा पराभव झाला व शेवटीं तह होऊन चीनचा कांहीं भाग चंपाला द्यावा लागला. इ. स. २७० ते २८० पर्यंत चंपाचें चीनवर आक्रमण चालूच होतें व टोंकिंगच्या गव्हर्नराची परिस्थिति मोठी शोचनीय झाली होती. यावरून श्री-मार हा चंपाचा राजा होता असें म्हणण्यास पुरावा मिळतो.

चंपाचें राज्य तसें म्हणण्यासारखें मोठें नव्हतें. चंपाची रुंदी कोठेंहि साठ मैलांहून जास्त नाहीं चंपा मध्य-आनाम व दक्षिण आनाम एवढा प्रदेश व्यापून होतें व म्हणूनच चंपाला चीन व फुनान या दोहोंशीं समानतेच्या पातळीवरून संबंध ठेवता आला.

व्हो-चान्हच्या आजूबाजूचा प्रदेश म्हणजे 'कुथारा'. हा चंपाच्या राज्याचा एक अविभाज्य भाग होता. कंबुज देशाने या भागावर कधीहि आक्रमण केलें नाहीं अगदी शेवटपर्यंत हा भाग चंपाच्या राज्यांत होता. यावरून श्री-मार हा चंपाचा हिंदु राजा होता या म्हणण्याला पुष्टी मिळते.

कोडेझ हा डच इतिहासकार 'श्री-मार' व 'फान-शी.मान' हे एकच होत असें म्हणतो. याला एकच कारण आहे. फान-शी-मान हा मोठा पराक्रमी असून त्यानें बरेच प्रदेश जिंकले होते व म्हणूनच त्याचें नांव 'मार' असावें असें कोडेझला वाटतें. पण हा पुरावा मान्य होण्यासारखा नाहीं.

एकंदरींत श्री-मार हा चंपाच्या हिंदु राज्याचा संस्थापक असें मान्य करावयास हरकत नाहीं. याने चंपाचा राजवंश स्थापन केला. पण चिनी इतिहासकार 'किऊ-लीन' चा मूळ संस्थापक म्हणून उल्लेख करतात. तेव्हां चिनी किऊ-लीन हा हिंदु श्री-मार असें मानावयास हरकत नाहीं. चिनी इतिहासकारांनीं चंपाच्या कांहीं राजांचे उल्लेख केले आहेत. याचें कारण म्हणजे असें कीं चंपाने सतत चीनशीं युद्ध चालविलें होतें. आपलें राज्य वाढविण्याचा उपक्रम चंपानें सातत्यानें चालू ठेवला व हा प्रयत्न उत्तरेकडे चालला होता. उत्तरेकडे चंपाची सरहद्द चीनला लागून होती. टोंकिंगवर चंपाचें सारखें आक्रमण चालू होतें. चवथ्या शतकाच्या मध्यावर तर चंपाची उत्तरेकडील सरहद्द थेट चीनमधील 'होआन सोन्ह' पर्वतराजीपर्यंत पोहोंचली. बराच काळपर्यंत टोंकींगवरील या आक्रमणाकडे चिनी साम्राज्यानें दुर्लक्ष केलें. पण नंतर मात्र चिनी बादशहानें याचा बंदोबस्त करण्याचें ठरविलें व इ. स. ४४६ मध्यें चिनी फौजा चंपामध्यें शिरल्या व त्यांनी राजधानीचें शहर चंपापूर काबीज करून लुटलें व खूप संपत्ती चीनला नेली.

चंपाच्या राजांची सर्व नावें चिनी उच्चारांतच उपलब्ध आहेत. प्रत्येक नांव 'फन' या शब्दानें सुरू होतें. 'फन' म्हणजे हिंदु 'वर्मन्'. चामचे नंतरचे राजे 'वर्मन्' ही उपाधि वापरीत. श्री-मारनंतरचा

अनुक्रम 26318 दि:

चंपाचा राजा 'श्री भद्रवर्मन्' याचें नांव एका संस्कृत शिलालेखांत आलें आहे. हा शिलालेख इ. स. ४०० चा असावा. चिनी इतिहासांत याला 'फन-हु-ता' म्हटलें आहे. हा मोठा पराक्रमी होता. याच्या कारकीर्दीत चंपाची कीर्ति खूप पसरली. भद्रवर्मन्चें पूर्ण नांव 'धर्म-महाराज श्री भद्रवर्मन्'. त्यानें 'मायसोन' येथें एक शिवमंदिर बांधलें व त्याचें 'भद्रेश्वरस्वामी' असें नामकरण केलें. एक हजार वर्षेपर्यंत हें चंपाचें प्रमुख देवालय राहिलें. स्वतः राजा मोठा विद्वान् होता व त्यानें चारहि वेदांचें पठण केलें होतें.

चिनी इतिहासाप्रमाणें 'फान-हु-ता' नंतर त्याचा मुलगा 'ती-चेन' हा इ. स. ४१३ मध्यें गादीवर आला. त्यानें राज्यत्याग केला व तो भारतामध्यें गंगेच्या कांठीं तपस्या करावयास निघून गेला. एका संस्कृत शिलालेखामध्यें गंगाराज नांवाचा राजा राज्यत्याग करून गंगेच्या कांठावर गेल्याचा उल्लेख आहे. तेव्हां चिनी 'ती-चेन' व गंगाराज हे एकच होत असें दिसतें.

या संस्कृत शिलालेखांत चंपामधील एका नव्या राजवंशाचा उल्लेख आलेला आहे. या वंशांतील सर्व राजे आपला पूर्वज 'गंगाराज' मानतात. यांत मनोरथ-वर्मन्, रुद्र-वर्मन्, शंभू-वर्मन्, कंदप-धर्म आणि प्रभास-धर्म या राजांचा उल्लेख आला आहे. शंभू-वर्मन्ने चीनची खंडणी थांबवली व परत घाबरून इ. स. ५९५ ला ती सुरू केली, परंतु इ. स. ६०५ मध्यें चिनी फौजा चंपामध्यें शिरल्या व त्यांनी चंपाचा पूर्णपणें पराभव केला. चंपापूर चिनी फौजांनीं परत लुटलें व १०,००० चाम लोकांना कैद केलें. या सर्वांचे कान चिनी सेनापतीनें कापले. हा सेनापति चंपाच्या १८ राजांचीं सुवर्णपत्रें व १३५० बौद्ध ग्रंथांच्या हस्तलिखित प्रती घेऊन गेला. त्यानें फुनानहून जातांना तेथील दरबारी गवय्ये व संगीतकार नेले व अशा तऱ्हेनें भारतीय संगीताचा 'स्पर्श' चिनी दरबारास झाला.

शंभू वर्मन्ने चीनशीं तह केला व खंडणी चालू केली. त्याचा नातू प्रभासधर्म हा त्याच्यानंतर गादीवर आला पण त्याची व त्याच्या सर्व

कुटुंबाची कत्तल करण्यांत आली (इ. स. ६४५) व त्यानंतर कांहीं काळ चंपांत अराजक माजलें. यांत कंबुज-देशाच्या राजाचा हात होता असें दिसतें. कारण इ. स. ६५७ पूर्वी चंपाच्या गादीवर 'प्रकाश धर्म-विक्रांतवर्मन्' बसला. याची आई शर्वाणी ही कंबुजाचा राजा ईश्वर-वर्मन् याची मुलगी,व त्याचा बाप जगध्धर्म हा चंपाच्या राजकुटुंबांतील एक पुरुष. कंबुज राजानें आपल्या कन्येच्या मुलाला अशा प्रकारें चंपाचें राज्य मिळवून दिलें.

**चंपाचा धर्म**

चंपाचा सर्वांत जुना शिलालेख 'व्हो चान्ह' चा. पण यांत कोण-त्याहि धर्माचा उल्लेख दिसत नाहीं. यानंतरचे सहा शिलालेख शैव-पंथीयांचे आहेत. येथील राजा भद्रवर्मन् यानें इ. स. च्या चवथ्या शतकांत एक शिवमंदिर बांधलें व त्याचें नांव भद्रेश्वरस्वामी ठेविलें. हें देवालय सबंध चंपाचें राष्ट्रीय देवालय बनलें. इ. स. च्या सहाव्या अथवा सातव्या शतकांत शंभूवर्मन्नें या देवालयांत शिवमूर्तीची पुनः स्थापना केली. कारण मधल्या काळांत कोणी तरी या देवालयाची नासधूस केली होती. या देवालयावर भद्रवर्मन्चा जो शिलालेख आहे तो असा आहे-

" माझा उमा-महेश्वराला नमस्कार असो. माझा ब्रह्मा व विष्णूला नमस्कार असो.

माझा पृथ्वी, आप, तेज, वायु व अग्नि यांना नमस्कार असो."

यांत प्रथम उमा-महेश्वराची प्रार्थना केली आहे हें लक्षांत ठेवण्या-सारखें आहे.

वैष्णवधर्माचा उल्लेख प्रकाशधर्म राजाच्या काळांत मिळतो (इ. स. ६५३-६५७). याने विष्णूचें एक देवालय बांधलें व दुसरें वाल्मीकीचें बांधलें. यानें ज्याला आदि नाहीं व अंत नाहीं व जो जगद्गुरु आहे असा विष्णूचा उल्लेख केला आहे. शिवाचा उल्लेख निराळ्या प्रकारें केला आहे. जो संपूर्ण विश्वाचा एकमेव ईश्वर असून

जगन्निर्माता आहे, जो जगाच्या कल्याणाकरितां पृथ्वी वगैरेसारखीं रूपें घेतो, आपली ब्रह्मा, विष्णु, इन्द्र आणि इतर देव पूजा करीत असले तरी, जगाच्या कल्याणाकरितां जो स्मशानांत वास्तव्य करतो, ज्याच्यांतून ही चराचर सृष्टि निर्माण झाली आहे व ज्याच्यांत सर्वजण शेवटीं विलीन होतात असा ह्या शिव आहे,म्हणून मी शिवमंदिर बांधतों, असें या शिलालेखांत म्हणतो. त्यानेच कुबेराचें मंदिरहि बांधलें आहे.

बुद्धाचें एक शिल्प चंपामध्यें डाँग-डुओंग् येथें मिळालें आहे. पण बौद्धधर्माचा पहिला उल्लेख इ. स. ८७५ च्या शिलालेखांत मिळतो. एकंदरींत चंपामध्यें शिवधर्माचें प्राबल्य बरेंच होतें व येथील संस्कृति संपूर्णतया भारतीय होती असें उपलब्ध असलेल्या पुराव्यावरून दिसतें. येथेंहि हिंदूंचीं महाकाव्यें, पुराणें, त्यांची शासनपद्धति इत्यादींचा प्रसार झाला होता व शेजारच्या फुनान व कंबोडियाबरोबरच चंपाची संस्कृतीहि 'भारतीय' झाली होती.

# सयाम

सयाम म्हणजे हल्लीचा थायलंड. याची लांबी १२०० मैल व रुंदी ५०० मैल आहे. निसर्गतःच याचे चार भाग पडतात : उत्तर, मध्य, नैर्ऋत्य व (मलायांतील) दक्षिण सयाम. उत्तर सयाममध्यें मध्यसयाममधील मॉन लोकांनी आठव्या शतकांत वसाहती केल्या होत्या. या भागांत भारतीय धर्म व संस्कृति यांचा बराच प्रभाव दिसून येतो. सयामी लोक मूळचे चीनमधील पश्चिम युनानचे असले तरीहि सयाममध्यें चिनी संस्कृतीची कांहींच छाप दिसुन येत नाही. अगदी तेराव्या शतकापर्यंत येथील देवाळयाचें स्थापत्य ब्रह्मदेशामधील स्थापत्याप्रमाणें होतें. मध्य सयाममध्यें ब्रह्मदेशामधील मॉन संस्कृतीचा प्रभाव आढळतो. मॉनपूर्वकाळांत येथें अमरावतीच्या संस्कृतीचा प्रभाव होता. नंतर मात्र कंबोडियामधील ख्मेर संस्कृतीचा पगडा दिसतो. नैर्ऋत्य सयाम हा फुनानच्या हिंदु राज्याचा एक भाग होता.

दक्षिण सयामचा अगदी पहिल्या शतकापासून भारताशी संबंध होता. कारण येथें जलमार्गानें सरळ येतां येत असे. भारतीय व्यापारी येथें व्यापारानिमित्त जात येत असत. याचा परिणाम येथील संस्कृतीवर होणें अपरिहार्य होतें. पुढें येथें दक्षिण भारतामध्यें पल्लव राजे राज्य करीत असतांना श्रीविजयचें हिंदु राज्य अस्तित्वांत आलें (इ. स. ६००–७७०). आठव्या व नवव्या शतकांत कलिंग व पाल राजांचा यांच्यावर प्रभाव पडला. ‘ ताय ’ ची संस्कृति येथें तेराव्या शतकापर्यंत पोहोंचू शकली नव्हती. हा काळ येईपर्यंत सिलोनमधून आलेल्या भिक्षूंनी येथें सिलोनच्या बौद्ध संस्कृतीचा प्रसार केला होता. हे सर्व संस्कृतींचे प्रभाव सयामच्या भूगोलानें आपोआपच निश्चित झाले होते. उत्तर सयामचा भाग पर्वतराजी, नद्या–नाले व जंगलांनी व्यापलेला आहे. मध्य सयाम म्हणजे ‘ मेनाम चाव प्या ’ ही नदी व तिच्या उपनद्या ‘ मे पींग ’, ‘ मे चोम ’, ‘ मे वँग ’, व ‘ मे संक ’ यांचें खोरें. या नद्यांनी सयामला समृद्ध केलें आहे. ईशान्य सयामच्या पश्चिमेला मेनाम नदी, उत्तर व पूर्वेला मेकोंग व दक्षिणेला डाँगरेकचे डोंगर आहेत. हा

भाग देखील स्वयंपूर्ण आहे. खालीं दक्षिणेला असलेले सयामचें द्वीपकल्प लांबवर पसरलें आहे.

सयाममधील शिल्प बघितल्यावर जर कोणती गोष्ट नजरेंत भरत असेल तर ती ही कीं हें शिल्प भारतीय छापाचें आहे. दक्षिण सयाम-द्वारा भारतीय संस्कृतीचा सयाम देशामध्यें प्रसार होत होता याबद्दल वाद नाहीं. येथें तांब्याची घडविलेली एक बुद्धाची मूर्ति सापडली आहे. मूर्ति छोटीशीच आहे पण तिच्यावरचा अमरावतीचा छाप चटकन् लक्षांत येण्यासारखा आहे. येथें आणखीहि तांब्याच्या मूर्ति सापडल्या आहेत. त्या गुप्त पद्धतीच्या वाटतात. त्यांचे पोषाख मात्र फार कडक असल्यासारखे वाटतात. हे सर्व अवशेष 'पोंग टुक' नांवाच्या एका खेड्यांत सांपडले आहेत. येथें एक देवालय सांपडलें आहे. तें लॅटेराइटचें आहे. याचा फक्त खालचा जोता तेवढा अस्तित्वांत आहे. वरचा सर्व भाग पडून नामशेष झाला असल्यामुळें त्याच्या स्थापत्याची कल्पना येत नाहीं. येथेंच एक ग्रेको-रोमन पद्धतीचा दिवा सापडला आहे. कोडेझच्या मतें हा दिवा दुसऱ्या शतकांतील असावा. म्हणजे या काळांतहि सयाममध्यें भारतीय वसाहती होत्या असें अनुमान काढतां येतें. सर्व शिल्पें भारतीय आहेत. शिवाय ख्मेर अथवा थाय संस्कृतीचे कोणतेहि अवशेष येथें मिळाले नाहींत. तेव्हां येथें अगदी इ. स. च्या पहिल्या शतकापासून ते इ. स. च्या सहाव्या, सातव्या शतकापर्यंत बौद्ध वसाहती होत्या असें अनुमान काढावयास कांहींच हरकत नाही. असें अनुमान काढावयास आणखीहि एक सबळ कारण आहे. पोंग टुक हें मेकालॉंग नदीवर वसलें आहे. येथून पूर्वेला 'प्रापटोम' व पश्चिमेला 'कानबुरी' या दोनहि ठिकाणीं एक दिवसांत जातां येतें. कानबुरीहून पुढें ब्रह्मदेश व मार्ताबान येथें जावयाला रस्ता आहे व मार्ताबानहून अमरावतीला जावयास मार्ग आहे. तेव्हां या भागाचा संबंध येणें साहजिकच होतें. हा संबंध दर्शविणारा आणखीहि एक पुरावा उपलब्ध आहे. पोंग टुकच्या देवालयाचा जोता अमरावतीच्या देवालयाच्या जोत्याप्रमाणें आहे. दोन्हींचें स्थापत्य सारखेंच आहे. तेव्हां सयाममधल्या

देवालयाची स्फूर्ति 'अमरावती' हून आली होती हें स्पष्ट आहे. म्हणजे इ. स. च्या पहिल्या तीन शतकांत 'अमरावती' च्या बुद्धधर्मीयांचा प्रवेश सयाममध्यें झाला होता असें दिसतें.

यानंतर एक दोन शतकांनंतर मध्य सयाममध्यें मॉन संस्कृतीचा प्रभाव दिसून येतो. हे मॉन हिंदुधर्मीय होते. यांच्या वसाहतींना 'रामण्णदेश' म्हणत असत. त्यांच्या जमातीचें नांव 'रमिन' होतें हें अकराव्या शतकांतल्या एका शिलालेखावरून समजतें. 'रमिन' चें 'रामन' व त्याचें 'मॉन' झालें. यांना 'तेलंग' देखील म्हणण्याचा प्रघात आहे. सुरुवातीला हें नामाभिधान भारतामधून आलेल्या तेलगु लोकांना लावीत. पुढें मात्र हें नामाभिधान सरसकट सर्वच लोकांना लावूं लागलें.

बँकॉकच्या उत्तरेला ८० मैलांवर लोपबुरी नांवाचें शहर आहे. हें जुनें 'लाव्हो.' येथें मध्यसयाममधील सर्वांत पुरातन अवशेष सापडतात. येथे ख्मेरकाळांतील तर अवशेष आहेतच. परंतु याशिवाय शहराच्या मध्यभागीं महातातचें देवालय आहे. या देवालयांत व त्याच्या आसमंतामध्यें बुद्धाच्या उभ्या मूर्ति सापडल्या आहेत. या ख्मेर नाहींत व 'ताय' सुद्धां नाहींत. त्या पूर्व ख्मेरकालीन आहेत यांत शंका नाही. यांतील एक बुद्धमूर्ति पांच फूट तीन इंच उंच आहे. या मूर्तीखालच्या कमलासनावर एक संस्कृत लेख आहे. हा कंबोडियामधील अगदी सुरुवातीच्या शिलालेखाशी मिळताजुळता आहे. येथेंच एक अष्टकोनी स्तंभ सांपडला आहे. या स्तंभाचें वरचें टोंक घनाकार आहे व त्याच्यावर मॉन लिपीमध्यें लेख आहे. प्रापटोमच्या देवालयांत असे बरेच स्तंभ आहेत. या काळांतील बुद्धाचें एक शिल्प बँकॉकच्या एका देवालयांत बाहेरील बाजूला आहे (आकृति क्र. ११). हें शिल्प जरा निराळ्या प्रकारचें आहे. या मूर्तीच्या डोक्यावरील केस तर कुरळे आहेतच, पण या कुरळ्या केसांनाहि नागमोडी वळण देऊन ते खांद्यावर सोडले आहेत चेहरा दीर्घवर्तुळाकार आहे. डोळ्याची वरची पापणी जरा जास्तच मोठी व बाहेर आल्यासारखी वाटते. भुवई मात्र पेन्सिल-

च्या रेषेप्रमाणें बारीक आहे. लोपबुरीमधील हीं शिल्पें गुप्तकालीन शिल्पाप्रमाणें वाटतात. पण हीं शिल्पें सयामी शिल्पकारांनीच घडविलीं आहेत व त्यामध्यें त्यांचा आगळेपणा दिसून येतो. हीं सर्व शिल्पें काळ्या चुनखडीचीं आहेत. लोपबुरीच्या पूर्वेला हा दगड बऱ्याच प्रमाणांत उपलब्ध असल्यामुळें त्याचा वापर शिल्पामध्यें केलेला आढळतो.

बुद्धाच्या मूर्ति लोपबुरी व प्रापटोमशिवाय अयोध्येला देखील सापडतात. या दोन प्रकारच्या आहेत : बसलेल्या व उभ्या. या सर्व मूर्ति पूर्व ख्मेरकालीन आहेत. हीं सर्व शिल्पें सहाव्या अथवा सातव्या शतकांतील असावींत. पांचव्या शतकामध्यें गुप्त कलेचा प्रसार मध्य सयाममध्यें झाला व त्याचा परिणाम या शिल्पावर दिसून येतो. कालांतरानें ज्या वेळीं गुप्त कलेचा प्रभाव कमी झाला, त्या वेळीं ही कला हिणकस होऊं लागली.

या काळांतील मध्य सयामचा इतिहास उपलब्ध नाहीं. मध्य सयामचें नांव ‘ द्वारावती’ असें होतें. चिनी प्रवासी ‘ ह्युएन–त्संग ’ व ‘इ–चींग’ यांनी सातव्या व आठव्या शतकांत ‘श्रीक्षेत्र’ (ब्रह्मदेश) व ‘इशानपूर’ (ख्मेर राज्य) यांच्यामध्यें ‘तो–ली–जो–ती’ नांवाचें राज्य आहे असें नमूद करून ठेविलें आहे. कोडेझच्या मतें हेंच द्वारावती असावें. हें नांव द्वारकेवरून घेतलें आहे हें स्पष्ट आहे. येथील सुरुवातीच्या वसाहती वैष्णवांच्या असाव्यात असें अनुमान यावरून काढतां येतें. ‘सी टेप’ (श्रीदेव), प्रापटोम आणि पोंग टुकला जे अवशेष सापडले आहेत त्यावरून येथे हिंदूंनीं चवथ्या अथवा पांचव्या शतकांत वसाहती केल्या असाव्यात असें वाटतें. येथील रहिवाशी मॉन लोक होते. सातव्या व आठव्या शतकांत येथे बुद्धधर्माचा प्रसार झाला असावा. कारण येथे बऱ्याच बुद्धमूर्ति उपलब्ध झाल्या आहेत. हीं शिल्पें कंबोडियाच्या शिल्पाप्रमाणें आहेत. यांतील कांहीं शिल्पें उल्लेखनीय आहेत. एक बुद्धाचें डोकें सापडलें आहे. हें काचमण्याचें (quartz) आहे. याचा तोंडवळा अगदी पोरगेला वाटतो व नाक बसकें आहे. चेहेरेपट्टीवरून ही मूर्ति पटकन् मॉन माणसाची आठवण करून देते. दुसरी एक बुद्धाची

उभी मूर्ति आहे. ही १० फूट उंच आहे. ती निळ्या चुनखडीची आहे. ही द्वारावतीच्या इतर शिल्पांप्रमाणें आहे. कुरळे केस नागमोडी वळण घेऊन खाली सोडलेले, डोळ्यांची वरची पापणी जरा बाहेर आलेली वगैरे द्वारावतीच्या मूर्तींचीं सर्व वैशिष्टयें या शिल्पांत आढळ-तात. आणखी एक मूर्ति निळ्या चुनखडींतील आहे. ही मॉन शिल्प-कारानें बनविली आहे. हा भारतीय शिल्पाचाच आविष्कार वाटतो. ही मूर्ति देखील द्वारावतीच्या इतर शिल्पांप्रमाणें आहे. या मूर्तीच्या चेहऱ्यावरचें हास्य अविस्मरणीय आहे.

'द्वारावती' कालीन शिल्पें अस्तित्वांत आहेत. तत्कालीन स्थाप-त्याचे नमुने मात्र उपलब्ध नाहींत. पॉंग टुकचें देवालय तर जवळ जवळ नामशेषच झालें आहे. प्रापटोमचें मूळ देवालय नाहींसें होऊन त्यावर नवें देवालय उभारलें गेलें आहे. या नव्या स्तूपाची उंची ३७४ फूट आहे. द्वारावतीची यापेक्षां जास्त माहिती आज तरी उपलब्ध नाहीं. मध्य सयाममध्यें आणखी उत्खनन झाल्यास याबद्दलची जास्त माहिती मिळूं शकेल.

## ख्मेर-काळ

साधारणपणें इ. स. च्या १० व्या शतकापर्यंत द्वारावतीचें राज्य अस्तित्वांत होतें. इ. स. १००२ मधून शेवटच्या मॉन राजाची हकाल-पट्टी होऊन ख्मेर राजे लोपबुरीच्या गादीवर आले. मध्य सयाममध्यें शिल्पकलेची प्रगति झाली होती व त्यामुळें ख्मेर संस्कृति व द्वारा-वतीची संस्कृति यांचा मिलाफ झाला. ख्मेर शिल्पकारावर बुद्धाच्या मूर्ति घडवितांना मॉन शिल्पकारांचा प्रभाव पडला. एकादी ख्मेर मूर्ति घेऊन ती मध्य सयाममधील ख्मेर कलाकारांनी घडविलेल्या मूर्तीशी ताडून पाहिली, तर हें पटकन् लक्षांत येईल. कोरात नांवाचें एक गांव आहे. येथील संपूर्णपणें 'ख्मेर' असलेली मूर्ति व लोपबुरीमधील महातातची बुद्धमूर्ति ताडून पाहिल्यास हें लक्षांत येतें (आकृति क्र. १२-१३). पहिल्या मूर्तींतील डोकें जरा खालच्या बाजूला कललें

आहे. डोळेहि खालच्याच बाजूला झुकले आहेत. केसाची रचना व डोक्यावरचें उष्णीश ख्मेर पद्धतीचें आहे. आता लोपबुरीमधील मूर्ति पहा. डोक्यावरचे केस व उष्णीश अगदी निराळें आहे. भुवया बांकड्या आहेत व डोळे अर्धे मिटलेले असून दृष्टि अगदी समोर आहे. डाव्या खांद्यावर उपरणें आहे. द्वारावतीची मॉन कला व ख्मेर कला या दोहोंचा हा मिलाफ आहे.

लोपबुरीची ही ख्मेर कला पुढे १००० वर्षे चालू राहिली. या काळांत ख्मेर पद्धतींत बदल झाले पण ती कला इतकीं वर्षे सातत्यानें टिकली हेंच मोठें आश्चर्य आहे. ज्या कालामध्यें या निरनिराळ्या जमाती येथें आल्या त्या सर्व जमातीचें चित्रण या कलेमध्यें झालेलें आढळून येतें. हे ख्मेर राजे हिंदु होते. इ स. १००२ सालामधील एक शिलालेख लोपबुरीमध्यें सांपडला आहे. यावरून येथील ख्मेर राजे हीनयान व महायान पंथीयांना स्वातंत्र्य देत असावेत असें दिसतें. यांच्या राज्यांत हिंदु व बौद्ध हे दोनहि धर्म रूढ होते. राजदरबारीं हिंदु धर्माचें बरेंच प्राबल्य होतें असें दिसून येतें. येथें सर्व धार्मिक विधि हिंदु पद्धतीने होत. सूर्यवर्मन् हा स्वतःला सूर्यवंशीय व वैष्णव म्हणवितो. शिवाय येथील 'पनोम रंग' व 'मुआंग ताम' चीं जीं देवालयें आहेत तींसुद्धां हिंदु आहेत. हीं दोनहि देवालयें आतां पडीक अवस्थेंत आहेत. तरीहि त्यांचें भारतीयत्व अगदी स्पष्ट आहे. सर्व ठिकाणीं गणेशपट्टयांवर हिंदु देव-देवता आहेत. कंबोडियामधील जवळ जवळ सर्वच देवळें हिंदु आहेत आणि हीं देवालयेंहि त्याला अपवाद नाहींत.

येथील ख्मेर राजे सहिष्णु होते व त्यांच्या राज्यांत बौद्ध देवालयें सुद्धां भरपूर होतीं. 'वट महतात' व 'प्रा प्रांग साम् योत्' हीं दोनहि ख्मेर देवालयें बुद्धाचीं आहेत. हीं दोनहि हिंदु देवालयासारखीं दिसतात. पहिल्या देवालयांत बुद्धमूर्ति आहेत. यांतील कांहीं मूर्ति मॉन आहेत. या नक्कीच द्वारावतीच्या काळांतील आहेत. तेव्हां हें देवालय द्वारावतीच्या जुन्या देवालयावरच बांधलें असावें असें वाटतें. दुसरें देवालय हिंदु त्रिमूर्तीची आठवण करून देतें. कारण येथें लागून तीन

आख्यायिकेप्रमाणें 'तपुस' व 'पलीकत' या दोघा भावंडांना गौतमानें आपल्या डोक्यावरचे आठ केस दिले व त्यांनी ते अगदी जपून सुवर्ण-भूमींत आणले.

मॉनच्या एका बखरीप्रमाणें पाटलीपुत्र येथें इ. स. २४१ मध्यें भरलेल्या भिक्षु संघाने सुवर्णभूमीला 'सोमा' व 'उत्तरा' नांवाचे दोन भिक्षु पाठविले. याचा पुरावा मात्र उपलब्ध नाहीं. इ. स. पांचव्या शतका अगोदरचा भारतीय संस्कृतीच्या अस्तित्वाचा कोणताहि पुरावा अद्यापपर्यंत येथें उपलब्ध झालेला नाहीं.

चीनच्या ' युंग चांग ' प्रांताच्या नैऋत्येला ' प्यू ' नांवाच्या जमातीचे लोक राहात होते. यांची राजधानी ' श्री क्षेत्र ', जुनें ' प्रोम ', व आजचें ' मावझा. ' याचा उल्लेख सातव्या शतकांत चिनी प्रवासी ' ह्युएन-त्संग ' व ' ओी त्सींग ' या दोघांनीहि केला आहे. या ठिकाणीं इ. स. ६७३-७१८ या काळांत ' विक्रम ' वंशाचे राजे राज्य करीत असत. या वंशांतील सूर्यविक्रम, हरिविक्रम व सिंहविक्रम या तीन राजांचा उल्लेख सापडतो. सिंहविक्रम हा शेवटचा राजा इ. स. ७१८ मध्यें मृत्यु पावला. इ. स. ६३८ पासून प्यूच्या राज्याचें पर्व सुरू होतें. येथें कोणत्या तरी ' वर्मन् ' वंशाचे शिलालेख पण मिळाले आहेत. वर्मन् नांवावर पल्लव राजांच्या नांवांची छाप पडली असावी असें वाटतें.

श्रीक्षेत्र हें मोठें नगर होतें. त्याच्याभोंवतीं भरभक्कम तटबंदी होती. या नगराचें महत्त्व बऱ्याच काळपर्यंत होतें. बाराव्या शतकांतील मॉन शिलालेखांत पण श्रीक्षेत्राचाच राजधानी म्हणून उल्लेख केलेला आढळतो. या नगराजवळ तीन मोठे बौद्ध स्तूप आहेत. यांतील एक स्तूप १५० फूट उंच आहे. या स्तूपाच्या आंत खोल्या आहेत. यामध्यें गुप्त पद्धतीचें शिल्प, सुटीं शिल्पें, चांदीचीं नाणीं, भाजलेल्या मातीच्या शिला वगैरे मिळते. या मातीच्या शिलावर नागरी भाषेंत संस्कृत लेख आढळतो.

धार्मिक स्वरूपाचे अवशेष मिश्र स्वरूपाचे आहेत. विष्णूचीं दगडाचीं शिल्पें, अवलोकितेश्वर व इतर बोधिसत्त्वांच्या तांब्याच्या मूर्ति

व पाली शिलालेख इ. गोष्टी पाहतां येथील लोकांना हीनयान बुद्धधर्माची दीक्षा मिळाली होती, हें सहज लक्षांत येतें.

आठव्या शतकामध्यें श्री-धर्मविजय यानें नवा राजवंश स्थापन केल्याचा उल्लेख सापडतो. याचा नातू श्रीक्षेत्रच्या 'प्यू' राजाच्या मुलीशीं विवाहबद्ध झाला. आठव्या व नवव्या शतकांत उत्तर व दक्षिण ब्रह्मदेशावरील बऱ्याच भागावर 'नांचाओ' च्या राजाचें वर्चस्व होतें. राजा किलोफेंग ( इ. स. ७४८-७७९ ) यानें एक बळकट किल्ला बांधला. यानें प्यूंना जिंकलें असावें. याच्या सैन्यांत प्यू शिपाई होते. याच्या काळांत उत्तर ब्रह्मदेशांत बरीच सुधारणा झाली. इ. स. ८०० मध्यें किलोफेंगच्या नातवानें प्यू गवई व वादक चीनच्या 'टांग' राजाला नजर म्हणून पाठविली. यानंतर १-२ वर्षांत एका प्यू राजानें ३५ वादक चीनला आपल्या वकिलाबरोबर पाठविले. टांगच्या इतिहासांत प्यूच्या राजधानीचें रसभरित वर्णन केलेलें आढळतें. इ. स. ८३२ मध्यें या प्यू राजधानीचा मॉन जमातीच्या हस्तें नाश झाला.

प्यू राज्य मोठें असावें. कारण त्यांच्या वर्चस्वाखालीं १८ राज्यें असल्याचा उल्लेख आला आहे. हीं सर्व राज्यें दक्षिण ब्रह्मदेशांतील होतीं. यांतील 'मी-चेन' चें राज्य इ. स. ८३५ मध्यें 'नांचव' ने उध्वस्त केलें.

प्यू बौद्धधर्मीय होते. त्यांच्या राजधानींत १०० संघाराम होते. मावझा (प्यूची राजधानी) जवळच 'मौंगन' येथें सोन्याच्या पत्र्यावर बौद्ध लेख आहेत. यांत बौद्ध धर्माचीं तत्त्वें कोरलीं आहेत. हीं ज्या लिपींत लिहिलीं आहेत तीं दक्षिण भारताच्या पांचव्या शतकांतल्या कदंब लिपीप्रमाणें आहेत. यावरून प्यूमध्यें या सुमारास हीनयान सांप्रदायाचा बराच प्रसार झाला असावा असें वाटतें. मद्रासजवळ असलेल्या कोंजीवरम्‌पासून या धर्माचा प्रसार ब्रह्मदेशामध्यें झाला असण्याचा संभव वाटतो. पांचव्या शतकाअगोदर येथें बुद्धधर्माचा प्रसार झाला होता कीं नाहीं हें समजण्याचा मार्गच नाहीं कारण या काळांतील या भागाचा इतिहास ज्ञात नाहीं.

प्यू भाषेमध्यें लिहिलेले छोटे छोटे शिलालेख सांपडलेले आहेत. ते अजून पूर्णतः वाचण्यांत कोणाला यश मिळालें नाहीं. मावझा येथें एका शिलेवर बुद्ध व त्याच्या दोन भक्तांच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत व त्यांच्या खालीं प्यू भाषेमधील लेख आहे याच्या खालीं आणखी एक श्लोक आहे तो संस्कृत असावा.

मंडालेच्या उत्तरेला असलेल्या 'श्वेब्रो' जिल्ह्यांत 'हालींग्यी' या गांवीं एक मूर्ति सापडली आहे. (आकृति क. १४). हिचा वरचा भाग तुटून गेला आहे. खालच्या भागापैकीं एक उजवा पाय व हात दिसतो आहे. खालील शिलालेख प्यू भाषेमधील आहे. याच्या खालीं उजव्या बाजूला मुकुट घातलेलीं कांहीं माणसें बसलेलीं आहेत. डाव्या बाजूला आणखीं कांहीं माणसें बसलेलीं आहेत. त्यांनी आपले केस अंबाड्याप्रमाणें वर बांधलेले आहेत. सर्वांची नजर वर आहे व त्यांचें हात नमस्कारमुद्रेंत आहेत. यावरून वर सिंहासनावर आरूढ असलेली पण आता तुटलेली प्रतिमा बुद्धाची असावी असें वाटतें. ही मंडळी मात्र प्यू जमातीची असावी कारण खालीं त्यांच्याच भाषेंतील लेख आहे.

१९२६ मध्यें डुरोसीलने मावझा येथें 'ख्मीन बा' चें एक जुनें स्मारक उघडण्यांत यश मिळविलें. या स्मारकाच्या खोलीमध्यें निरनिराळ्या वस्तु अतिशय व्यवस्थितपणें मांडलेल्या आढळून आल्या. या १२०० वर्षांपूर्वीच्या आहेत असा अंदाज आहे. यांत सोन्याच्या दोन बुद्धमूर्ति (आकृति क. १५), एक चांदीची स्तूपाच्या आकाराची एक पेटी, एक चांदीची चौकोनी पेटी (या दोनहि पेट्यांवर प्यू भाषेमधील लेख व प्रतिमा आहेत), चांदीचे दोन द्वारपाल (आकृति क. १६) कांहीं सोन्याच्या पत्र्यांवरील लेख, वगैरे वस्तु सांपडल्या. या सापडलेल्या अवशेषांवरून सातव्या व आठव्या शतकांत बुद्धकलेची किती प्रगति झाली होती याची कल्पना येते.

यांतील चांदीची स्तूपाकाराची पेटी २ फूट व २ इंच उंच आहे. यावर बुद्धाच्या चार प्रतिमा कोरलेल्या आहेत. प्रत्येक बुद्धाजवळ एक भिक्षु उभा राहिला आहे. हें कोरीव काम उठावांत केलें आहे. या

पेटीचें झाकण काढतां येतें. याच्या कांठावर दोन लेख कोरलेले आहेत: एक प्यू भाषेमध्यें व दुसरा पालीमध्यें. ही पाली लिपि दक्षिण भारतामधील तेलगू–कानडी लिपीप्रमाणें आहे. 'मौंग्गन' येथील पत्र्यावर अशीच लिपी आहे. पेटीच्या खालच्या बाजूस आणखी एक लेख आहे. प्यूमध्यें त्यांत दोन नांवें आहेत. त्यांचा शेवट 'वर्मन्' या शब्दांनी होतो. बुद्धाच्या प्रतिमा 'हीनयान पंथी' छापाच्या आहेत.

इ. स. १९२६ मध्यें येथून जवळच असलेल्या 'कलगंगोन' या गांवीं १४ इंच लांबीचें एक लिंग सापडलें. यावरून येथें शिवपंथीय लोक राहात होते असें दिसतें. मावझ्याला बोधिसत्त्वांच्या प्रतिमा सांपडल्या आहेत. त्या 'पाल' छापाच्या दिसतात. या नवव्या किंवा दहाव्या शतकांतील असाव्यात.

बुद्धाच्या दगडाच्या मूर्ति देखील सांपडल्या आहेत. यांत प्रकट झालेली कला स्थानिक आहे पण छाप गुप्तांचा आहे. त्यांच्या खालीं कोरलेले लेख प्यू व संस्कृतमध्यें आहेत. या संस्कृत लेखांची लिपी गुप्तकालीन लिपीप्रमाणें आहे. संस्कृतच्या प्रसारावरून येथें महायान संप्रदाय पसरला असावा असें वाटतें. कदाचित् हे 'मुळसर्वस्तवादीन्' पंथीयांचे लेख असतील हे आपले लेख संस्कृतांतच लिहीत. या पंथाची त्या काळीं बरीच भरभराट झाली होती व त्याचा प्रसार तुर्कस्थान, चीन, इंडोचीन व मलायाच्या द्वीपसमूहामध्यें झाला होता.

या बौद्धधर्मीय मूर्तीशिवाय येथें बरींच हिंदुधर्मीय शिल्पें सापडलीं आहेत. मावझा येथें विष्णु, ब्रह्मा व गणेश, 'मेर्गुई' येथें विष्णु, गरुड आणि हनुमान व आराकानमध्यें सूर्य, दुर्गा आणि विष्णू यांच्या प्रतिमा व मूर्ति सांपडल्या आहेत. याशिवाय भाजलेल्या चत्क्यांवर व कांहीं नाण्यांवर हिंदु चिन्हें कोरलेलीं आहेत.

यावरून इ. सनाच्या पांचव्या शतकापासून ते आठव्यापर्यंत ब्रह्मदेशामध्यें हिंदु धर्म व बौद्ध धर्म या दोनहि धर्मांचे लोक गुण्यागोविंदानें एकत्र राहात होते असें दिसतें. तेथील बहुसंख्य शेतकरीवर्ग

हीनयान संप्रदायाचा असावा व महायान पंथीय आणि हिंदु यांच्या लहान लहान वसाहती असाव्यात, असें वाटतें.

ब्रह्मदेशामध्यें नवव्या व दहाव्या शतकामध्यें तीन बलशाली राज्यें होतीं. एक रामण्णदेश, रामण अथवा हल्लीं ज्यांना मॉना म्हणतात त्यांचा देश. हे दक्षिण ब्रह्मदेशांत राज्य करीत असत. या राज्यांत रामावती, हंसावती, श्रीक्षेत्र, द्वारावती वगैरे लहान राज्यें होतीं. हें हिंदु राज्य होतें. येथील संस्कृतीहि पण हिंदु होती. याच्या उत्तरेला पगान होतें. पगानचें दुसरें नांव 'अरीमर्धनपूर'. हें उत्तर ब्रह्मदेशामध्यें इरावती व चिंदवीन या दोन नद्यांच्या खोऱ्यांत वसलें होतें. तिसरें राज्य होतें कोसांबीचें. हें पगानच्या उत्तरेकडे व ईशान्येकडे होतें.

## ब्रह्मदेशाची मॉन संस्कृति

ब्रह्मदेशामधील पुरातन जमाती म्हणजे प्यू व मॉन जमात ही तिबेटची. ती पुढें ब्रह्मी लोकांत संपूर्णपणें मिसळून गेली. कारण या दोहोंत बरेंच साम्य होतें. मॉन जमात आजहि अस्तित्वांत आहे. पगानच्या राज्यांत मॉन संस्कृतीचें प्राबल्य होतें. पगानच्या अनव्रथाने (इ. स. १०४४–१०७७) काळांत मॉन लोकांची राजधानी 'थातोन' जिंकली. पगानच्या राजानें मॉनचें राज्य जिंकिलें पण मॉनच्या संस्कृतीने पगानला जिंकलें. मॉन लोकांना 'तेलंग' म्हणतात. कारण ते भारतामधील तेलंगणामधून आले अशी समजून आहे. दक्षिण ब्रह्मदेशांतील थातोन हें मॉन संस्कृतीचें प्रमुख केन्द्र. दुसरें केन्द्र 'पेगू'. 'थातोन' हें एके काळीं बंदर असावें कारण येथें जहाजाचे अवशेष, दोरखंड, कड्या वगैरे वस्तु सापडल्या आहेत. अकराव्या शतकापूर्वीच येथील किनाऱ्यावर वाळू सांठू लागली, तें बंदर बंद झालें नि त्याची जागा मर्तबानने घेतली. पेगु मात्र अगदां सतराव्या शतकापर्यंत बंदर राहिलें आतां मात्र तेंहि बंद झालें आहे व त्याची जागा रंगूनने घेतली आहे. पेगूचें भारतीय नांव 'ऊस्सा'.

थातोन व पेगू येथें अजून नीटपणें उत्खनन झालें नाहीं. कांहीं वर्षांपूर्वी थातोनपासून २४ मैलांवर असलेल्या 'झोकथोक' या खेडयांत 'तिझाअुंग पगोडा' सापडला. हा स्तूप शंकूच्या आकाराचा (conical) असून त्याचा जोता अष्टकोनी आहे. हा ११ फूट लांब आहे. हा जोता लॅटेराईट दगडाचा आहे व याच्या खालीं त्याचा जो पाया आहे तो ३ फूट उंचीचा आहे. हा पाया पण त्याच दगडाचा आहे. चारहि बाजूला दगडाचे जिने आहेत. ते थेट स्तुपाच्या वरच्या टोकापर्यंत पोहोंचतात. हा पगोडा अकराव्या शतकांतील असावा. अशा प्रकारचा लॅटेराईट दगडाचा आणखी एक स्तूप मध्यसयाममध्यें 'सवन–का–लोक' येथें आहे. मॉन संस्कृति सयाममध्यें पसरली होती हें याच्यावरून सिद्ध होतें. मॉन संस्कृतीच्या मध्यसयामवर झालेल्या परिणामाचें हा स्तूप द्योतक आहे. हा स्तूप चौदाव्या शतकांतील असावा असा अंदाज आहे. याचा तळ पण अष्टकोनीच आहे. अशा प्रकारचे अष्टकोनी तळ असलेले बरेचसे स्तूप दक्षिण ब्रह्मदेशामध्यें सर्वत्र विखुरलेले आहेत. यांतील सर्वांत सुंदर पगोडा रंगूनला आहे. त्याचें नांव 'सुले पगोडा.' मॉनच्या राज्याचे प्राचीन नांव 'रामण्ण देश' असें होतें.

मॉनचा सर्वांत जुना शिलालेख मध्यसयाममध्यें लोपबुरी गांवीं एका स्तंभावर कोरलेला आहे. हार्वेच्या मताप्रमाणें या शिलालेखाची लिपि पांचव्या शतकांतील पल्लव लिपीप्रमाणें आहे. मॉन संस्कृतीचे आणखीहि शिलालेख सापडले आहेत. ते दक्षिण भारतीय लिपीशीं बरेच मिळतेजुळते आहेत. या विषयावर ब्लागडेन्, डुरोसील व हालीडे वगैरे विद्वानांनीं बराच अभ्यास केला आहे. तरीहि ब्रह्मदेशाच्या या काळाविषयीं विशेष माहिती उपलब्ध झालेली नाहीं. मॉन संस्कृतीचे लोक बौद्धधर्मीय होते. इ. सनाच्या आठव्या शतकामध्यें लोपबुरीच्या मॉन राजाची मुलगी आपल्या पतीला सोडून उत्तरसयामला गेली. तेथें तिने एक बुद्धधर्मीय राज्य स्थापन केलें. हें राज्य तेराव्या शतकापर्यंत अस्तित्वांत होतें.

थातोन येथें गुप्त छापाच्या पितळेच्या बुद्धमूर्ति सापडल्या आहेत (आकृति क्र. १७). पेगू जिल्ह्यामध्यें एक मातीची शिला मिळाली आहे. या शिलेवर मध्यभागीं एक नर्तक दारू पिऊन नाच करीत आहे व भोंवतालीं त्याचे साथीदार वाद्यें वाजवून त्याला साथ करीत आहेत असें दृश्य आहे. ही शिला भाजलेल्या मातीची आहे. या सर्व प्रतिमा भारतीय आहेत. त्यांचा पोषाख व तोंडवळा देखील भारतीय आहे.

जुन्या मॉन संस्कृतीचे इतकेच अवशेष सध्या उपलब्ध आहेत. पगानचें राज्य अस्तित्वांत आल्यावर मात्र ही परिस्थिति बदलते. कारण येथपासून पुढचा इतिहास नीटपणें सांगता येतो. इ. स. ८०० पासून जुन्या प्रोमचे (मॉनचें) राज्य अंतःस्थ भांडणामुळें मोडकळीस आलें. याच सुमारास पगानचें राज्य उदयास येऊन जोम धरूं लागलें. पगान हें इरावती व चिंदवीन या दोन नद्यांच्या संगमावर वसलें होतें. येथील भूमि सकस होती.

**पगान**

पगानचा प्रमुख धर्मगुरु सावराहन (इ. स. ६१३–६४०). यानें ब्रह्मदेशामध्यें एक नवा शक मार्च ६३८ मध्यें सुरूं केला. याचा प्रसार सयाममध्यें होऊन १८८९ पर्यंत तो शक तेथें अस्तित्वांत होता. पगान-मध्यें बऱ्याच काळपर्यंत देवालय कसें बांधावयाचें याची माहिती उपलब्ध नव्हती. इ.स. ९१३ ते ९६४ मध्यें येथें राज्य करणाऱ्या राजानें थातोन व प्रोम येथें देवालयाच्या रचनेचा अभ्यास करण्याकरितां आपलीं कांहीं माणसें पाठविलीं. तीं परतल्यावर त्यानें पगानच्या आस-पास पांच देवालयें बांधलीं. महायान बौद्धधर्माचा येथे प्रसार झाला होता असें यावरून अनुमान करता येतें. कारण हीनयान पंथीय मंदिरें बांधीत नसत.

पगानचा पहिला मोठा राजा म्हणजे 'अनव्राथ.' हा इ. स. १०४८ मध्यें गादीवर आला. याच्या काळांत 'शिन् अरहन्' नांवाचा एक मॉन भिक्षु पगानमध्यें आला. यानें अनव्राथाला हीनयानधर्मीय

11802

केलें. अनब्राथाने थातोनच्या मॉन राजाला आणखी भिक्षु पाठविण्याची विनंती केली. या विनंतीचा थातोनच्या राजानें अव्हेर केला. त्यामुळें संतापुन जाऊन अनब्राथाने थातोनवर हल्ला करून तें जिंकून घेतलें. त्यानें थातोनचा राजा मनुहा याला पगानला कैद करून आणलें व थातोनचे ३०,००० लोक सुद्धां पगानमध्यें आणले. थातोनहून त्याने पाली त्रिपीटकांचीं हस्तलिखितें आणलीं. यानंतर पगानचे लोक हीनयान झाले. कांहीं काळानंतर अनब्राथानें जुनें प्रोमचें राज्य काबीज केलें व तेथील बौद्ध अवशेष पगानला आणले.

थातोनचा अशा प्रकारें ऱ्हास झाल्यावर तेथील सर्व विद्वान् मंडळी, कलावंत वगैरे इतर पगानमध्यें येऊन स्थायिक झाले. यांनी हीनयान धर्माचा प्रसार सुरूं केला. यांनी आपले ग्रंथ पाली भाषेमध्यें लिहिले होते. त्यामुळें पालीचा प्रसार होऊं लागला. संस्कृत भाषा मागे पडली. पगानने मॉनची लिपि स्वीकारली व मॉन ही ब्रह्मदेशाची लिपि बनली. थातोनहून जे शिल्पकार, स्थापत्यशास्त्रज्ञ आले त्यांनी पगान येथें देवालयें बांधावयास सुरुवात केली. हीं अर्थातच बौद्धधर्मीय होतीं. पण या बहुतेक देवालयांमध्यें हिंदु देवांचीं शिल्पें कोरलीं होतीं. पगानमध्यें भारतीय संस्कृति मॉन लोकांनी आणली. या काळामधील शिलालेख पाली अथवा मॉन भाषेमधील आहेत. थातोनचा राजा मनुहा याने 'म्यिकाबा' येथें बांधलेल्या देवालयांत बरींच हिंदु शिल्पें आहेत. पगान येथील संपूर्णतया हिंदु देवालय म्हणजे 'नन-लाइंग-क्याइंग.' हें दहाव्या शतकांत बांधलें असावें असा अंदाज आहे. हें विष्णूचें देवालय आहे. आंत विष्णूचे 'दशावतार' भिंतीवर कोरलेले आहेत. बुद्ध नववा अवतार म्हणून दाखविला आहे.

पगानच्या आसमंतांत ५,००० स्तूपांचे अवशेष आडळतात. येथील देवालयें दक्षिण भारतीय देवालयांची आठवण करून देतात. पगानमध्यें 'कांजीवरम' चा प्रभाव दिसतो. या काळांत ब्रह्मदेशामधील कला संपूर्णपणें भारतीय झाली होती व म्हणून हीं देवालयें जरी बुद्धाच्या अनुयायांनी बांधलीं असलीं तरी त्यांची बांधणी पूर्णपणें दक्षिण भारतीय

पद्धतीची दिसते. कांहीं ठिकाणीं मात्र उत्तर भारतीय स्थापत्याचीहि छाप दिसते.

आठव्या शतकाच्या अगोदरपासूनच भारतामधून बौद्धधर्माची पिछेहाट होत होती. या व यापुढील शतकांत कुमारील भट्ट व शंकराचार्य यांच्या प्रयत्नानें बौद्धधर्म भारतामधून जवळ जवळ संपूर्णपणें नाहीसा झाला. भारतामधून बौद्धाचे शेष अनुयायी ब्रह्मदेश, सिलोन, सयाम वगैरे ठिकाणीं जाऊं लागले. या भारतीयांनी अर्थातच बिहारमधील बोधगयेशीं आपला संबंध ठेवला.

अनव्राथाने देवालय बांधलेंच नाहीं. त्याने पगोडेच बांधले. त्याने बांधलेला सर्वांत महत्त्वाचा पगोडा म्हणजे श्वेझिगॉनचा पगोडा (इ. स. १०५९). हा पगोडा म्हणजे ब्रह्मदेशाचें सर्वांत महत्त्वाचें धार्मिक स्थळ आहे. कारण यांत बुद्धाचे कांहीं अवशेष (गळयाचें हाड, दांत वगैरे) व ब्रह्मदेशामधील ३१ ' नत-आत्मे ' आहेत. म्हणून तें यात्रेचें ठिकाण झालें आहे. त्यानें ' श्वेसंदा ' (आकृति क्र. १८) नांवाचा स्तूपहि बांधला. याच्या बांधणीमध्यें मॉन स्थापत्याचा छाप दिसतो. कारण याचा तळ अष्टकोनी आहे. याला नवसाच्या वड्या (votive tablets) करण्याचा फार शौक होता. या वड्यांवर तो बुद्धप्रतिमा व लेख कोरून घेत असे.

अनव्राथाचा पुत्र ' क्यांझीथ्था. ' हा आपल्या पित्याप्रमाणेंच शूर होता. त्याच्या कारकीर्दींत पगानचें आनंद देवालय तयार झालें. आनंदचें देवालय हें पगानमधील एक अत्यंत प्रेक्षणीय स्थळ आहे (आकृति क्र. १९). याचें पांढरेंशुभ्र अंग व शिखरावर असलेल्या चकाकणाऱ्या ' टी ' कळसामुळें हें देवालय अतिशय नयनमनोहर दिसतें. त्याच्या बाह्यसौंदर्याच्या मानानें त्याचा आंतील भाग मात्र निराशाजनक आहे. देवालयाचा आकार साधारणपणें क्रुसासारखा आहे. आंतील लांबलचक दालनांमध्यें सूर्याचे किरण कधीच पोहोचूं नयेत अशी व्यवस्था केली आहे. या चार दालनाच्या टोकाला चार गर्भगृहें आहेत. या प्रत्येक गर्भगृहांत बुद्धाचीं उभी असलेली प्रचंड

मूर्ति आहे. या बुद्धमूर्तीच्या तोंडावर व खांद्यावर सूर्याचीं किरणें पडण्याची व्यवस्था केली आहे. बाहेरच्या लांबलचक व संपूर्णपणें अंधारांत असलेल्या दालनांतून आल्यावर हा प्रकाशाचा झोत कांहीं वेळ सहन होत नाहीं. आंतील दालनांमध्यें ८० कोनाडे आहेत. या कोनाड्यांत बुद्धाचें बालपणाचें आयुष्य दाखविणारीं शिल्पें आहेत. हीं शिल्पें भारतीय पद्धतीचीं आहेत. कारण तीं भारतीय शिल्पकारांनीच घडविलीं आहेत.

पश्चिमेकडे जें गर्भगृह आहे त्यांत क्यांझीथ्था (आकृति क्र. २०) व त्याचा धर्मगुरु शिन् अरहन् या दोहोंच्या मूर्ति आहेत. दोघेहि गुडघ्यावर टेकून बसले असून त्यांचे हात नमस्कारमुद्रेंत आहेत. यांतील राजा क्यांझीथ्था हा त्याचे कपडे, दागिने व मुकुट यांच्यावरून चटकन् ओळखतां येतो. धर्मगुरु शीनचा पोषाख बुद्ध भिक्षूप्रमाणें आहे.

देवालयाचें शिखर कंबोडियन पद्धतीचें आहे. देवालयाच्या बाहेरच्या अंगावर १५०० शिल्पपट आहेत. यांमध्यें बुद्धाच्या पूर्वायुष्यांतील जातककथा कोरल्या आहेत. प्रत्येक शिल्पपटाच्या खालीं पाली अथवा मॉन लिपीमध्यें लेख कोरले आहेत.

क्यांझीथ्थाने आपल्या वडिलांच्या कारकीर्दीत सुरू झालेलें खेझीगोनचें देवालय पूर्ण केलें व शिवाय आणखींहि बरींच देवालयें बांधलीं. याच्या कारकीर्दीत बोधगयेचें देवालय मोडकळीस आलें होतें. तें देवालय याने परत बांधून काढलें. बिहार व बंगालमध्यें पाल राजांनीं ३५० वर्षें राज्य केलें. यांच्या काळांत बौद्ध व हिंदु दोनहि कला उत्कर्ष पावल्या. याच काळांत नालंदचें विद्यापीठ परत एकदा महत्त्वाला आलें. या विद्यापीठांत बौद्धधर्माचें व तत्त्वज्ञानाचें फार प्राबल्य होतें. बिहार व बंगालमध्यें पालांच्या काळांत बौद्ध कलेला प्रोत्साहन मिळालें होतें हजारों बुद्धमूर्ति येथें घडविल्या जात होत्या. येथून कांहीं भिक्षु ब्रह्मदेशामध्यें गेले व तेथें त्यांनी बुद्धाच्या मूर्ति करावयास सुरुवात केली. सुरुवातीच्या मूर्तींवर अर्थातच पाल शिल्पाची छाप होती (आकृति क्र. २१ व २२). परंतु कांहीं काळानंतर ब्रह्मी

लोकांनी बुद्धाच्या मूर्ति घडविण्याची कला अवगत करून घेतली व या मूर्ति मात्र ब्रह्मी छापाच्या झाल्या.

क्यांझीथ्थासंबंधीची माहिती त्याचा नातू 'अलौंग्सीथू' याने एका शिलालेखांत लिहून ठेविली आहे. हा लेख पेगूच्या दक्षिणेला असलेल्या 'म्याझेडी पगोडा' मध्यें आहे. अलौंग्सीथू हा क्यांझीथ्थानंतर पगानच्या गादीवर आला. ब्रह्मदेशाच्या इतिहासात अलौंग्सीथूचा शिलालेख अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण या ठिकाणीं एकत्र शिलालेख प्यू, मॉन, ब्रह्मी व पाली लिपींत लिहिला आहे. इ. स. १९११ मध्यें याचा शोध लागल्यामुळें पगानच्या राजाविषयीं पूर्वी माहीत नसलेली किती तरी माहिती उपलब्ध झाली आहे. अलौंग्सीथू हा अत्यंत धार्मिक राजा होता. हा नेहमीं आपल्या राज्यांत फिरत असे. सर्व देशभर त्यानें शिलालेख खोदविले व देवालयें बांधलीं. याच्या शिलालेखावरून तो किती धार्मिक होता याची कल्पना येते. त्याला ऐहिक ऐषारामाचें कांहींहि आकर्षण नव्हतें. याच्या काळांतील बरेच शिलालेख काव्यांत आहेत. याने 'थत्पिन्यू' नांवाचें एक देवालय बांधलें. हें बरेंचसें आनंद देवालयाच्या धर्तीवर आहे. श्वेगु पगोडयावरचा या राजाचा पाली शिलालेख वाचला तर आपल्यासमोर एकाद्या साधुसंताचें चित्र उभें राहतें.

इ. स. ११६७ ते ११७३ हा काळ पगानच्या इतिहासांत फार महत्त्वाचा आहे. या सात वर्षाच्या काळांत ब्रह्मदेशामध्यें एक महत्त्वाची घटना घडली. इ. स. च्या ११६७ सालापर्यंत ब्रह्मदेशाची भाषा मॉन होती. इ. स. ११७३ मध्यें ब्रह्मी भाषेची प्रतिष्ठा अचानकपणें वाढलेली दिसते. या काळपर्यंत वाङ्मयाची भाषा सुद्धा मॉनच होती. म्हणजे ११६७ ते ११७३ या काळांत येथें मॉन भाषा व मॉन संस्कृतीविरुद्ध कांहीं तरी चळवळ झाली असें अनुमान करता येण्यासारखें आहे. येथपासून एका शतकांत पगानची संस्कृति ब्रह्मी झाली.

इ. स. ११७३ मध्यें नरपतिसिथू हा गादीवर आला. याने इ. स. १२१० पर्यंत राज्य केलें. याच्या कारकीर्दींत बरींच देवालयें बांधलीं गेलीं. खुद्द पगानमध्यें 'गॉडॉपलीन्' व 'सुलमनी' हीं दोन

अनुक्रम ५५ ...... (विः ......
नों दि: ......

देवालयें त्यानें बांधलीं. [redacted] ठिकाणीं पगोडे बांधले. पण याच्या कारकीर्दीतील व ब्रह्मदेशाच्या इतिहासांतील महत्त्वाची घटना म्हणजे येथे सिंहली बुद्धधर्माचा प्रसार झाला. कोंजीवरम्‌चें महत्त्व नाहीसें झालें. कारण या काळांत कोंजीवरम् संपूर्णतया हिंदु झालें होतें. याउलट सिलोनमध्यें बाराव्या शतकाच्या उत्तरार्धांत हीनयान संप्रदायाचा कमालीचा उत्कर्ष झाला होता व येथून पुढें सिलोन हें बौद्ध धर्माचें एक अत्यंत महत्त्वाचें व मोठें केंद्र झालें. सिलोनविषयीं ब्रह्मदेश, सयाम, कंबोडिया या राज्यांना आदर वाटूं लागला व म्हणूनच ब्रह्मदेशाचा प्रमुख धर्मगुरु 'उत्तरजीव' हा इ. स. ११८० मध्यें सिलोनला जाऊन आला. तो परत आल्यावर लोकांनी त्याला 'सीलोनचा पहिला यात्रिक' अशी पदवी बहाल केली. 'चपत' हा दुसरा ब्रह्मी भिक्षु. हा उत्तरजीवाबरोबरच सिलोनला गेला होता. परंतु तो मागाहून १० वर्षांनी घरीं परतला. त्याला 'सिलोनचा दुसरा यात्रिक' ही पदवी लोकांनी बहाल केली. या दोघांच्या अगोदर 'पंथगू' हा धर्मगुरु सिलोनला जाऊन आला होता.

चपत परत आल्यावर 'न्यांगू' येथे भिक्षूंना दीक्षा देण्याकरितां एक केंद्र स्थापन करण्यांत आलें. येथे सिंहली पद्धतीचा एक पगोडाहि बांधण्यांत आला. येथील भिक्षूंनी थोडयाच काळांत ब्रह्मदेशामध्यें सिलोनी हीनयान संप्रदाय पद्धतशीरपणें पसरविला. ब्रह्मदेशामधून बरेच भिक्षु दीक्षा घेण्याकरितां सीलोनमध्यें गेले व परत आल्यावर त्यांनी सबंध इंडो-चीनच्या द्वीपकल्पामध्यें बुद्धधर्माचा प्रसार केला. येथील बुद्ध भिक्षु लाओस, कंबोडिया येथें गेले व तेथील सर्व लोकांना त्यांनी बुद्ध बनविले. बौद्धधर्म जनतेचा धर्म झाला. पुढे इस्लामधर्म मलाया, इंडोनेशियामध्यें आला. परंतु ज्या ठिकाणीं बुद्धधर्माचें प्राबल्य होतें तेथें मात्र इस्लामचा कांहीं परिणाम झाला नाहीं. या भागांतील शैव, वैष्णव वगैरे धर्म मात्र लोप पावले.

'नंत्योंग्म्या' (इ.स.१२१०–१२३४)च्या कारकीर्दीत बौद्ध भिक्षूंच्या कार्याला आणखीनच प्रोत्साहन मिळालें. याला धर्माचें इतकें वेड होतें

कीं, तो आपला सर्व वेळ देवालयें बांधणें व बौद्धधर्माचा प्रसार करण्याच्या कार्यांत प्रोत्साहन देणें, यांतच घालवीत असे. त्याला राज्यकारभाराकडे लक्ष द्यावयास वेळच मिळत नसे. म्हणून त्यानें राज्यकारभार आपल्या चार भावंडांकडे सोपविला होता. याने आपल्या कारकीर्दींत 'महाबोधी' व 'तिलमिनलो' हीं दोन मोठीं देवालयें बांधलीं.

पगानचा शेवटचा राजा नरथिहपति यानें 'मिंगलाझेडी' नांवाचें देवालय बांधण्यास सुरुवात केली. पण तें पूर्ण करण्याची त्यास भीति वाटूं लागली. कारण या देवालयाबद्दल अशी वदंता होती कीं ते ज्या वेळीं पूर्ण होईल त्या वेळीं पगानचें राज्य नष्ट होईल. परंतु धर्मगुरूनें आज्ञा केल्यामुळें राजाने देवालय पूर्ण केलें. पण त्याबरोबरच राज्यासंबंधीचें भाकीतहि खरें ठरलें. इ. स. १२८७ मध्यें कुबलाखानाच्या नातवंडानें पगानचें राज्य पादाक्रान्त केलें.

# श्रीविजय व शैलेन्द्र साम्राज्य

फुनानच्या ऱ्हासानंतर आग्नेय आशियामध्यें एक प्रकारची राजकीय पोकळी निर्माण झाली. फुनानची राजकीय सत्ता नाहीशी झाली. फुनानच्याबरोबर त्याचें आरमार गेलें व व्यापारी साम्राज्य कोसळलें. यामुळें मलाया द्वीपकल्पाच्या पश्चिम टोकाला एकादें नवें व्यापारी साम्राज्य निर्माण होणें अपरिहार्य झालें.

अशा प्रकारचें साम्राज्य सुमात्रामध्यें सातव्या शतकांत निर्माण झालें. या राज्याबद्दलची माहिती इ. स. १९१८ पर्यंत उपलब्ध नव्हती. याच वर्षी कोडेझ यांचा 'श्रीविजय' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला व येथपासून श्रीविजयच्या राज्याचा अभ्यास सुरू झाला.

जावा व सुमात्राविषयींची माहिती चिनी इतिहासांत सापडते. सुमात्रामधील दोन राज्यांचा उल्लेख यांत आला आहे. एक 'मौ-ली-चीऊ.' हें पूर्व किनाऱ्यावर होतें. हें मलायू. आताचें जंबी. याच्या दक्षिणेला दुसरें राज्य होतें. हें 'चे-ली-फो-चे,' म्हणजे 'श्रीविजय'. श्रीविजय म्हणजे आताचें सुमात्रामधील 'पालेंबांग.' जावामध्यें तीन राज्यें होतीं. अगदी पश्चिमेला पूर्णवर्मन्चें 'तरूमा', मध्यावर 'हो-लींग' अथवा 'कलिंग' व पूर्वेला आणिक एक राज्य.

श्रीविजयविषयींची आणखी माहिती चिनी प्रवासी 'ई-त्सींग' याच्याकडून मिळते. हा इ. स. ६७१ मध्यें चीनमधून भारतामध्यें यावयास निघाला. कँटोनपासून 'फो-चे' येथें पोहोंचावयास त्याला २० दिवस लागले. येथें ६ महिने राहून तो संस्कृत व्याकरण शिकला. तेथून तो 'मलायू' ला गेला. येथें २ महिने राहून तो 'केडाह' येथें गेला. " 'फो-चे' च्या तटबंदी असलेल्या शहरांत हजारांहून जास्त बुद्ध भिक्षु राहतात. हे अभ्यासू वृत्तीचे असून त्यांची रीतभात चांगली आहे. ज्या ज्या विषयाचें मध्य-देशांत (भारतांत) अध्ययन होतें, त्या त्या विषयांचा येथें सांगोपांग अभ्यास केला जातो. या दोन्ही देशांमधील विधीमध्यें वगैरे अजिबात फरक नाही. जर एकाद्या बुद्ध भिक्षूला

पश्चिमेकडे (भारतांत) बुद्धधर्माचें अध्ययन करण्याकरितां जावयाचें असेल तर त्यानें अगोदर 'फो-चें' येथें १-२ वर्षे अध्ययन करून मग तेथें जावे."

अी-त्सींग भारतामध्यें नालंद विद्यापीठांत १० वर्षे राहिला. नंतर तो परत फो-चे ला परतला. येथें त्यानें इ. स. ६८५ ते ६८९ पर्यंत वास्तव्य करून बऱ्याच संस्कृत ग्रंथांचें चिनी भाषेंत भाषांतर केलें. इ. स. ६८९ मध्यें त्याने कँटोनला जाऊन चार सहकारी आणले. इ. स. ६९२ मध्यें त्याने आपली बरीचशीं हस्तलिखितें चीनमध्यें पाठविलीं. तो स्वतः इ. स. ६९५ मध्यें आपल्या मायदेशीं परतला. या काळामध्यें बुद्धधर्माविषयीं लिहितांना तो म्हणतो की "भारतामध्यें जातांना लागलेलें 'मलायू' आता 'श्रीविजय' आहे." भारतामध्यें जातांना मलायू येथें दोन महिने अीत्सींग राहिला होता. अी-त्सींगच्या या विधानाला मलायामध्यें सांपडलेल्या शिलालेखांवरून दुजोरा मिळतो. हे शिलालेख इ. स. ६८३ ते ६८६ या चार वर्षांतील आहेत नीळकंठशास्त्री यांच्या मतें हे सर्व शिलालेख पल्लव अथवा आंध्र लिपीशीं मिळतेजुळते आहेत.

यांतला एक शिलालेख 'सुंगी ततंग' या नदीच्या कांठांवर 'केडुकन बुकीत' या खेड्यांत सापडला आहे. हा इ स. ६८३ चा आहे. १३ एप्रिल ६८३ रोजीं एक राजा एका जहाजांत बसून 'सिद्धयात्रेवर' निघाला. ८ मे रोजीं त्याने २०,००० सैन्य घेऊन हा किनारा सोडला व तो मलायूमध्यें गेला. याची शेवटची ओळ अशी आहे- "श्री-विजय जयसिद्धयात्रा मुभिक्ष......" म्हणजे मलायूची ही मोहीम यशस्वी झाली असें दिसतें. इथून दोन मैलांवर 'तलंग तुवो' गांवीं दुसरा शिलालेख सापडला आहे. हा १४ ओळींचा आहे तो इ स ६८४ चा आहे यामध्यें जयनाश (जयनाग ?) नांवाच्या राजानें 'श्री-क्षेत्र' नांवाची सार्वजनिक बाग बांधल्याचा उल्लेख आहे. तिसरा शिलालेख जंबी नदीच्या तीरावर 'फरंग ब्राही' येथें मिळाला आहे. चवथा बंकाच्या द्वीपकल्पांत 'कोताकपूर' येथें मिळाला आहे. हे दोनहि शिलालेख

इ. स. ६८६ चे आहेत. या शिलालेखांत श्रीविजयच्या सैन्याची जावावर मोहीम निघाली असल्याचा उल्लेख आहे. या तिसऱ्या व चवथ्या शिलालेखांत बरंग व बंका येथील जनतेला बंड केल्यास त्याचे काय परिणाम होतील याची समज दिली आहे. राजसत्तेविरुद्ध कोणत्याहि प्रकारचा उठाव केल्यास त्याचा कडक बंदोबस्त करण्यांत येईल असें घोषित करण्यांत आलें आहे. येथील लोकांनी राजाची व त्याने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांची आज्ञा पालन करावी असें त्यांना बजावून सांगण्यांत आलें आहे. नाहीं तर त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना कडक शिक्षा देण्यांत येईल असा इशारा त्यांना देण्यांत आला आहे.

श्रीविजय हळूहळू आपले हातपाय पसरूं लागले. एका बाजूला मलायाची सामुद्रधुनी व दुसऱ्या बाजूला सुन्दाची सामुद्रधुनी. या दोहोंच्या मध्यें श्रीविजय होतें. भारत व चीन या दरम्यानच्या व्यापारी दळणवळणाच्या मार्गावरच मोक्याचें स्थान असल्याने श्रीविजयने व्यापारक्षेत्रांत आपलें वर्चस्व स्थापन केलें. भारतीय व चिनी जहाजांना श्रीविजयला भेट देणें अपरिहार्यच होऊन बसलें. भारत व चीन या दोनहि देशांशीं श्रीविजयनें मित्रत्वाचे संबंध ठेविले व आपल्या व्यापाराची भरभराट करून घेतली. अी-त्सींगनें भारताचा प्रवास श्रीविजयच्या जहाजांतूनच केला.

सातव्या शतकाच्या पूर्वीचा श्रीविजयचा इतिहास उपलब्ध नाही. फेरांडच्या मतें श्रीविजयचा पहिला उल्लेख चवथ्या शतकांत मिळतो. इ. स ३९२ मध्यें भिक्षु कलोदक याने चिनी भाषेंत भाषांतर केलेल्या एका ग्रंथांत जांबुद्वीपाचा उल्लेख आहे. या द्वीपांत 'चों-चें' नांवाचें राज्य असल्याचा उल्लेख आहे. सिल्व्हन लेव्ही यांच्या मतें हें जावा असावें, तर फेरांड यांच्या मतें हें 'श्रीविजय' होय. चीनमधील 'मिंग' वंशाच्या इतिहासांत 'सान्–फो–त्सी' (श्रीविजय) ने आपली पहिली वकीलात 'सुंग' वंशाचा बादशहा 'हीआ-वु' (इ. स. ४५४ ते ४६४) याच्याकडे पाठविल्याचा उल्लेख आहे. पण त्या वेळीं सान्–फो–त्सीचें नांव 'कन्–तो–ली' होतें असें म्हटलें आहे. हें कन्–तो–ली म्हणजेच

श्रीविजय असें नीळकंठशास्त्री म्हणतात. पण याबद्दल निश्चित कांहीच सांगता येत नाही. कारण कांही विद्वानांच्या मतें श्रीविजय सुरुवातीला पूर्व जावा अथवा मलायाच्या द्वीपकल्पांत असावें असें आहे.

श्रीविजयचें राजधानीचें शहर मध्य सुमात्रामधील पालेंबांग. बंका, करंग ब्राही, मौरा टाकुस वगैरे भाग 'दातु' नांवाच्या अधिकाऱ्यांकडे होते. मुजुमदारांच्या मतें ही राजधानी पालेंबांगला नसून ती कोठें तरी जावा अथवा मलायामध्यें असावी. क्वेरीच वेल्स यांच्या मतें ती बँडॉन-च्या उपसागरांतील 'चैय्य' या ठिकाणीं असावी. श्रीविजयचा पहिले संशोधक कोडेज्ञ यांच्या मते सुमात्रामधील पालेंबांग हीच श्रीविजयची राजधानी होय.

उपरिनिर्दिष्ट चवथ्या शिलालेखांत 'भूमि-जावा' चा उल्लेख आहे. यामध्यें श्रीविजयचें सैन्य जावावर चाल करून जात असल्याचा उल्लेख आहे. हें जावा व भूमिजावा एकच. सातव्या शतकाच्या अखेरला श्रीविजयने पश्चिम जावाचा कांही भाग जिंकून घेतला. इ. स. ६८३ मध्यें श्रीविजयने मलायू जिंकला. श्रीविजयच्या चढाऊ धोरणामुळें त्या राज्याच्या ताब्यांत जवळजवळ सर्व सुमात्रा व बंका हे प्रदेश आले. तेव्हां जावावर आक्रमण होणें हें क्रमप्राप्तच होतें. वर उल्लेखिलेल्या दोन शिलालेखांवरून श्रीविजयच्या राज्याच्या प्रांतावर दातु (प्रांताधिकारी) नांवाचे अधिकारी होते व ते इमान राखणाऱ्या लोकांना बक्षिसें देत व बंडाळी करणाऱ्यांना शिक्षा करीत असें म्हटलें आहे.

मोअेन्सच्या मतें शिलालेखांत जावावरील आक्रमणाचा जो उल्लेख आला आहे तो पश्चिम जावामधील 'तरूमा' चा असावा. तरूमाचा उल्लेख इ. स. च्या पांचव्या शतकांतील पूर्णवर्मन् च्या शिलालेखांत आला आहे. चीनमधील 'लीआंग' व 'टांग' वंशाच्या इतिहासांत 'तो–ली–मे' येथून सहाव्या व सातव्या शतकांत वकीलाती आल्याचा उल्लेख आहे. हें 'तो-ली-मे' म्हणजेच 'तरूमा'. इ.स. ६६९ नंतर त्याचा उल्लेख सापडत नाही. याचें कारण हें राज्य श्रीविजयमध्यें विलीन झालें असावें.

म्हणजे श्रीविजय हें वायव्येला मलायाच्या सामुद्रधुनीकडे व आग्नेयेला सुन्दाच्या सामुद्रधुनीवडे पसरत होतें. श्रीविजयचा हेतु भारतीय समुद्र व चिनी समुद्र यांमधील व्यापार काबीज करण्याचा होता. श्रीविजयच्या वाढत्या महत्त्वाकांक्षेचा पहिला बळी मलायू. भारत व चीनमधील व्यापार ताब्यांत ठेवण्याकरितां सुमात्राच्या आग्नेय किनाऱ्यावरील बंदरें ताब्यांत ठेवणें आवश्यक होतें.

श्रीविजय हें मलायाच्या द्वीपकल्पांतील राजकीयच नव्हे तर सांस्कृतिक केन्द्र झालें होतें. ज्या वेळीं हे राजे मलायाच्या पूर्व किनाऱ्यावर होते त्या वेळीं ते हिंदु होते. सुमात्रामध्यें पालेंबांगला राजधानी आल्यावर श्रीविजय हें बुद्धधर्माचें एक महत्त्वाचें केन्द्र बनलें. इ स. ४१३ मध्यें 'फा-हीन' हा चिनी प्रवासी यवद्वीपांत येऊन गेला. तो म्हणतो, "येथें बुद्धाचे अनुयायी इतके कमी आहेत कीं त्यांचा उल्लेख न केलेलाच बरा." यानंतर कांहीं वर्षांनी काश्मीरमधील गुणवर्मन् नांवाचा एक बुद्ध भिक्षु 'ची-पो' (जावा ?) मध्यें गेला व तेथील राजमाता व राजा या दोघांना त्याने बुद्धधर्माची दीक्षा दिली. तो इ. स. ४३१ मध्यें चीनला गेला. तो चीनला जाईपर्यंत सर्व जावामध्यें बुद्ध धर्माचा प्रसार झाला होता. चिनी इतिहासाप्रमाणें सहाव्या शतकाच्या सुरुवातीला कान्तोलीच्या राजाने बुद्धधर्म स्वीकारला. सातव्या शतकाच्या अखेरपर्यंत जवळ जवळ मलायाच्या सर्व द्वीपसमूहामध्यें हीनयान बुद्धधर्म पसरला. श्रीविजयमध्यें मात्र महायान पंथाचा प्रसार झाला होता. 'तेलंग तुवोच्या' शिलालेखावरून येथें तंत्रयान बुद्धधर्माचा प्रसार झाला होता असें दिसतें. तंत्रयान बुद्धधर्म महायानाच्या 'योगाचार' पंथांतून निर्माण झाला होता व याची सुरुवात सातव्या शतकाच्या मध्यावर बंगालमध्यें झाली. नालंदचें आंतरराष्ट्रीय कीर्तीचें विद्यापीठ या पंथाचें माहेरघर बनलें होतें. बंगाल, बिहारमध्यें बुद्ध व हिंदुधर्म यांचें मिश्रण झालें होतें व तांत्रिक पूजेचें प्राबल्य फार वाढलें होतें. हाच प्रकार सुमात्रा व जावामध्यें झालेला आढळून येतो.

'कांचीपुरम्' हें दक्षिण भारतांतील वुद्धधर्मीयांचें एक प्रमुख केन्द्र होतें. कांचीचा धर्मपाल हा नालंद विद्यापीठांत ३० वर्षे होता. तो नंतर सुवर्णद्वीपांत गेला. धर्मपालाच्या प्रयत्नाने मलायू महायान पंथीय झाले. सुमात्रामध्यें पालेंबांगला श्रीविजयची पुन:स्थापना झाल्यावर हें महायान वुद्धधर्माचें मोठेंच केन्द्र बनलें. येथें वुद्धाच्या धर्मग्रंथांचा अभ्यास होऊं लागला. श्री–त्सींगनें भारतामधून येथें येतांना त्रिपीटिकामधील ५००,००० श्लोक आणले. या सुमारास श्रीविजयचा चीन व भारत या दोहोंशींहि संबंध होता.

आठव्या शतकांत श्रीविजयचा उल्लेख चिनी इतिहासांत सापडतो. 'फो-चे' हून चीनला इ. स. ७०२ व ७१६ मध्यें वकील आल्याचा उल्लेख आहे. इ. स. ७२४ मध्यें 'कीअु-मों-लो' ('कुमार'-हा श्री-विजयचा राजपुत्र असावा) याने चिनी वादशहाला दोन वुटकीं माणसें, एक निग्रो नर्तकी, कांहीं वादक व पांच रंगीत पोपट दिल्याचा उल्लेख आहे. चिनी वादशहाने यावद्दल याला 'चो-चोंग' (सेनापती) ची उपाधि वहाल केली व रेशमाचे १०० तुकडे दिले. श्रीविजयच्या राजाला 'चे-ली-टो-ले-पा-मे' (श्रींद्रवर्मन् ?) ही पदवी बहाल केली. श्रीविजयची या काळांतील शेवटची वकीलात चीनला इ. स. ७४२ मध्यें गेली.

इ. स. ७७५ मध्यें खोदलेली एक शिला लीगोर येथें सापडली आहे. तिच्या दोनहि बाजूला लेख कोरलेले आहेत. एका वाजूला ४ ओळी दिसतात, याला कोडेझ 'B' म्हणतो व दुसऱ्या बाजूला २९ ओळी आहेत, याला तो 'A' म्हणतो. ए शिलालेख हा इ. स. ७७५ चा आहे. याच्या सुरुवातीला नेहमीचा 'मंगलचरण' नाहीं. पहिल्या चार श्लोकांत राजाची खूप स्तुति केली आहे. पांचव्या श्लोकांत श्री-विजयेन्द्रराज याच्या आधिपत्याखालीं आजूबाजूच्या देशांतील राजे राहतात असें म्हटलें आहे. या श्री-विजयेश्वर-भूपतीने तीन स्तूप वांधल्याचा उल्लेख नंतर आला आहे. आठव्या श्लोकांत हे तीन स्तूप 'जयन्त' नांवाच्या त्याच्या धर्मगुरूने राजाज्ञेवरून बांधले असें म्हटलें

आहे. जयन्ताच्या मृत्युनंतर त्याचा शिष्य 'अधिमुक्ती' हा राजगुरु झाला व त्याने या तीन स्तुपांजवळ विटांचे आणखी चैत्य बांधले. दहाव्या श्लोकांत श्रीविजयच्या राजाची इन्द्राशीं तुलना केली आहे.

या शिलालेखावरून श्रीविजयने अवलंबिलेलें चढाईचें धोरण किती यशस्वी झालें याची स्पष्ट कल्पना येते. एका शतकांतच हें राज्य खूप पसरलें, हें या लीगोरच्या शिलालेखावरून स्पष्ट होतें. इ.स. ७७५ पर्यंत ही प्रगति चालूं राहिली. सुमात्रा, बंका व पश्चिम जावाचा कांही भाग या राज्यांत या वेळीं होता. श्रीविजयचा हा उत्कर्षाचा काळ होता. श्रीविजयच्या या उत्कर्षकाळांत त्या राज्याचें हिंदुत्वकरण होत होतें असें दिसतें. पहिले शिलालेख मलाय व संस्कृतमिश्रित आहेत. लीगोरचा शिलालेख संस्कृतांत तर आहेच पण अत्यंत काव्यमय आहे

लीगोरच्या शिलालेखाची 'बी' बाजू जावामधील शैलेन्द्र राजांचा परिचय करून देते. या बाजूला फक्त एकच श्लोक दिसतो. यांत शैलेन्द्र राजाची तुलना सूर्य, मदन, विष्णु यांच्याशीं केली आहे, व 'श्रीविजय महाराज शैलेन्द्र वंशाचे आहेत असें म्हटलें आहे बऱ्याच काळपर्यंत हे शैलेन्द्र राजे श्रीविजयचे राजे होत अशी समजूत होती. क्रोमचें हें प्रतिपादन मुजुमदार यांना मान्य नाही. ए शिलालेखामध्यें श्रीविजयचे राजे शैलेन्द्र वंशाचे असल्याचा कोठेहि उल्लेख नाही. उलटपक्षीं 'बी' शिलालेखावर शैलेन्द्राचा उल्लेख आहे पण श्रीविजयचा नाही.

जावामध्यें शैलेन्द्रांचे दोन शिलालेख सापडले आहेत. नवव्या शतकाच्या मध्यावरच्या देवपालदेवाच्या नालंद ताम्रपटांत देखील शैलेन्द्राचा उल्लेख आहे. जावामधील 'कलसन'चा शिलालेख इ. स. ७७८ चा आहे. यांत १२ संस्कृत श्लोक आहेत. प्रथम तारेला मंगल अभिवादन आहे. 'नमो-भगवते आर्य तार्ये-' लिपि पूर्वनागरी आहे. तारेला अभिवादन केल्यावर मंगलचरण आहे. यांत तारेकरितां शैलेन्द्र राजांच्या धर्मगुरूंनीं महाराज 'पंचजन पनकरण' यांच्या अनुमतीनें एक देवालय बांधलें असें म्हटलें आहे. हीं धार्मिक कार्यें शैलेन्द्र वंशाला ललामभूत ठरलेल्या राजाच्या कारकीर्दींत घडलीं असें पुढें म्हटलें

आहे. शके ७०० मध्यें महाराज पंनकरण याने ताराचें देवालय बांधलें व तेथील संघारामाच्या चरितार्थाकरितां एक खेडें दान केलें. ह्या देवालयाचा कारभार राजाने नियुक्त केलेल्या पंकुर, तवान, तीरूप वगैरे स्थानिक अधिकाऱ्यांच्या मदतीने चालत असे.

जावामधील शैलेन्द्राचा दुसरा शिलालेख ' केलुरक ' येथील इ. स. ७८२ चा. हा देखील पूर्व नागरी लिपीमध्यें आहे. सुरुवातीला ' नमो रत्नत्रयाय ' असें म्हटलें आहे. त्यानंतर २० संस्कृत श्लोक आहेत. पहिल्या दोन श्लोकांत वऱ्याचशा बुद्धदेवतांना अवाहन केलें आहे. चवथ्या श्लोकांत शैलेन्द्र वंशांतील राजा धरणेंद्र हा पृथ्वीला आधारभूत झाला आहे असें म्हटलें आहे. हा आपलें राज्य सामंत, मंत्री वगैरे अधिकाऱ्यांच्या मदतीने चालवितो तो मोठा जेता आहे. याच्या कारकीर्दीत त्याचा गुरु ' कुमारघोष ' याने मंजुश्रीचें देवालय बांधलें. मंजुश्री हा हिंदु त्रिमूर्तीचें व बुद्ध त्रिरत्नाचें प्रतीक आहे. शेवटच्या श्लोकांत ' श्री-संग्राम-धनंजय ' एवढींच अक्षरें स्पष्ट आहेत.

हे दोन्ही शिलालेख मध्यजावामध्यें असून ते उत्तर भारतीय (पूर्वनागरी) लिपींत आहेत. शैलेन्द्राचे नंतरचे शिलालेख या लिपींत नाहीत.

श्रीविजयचे राजे शैलेन्द्र होते का ? कीं शैलेन्द्र राजांनी श्रीविजय जिंकून घेतलें ? कां कांही काळपर्यंत शैलेन्द्र वंशांतील राजांनीं श्रीविजयवर राज्य केलें, अशा अनेक समस्या निर्माण होतात. याचीं उत्तरें निरनिराळ्या अभ्यासकांनीं निरनिराळ्या प्रकारें दिलीं आहेत.

मध्य जावामध्यें कांहीं सुवर्णपट सापडले आहेत. यावरची लिपि, लीगोरमधील ' ए ' व ' बी ' वरची लिपि या मिळत्याजुळत्या आहेत. यावरून श्रीविजयचेच राजे शैलेन्द्र असावेत असा निष्कर्ष नीळकंठशास्त्री काढतात.

हे शैलेन्द्र होते कोण ? हा वादाचा प्रश्न आहे. शैलेन्द्र म्हणजे पर्वताचे राजे. ही उपाधि शिवाची आहे. दक्षिण भारतामधील पांड्य

राजे स्वतःला 'मिनांकित' शैलेन्द्र म्हणवीत. हीरानन्दशास्त्रींच्या मतें हे शैलेन्द्र राजे कलिंगामधून जावामध्यें गेले असावे. मुजुमदारांचा याला दुजोरा दिसतो व म्हणूनच जावामध्यें नागरी लिपीचा प्रसार झाला असें त्यांचें म्हणणें आहे. पण ही नागरी लिपि बंगालमधील बुद्ध भिक्षूंनीं जावामध्यें नेली असल्याचा संभव आहे. जावामधील एका भागाला 'हो-लींग' (कलिंग) म्हणतात. पण हें नांव या भागाला चिनी इतिहासकार फार पुरातन काळापासून लावत आलें आहेत. मुजुमदारांच्या मतें पूर्वेचे गांग राजे, शैलोद्भव व शैल राजे हे सर्व शैलेन्द्र असावेत. कोडेझ यांच्या मतें हें नांव फुनानमधील राजांपासून घेतलें असावें. कारण ते देखील आपल्याला शैलराज म्हणवीत. फुनानी राज्य नष्ट पावल्यावर त्यांच्याशीं मित्रत्वाचें नातें असणाऱ्या एकाद्या जावामधील राजवंशाने यांची उपाधि घेतली असावी, असें ते म्हणतात. शैलेन्द्र हें नांव कलिंग, दक्षिण भारत अथवा फुनानवरून घेतलें असल्याचा कोणताहि पुरावा उपलब्ध नाही. मात्र या नांवाचा संबंध शिवाशीं आहे एवढें निश्चित. कारण तो पर्वतराज आहे.

या शैलेन्द्र राजांचा जावा व सुमात्राशीं काय संबंध आला होता तें पाहिलें पाहिजे. व्होगेल व कोम या डच इतिहासकाराच्या मतें श्रीविजयचे राजे शैलेन्द्र वंशाचे होते. जावामध्यें राज्य करण्यापूर्वी हे राजे सुमात्रामध्यें राज्य करीत होते. केडूच्या इ. स. ९०७ च्या ताम्रपटाचा आधार घेऊन स्टटरहीम हे डच इतिहासकार याला दुजोरा देतात.

केडूचा हा ताम्रपट अत्यंत महत्त्वाचा आहे. यांत ९ राजांचीं नावें आहेत. शेवटचें नांव 'श्री-महाराज रकाई वतुकुर वलीतुंग' याचें आहे. याची राजधानी मध्य जावामध्यें 'मतराम' येथें होती. ही यादी अशी आहे :-

रकाओ मतराम संग रतू संजय
श्री-महाराज रकाई पनुंग करण
श्री-महाराज रकाई पनुंग गलन

श्री-महाराज-रकाई वराक
श्री-महाराज-रकाई गरुंग
श्री-महाराज रकाई जिकतन
श्री-महाराज रकाई वंगी
श्री-महाराज रकाई हुमालंग
श्री-महाराज रकाई वटुकुर

यांतील संजयाचा उल्लेख इ. स. ७३२ च्या चंगल शिलालेखांत सापडतो. हा शिलालेख बोरोबुदरच्या आग्नेय दिशेला असलेल्या वुकीर टेकाडावर एका शिवदेवालयांत सापडला. यांत मतरामच्या संजयानें कुंजरकुंजरदेशामध्यें एका लिंगाची प्रतिस्थापना केल्याचा उल्लेख आहे. केडूचा संजय व हा संजय एकच. या संजयानंतर आणखी ८ राजांचा उल्लेख आहे. या सर्वांच्या मागें 'रकाई' व 'महाराज' अशीं दोन बिरुदें आहेत. संजयानंतर महाराज पनंगकरणचें नांव आहे. हा 'कलशन' शिलालेखाचा 'पंचपण पनंगकरण' याची आठवण करून देतो. संजयाची तारीख इ. स. ७३२ आहे. तर पनंगकरणाची इ. स. ७७८ आहे. तेव्हां केडूचा पनंगकरण व कलशनचा पनंकरण हें एकच असें मानावयास हरकत नाहीं. संजयानंतर हा राज्यावर आला. पहिला संजय व शेवटचा वलीतुग यांच्यामध्यें ७ राजांनीं १७५ वर्षें राज्य केलें.

या पनंगकरणानें केलूरकचा शिलालेख कोरला असावा, कारण या शिलालेखांत व कलशनच्या शिलालेखांत बरेंच साम्य आहे. या पनंगकरणाचें अभिषेकनाम 'धरणेंद्र' असावें. शैलेन्द्र घराण्याच्या स्थापनेपासून (आठव्या शतकाच्या उत्तरार्धांत) जावामध्यें स्थापत्याचें एक नवें युग सुरू होतें. बोरोबुदरची अमर कलाकृति याच काळांतली. बोरोबुदरच्या जवळच 'चंडी मेंदूत' आहे. या दोहोंमधील संबंध सहज लक्षांत येण्याइतका स्पष्ट आहे येथें बुद्ध व त्याचे दोन बोधिसत्त्व यांच्या मूर्ति आहेत. त्या गुप्त पद्धतीच्या वाटतात. एकंदरींत शैलेन्द्राचें राज्य सुरू झाल्यावर येथील कला उत्कर्षाला पोहोंचली.

यामुळें एक निराळाच प्रश्न निर्माण होतो. केडूच्या यादींतला संजय शैव होता, तर पनंगकरण हा बुद्ध होता. मग या दोघांचा संबंध काय? संजयाचा 'महाराज' म्हणून उल्लेख नाही व तो शैलेन्द्र असल्याचा पण दावा केलेला आढळत नाहीं. मग तो शैलेन्द्र होता कीं नाही? नसला तर मग तो होता तरी कोण? याचें उत्तर संजय हा स्थानिक राजा होता व त्याची व त्याच्याबरोबरच शैवपंथाची हकालपट्टी करून पनंगकरण हा येथील राज्यावर आला असें देतां येईल. 'दिनम' नांवाच्या ठिकाणीं एक संस्कृत शिलालेख मिळाला आहे तो इ. स. ७६० चा आहे. यांत अगस्ति ऋषीचें देवालय 'देवसिंह' राजाच्या 'गजयन' नावाच्या पुत्रानें बांधलें असल्याचा उल्लेख आहे. हे राजे शैव होते. संजय हा या घराण्यांतील शेवटचा राजा असावा. शैलेन्द्र राजांनी यांची हकालपट्टी पूर्व जावामध्यें करून आपली सत्ता मध्य जावामध्यें प्रस्थापित केली.

संजयाच्या घराण्यांतील राजे पूर्व जावामध्यें गेले. कांहीं काळानंतर त्यांनी जुन्या राज्यांतील कांहीं भाग जिंकून घेतला व या घटनेच्या स्मरणार्थ एक नवा शक स्थापन केला.

केडूमधील यादीमध्यें आलेले राजे हे एका वंशाचे नव्हते हें यावरून स्पष्ट होतें. मध्यजावामध्यें ज्या राजांनी एकामागून एक असें राज्य केलें त्यांची ही यादी आहे.

शैलेन्द्राची सत्ता कां व कशी नाहीशी झाली याबद्दलहि बराच वाद आहे. क्रोमच्या मतें हा वंश इ. स. ८७९ मध्यें संपला. कारण या वर्षी मध्यजावामध्यें जो राजा राज्य करतांना आढळतो तो शैलेन्द्र वंशाचा नाही. इ. स. ८६३ मध्यें मध्यजावामध्यें अगस्ति ऋषीची पूजा सुरू होते. याचा अर्थ येथून बुद्धधर्माची पिछेहाट झाली असा होतो. मुजुमदारांच्या मतें शैलेन्द्र राजाचें साम्राज्य तेराव्या शतकापर्यंत अस्तित्वांत होतें व त्या शतकांत थाय व जावा या दोन ठिकाणांहून या राज्यावर आक्रमण झालें व त्याचा नाश झाला. एकंदर याबाबतचा उपलब्ध असलेला पुरावा लक्षांत घेतल्यास शैलेन्द्र राजांची मध्य

याचा पिता धर्मपाल हा होय. बॉश (डच इतिहासकार), मुजुमदार यांच्या मतें हें नांव ‘ धर्मसेतु ’ नसून ‘ वर्मसेतु ’ आहे.

क्रोमच्या मतें धर्मसेतु हा श्रीविजयचा राजा होता व शैलेन्द्र राजा ‘ समराग्रवीर ’ याने त्याच्या कन्येशीं विवाह केला. यांचा पुत्र बालपुत्र धर्मसेतूच्या मृत्यूनंतर कदाचित त्याचा कोणी वारसपुत्र नसल्या-मुळें श्रीविजय (सुमात्रा) चा राजा झाला व येथपासून शैलेन्द्र राजे सुमात्रावर राज्य करूं लागले.

सातव्या, आठव्या व नवव्या शतकांत ज्या वकीलाती या भागांतून चीनला गेल्या त्यांच्या आधारें याबाबतींत काय प्रकाश पडतो तें बघूं. इ. स. ६७० ते ७४९ पर्यंत फक्त श्रीविजयमधून येथें वकील गेले. इ. स. ७६७ ते ८७३ मध्यें फक्त जावामधून व इ. स ९०४ ते ११७८ मध्यें फक्त श्रीविजयमधून येथे वकील गेले. याचा अर्थ ७६७ ते ८७३ मध्यें सुमात्रावर जावाचें राज्य होतें, असा स्टटरहीम करतो. परंतु तो बरोबर नाही. कारण चीनचे व श्रीविजयचे या काळांतील संबंध मैत्रीचे नसण्याचा संभव आहे. लीगोरच्या शिलालेखांत श्रीविजय व शैलेन्द्र या दोघांच्याहि सत्तेचें दर्शन होतें.

यावरून श्रीविजयची माहिती मिळते. श्रीविजयचें अधिराज्य मलायाच्या दोनहि सामुद्रधुनींत होतें. यांचें पश्चिम जावामध्यें सुद्धा राज्य होतें. याच सुमारास शैलेन्द्राचें राज्य मध्यजावामध्यें प्रस्थापित झालें. या दोहोंचे संबंध मित्रत्वाचे होते. या दोन सत्ता एकत्र आल्या व त्यांनी आपलें अधिराज्य कंबुजा व चंपावर कांही काळपर्यंत प्रस्था-पित केलें. श्रीविजयचा राजा धर्मसेतु हा मृत्यु पावल्यावर त्याला वारसपुत्र नसल्यामुळें त्याचा नातू बालपुत्र हा श्रीविजयचा राजा झाला. येथपासून श्रीविजयवर शैलेन्द्र राजे राज्य करूं लागले.

**श्रीविजयचें शैलेन्द्र साम्राज्य.**

या शैलेन्द्रांच्या काळांत जावामध्यें एक नवें युग सुरू झालें व म्हणून त्यांच्याविषयीं जास्त माहिती मिळविणें अवश्य ठरतें. शैलेन्द्रांचें

साम्राज्य आठव्या शतकाच्या उत्तरार्धांत उदयास आल्याचें लीगोरच्या शिलालेखावरून कळतें. आठव्या शतकापासून मलायाचे द्वीपसमूह व मलायाचें द्वीपकल्प यांवर हें साम्राज्य पसरूं लागलें होतें. हें साम्राज्य स्थापन झाल्यापासून येथें एक नवीनच युग सुरू झालें. राजकीय एकात्मता तर निर्माण झालीच पण याहूनहि महत्त्वाची गोष्ट म्हणजे येथें एक समृद्ध असें सांस्कृतिक जीवन निर्माण झालें. शैलेन्द्रांच्या काळांत जावानें महायान बुद्धधर्माचा स्वीकार केला. बोरोबुदर व चंडी कलशनसारखीं स्मारकें यांच्याच काळांत व यांच्याच आश्रयाखालीं बांधलीं गेलीं. त्यांनी नागरी लिपीचा पुरस्कार केला व वाङ्मयाला उत्तेजन दिलें. नाट्यशास्त्र, काव्यशास्त्र, व्याकरण, ज्योतिष, पुराणें, स्थापत्य, शिल्प व इतर अनेक शास्त्रांना व कलांना त्यांनीं आश्रय दिला. बोरोबुदरसारखी चैतन्यमय व चिरस्मरणीम कलाकृति शैलेन्द्रांच्या साम्राज्यांतच निर्माण होऊं शकली. श्रीविजयच्या साम्राज्यांत बोरोबुदर, चंडी कलशनसारख्या कलाकृति निर्माण झालेल्या दिसत नाहीत. शैलेन्द्रांचा आगळेपणा व मोठेपणा यांतच आहे कीं त्यांच्या काळांत बौद्धच नव्हें तर हिंदु वाङ्मयाला पण बौद्ध वाङ्मयाइतकें अथवा जास्त प्रोत्साहन मिळालें व यामुळें जावाचें या काळांतील जीवन समृद्ध झालें.

या राज्याचा उल्लेख अरब इतिहासकार व लेखक 'झावग' म्हणून करतात. मुजुमदार यांच्या मतें शैलेन्द्रांनीं आपलें आरमार बळकट करून इंडो-चीनमध्यें कांही काळपर्यंत आपला दरारा बसविला होता. तेथील चंपा (आनाम) व कंबुजा (कंबोडिया) या दोन देशांवर त्यांनीं यशस्वी रीतीनें आक्रमण केलें होतें. नवव्या शतकाच्या मध्यावर त्यांचें येथील वर्चस्व संपलें. कंबोजाच्या दुसऱ्या जयवर्मनानें शैलेन्द्र राजांची सत्ता झुगारून दिली. शैलेन्द्रांच्या या वेळच्या अगतिक परिस्थितिमुळें त्यांना याबाबतींत कांहीच करता येण्यासारखें नव्हतें. त्यांची जावामधील परिस्थितीच इतकी शोचनीय झाली होती कीं त्यांना आपली तेथील परिस्थिति आवाक्यांत ठेवतां ठेवतां नाकी नऊ आलें. परंतु त्यांनीं कसें तरी आपलें राज्य टिकवून धरलें.

इ. स. ८७१ मध्यें शैलेन्द्रांचें राज्य अगदी मोडकळीस आलें होतें. तें पार मोडून संपुष्टांत आलें असें नीळकंठशास्त्री म्हणतात. मुजुमदारांच्या मतें हें राज्य जावामध्यें संपुष्टांत आलें परंतु सुमात्रावर या वंशाचे राजेच राज्य करीत होते. अरब व चिनी इतिहासकारांनीं 'झावग' व 'सान-फो-त्से' असे ज्याचे उल्लेख केले आहेत तेंच श्री-विजयचें शैलेन्द्र राज्य. अरब व्यापारी 'झाबगचा' सारखा उल्लेख करतात. ओीवन् खोर्दाझबे (इ. स. ८४४) लिहितो कीं झाबगच्या महाराजाचें रोजचें उत्पन्न २०० मण सोनें आहे. इ. स. ९०३ मध्यें ओीबन् रोस्ते म्हणतो कीं झावगच्या राजाएवढा कोणी श्रीमंत नसेल. सुलेमान झावगविषयीं लिहितांना म्हणतो, "झाबग ते चीन या प्रवासाला १ महिना लागतो. येथील राजाला 'महाराज' म्हणतात. त्याचें राज्य ९०० 'परसंग आहे' त्याच्या सार्वभौमत्वाखालीं आणखी १००० 'परसंग' इतकीं राज्यें आहेत. यांत 'श्रीबुझा' (श्रीविजय) व 'रामी' ही दोन मोठीं राज्यें आहेत. झावगच्या राज्यांत एक विचित्र पद्धत आहे. तेथील राजाचा राजवाडा एका तलावानें समुद्राशीं जोडलेला आहे. रोज सकाळीं राजा यांत एक सोन्याची वीट टाकतो. राजाच्या मृत्यूनंतर या सर्व विटा गोळा करतात व राजकुटुंबांतील व्यक्ति, राजाचे सेनापति व इतर कांही ठरलेली मंडळी हें सोनें आपसांत वांटून घेतात." मसुदीने हीच माहिती इ.स. ९४३ मध्यें परत जशीच्या तशीच नमूद करून ठेवली आहे. झाबगच्या या ऐश्वर्याची कल्पना भारत व चीन या दोघांनाहि होती व म्हणून या सुवर्णद्वीपाकरितां दोनहि देश मोठ्या हिरिरीनें लढले. शैलेन्द्रांना चीन व भारतामधील चोल राजे या दोघांशीं सामना द्यावा लागला. इ. स. १००० मध्यें चिनी लोकांनी झाबगवर आक्रमण करून तेथें लूटमार केल्याचें 'इब्राहिम बीन वाशीफ साह' याने नमूद करून ठेवलें आहे. इ स. १०३० मध्यें लिहितांना अलबेरुनी म्हणतो, "या समुद्रांत पूर्वेकडे चीनजवळ झाबगचीं द्वीपकल्पें आहेत. हिंदु यांना सुवर्णद्वीप म्हणतात." अरब व्यापाऱ्यांच्या माहितीवरून श्रीविजयचें राज्य नवव्या व दहाव्या शतकांत अस्तित्वांत होतें असें दिसतें. यासंबंधींचा पुरावा चिनी इतिहासांत देखील आढळतो.

दहाव्या शतकांत श्रीविजयच्या राजांचे बरेच वकील चीनला गेले. चिनी भाषेमध्यें या राज्याचा 'सान-फो-त्सी' असा उल्लेख आहे. नीळकंठशास्त्री यांच्या मतें या वकीलाती श्रीविजयच्या होत्या, कारण सान-फो-त्सी म्हणजे श्रीविजय असें ते म्हणतात. मुजुमदारांच्या मतें या श्रीविजयवर राज्य करणारा वंश शैलेन्द्रांचा होता. राज्याचें नांव श्रीविजय पण राज्य करणारा वंश शैलेन्द्रांचा. बालपुत्रापासून शैलेन्द्र घराणें श्रीविजयवर राज्य करूं लागलें. इ. स. ९०५ मध्यें श्रीविजयचे वकील चीनला गेले. यानंतर इ. स. ९६०, ९६१, ९६२, ९७४, ९७५, ९८० व ९८३ या सालीं चीनमध्यें श्रीविजयचे वकील गेले. इ. स. ९८८ मध्यें श्रीविजयच्या राज्यावर गंडांतर आलें. जावामधूनच त्यांच्यावर आक्रमण झालें. याच वर्षी श्रीविजयचा वकील चिनी दरबारीं आला होता. इ. स. ९९० सालीं तो परत जावयाकरितां कँटोनला आला. तेथें त्याला आपल्या राज्यावर आक्रमण झाल्याची बातमी समजली. म्हणून तो एक वर्षभर तेथेंच थांबला. नंतर तो चंपाला आला. तेथें त्याला आणखीनच वाईट बातमी समजल्यामुळें तो परत चीनला आला व त्याने चिनी बादशहाकडे संरक्षण मागितलें. जावाचा राजा धर्मवंश यानें श्रीविजयचा पराभव केला. परंतु त्याचें हें यश तात्कालिक स्वरूपाचें ठरलें. कारण इ. स. १००३ मध्यें शैलेन्द्र राजांनी आपला वकील चीनला पाठविल्याचा उल्लेख मिळतो.

### श्रीविजय व चोल राजे

अकराव्या शतकांत श्रीविजय व चोल राजे यांत झगडा सुरू झाला. चोल हें दक्षिण भारतामधील एक महत्वाचें राजघराणें होतें. पल्लव राजांच्या उत्कर्षकाळांत यांना वर तोंड काढावयास वावच मिळाला नाही. नवव्या शतकांत पल्लवांची सत्ता कमी झाल्यावर चोल राजांचें अस्तित्व जाणवूं लागलें. या राज्याची उत्तरेकडील सीमा म्हणजे पेन्नारची नदी. दक्षिणेकडे वेल्लारू नदी. पश्चिमेला यांची सीमा कूर्गला लागून होती. पहिला परांतक (इ स ९०७) हा पहिला

पराक्रमी चोल राजा. याच्या काळापासून चोलांचा उत्कर्षकाळ सुरू झाला. राजराजाच्या (इ. स. ९८५ ते १०१४) कारकीर्दीत दक्षिण भारतांत चोलांचें राज्य सर्वात सामर्थ्यशाली राज्य बनलें. राजराजाचा पुत्र राजेंद्र चोल याच्या कारकीर्दीत तर चोल राजांनी थेट बंगालपर्यंत धडक मारली.

परंतु एवढ्याने त्यांचें समाधान होण्यासारखें नव्हतें. त्यांना सुवर्ण-द्वीपाचें मोठें आकर्षण होतें. जावा व सुमात्रा हे अत्यंत ऐश्वर्यसंपन्न देश. तेव्हां या देशांचा कबजा आपल्यास मिळावा अशी चोल राजांची मनीषा होती. हा हेतु मनाशीं ठेवून त्यांनी आपली आरमारी सत्ता वाढविण्याचा उपक्रम सुरू केला. सुरुवातीला या दोनहि राज्याचे संबंध सलोख्याचे होते. शैलेन्द्र राजा चुलामणीवर्मन् याने नागपट्टण (हल्लीचें नेगपटम्) येथें एक बौद्ध विहार बांधावयास सुरुवात केली. या विहाराकरितां चोल राजा राजराज याने एक खेडें दान म्हणून दिलें. हा विहार बांधून पूर्ण होण्यापूर्वीच चुलामणीवर्मन् मृत्यु पावला. तो विहार त्याचा पुत्र 'मार-विजयोत्तुंग–वर्मन्' याने पुरा केला. मध्यंतरीच्या काळांत राजराजहि मृत्यु पावला होता व तो विहार राजेन्द्र चोलाच्या काळांत पूर्ण झाला ही माहिती "लीडन ग्रँट" मध्यें नमूद केली आहे.

या विहाराकरितां जें खेडें राजराजाने दान म्हणून दिलें तें इ. स. १००५ मध्यें. म्हणजे या वर्षी चुलमणीवर्मन् मलायांत राज्य करीत होता हें स्पष्ट होतें. त्याच्यानंतर त्याचा पुत्र 'श्री-मार-विजयोत्तुंग-वर्मन्' हा गादीवर आला. या दोनहि राजांचा शोध फ्रेंच इतिहासकार कोडेस याने लावला आहे. हीं दोनहि नांवें 'सुंग' वंशाच्या इतिहासांत सापडतात.' इ. स. १००३ मध्यें राजा 'से-ली-चू-ला-वू-नी-फू-मा-तीअुवा'(श्री चुडामणी वर्मदेव) याने दोन वकील पाठविले. आपल्या देशांत (मलायांत) आपल्या राजाने बादशहाला (चीनच्या) दीर्घायुष्य मिळावें असें चिंतण्याकरितां एक बौद्ध देवालय बांधलें आहे तेव्हां आपणांस बादशहाने पैसे द्यावे अशी त्यांनीं विनंती केली. इ. स. १००८ मध्यें राजा

'से-री-मा-ला-जी' (श्री-मार-विजयोत्तुंग-वर्मन्) याने वकीलाबरोबर खंडणी पाठविली असा उल्लेख आढळतो.

लीडन ग्रँटवरून आणखी एक गोष्ट स्पष्ट होते. ती ही कीं राजा मार विजयोत्तुंग हा श्रीविजय व मलाय द्वीपकल्प या दोहोंवर राज्य करीत होता. शैलेन्द्र व चोल राजे यांच्यामध्यें व्यापारविषयक संबंध होते. परंतु हे संबंध पुढें बिघडल्यावर राजेन्द्र चोलाने मलायावर स्वारी केली व श्रीविजयच्या शैलेन्द्रांचा पराजय केला. या आरमारी आक्रमणाचा उल्लेख चोल ताम्रपटांत सांपडतो. इ. स. १०१७-१८ च्या तिरुवालंगाढ ताम्रपटांत याचें वर्णन मिळतें. "आपल्या शूर व पराक्रमी शिपायांच्या मदतीने समुद्र पार करून कटाह घेतल्यावर त्याने (राजेन्द्र चोलाने) तेथील सर्व राजांना शरण आणलें व मग तो सर्व पृथ्वीला आधारभूत होऊन राहिला." राजेन्द्र चोलाच्या तंजोरच्या इ. स. १०३०-३१ च्या शिलालेखांत तर याचें अत्यंत रसभरित वर्णन आढळतें. राजेन्द्र चोलाने जहाजें समुद्रापार नेऊन संग्राम विजयोतुंग-वर्मनचा पराभव करून श्रीविजय, पण्णाई, मलायूर, मायीरूधींगम वगैरे घेतल्याचें सविस्तर वर्णन यांत आहे. या शिलालेखावरून राजेन्द्र चोलाने पूर्व सुमात्रा, मध्य व दक्षिण मलाया, कटाह व श्रीविजय एवढा सर्व प्रदेश पादाक्रान्त केला असें दिसतें (इ. स. १०२५). राजेन्द्र चोलाने सबंध कलिंग देशावर अंमल बसविल्यामुळें हें आक्रमण शक्य झालें. पूर्व किनारा ताब्यांत आल्यामुळें आग्नेय आशिया व चीनचा सर्व व्यापार चोलांच्या ताब्यांत आला. भारत व चीन यांचा व्यापार जावा सुमात्रा-मधूनच चाले. भारत व चीन या दोन देशांच्या व्यापारी मार्गावर श्री-विजयचें साम्राज्य वसलें होतें. हें साम्राज्य कबजांत आल्यावर चोलांच्या ताब्यांत हा सर्व व्यापार येणार होता. आग्नेय आशियामध्यें संचार करणाऱ्या बहुतेक जहाजांना श्रीविजयला कर द्यावा लागे. हा व्यापार ताब्यांत आल्यावर चोलांना हा फायदा मिळणार होता.

श्रीविजयच्या साम्राज्याशीं युद्ध करून त्यांचा प्रदेश जिंकून घेणें सोपें होतें. परंतु हें समुद्रापलीकडचें साम्राज्य टिकविणें अत्यंत अवघड

होतें. याकरितां एक तर आरमारी सामर्थ्याची आवश्यकता होती, परंतु त्याबरोबरच या देशावर नियंत्रण ठेवण्याइतकें सामर्थ्य भारतीय राजसत्तेजवळ सातत्यानें असणें हीहि आवश्यक बाब होती. जोंपर्यंत चोलांना आपली सत्ता दक्षिण भारतामध्यें टिकवून धरतां आली तोंपर्यंत हें साम्राज्य त्यांना टिकवून धरतां आलें. परंतु ज्या वेळीं त्यांची दक्षिण भारतामधील सत्ताच मोडकळीस आली त्यावेळीं हें साम्राज्य त्यांना टिकवितां येणें अशक्य झालें. राजेन्द्र चोलानें प्रचंड मेहनतीने व पराक्रमाने एवढें साम्राज्य मिळविलें. परंतु त्याच्या मुलांच्या कारकीर्दीतच या राज्याला तडा पडावयास सुरुवात झाली. त्याचा पुत्र राजाधिराज याची सर्व कारकीर्द चालुक्यांशीं लढण्यांत गेली. पुढें इ. स. १०६३ मध्यें वीर राजेन्द्र चोल याने चालुक्यांचा पराभव करून चोल सत्ता सांवरली पण त्याच्या मृत्यूनंतर ( इ. स १०७० ) घरभेदेपणामुळें कलिंग देश स्वतंत्र झाला. यामुळें चोलांचें आरमारी बळ एकदमच कमी झालें. अकराव्या शतकाच्या अखेरला कुलोत्तुंग चोलाने (इ. स. १०७० ते १११९) कलिंग परत घेऊन मोडकळीस आलेल्या चोल सत्तेची घडी परत बसवली.

इ. स. १०६९–७० च्या वीर राजेंद्रच्या शिलालेखांत त्याने 'कधारम्' परत जिंकून घेतलें असें म्हटलें आहे. याचा अर्थ तें मध्यंतरीच्या काळांत स्वतंत्र झालें असावें असा करावयास हरकत नाही. श्रीविजय व चोल यांचें वैमनस्य एक शतकापर्यंत कायम राहिलें. 'मा–ट्वान–लीन', चोल हें 'सान–फो–त्सी' चे मांडलिक होते असें म्हणतो ( इ. स. ११०६). पण हें असंभवनीय वाटते. कारण या सुमारास कुलोत्तुंग चोल हा पराक्रमी राजा राज्य करीत होता. या काळांत चोल राजांची परिस्थिति एवढी शोचनीय खास नव्हती.

मुजुमदार यांच्या मतें कुलोत्तुंग हा स्वतः चिनी दरबारीं इ. स. १०६७ सालीं गेला होता. कुलोत्तुंग हा राजेंद्र चोलाच्या मुलीचा मुलगा. त्याचा पिता हा वेंगीचा राजा. वीर राजेंद्राने ज्या वेळीं (इ.स. १०६९–७०) कधारम् जिंकलें त्या वेळीं हा त्याच्याबरोबर होता.

अनुक्रम ७.१...22317... वि: ...
216 ... नों: दि: ...

वीर राजेंद्राने त्याला मागें ठेवले व तीं तेथून कधारम्‌चा वकील म्हणून चिनी दरबारीं गेला. इ. स. १०७० मध्यें तो कधारम्‌हून घरीं परतला. याचा फायदा घेऊन कधारमने राहिलेल्या चोल फौजांचा पराभव करून त्यांना हकलून दिलें व चिनी बादशहाला "आम्हीं चोल राजांचा पराभव केला व त्यांना आमचें मांडलिक केलें" अशी बडाई मारली, व म्हणून चोल राजे हे सान-फो-त्सी चे अंकित राजे आहेत असें मा-ट्वान-लीनने लिहून ठेवलें.

चोल राजाचे सुमात्रा वगैरे भागावर अर्धे शतक पर्यंत वर्चस्व राहिलें असावें. याला पुरावाहि मिळतो. सुमात्रामध्यें सापडलेल्या इ. स. १०८८ च्या शिलालेखांत १५०० व्यक्तींच्या एका संघटनेचा उल्लेख आला आहे. अशा प्रकारच्या संघटना फक्त तामीलनदमध्येच अस्तित्वांत होत्या. शिवाय सुमात्रामधील चोलीय, पडीय, मेलीयल, पेलवी हीं नांवें चोल, पांड्य, मल्यालम् व पल्लव यांवरून घेतलेलीं आहेत, असें वाटतें. अकराव्या शतकांत दक्षिण भारतांतून बरीच मंडळी मलायाच्या द्वीपकल्पांत गेली.

चोलांशीं झालेल्या झगड्यांत श्रीविजयचें साम्राज्य खिळखिळें झालें. कारण बाराव्या शतकापासून त्याचें नांव विशेष ऐकूं येत नाहीं. बाराव्या शतकांत एक शैलेन्द्र वकीलात चिनी दरबारांत होती. बाराव्या व तेराव्या शतकांत अरब व्यापारी झबगचें वर्णन करतांना आढळतात. बाराव्या शतकांत चीनचा फुकीन येथील परदेशी व्यापाराचा इन्स्पेक्टर 'चाऊ-ज़ु-कुआ' याने आग्नेय आशियामधील देशांची माहिती तयार केली. त्यांत सान-फोन-त्सी चा उल्लेख असून या राज्यांत १५ लहान राज्यें समाविष्ट आहेत असें नमूद करून ठेवलें आहे. यांत सिलोनचा पण उल्लेख आहे. यावरून शैलेन्द्र साम्राज्यामध्यें सुमात्राबरोबरच जावा, मलाया व सिलोन या तिन्ही राज्यांचा समावेश झाला होता असें दिसतें.

चुल्लवंशा मध्यें श्रीविजयचा शैलेन्द्र राजा चन्द्रभानु याने सिलोनवर केलेल्या आक्रमणाचें वर्णन आहे. 'जावक' च्या सैन्याने विषारी बाण वापरून सिलोनी सैन्याचा पराभव केला व सिलोन उध्वस्त

करावयास सुरुवात केली. सिलोनच्या राजप्रतिनिधीने आपलें सर्व सामर्थ्य एकवटून जावकच्या सैन्यावर निकराचा हल्ला चढविला व त्यांचा पराभव केला. पण चन्द्रभानूचा सिलोन घेण्याचा प्रयत्न चालूच राहिला. त्याने आतां जास्तच निकराचा प्रयत्न करण्याचें ठरविलें व त्या दृष्टीनें आपली तयारी चालविली. त्याने पांडय व चोल राजांची मदत मिळविली व नव्या दमाने त्यानें सिलोनवर चाल केली. परंतु या वेळींहि त्याला अपयश पत्करावें लागलें (इ. स. १२५६). पहिलें आक्रमण कोडेझ यांच्या मतें इ. स. १२३६ मध्यें झालें असावें; यांत सुरुवातीला चन्द्रभानूला यश मिळालें होतें व म्हणून चाउ-ज-कुआच्या माहितींत सिलोन सान-फो-त्सीचा भाग असल्याचा उल्लेख आहे.

चन्द्रभानू हा श्रीविजयचा शेवटचा मोठा राजा. याच्या सिलोन-वरील स्वाऱ्यामुळें त्याच्या सत्तेचा ऱ्हास झाला. तेराव्या शतकांत जावा व थाय हीं दोन नवीं राज्यें उदयाला आलीं. या दोहोंच्या आक्रमणामुळें श्रीविजयची सत्ता नामशेष झाली. चौदाव्या शतकाच्या अखेरीस या राज्याचा संपूर्णपणें ऱ्हास झाला.

श्रीविजय व शैलेन्द्र यांचीं राज्यें अस्तित्वांत येण्यापूर्वी जावामध्यें शैवधर्म प्रसारांत होता. शैलेन्द्र राजांनीं आपल्या कारकीर्दींत महायान बुद्धधर्माचा प्रसार केला व अनेक बौद्ध स्मारकें बांधलीं. शैलेन्द्रांची सत्ता मध्यजावामध्यें प्रस्थापित झाल्यावर तेथील हिंदु राजांना पूर्व जावामध्यें जावें लागलें व पूर्व जावामध्यें हिंदु देवदेवतांची पूजा होऊं लागली. येथें अगस्ति ऋषीचा पंथ अस्तित्वांत होता. येथील हिंदु राजे लिंगपूजा करीत. पूर्व जावामध्यें इ. स. ७६० चा एक संस्कृत शिलालेख सांपडला आहे. गजयन नांवाच्या एका राजानें 'दिनय' येथें अगस्ति ऋषीच्या मंदिराची पायाभरणी केल्याचा यांत उल्लेख आहे. नवव्या शतकाच्या उत्तरार्धांत मध्यजावामध्यें शैवपंथाची पुन: स्थापना झाली. येथें राजा बालीत्तुंग याचे बरेच शिलालेख सांपडले आहेत. हा बालीत्तुंग मतरामचा राजा होता. हा शैवपंथीय होता. या वंशांतील राजांचे बरेचसे शिलालेख प्रांबाननजवळ केडूच्या सपाट भूमींत मिळाले आहेत. गजयन हा याच वंशांतील असावा. बालीत्तुंग याने इ. स. ८९८ ते ९१० पर्यंत राज्य केलें. याच्यानंतर दक्षोत्तम गादीवर आला. याचे शिलालेख सिवसरी व प्रांबानन या ठिकाणीं मिळाले आहेत. यावरून याचें राज्य पूर्व व मध्य जावांत पसरलें होतें असें दिसतें. याने आपल्या कारकीर्दींत शेंकडों देवालयें बांधलीं. प्रांबाननजवळ याने एक मोठें शिवमंदिर बांधून त्याच्याभोंवतीं आणखीं ७ प्रमुख देवालयें बांधलीं. या ८ मंदिरांच्या भोंवती त्याने १४८ लहान लहान देवालयें बांधलीं. मध्यावरच्या प्रमुख शिवमंदिरावर रामायणांतील प्रसंग कोरले आहेत. मध्यावरच्या ८ देवालयांपैकीं एकात दुर्गेची एक सुंदर मूर्ति ठेवली आहे. तिचें स्थानिक नांव आहे: 'लोरा–जोंग्रांग' म्हणजे 'सडपातळ तरुणी.' या देवालयांना हेंच नांव मिळालें आहे. या लोरा–जोंग्रांगच्या देवालयांत राजा, राणी त्यांचे नातेवाईक व सरदार मंडळी वगैरे बऱ्याच जणांचीं स्मारकें आहेत. जावामध्यें देवराजपंथ रूढ झाला होता. या पंथाप्रमाणें राजाला मृत्यूनंतर देवपद

प्राप्त होत असे. तो शिवोपासक असल्यास शिवरूपाशीं ऐक्य पावत असे व वैष्णव असल्यास विष्णूशी एकरूप होत असे. मग मृत्यूनंतर याची पूजाअर्चा होत असे. जावामधील पुरातन पूर्वजपूजेची पद्धत नव्या धर्मांत कायम राहिली होती. मतरामचीं हीं देवालयें जावाच्या जुन्या वैभवाची साक्ष देतात. या देवालयाचें स्थापत्य व कलाकुसर सिंघसरी व मजपहितच्या देवालयांच्या स्थापत्यापेक्षां निश्चितच सरस आहेत. दक्षोत्तमानंतर ‘ तुलोदोंग ’ हा गादीवर आला (इ. स. ९१९ ते ९२१). या घराण्यांतील शेवटचा राजा वावा. यानें इ. स. ९२४ ते ९३८ पर्यंत राज्य केलें. या घराण्यांतील राजांनी हिंदुधर्माची पुनः स्थापना केली. वावानंतरची मतरामविषयींची माहिती उपलब्ध नाही.

## पूर्व जावा

मतरामचें राज्य इतिहासजमा झाल्यावर मध्यजावांतील राजांनीं आपली सत्ता पूर्व जावांत प्रस्थापित केली. ही घटना ‘ सिंदोक ’ च्या काळांतली (इ. स. ९२९ ते ९४७). याने स्थापन केलेला वंश इ. स. १२२२ पर्यंत अस्तित्वांत होता. त्याने व त्याच्या राणीने संयुक्तपणें राज्य केलें. जावामध्यें स्त्रियांना बराच मान असावा असें दिसतें. कारण येथें अनेक स्त्रियांनी राज्य केल्याचीं उदाहरणें सांपडतात. सिंदोकनंतर त्याची मुलगी गादीवर आली. तिचें नांव ‘ श्री ईशनतुंगविजय ’. तिचा पति सरदार होता. विवाहानंतरहि तो सरदारच राहिला. त्याला राजपद लाभलें नाही.

राजधानीचें ठिकाण पूर्व जावाला गेल्याचा एक परिणाम म्हणूनच कीं काय जावाच्या संस्कृतीच्या विकासाला तेथें पूर्ण वाव मिळाला. पूर्व जावामध्यें भारतीय संस्कृतीचा प्रभाव पहिल्यापासूनच कमी होता. याउलट मध्यजावामध्यें भारतीय संस्कृतीचा फार प्रभाव पडला होता. तथापि पूर्व जावावर भारतीय संस्कृतीचा अगदींच प्रभाव पडला नव्हता, असें नाहीं. परंतु सिंदोकाच्या काळांतील जे शिलालेख उपलब्ध झाले आहेत त्यावरून येथील संस्कृति मूलतः तद्देशीय व पारंपरिक स्वरूपाची होती हें स्पष्ट होतें.

'धर्मवंश' हा सिंदोकाचा एक वंशज. त्यानें जावामधील कायद्याला सुसूत्र स्वरूप आणून दिलें. त्यानें महाभारताचा व अन्य संस्कृत ग्रंथांचा जावानीज भाषेंत अनुवाद करवून घेतला. या ग्रंथांत जागोजागीं संस्कृत श्लोक उद्धृत केले आहेत. धर्मवंश हा मोठा पराक्रमी राजा होता. त्याने श्रीविजयच्या शैलेन्द्र राज्यावर आक्रमण केलें. तेव्हां श्रीविजयने त्याच्या राज्यावर आक्रमण करून त्याचा पराभव केला व त्याला युद्धांत ठार मारलें.

या घटनेनंतर धर्मवंश राजाचा जावई ऐरलंग याला एका संघारामांत आश्रय घ्यावा लागला. या वेळेस ऐरलंगाचें वय फक्त १६ वर्षांचें होतें. तीन वर्षांपर्यंत त्याला अज्ञातवासांत राहावें लागलें. यानंतर इ. स. १०१० मध्यें तो प्रकट झाला. इ. स. १०१९ मध्यें त्याचें राज्यारोहण झालें. या वेळीं त्याचें राज्य फारच लहान होतें. इ. स. १०१२ मध्यें ( पित्याच्या मृत्यूनंतर ) तो बालीचा राजा झाला. इ. स. १०२५ मध्यें दक्षिण भारतामधील चोल राजांनी श्रीविजयच्या राज्यावर हल्ला केला व श्रीविजयचा पराभव केला. यामुळें श्रीविजयची भीति नाहीशी झाली. ऐरलंगाने आतां चढाईचें धोरण स्वीकारलें. प्रथमतः त्याने आपली सत्ता बळकट करण्याच्या दृष्टीने आजूबाजूच्या राजांशीं युद्ध करून त्यांचा पराभव केला. इ. स. १०३० पर्यंत त्याने आपली सत्ता सर्व बाजूंनी वाढवून आपला दरारा बसविला. श्रीविजयच्या राजाने त्याच्या पराक्रमावर लुब्ध होऊन आपल्या मुलीचें लग्न त्याच्याशीं केलें. त्याच्या कारकीर्दीत देशांतील व्यापाराची भरभराट झाली. सुरबायाच्या उपसागरांतील बंदरें व्यापारी जहाजांनी नेहमीं गजबजलेलीं असत. तामिळ, सिंहली, मलबारी, मॉन, ख्मेर वगैरे सर्व देशांतील व्यापारी सुरबायाच्या उपसागरांत दिसूं लागले. परंतु ऐरलंगाचें नांव केवळ त्याच्या काळांतील व्यापारी भरभराटीमुळें अथवा केवळ त्याच्या पराक्रमामुळें अमर झालें नाहीं. त्याच्या कारकीर्दींत वाङमय व कला यांना जो बहर आला त्यामुळें त्याचें नांव चिरस्मरणीय झालें आहे.

राजकवि 'पु कण्व' याने त्याला आपल्या महाकाव्याचा नायक केला. त्याने 'अर्जुन-विवाह' नांवाचें एक महाकाव्य रचलें. यांतला अर्जुन म्हणजे खुद्द ऐरलंग व या काव्याची सुभद्रा म्हणजे श्रीविजयची राजकन्या. या दोघांचा झालेला विवाह ही या काव्याची कथा व पार्श्वभूमि होय. महाभारतांतील संन्यासी अर्जुनाची भूमिका ऐरलंगाने पार पाडली आहे. याच कथेंत थोडाफार फेरफार करून ती छायानाटच (वायंग) करतांना जावामध्यें वापरतात. ऐरलंगाच्या काळीं शैवधर्म, महायान बुद्धधर्म व ऋषि धर्म हे सर्वच प्रचलित होते. पण या सर्व धर्मांचे अनुयायी गुण्यागोविंदाने एकत्र नांदत होते. त्यांच्यांत कोणत्याहि प्रकारचें वैमनस्य नव्हतें. अशा प्रकारची सहिष्णुता कंबुजामध्यें सुद्धां अस्तित्वांत होती. वरच्या थरांतील समाज तांत्रिक महायान धर्माचें पालन करणारा होता. तंत्रपूजेची परिणति बहुधा चक्रपूजेंत होत असे. महायान धर्माचें स्थान शैवधर्मापेक्षां श्रेष्ठ दर्जाचें होतें. निर्वाणाप्रत जाण्याकरितां शैवधर्म ही पहिली पायरी मानली जात असे. यानंतरची पायरी म्हणजे महायान धर्म. कारण हा धर्म म्हणजे श्रेष्ठ सत्य आहे असें मानलें जाई. शैव व बौद्ध धर्मगुरूचें येथील समाजजीवनांत फार प्राबल्य होतें. त्यांची सत्ता मर्यादित ठेवणें हे मोठें कठीण काम होतें. ऐरलंगाने सुरुवातीपासून धर्मगुरूवर आपली घट्ट पकड ठेवली. ऐरलंग स्वतःला विष्णूचा अवतार मानीत असे. त्याच्या 'चंडी' बेलहनमध्यें' त्याची स्वतःची विष्णुरूपांतील गरुडावर विराजमान झालेली मूर्ति आहे (आकृति क्र. २३). येथील सर्व राजे देवराजपंथाचे असल्यामुळें आपल्या हयातींत ते आपली 'चंडी' (देवालय) बांधून ठेवीत. राजाची विष्णुरूप अथवा शिवरूप मूर्तीची स्थापना या मंदिरांत होत असे. ऐरलंगाच्या वंशांतील सर्वच राजे आपल्याला विष्णूचा अवतार मानीत. पूर्वजपूजा जावामध्यें फार पुरातन काळापासून प्रचलित होती. हे पूर्वज कोणत्या तरी चंडींत निवास करीत. राजा आपल्या पूर्वजांच्या चंडींत जाऊन पूजाअर्चा करीत असे व त्याची पूजा त्याच्या मृत्यूनंतर त्याचे वंशज करीत. देवराजपंथ हा येथील पुरातन धर्म होता. जेव्हां या लोकांनी भारतामधून आलेले धर्म स्वीकारले तेव्हां त्यांनी या नव्या धर्मात आपला जुना पथ आणला व मग बौद्ध-

धर्मीय राजे अवलोकितेश्वराशीं एकरूप होत, शैवराजे शिवरूपांत विलीन होत व वैष्णव राजे विष्णूचें रूप धारण करीत.

ऐरलंग हा फार धार्मिक वृत्तीचा असावा असें वाटतें. त्याला राज्याचा मोह नव्हता. इ. स. १०४५ मध्यें त्याने राजत्याग केला व तो संन्यासी झाला. याला औरस संतति नव्हती. तेव्हां त्याने आपलें राज्य आपल्या दोन अनौरस पुत्रांत वांटून दिलें हेतु हा कीं आपल्या मृत्यूनंतर आपल्या राज्यांत अराजक माजूं नये. जावामधील राजांची सत्ता निरंकुश कधींच नसे. राजा कितीहि सामर्थ्यशाली असला तरी त्याला आपल्या आधिपत्याखालीं असलेल्या राजांना दुखवतां येत नसे. एकाद्या राजाची सत्ता वाढली, याचा अर्थ इतकाच कीं तो इतर राजांना आपलें सार्वभौमत्व मान्य करायला लावीत असे. हे राजे त्याच्या आधिपत्याखालीं असले तरी ते आपल्या राज्यांत स्वतंत्र असत. त्यांनी कांही अनुचित कृत्य केलें तर मध्यवर्ती सरकार त्यांना योग्य तें शासन करीत असे पण त्याकरितां त्यांना युद्ध करावें लागे. अर्थात् मध्यवर्ती सरकार बळकट असल्यावर असे प्रसग क्वचित् येत.

ऐरलंगाने आपल्या राज्याची वांटणी करून दोन राज्यें निर्माण केलीं. एक ‘ जंग्गाल ’ व दुसरें ‘ पंजलु ’ अथवा ‘ केदिरी ’. बाराव्या शतकांत केदिरीचा राजा कामेश्वर याचा विवाह जंग्गालची राजकन्या किरण हिच्याशीं झाला व हीं दोन राज्यें पुन्हां एक झालीं.

**केदिरीचें राज्य**

केदीरीच्या राज्याची वरीचशी माहिती चिनी इतिहासांतून मिळते. हें राज्य सामर्थ्यशाली होतें असें दिसतें. इ. स. १२२२ पर्यंत या राज्यांतील १० राज्यांचा उल्लेख केलेला आढळतो. कामेश्वराचा (इ. स. १११७ ते ११३०) किरणशीं झालेला विवाह ‘ स्मार-दहन ’ या काव्यांत अमर झाला आहे. यांतील मदन म्हणजे कामेश्वर व रति म्हणजे किरण.

कामेश्वराचा उल्लेखनीय असा वंशज म्हणजे 'जयभाय.' हा त्याचा पुत्र होता. याच्या काळांत कवि 'पु पुनुलु' यानें 'हरिवंश' नांवाचें काव्य रचिलें. याचा नायक जयभाय.कवीने याची मुक्तकंठाने स्तुति केली आहे. (हा विष्णूचा अवतार होता वगैरे वगैरे) परंतु याच्या कारकीर्दी-तील सरस महाकाव्य म्हणजे 'सेध रचित' 'भारतयुद्ध'. हें पुरें व्हावयाच्या अगोदरच तो मृत्यु पावला. हें महाभारताचें जावामधील रूपांतर आहे व तें काव्य पुनुलूने पुरें केलें. पुनुलूचें तिसरें काव्य म्हणजे 'घटोत्कचाश्रय.' या काव्यांत त्याने राजा जयाकृत याचा उल्लेख केला आहे. हा जय-भायानंतर गादीवर आला असावा. याबद्दल वाद आहे. कारण जयभाया-नंतर 'जयकटवांग' गादीवर आला असेंहि कांहीं जणाचें मत आहे. एकंदरींत केदिरीच्या राजवटींत अनेक वाङमयाकृति निर्माण झाल्या.

हा देश आर्थिक दृष्टया संपन्न होता. आर्थिक दृष्टया संपन्न देशांत कलाहि समृद्ध होतात.मोलुक्का म्हणजे मसाल्यांचें माहेरघर.येथील लवंग, जायफळ, मिरें यांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेंत बरेंच महत्त्व होतें. अरब व्यापारी येथें येऊन येथील नाना प्रकारचे मसाले घेऊन जात. हे अरब मुसलमान असून त्यांचा कल व्यापाराकडे होता. त्यांनी धर्मांतर करण्याचा प्रयत्न केल्याचें दिसत नाहीं. येथें येणारे व्यापारी भारताच्या पूर्वकिनाऱ्यावरून तर येतच पण पश्चिम किनाऱ्यावरील बंदरांतून सुद्धां येत. गुजराथमधून (खंबायत येथून) व्यापारी इकडे येत असल्याचा उल्लेख सांपडतो. ते येथें येतांना कापड आणीत असत.

केदिरीचा शेवटचा राजा कृतजय. 'नगरकर्तगमांत' याचा उल्लेख आला आहे. तो अत्यंत सच्छील व सद्वर्तनी असून धर्म व तत्त्वज्ञान यांचीहि त्यास गोडी वाटत असे. 'पररतोन' मध्यें याचा 'धंगथंग गेंडीस' या नांवानें उल्लेख केला आहे. सर्व धर्मगुरूंनीं आपली पूजा करावी असा त्याने दंडक घातला. यामुळें रागावून जाऊन केदिरीचे सर्व धर्मगुरु 'तुमापेल' येथें गेले. तुमापेलच्या राजाने केदिरीवर हल्ला चढविला व कृतजयाचा पराभव करून त्याला ठार मारलें (इ. स. १२२२). याच्या मृत्यूबरोबर केदिरीच्या राज्याचा शेवट झाला.

**सिंघसरीचें राज्य**

या राज्याच्या उदयाची माहिती जावाच्या इतिहासांत मिळते. जावामधील ‘ पररतोन ’ (राजांचा ग्रंथ) मध्यें या राज्याचा संस्थापक ‘ केन अंग्रोक ’ याच्याबद्दल माहिती नमूद केली आहे. याने केदिरीचा शेवटचा राजा कृतजय याचा पराभव करून त्याचें राज्य बळकाविलें. हा केन अंग्रोक एका शेतकरी कुटुंबातील होता. याचें सर्व आयुष्य चोऱ्यामाऱ्या करण्यांत गेलें होतें. याला तुमपेलच्या अभितुंग नांवाच्या प्रमुख अधिकाऱ्याने आपल्याकडे नोकरीला ठेवून घेतलें. अंग्रोकने आपल्या धन्याचा खून करून त्याची राणी ‘ केन देदेस ’ हिच्याशीं विवाह केला. मध्यंतरीच्या काळांत कृतजय व त्याचे धर्मगुरु यामध्यें कलह सुरू झाला. हे सर्व धर्मगुरु अंग्रोककडे आले. या भांडणाचा फायदा घेऊन त्याने इ. स. १२२२ मध्यें केदिरीवर हल्ला केला. कृतजयाचा युद्धांत पराभव झाला व त्याचें राज्य अंग्रोकने बळकाविलें. अंग्रोक हा सिंघसरी राज्याचा संस्थापक. सिंघसरी हें नांव राज्याच्या राजधानीवरून पडलें. त्याने राज्यावर आल्यावर ‘ राजस ’ हें नांव धारण केलें (आकृति क्र. २४). याने सबंध पूर्व जावावर आपला अंमल बसविला. जंगल व केदिरीचीं राज्यें पुन्हां एक झालीं. इ. स. १२२७ मध्यें त्याची पत्नी केनदेदेस हिला प्रथम पतीपासून झालेल्या ‘ अनुसपती ’ नांवाच्या मुलानें त्याचा खून करविला व मग तो गादीवर बसला. अंग्रोकची ‘ चंडी ’ सिंघसरी-जवळच होती. लीडनच्या वस्तुसंग्रहालयांत याची पत्नी केन देदेस हिची मूर्ति आहे. यांत तिने ‘ प्रज्ञापारमिता ’ चें रूप घेतलें आहे. अनुसपतीनें २७ वर्षें राज्य केलें. इ. स. १२४८ सालीं राजसचा पुत्र तोहजय याने याचा खून केला व तो गादीवर बसला. पण कांही महिन्यांच्या आंतच याचादेखील खून झाला व त्याचा पुतण्या ‘ रंगा वुनी ’ हा गादीवर आला. याने ‘ श्री जयविष्णुवर्धन ’ (इ. स. १२४८ ते १२६८) हें नांव धारण केलें. सिंघसरीच्या काळांत शिव व बुद्ध हे एकमेकांत विलीन झाल्याचें दृश्य दिसतें. विष्णुवर्धनच्या मृत्यूनंतर

त्याच्या अस्थि दोन देवालयांत वांटण्यांत आल्या. देवराजपंथाला अनुसरून चंडी म्लेरीमध्ये तो शिवरूप झाला तर चंडी जागोमध्यें बोधिसत्त्व अमोघपाशाशीं एकरूप झाला. सिंघसरीचा शेवटचा राजा कृतनगर हा शिवबुद्धाचा उपासक होता. हा तंत्रयानाचा उपासक असल्यामुळें तो तांत्रिक पूजेमधील चक्रपूजा परम भक्तिभावाने करीत असे! चक्रपूजेमध्यें मद्य, मांस, मत्स्य, मुद्रा व मिथुनाची पूजा करीत असत. 'पररोतन' च्या लेखकाने याच्या चक्रपूजेविषयींची महिती सांगून तो चारित्र्यहीन होता असें म्हटलें आहें. इ. स. १३६५ मध्यें बुद्धांचा प्रमुख धर्मगरु 'प्रपच' याने 'कृतनगर' या राजाविषयीं 'नगरकर्तगम' नांवाचें काव्य रचिलें. याच्या मतें कृतनगर हा अत्यंत सच्छील व धार्मिक वृत्तीचा होता. प्रा. वर्ग हे या मताला दुजोरा देतात. कृतनगर हा सिंघसरीचा शेवटचा राजा होता. याबद्दल बराच वाद आहे. क्रोमनें आपल्या ग्रंथांत याला 'सिंघसरी साम्राज्याचा संस्थापक' असें म्हटलें आहे. सिंघसरीसंबंधीं या महत्त्वाकांक्षी राजाच्या फार मोठ्या आकांक्षा होत्या. आपलें राज्य सर्व मलायाच्या द्वीपकल्पांतील मोठें राज्य व्हावें अशी त्याची इच्छा होती. आपली योजना मूर्त स्वरूपांत आणण्याकरितां त्याने आपल्या विश्वासांतल्या 'तेंगाह' व 'अरगणी' या दोघांना मंत्री केले. इ. स. १२७५ सालीं त्याने एक प्रचंड धार्मिक विधि करून आपण बुद्धभैरव झाल्याचें जाहीर केलें. या विधीमुळें आपली शक्ति वाढेल अशी त्याची श्रद्धा होती. हा विधि झाल्यावर त्याने आपल्या राज्यांतील शत्रूंचा बीमोड केला.

या सुमारास चीनमध्यें कुबलाई खान राज्य करीत होता. चीनमध्यें आपलें आसन स्थिर झाल्यावर त्याचें लक्ष आग्नेय आशियाकडे वळलें. आग्नेय आशियांतील सर्व राज्यें जर आपण आपल्या आधिपत्याखालीं आणूं शकलों तर कुबलाई खानास आपण यशस्वी रीतीने तोंड देऊं शकूं अशी कृतनगराची कल्पना होती. म्हणून आपल्या राज्यांत आपली सत्ता बळकट केल्यावर त्याने मदुरेवर स्वारी केली. या स्वारीचें आधिपत्य त्याने आर्य 'वीरराज' याच्याकडे दिलें. मदुरा जिंकून घेतल्यावर

त्याने बालीवर स्वारी केली परारतोनच्या माहितीप्रमाणें हा वीरराजच शेवटीं राजाच्या नाशाला कारणीभूत आला. राजाचा दुसरा मंत्री 'अरगणी' याच्या आग्रहास्तव राजाने आपलें सैन्य मलायामध्यें पाठविलें. अशा तऱ्हेने अरगणीनेसुद्धां ऐन आणीबाणीच्यावेळीं राजद्रोह केला. बर्ग यांच्या मतें प्रपंचकथित आक्रमणाच्या या कथा खऱ्या नाहीत. उलट तो म्हणतो कीं कृतनगराने जें आक्रमण केलें तें प्रेमाचें होतें. त्याने सर्व राजांची मनें प्रेमाने जिंकून घेतलीं व त्यांच्याशीं स्नेहाचे संबंध ठेविले.

या सर्व घटना घडत असतांना चीनचा मोंगल बादशहा कुबलाई खान याने आग्नेय आशियामध्यें आपले वकील पाठवून तेथील राजांना आपलें सार्वभौमत्व मान्य करावयास सांगितलें. याच वेळीं खानाने आपलें राज्य वाढविण्याचा उपक्रम चालविला होता. त्याचें सैन्य जपानला जाऊन पोहोंचलें. इ. स. १२८१ मध्यें जपानी सैन्याने त्याच्या सैन्याचा पराभव करून त्यांना जपानमधून हाकलून लाविलें. टोंकिंग व चंपामध्यें पण खानाला अपयश आलें. या खानाच्या अपयशाच्या वार्तेने कृतनगरला फार आनंद झाला. खानाची भीति नाहींशी झाली. म्हणून इ. स. १२८३ मध्यें खानाचे प्रतिनिधि त्याच्या दरबारीं आले असतां त्याने त्यांचीं नाकें कापून त्यांना रवाना केलें व तो स्वतः मलायूवर स्वारी करण्याकरितां निघाला. मोंगलांच्या वाटेवरच्या सर्व महत्त्वाच्या व मोक्याच्या जागा त्याने जिंकून घेण्याचा सपाटा चालविला. चीनच्या सैन्याला जावाच्या भूमीवर उतरण्याची संधीच द्यावयाची नाही असा त्याचा प्रयत्न होता. परंतु बोर्निओच्या किनाऱ्यावर कुबलाईचें आरमार अडविण्याचा त्याचा प्रयत्न फसला.

या सर्व घटना घडत असतांना त्याच्या विश्वासांतला मंत्री वीरराज याने त्याच्या विरुद्ध चालविलेल्या कारस्थानाची कल्पनाहि कृतनगराला नव्हती. या वीरराजाने केदिरीचा राजपुत्र जयकट्वांग याच्याशीं संधान बांधलें. केदिरीच्या राजपुत्राने आपल्या सैन्याची एक लहानशी तुकडी उत्तरेच्या मार्गाने सिंघसरीत पाठविली. चक्रपूजेमध्ये दंग

असलेल्या कृतनगराचा या बातमीवर विश्वासच बसेना. आपल्या राज्यावर हल्ला होत आहे हें लक्षांत येताच त्याने आपलें होतें नव्हतें तेवढें सर्व सैन्य या आक्रमणाला तोंड देण्याकरितां पाठविलें व तो 'शक्ती'ची आराधना करूं लागला. हें सर्व होत असतांना केदिरीचें मुख्य सैन्य दक्षिणेकडून सिंघसरींत शिरलें. राजवाड्यांत शिरलेल्या सैनिकांनी कृतनगराची कत्तल केली (इ. स. १२९२). इ स. १२९३ मध्यें चिनी आरमाराचा प्रमुख याकोमूसु तुबनला आला, त्या वेळीं जयकट्वांग सिंघसरीवर राज्य करीत होता. या चिनी आक्रमणाचा फायदा कृतनगराचा जावई 'राजपुत्र विजय' याने मोठ्या अक्कलहुषारीने घेतला. याने प्रथम चीनची मदत मिळवून सासऱ्याचें राज्य परत मिळविलें. ही मदत मिळविण्याकरितां त्याने खानाचे सार्वभौमत्व पण मान्य करण्याचें कबूल केलें. राज्य हस्तगत केल्यानंतर त्याने चिनी सैन्य इतस्तत: पसरलेलें व बेसावध आहे हें पाहून त्याच्यावर अचानकपणें हल्ला केला व वेगवेगळ्या ठिकाणीं गांठून त्यांचा पराभव केला. राहिलेल्या चिनी सैन्याला त्याने मोठ्या शिताफीनें गांठले व त्याचा पराभव केला. गादीवर बसल्यावर त्याने 'कृतराजस जयवर्धन' हें नांव धारण केलें व मजपहित राज्याची स्थापना केली. मजपहित हें जावामधील शेवटचें मोठें हिंदु राज्य होऊन गेलें.

## मजपहित

कुबलाई खानाचा पराभव करून त्याने सबंध मलाया द्वीपकल्पांतील जनतेचा दुवा घेतला. त्याचे इ.स. १२९४, १२९६ व १३०५ मधील तीन शिलालेख मिळाले आहेत. त्याने कृतनगराच्या मुलींशीं विवाह केला असल्यामुळें लोक त्याला राज्याचा कायदेशीर वारस मानीत होते व चिनी फौजांचा त्याने पराभव केला असल्यामुळें त्याचे नांव सर्वतोमुखीं झालें होतें. याने कृतनगराच्या चारी कन्यांशीं विवाह केला होता. यांतली सर्वांत धाकटी गायत्री ही होती. हिच्यापासून त्याला दोन मुली झाल्या. वर्गच्या मतें ही चामची राजकन्या होती. कृतराजसाची आणखी एक पत्नी होती. ही मलायू (सुमात्रा) ची राजकन्या होती. मलायूमध्यें गेलेल्या

सैन्याने सुमात्रामधून दोन राजकन्या बरोबर आणल्या. यांतील धाकटी राजकन्या 'दारा-पेतक' हिच्याशीं त्याने विवाह केला. हिची मोठी वहीण दारा-जींगा हिचा विवाह राजकुटुंबांतील अन्य कोणाशीं झाला. हिचा पुत्र मलायूचा राजा झाला. दारापेतकचा पुत्र कृतराजसाच्या मृत्यूनंतर मजपहितचा राजा झाला.

कृतराजसाच्या कारकीर्दीत मजपहितमध्यें शांतता नांदत होती, असें क्रोम म्हणतो. कृतराजसाचा राजा होण्यापूर्वीचा एकंदर इतिहास बघतां त्याच्या कारकीर्दीत त्याच्याविरुद्ध बंडाळी होऊं शकली असती असें वाटत नाहीं. कारण तो फार सामर्थ्यशाली राजा होता. त्याच्या एकंदर वागणुकीमुळें त्याने पुष्कळ शत्रु निर्माण केले यांत शंका नाही. पण या शत्रूंनी त्याच्या हयातीत दंगल सुरूं केली कीं काय हा वादाचा प्रश्न आहे. क्रोमच्या मतें रंगा लावेचें बड इ. स. १३०९ मध्यें कृतराजसाच्या मृत्यूनंतर झालें, तर स्टटरहीम व बर्ग यांच्या मतें हें बंड त्याच्या हयातींतच म्हणजे इ. स. १२९५ मध्यें झालें या दोघांच्या मतें कृतराजसाने या वर्षीं आपल्या सुमात्राच्या राजकन्या दारापेतक हिच्यापासून झालेल्या पुत्राला आपला वारस म्हणून जाहीर केल्यामुळें हें बंड झालें. जावावर सुमात्राच्या राजकन्येच्या मुलाने राज्य करावें याचा कांहीं लोकांना राग आला. यांच्या मतें इ स. १२९५ पासून ते १३२८ पर्यंत राज्यांत ९ वेळां बंडाळी माजली. या सर्व बंडांचा बीमोड करण्यांत आला. यापैकीं एका उठावाचें पुढारीपण वीरराजाचा पुत्र नांबी याने केलें होतें. इ. स. १३१६ सालीं जयनगराने याचा पाडाव केला व त्याला ठार मारलें. इ स. १३१९ चा कुति नांवाच्या सरदाराने केलेला उठाव जास्त गंभीर स्वरूपाचा होता. कारण याने तर कांहीं काळपर्यंत राजधानीचें शहर काबीज करून आपल्या ताब्यांत ठेवलें. परंतु जयनगरच्या गजमद नांवाच्या एका तरुण अधिकाऱ्याने मोठ्या हिकमतीने तें परत मिळविलें. या त्याच्या कामगिरीवर खूप होऊन राजाने त्याला बढती दिली. गजमदाच्या मदतीचा मोबदला म्हणूनच कीं काय राजाने त्याच्या पत्नीलाच आपली 'शक्ती' केलें. गजमदाला हा

उपमर्द सहन न होऊन त्याने राजवैद्याच्या मदतीने राजाचा कांटा काढला. राजाची शस्त्रक्रिया चालू असतांना वैद्याच्या चाकूचें पातें थोडेसें आंत गेलें व राजाचा अंत झाला. नंतर गजमदाने राजवैद्याला तोच मार्ग दाखविला.

जयनगराला पुत्र नसल्यामुळें कृतराजसाची पत्नी गायत्री ही राणी झाली. पण तिने राजत्याग केल्यामुळें तिची कन्या व जयनगराची सावत्र बहीण त्रिभुवना ही राणी झाली (इ. स. १३२८). हिने इ. स. १३५० पर्यंत राज्य केलें व नंतर आपला पुत्र 'हयम वुरूक' याला गादीवर बसविलें. इ. स. १३३० मध्यें गजमद मजपहितचा मुख्य मंत्री झाला व इ. स. १३६४ मध्यें त्याचा मृत्यु होईपर्यंत मजपहितचा तो अनभिषिक्त राजा होता. त्याच्या हयातींत राज्याची सर्व सत्ता त्याच्या हातांत केंद्रित झाली होती.

गजमद हा साम्राज्यवादी होता. मजपहितची सत्ता मलायाच्या द्वीपकल्पांत व इतरत्र पसरावी अशी त्याची मनीषा होती. या हेतूने त्याने नवें चढाईचें धोरण स्वीकारलें व या धोरणाचें निदर्शक म्हणून अक्षोभ्याची मूर्ति काढून त्या जागीं चामुंडेच्या मूर्तीची स्थापना केली. या नव्या धोरणाची नांदी बालींत झाली. कांही विद्वानांच्या मतें त्याने गुरून, सेरन, तुजुंगपूर, अरू, पहंग, डोंपो, सुंदा, पालेंबांग आणि तुमासिक वगैरे सर्व प्रदेश इ. स. १३५१ पर्यंत जिंकून त्यांना आपलें सार्वभौमत्व मान्य करावयास लाविलें. याबद्दल वाद आहे. कारण याच्या-संबंधीचा पुरावा उपलब्ध झाला नाही. बाली जिंकल्याचा पुरावा मिळतो. कारण या काळापासून हिंदु बालीमध्यें जावाच्या संस्कृतीचा प्रवेश झालेला दिसतो. डोंपो, सुंबाना वगैरे ठिकाणीं पण जावाची संस्कृति याच वेळेस प्रवेश करीत होती. नगरकर्तगमाप्रमाणें या वेळीं मजपहित राज्याचें सार्वभौमत्व सुमात्रा, मलायाच्या द्वीपकल्पाचा कांही भाग, बोर्निओचा कांही भाग व जावाचा कांही भाग या ठिकाणीं मान्य केलें गेलें होतें. हें राज्य हल्लीचा इंडोनेशिया व मलायाचा बराचसा भाग एवढ्यावर पसरलें होतें.

जावाच्या इतिहासांतील एक अत्यंत दुःखद घटना 'ह्यम वरूक'च्या कारकीर्दींत घडली. ही घटना जितकी दुःखद तितकीच नाट्यमय होती. ती घटना म्हणजे 'बुवतचा रक्तपात'. इ. स १३५० सालीं 'ह्यम वुरूकने' सुन्दाच्या राजकन्येला मागणी घातली. सुन्दाच्या राजाने मोठ्या आनंदाने या मागणीचा स्वीकार केला व तो मोठ्या लवाजम्यानिशीं लग्नाची तयारी करून निघाला. हा विवाह मजपहित-जवळ असलेल्या वुवत या गांवीं व्हावयाचा होता म्हणून तो तेथें येऊन दाखल झाला. तेथें येऊन तो लग्नाच्या तयारींत दंग असतां एक राजदूत गजमदाकडून खलीता घेऊन आला. या खलीत्यांत सुन्दाच्या राजाने मजपहितचें मांडलिकत्व मान्य करावें व याचें निदर्शक म्हणून आपली कन्या वुरूकला भेट म्हणून द्यावी अशी मागणी केली होती. आपल्याला लग्नाच्या निमित्तानें बोलावून आपला विश्वासघात करण्याचा हा डाव सुन्दाच्या राजाच्या लक्षांत आला. पण आतां फार उशीर झाला होता. आपण संपूर्णपणें गजमदाच्या ताब्यांत येऊन पडलों आहोंत हें त्याला कळलें. परंतु, त्याचें स्वाभिमानी मन त्याला हें मान्य करूं देईना. त्याने मजपहितचें मांडलिकत्व मान्य करण्याचें साफ नाकबूल केलें. गजमदानें सुन्दाच्या राजाला सर्व बाजूंनी घेरून त्याच्या-सकट सर्वजणांची कत्तल केली व सुन्दाला अशा कपटनीतीने मजपहितचें सार्वभौमत्व मान्य करावयास भाग पाडलें.

मजपहितचें मोठेपण हें गजमदाचें मोठेपण होतें. मजपहितला साम्राज्य दिलें तें गजमदाने. मजपहितमध्यें शांतता प्रस्थापित केली ती त्यानेच. त्याची काम करण्याची शक्ति प्रचंड होती. दहा जणांचें काम तो एकटा करीत असे. मजपहितने साम्राज्यवादी धोरण स्वीकारल्यानंतरहि त्याची अंतर्गत कारभारावरची पकड जरासुद्धा सैल झाली नव्हती. अंतर्गत कारभारांत त्याने सुव्यवस्थितपणा आणला होता. याकरितां त्याने राजकुटुंबांतल्या मंडळींची मदत घेतली. राजाच्या पित्याकडे शेतीसुधार व रस्तेदुरुस्तीचीं खातीं होतीं. त्याने सर्व जमिनीची वर्गवारी करून घेतली. करवसुलीकरितां खानेसुमारी केली.

धंदे जातीप्रमाणें ठरून गेले होते. सरकारी अधिकाऱ्यांनी कोणत्या देणग्या स्वीकाराव्या याबद्दल नियम घालून दिले होते. देवालयांना वर्षासनें ठरवून दिलीं होतीं. सैन्याच्या पगाराची व्यवस्था चोख होती. करवसुलीचे नियम ठरवून दिले होते. राज्यकारभारांत कुठेंहि कसलीहि गडबड नव्हती, गोंधळ नव्हता. गजमदाची तीक्ष्ण नजर सर्वांवर होती.

त्याच्या मृत्यूनंतर त्याचें काम चार मंत्री पाहूं लागले. पण त्यांना या अफाट राज्यकारभाराचा गाडा हाकता येईना. गजमदानें आपल्या कारकीर्दींत सर्व कायद्यांचा संग्रह करून घेतला होता. यापूर्वीं सर्व जावामध्यें मनुस्मृतीचें झालेलें रूपांतर वापरांत होतें.

हयम वुरूकची औरस संतति म्हणजे त्याच्या पट्टराणीपासून झालेली कन्या. हिनें मतरामच्या राजपुत्र विक्रमवर्धन याच्याशीं विवाह केला. हयमला दुसऱ्या एका राणीपासूनहि मुलगा होता. त्याला त्यानें पूर्व जावाचा राजा केलें. याचें नांव वीरवुमी. हयमच्या मृत्यूनंतर विक्रमवर्धन राजा झाला (इ. स. १३८९ ते १४२९). याचें व वीरवुमीचें ताबडतोब युद्ध जुंपलें. या दोघांतील भांडणाचा फायदा घेऊन मलायानें आपलें स्वातंत्र्य पुकारलें. श्रीविजयचें राज्य नष्ट झाल्यामुळें या राज्याला कोणताहि अडथळा राहिला नाही. याच सुमारास येथें मुसलमानी धर्माचा प्रसार सुरू झाला. मजपहितच्या राज्याचा ऱ्हास सुरू झाला. विक्रमवर्धनाच्या मृत्यूनंतर त्याची कन्या 'सुहिता' ही राणी झाली (इ. स. १४२९ ते १४४७). मजपहितचा शेवटचा राजा 'पतौद्रा.' याच्याविषयीं कांहीच माहिती उपलब्ध नाही. येथें मजपहितचा इतिहास संपतो. हें जावामधील शेवटचें हिंदु राज्य.

# बोर्निओ

मलायाच्या द्वीपसमूहांतील हें सर्वांत मोठें द्वीपकल्प. आकारानें हें जावाच्या आठपट मोठें आहे. पण त्याची लोकसंख्या मात्र फारच विरळ आहे. बोर्निओचा बराचसा भाग जंगलांनी व्यापला आहे. ईशान्येपासून नैर्ऋत्येकडे पर्वतराजी पसरलेल्या आहेत. यांतल्या सर्वांत उत्तुंग पर्वताची उंची १३,६९८ फूट आहे. याचें नांव किनाबालू. येथील नद्या मोठ्या व वाहतुकीस योग्य आहेत. पश्चिमेला ब्रुनी, रेजांग आणि कपुआस व दक्षिणेला व पूर्वेला संपीत, कटींगन, बरीतो व कुति या नद्या वाहतुकीला चांगल्या आहेत. येथील जंगलें समृद्ध आहेत, भूमि सुपीक आहे व खनिज संपत्ति भरपूर आहे.

बोर्निओच्या हिंदु संस्कृतीचा पुरावा कोटी' जिल्ह्यामधील 'मौरा कामन' येथें मिळाला आहे. येथें शिलालेख सापडले आहेत. विष्णूची एक सोन्याची मूर्ति पण येथें मिळाली आहे. येथील शिलालेख स्तंभावर कोरलेले आहेत. यामध्यें राजा मुलवर्मन्चा उल्लेख आहे. राजा कुंडुंघ याला अश्ववर्मन् नांवाचा पुत्र झाला. यानें एक नवा वंश स्थापन केला. मलवर्मन् हा अश्ववर्मनाचा ज्येष्ठ पुत्र. यानें 'बहु-सुवर्णकम्' नांवाचा यज्ञ केला. त्यानें ब्राह्मणांना २०,००० गाईचें दान केलें. हे शिलालेख इ. स. च्या चवथ्या शतकांतील असावेत असें वाटतें. म्हणजे चवथ्या शतकाच्या अगोदर येथें हिंदु राज्यें अस्तित्वांत आलीं होतीं असें दिसतें. ब्राह्मणांना समाजांत मानाचें स्थान होतें असें मानावयास हरकत नाही. सरकार-दरबारीं ब्राह्मणाची धार्मिक विधी-करतां गरज लागत होती हें देखील या शिलालेखांवरून सिद्ध होतें.

भारतीय संस्कृतीचे अवशेष पूर्व बोर्निओमध्यें ' कोबेंग ' नांवाच्या गुहेमध्यें सापडले आहेत. या गुहेला दोन खोल्या आहेत. या वाळूच्या खडकाच्या आहेत. येथे कोरीव काम केलेले कांही दगड व लाकडाचे व लोखंडाचे स्तंभ सापडले आहेत. या मूर्ति व हे स्तंभ घाईघाईनें एकाद्या देवालयांतून काढून आणले असावे असें वाटतें. येथील सर्व

मूर्ति अलग अलग आहेत व प्रत्येक मूर्तीच्या खालीं एक एक खिळा आहे. हे खिळे या मूर्ति कोनाड्यांत बसविण्याकरितां उपयोगी पडत असत. यांतील बहुतेक मूर्ति हिंदु देवतांच्या आहेत. शिव, गणेश, नंदी, अगस्ति, नंदीश्वर, ब्रह्मा, स्कंद आणि महाकाल. बाकीच्या बौद्ध आहेत. यांत शैवपंथीय मूर्तीच जास्त दिसतात. हीं शिल्पें भारतीय वळणाचीं आहेत. जावामध्यें भारतीय वळणाच्या मूर्ति आठव्या शतकापासून पुढे मिळतात. बोर्निओमधील शिल्पें चवथ्या व पांचव्या शतकांतील आहेत. तेव्हां ही कला भारतामधून बोर्निओमध्यें चवथ्या शतकांत गेली असावी, असें दिसतें. या काळांतील देवळांचें स्थापत्य कसें होतें हें सांगतां येत नाही. या काळांतील देवालयें लाकडाचीं असल्यामुळें त्यांचे अवशेष आज उपलब्ध नाहीत. कोंबेंगच्या गुहेमधील मूर्ति ज्या देवालयांतून आणल्या तें मंदिर ‘महाकाम’ नदीच्या किनाऱ्यावर असावें. कारण बोर्निओच्या या सुरुवातीच्या हिंदु वसाहती याच नदीच्या कांठावर झाल्या. हिंदूच्या सुरुवातीच्या कांही वसाहती पश्चिम बोर्निओ-मध्यें ‘कपुआस’ नदीच्या कांठावर वसल्या. येथें भारतीय संस्कृतीचे अवशेष सापडले आहेत. सेपाउक येथें एक मुखलिंग सापडलें आहे. ‘बटु पहत’ येथें ७ शिलालेख मिळाले आहेत. या शिलालेखांत “ ‘अज्ञाना-चियते कर्म’ व ‘ये धर्मा हेतुप्रभवा’ ” हीं सूत्रें पुनः पुनः कोरलेलीं आढळतात. उपलब्ध असलेल्या पुराव्यावरून इ. स. च्या सुरुवातीच्या शतकांत हिंदु वसाहती बोर्निओमध्यें वसल्या होत्या असें दिसतें.

यानंतरची बोर्निओची जी माहिती मिळते ती अगदी त्रोटक व अत्यंत असमाधानकारक अशी आहे. जी माहिती मिळते ती चिनी इतिहासकारांनी लिहिलेल्या त्यांच्या वंशांच्या इतिहासांत मिळते. टांग वंशाच्या इतिहासांत ‘पो–लो’ येथून इ. स. ६६९ मध्यें चिनी दरबारीं वकील आल्याचा उल्लेख आहे. नवव्या शतकांत लिहिलेल्या चिनी इतिहासांत ‘पो–नी’ चा उल्लेख आहे. ‘सुंग’ वंशाच्या इतिहासांत पो-नीचा राजा स्वतःला ‘महाराज’ म्हणवितो असें लिहिलें आहे. येथील लोक कापडाचे कपडे वापरतात, लग्न जमल्यावर ताडी, पोफळीच्या

झाडाचीं फळें, अंगठी, कपडा व सोनें-चांदी पाठवितात. असेंहि यांत नमूद केलें आहे. इ. स. ९७७ मध्यें येथील राजाने चीनला आपले वकील पाठविल्याची माहिती मिळते. पो–नी (पश्चिम बोर्निओ) व चीन यांचे व्यापारी संबंध होते. इ. स. च्या तेराव्या शतकांत 'चौ जु–कुआ' याने पो–नीविषयीं बरीच माहिती लिहून ठेवली आहे. त्याच्या माहितीवरून येथील संस्कृति भारतीय असावी असें वाटतें. येथील लोक बुद्धाची पूजा करतात असें तो लिहितो इ. स. १३४९ मध्यें वँग-युअेन याने लिहिलेल्या माहितीवरून येथें बुद्धाची पूजा प्रचलित होती असें अनुमान बांधता येतें. येथील लोक जमाखर्चांत फार पटाईत आहेत व त्यांचें गणितविषयक ज्ञान फार प्रगत झालेलें आहे असें तो लिहितो. या दोनहि गोष्टी भारतीय संस्कृतीच्या प्रभावाच्या निदर्शक आहेत. इ. स. १३७० च्या सुमारास बोर्निओचा कांहीं भाग जावाने जिंकून घेतला. नैर्ऋत्य बोर्निओमधील 'तंजुंगपूर' जावाच्या मजपहित राज्यांत होतें. इ. स. च्या पंधराव्या शतकांत बोर्निओचा राजा चीनला गेला व तेथेंच मृत्यु पावला. इ. स. १४१७ मध्यें येथील कांहीं राजे आपल्या कुटुंबासहित चीनला गेले व त्यांनी बादशहाला नानाप्रकारचे मौल्यवान् नजराणे दिले.

बोर्निओची संस्कृति निःसंशय भारतीय होती. यांत तेराव्या शतकापासून जावाच्या संस्कृतीची भेसळ झाली. बोर्निओविषयीं उपलब्ध असलेले उल्लेख एकंदरींत अत्यंत असमाधानकारक आहेत व त्यामुळें बोर्निओची माहितीहि अत्यंत त्रोटक अशी आहे.

वाली द्वीपकल्प जावाच्या उत्तरेला आहे. याची लांबी ९० मैल व रुंदी जास्तींत जास्त ५० मैल आहे. पश्चिम ते पूर्व अशा पर्वतराजी आहेत व यांतील बरेच ज्वालामुखी आहेत. वालीला दोनच बंदरें आहेत. नद्या आहेत पण त्या फार लहान आहेत. सबंध द्वीपकल्पांत अत्यंत प्रेक्षणीय तलाव आहेत. बालीचे द्वीपकल्प एकाद्या बागेप्रमाणें दिसतें. जमीन सुपीक आहे. द्वीपकल्पाच्या मध्यावरून पर्वतराजीची जी रांग जाते तिच्या दोनहि बाजूला सपाट व सुपीक जमीन आहे. त्यामुळें येथे अन्नधान्यें व फळफळावळ यांची सुबत्ता आहे.

वालीमध्यें आजहि भारतीय संस्कृति अस्तित्वांत आहे. आजहि तेथील लोक हिंदुधर्मीय आहेत व त्यांची सर्व सस्कृति 'भारतीय' आहे. ही संस्कृति किती पुरातन आहे हे कळण्याचा कांही मार्ग नाही. कारण वालीमध्यें अजून तरी पुरातन काळांतील अवशेष सापडले नाहीत. जुन्या वालीचा इतिहास उपलब्ध नाही. पण वालीविषयीं थोडीफार माहिती चिनी इतिहासावरून मिळते. परंतु याविषयीं देखील वाद आहे. चिनी इतिहासकार 'पो-ली' नांवाच्या द्वीपकल्पांचा उल्लेख करतात. हे पो-ली म्हणजेच बाली हें मान्य झालें तरच चिनी इतिहासांतील माहिती वालीविषयींची आहे असें म्हणता येईल. पेलीओट यांच्या मतें पो-ली म्हणजेच वाली.

सहाव्या शतकांत लिहिलेल्या 'लिआंग' वंशाच्या इतिहासांत पो-लीचा पहिला उल्लेख आढळतो. "पोलीचा राजा आपण कौण्डीण्य वंशाचे आहोंत असें सांगतो. राजा फुला-फुलाचे रेशमी कापड आपल्या शरीराभोंवती गुंडाळतो. त्याचा मुकुट सोन्याचा असून त्यांत हिरे, माणिक वगैरे वसविले आहेत. हा मुकुट एका वितीहून जास्त उंच आहे. व तो चिनी शिरस्त्राणाप्रमाणें दिसतो. त्याच्या तरवारीवर नक्षीकाम असून त्यांत हिरे वगैरे बसविले आहेत. त्याचें सिंहासन सोन्याचें आहे व तो सिंहासनावर बसून आपले पाय तिपाईवर ठेवतो. राजाच्या दासी

नानाप्रकारची सोन्याची फुलें, आणि हिरे, पाचू इ. चे दागिने घालतात. त्यांच्या हातांत मोराच्या पिसांची 'चवरी' असते. राजाचा रथ हत्ती ओढतो. हा रथ चंदनाचा आहे. रथाचें छप्पर सपाट असून तें पिसांचें आहे. रथाच्या दोनहि बाजूला कशिदा काढलेले पडदे सोडतात. रथाच्या पुढे व मागे राजाचे नोकर शंख वाजवीत व ढोल बडवीत चालतात."

चीनच्या इतिहासांत नमूद केलेल्या या माहितीवरून बालीचें राज्य समृद्ध होतें हें स्पष्ट होतें. येथें भारतीयांच्या वसाहती झाल्या होत्या व लोक बौद्धधर्माचे अनुयायी होते. इ. स. ५१८ मध्यें येथील राजानें चिनी बादशहाकडे आपले वकील पाठविले. 'सुअी' वंशाच्या (इ. स. ५८१–६१७) इतिहासांत आणखी माहिती मिळते. "राज्य करणाऱ्या वंशाचें नांव 'च-रि-य-क' व राजाचें नांव 'हु-लन्-न-पो' आहे." 'टांग' वंशाच्या (इ. स. ६१८–९०६) इतिहासांत याच राजाचें नांव परत नमूद केलें आहे. सुअी वंशाच्या इतिहासांत बालीमध्यें वापरांत असलेल्या एका आयुधाची माहिती दिली आहे. "येथील लोक एक गोलाकार चाकू वापरतात. त्याच्या मध्यभागीं एक भोंक असतें व त्याच्या धारेच्या बाजूला दांत असतात. हा चाकू ते मोठ्या शिताफीने आपल्या शत्रूवर फेकतात. त्यांचा नेम कधीं चुकत नाही."– हा उल्लेख 'चक्रा'चा आहे हें स्पष्ट आहे. चक्र हें कृष्णाचें आयुध आहे. टांग वंशाच्या इतिहासांत 'पोली'ला 'माली' पण म्हणतात असें म्हटलें आहे. येथील लोक कानांत 'कुंडलें' घालतात व कमरेभोंवती कापड गुंडाळतात असें यांत लिहिलें आहे. अी–त्सींग यानें बालीचा उल्लेख केला आहे. बालीमध्यें 'मुलसर्वास्तीवाद–निकाय' पंथ रूढ आहे असें तो म्हणतो. यानंतर बालीचा उल्लेख चिनी इतिहासांत मिळत नाहीं. यानंतर एक शतकापर्यंत बालीची माहिती मिळत नाही. आठव्या शतकानंतरच्या बालीची मात्र पुढें माहिती मिळते. स्टटरहीमनें या काळांतील बरीचशी माहिती उपलब्ध करून दिली आहे. बालीमध्यें या काळातील बरेचसे शिलालेख व ताम्रपट सांपडले आहेत व त्यांच्या आधारें या काळांतील बाली देशाच्या इतिहासावर प्रकाश पडतो. या काळांतील

या देशावर भारतीय संस्कृतीचाच प्रभाव दिसून येतो. तथापि जावाकडून हा प्रवाह वाहत आला नव्हता, हें निश्चित.

बालीमध्यें सांपडलेल्या ताम्रपटावरून बालीच्या इतिहासाविषयीं माहिती मिळते. यांतला सर्वांत जुना ताम्रपट इ. स. ८९८ चा आहे. इ. स. ९१५ व ९३३ च्या दोन शिलालेखांवरून उग्रसेन नांवाचा उल्लेख आढळतो. हा या काळांतील बालीचा पहिला ज्ञात राजा होय. याच्यानंतरचे दोन राजे यांत उल्लेखिले आहेत. एक 'तवनेन्द्रवर्मदेव' (इ. स. ९५५) व दुसरा 'चन्द्रभयसिंघवर्मदेव' (इ. स. ९६२). इ. स. ९७५ मध्यें 'जनसाधुवर्मदेव' व इ. स. ९८३ त राणी 'श्रीविजय-महादेवी' राज्य करीत असल्याचा उल्लेख आहे. दहाव्या शतकांतला आणखी एक 'श्रीकेशरीवर्मा' नांवाचा राजा होऊन गेला. याच्या-नंतर धर्मवंशाने बालीवर आक्रमण करून तो देश जिंकला. पुढें आपल्या पित्याच्या वतीने 'महेन्द्रदत्त' राणीने राज्यकारभार हातीं घेतला. ही ऐरलंगाची जननी होय. हिचा पिता उदयन. याच्यामुळेंच जावाच्या संस्कृतीचा परिचय बाली देशास झाला. इ. स. ९८९ ते १००१ पर्यंत 'गुणप्रियधर्मपत्नी' (महेन्द्रदत्त) व तिचा पति (धर्मोदायनवर्मन्) या दोघांच्या नांवाचा उल्लेख आढळतो. इ. स. १०११ व १०२२ च्या लेखांमध्यें मात्र फक्त उदयनाचाच उल्लेख मिळतो. मध्यंतरीच्या काळांत महेन्द्रदत्त निधन पावला असावा. उदयनानंतरचा राजा 'श्री-धर्मवंशवर्धन मरकतपंकज-स्थानोत्तुंगदेव'. याच्या नांवावरून हा धर्म-वंशराजाच्या वंशातील असावा असें दिसतें. याने तीनच वर्षे राज्य केलें. इ. स. १०४९ ते १०७७ च्या काळांतील दहा ताम्रपटांमध्यें ज्या राजाचा उल्लेख आढळतो तो, उदयन व महेन्द्रदत्त यांचा कनिष्ठ पुत्र असावा. यांच्यानंतरच्या राणीचें "श्री शकलेंदकी रींग ईशान गुणधर्म-लक्ष्मीधर विजयोत्तुंगदेवी" असें बरेंच लांबलचक विरुद आहे. बाराव्या शतकांत 'श्री शुराधीप' व 'श्री जयशक्ती' या दोन राजांचा उल्लेख मिळतो. 'पदुका श्री महाराज हाजी जय पंगुस' याचा उल्लेख १३ ठिकाणीं आढळतो. इ. स. ११८१ चा जो उल्लेख आहे त्यांत तो '

सप्तमंडलावर (बाली द्वीपमंडळ) राज्य करतो असें म्हटलें आहे. तेराव्या शतकाच्या सुरुवातीला 'शकलेंदु भतार परमेश्वर' व 'भतार गुरु श्री अधिकुन्ति' यांचा उल्लेख आला आहे. या सुमारास जावामध्यें चाललेल्या अंतस्थ बंडाळीचा फायदा घेऊन बालीने आपल्या स्वातंत्र्याची घोषणा केली. परंतु कृतनगरच्या कारकीर्दीत जावाने परत बाली पादाक्रांत करून तेथें आपली सत्ता प्रस्थापित केली. कृतनगराच्या काळांत कुबलाओ खानानें जें आक्रमण केलें त्याचा फायदा घेऊन बाली पुन्हां स्वतंत्र झालें. बालीने चीनचें सार्वभौमत्व मान्य केलें. येथपासून ५० वर्षें बाली हा देश स्वतंत्रच होता. चौदाव्या शतकांत 'भतार गुरु' व 'महागुरु' यांचा उल्लेख ताम्रपटांत सापडतो. जावामध्यें मजपहित राज्य आल्यावर गजमदाने बाली पुन्हां पादाक्रान्त केलें. यानंतर मात्र बाली जावाचाच एक भाग म्हणून गणलें जाऊं लागलें. मजपहितांचा ऱ्हास झाल्यावर त्यांचा राजा बालीमध्यें येऊन राज्य करूं लागला. त्याच्यावरोबर बरेचसे लोक बालीदेशांत गेले. या सुमारास जावामध्यें इस्लामधर्माचा प्रसार होत होता. यामुळें जावामधील बरीच प्रजा बालीमध्यें येऊन स्थायिक झाली. मजपहित राजांनी 'गेलगेल' हें आपलें राजधानीचें शहर केलें. एकोणिसाव्या शतकांत बाली डच लोकांनी जिंकून घेतलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत,
अनुक्रम २८३१५ दि: २५-९-मास
क्रमांक २८० नों दि २१।२।६१

# मलाया

मलायाचें द्वीपकल्प म्हणजे आशियाचें अगदी दक्षिणेचे टोक. मलाया हा देश इंडो-चीनच्या दक्षिणेस असून त्याच्या एका बाजूस बंगालचा उपसागर दुसऱ्या बाजूस चिनी समुद्र आहे. मलायी लोक त्याला ' तनाह् मलायू ' (मलायी लोकांचें राष्ट्र) म्हणतात. मलायाच्या उत्तरेला सयाम आहे. पूर्वेला सयामचे आखात व चिनी समुद्र, दक्षिणेला सिंगापूरची सामुद्रधुनी, व पश्चिमेला मलायाचें आखात आणि बंगालचा उपसागर अशी याची भौगोलिक रचना आहे. मलायाच्या बाजूने लहान लहान बेटें आहेत. यांत प्रमुख म्हणजे पश्चिमेला लांगकवि आणि पेनांग व दक्षिणेला सिंगापूर, बटन व रिटंग हीं आहेत. मलायाच्या दक्षिणोत्तर खडकाळ पर्वतांची रांग पसरली आहे. या रांगेला समांतर अशा आणखीहि पर्वतांच्या रांगा आहेत.

मलायाचीं जंगलें फार समृद्ध आहेत. मलायाच्या पर्वतराजी व भूमिप्रदेश नेहमीच हिरवागार असतो. जंगलांत लाकूड, कापूर, ओबॉनी, रत्तन, बांबू, निबुंग वगैरे मिळतें. मलायाच्या जमिनींत तांदूळ, ऊस, कॉफी, कापूस, साबूदाणा, काळीं मिरीं, मसाले व रबर मिळतें. याशिवाय आंबा, डाळिंब, फणस, सीताफळ, नारळ वगैरे फळफळावळ देखील येथें होते. मलायामध्यें विपुल खनिजसंपत्ति आहे. कथील,लोखंड, सोनें व कोळसा येथें मोठ्या प्रमाणावर मिळतो. मलायामध्यें सर्वत्र लहान लहान नद्या वाहत आहेत. पश्चिमेला पेराक, बर्नम आणि मुआर व पूर्वेला जतनो, तलुकिन्, केलंतन, बेसूत, गेंगनू, कौन्तात, पहंग व रोंजीन. मलायामध्यें असलेल्या जंगलामुळें दळणवळणाचे मुख्य साधन म्हणून नद्यांचाच उपयोग केला जातो.

भारताचा मलायाशीं फार प्राचीन काळीं संबंध आला असावा. पुराणांमध्यें 'मलाया द्वीप' व 'कटाह् द्वीप' या दोहोंचे उल्लेख आहेत. मलायाला भारतीय लोक 'सुवर्णद्वीप' या नांवाने ओळखीत. टॉलेमी आपल्या ग्रंथांत त्याला 'ख्राओस केर्सोनेसस' म्हणतो. इ. स. च्या पहिल्या

 ११४०६

शतकांत भारतीयांचा अतिपूर्वेशीं व्यापारानिमित्त संबंध आला होता. मलायामधील तक्कोला, जावा, ताम्रलिंग हीं नांवें भारतीय आहेत. इ. स. च्या दुसऱ्या शतकांत भारतीय व्यापारी मलाक्काच्या आखातांतून चीनला जात. भारतीयांनीं फुनान येथें पहिल्या शतकांत आपल्या वसाहती स्थापन केल्या. साधारणतः दुसऱ्या शतकाच्या आरंभीं चंपा येथें भारतीय वसाहत झाली. या दोनहि ठिकाणीं मलाक्काच्या आखातांतून म्हणजे मलायावरून जावें लागे. तेव्हां मलायामध्यें हिंदु वसाहती पहिल्या शतकाच्या अगोदर झाल्या असणें अगदीं शक्य आहे.

या अनुमानाला ऐतिहासिक आधारहि मिळतो. चीनमधल्या लीआंग राजवंशाच्या इतिहासांत 'लांग-य-सू' नांवाच्या प्रदेशाचा उल्लेख आहे. या राज्याची स्थापना ४०० वर्षांपूर्वी झाली असा यांत उल्लेख आहे. या देशाचा राजा मोठ्या अभिमानानें चीनच्या बादशहाला सांगतो कीं, संस्कृत भाषा त्याच्या देशांत सर्वांना येते. या पुराव्यावरून येथें हिंदु वसाहती होऊन कांहीं काळ लोटला असला पाहिजे हें स्पष्टच होतें. 'लांग-य-सू' म्हणजे केदाह व पेराकजवळचें 'लंकसुक.' क्वेरीच वेल्स यांनीं येथें बऱ्याच ठिकाणीं उत्खनन केलें. त्यांच्या मतें हें राज्य बौद्ध-धर्मीय होतें. त्यांना उत्खनन करतांना बूजंग नदीकांठीं विटांच्या एका इमारतीच्या पायाशीं बुद्धाची पितळेची एक अतिशय सुन्दर मूर्ति मिळाली. हिची उंची $८\frac{१}{२}$ इंच आहे. ही मूर्ति गुप्त छापाची वाटते. ती चवथ्या अथवा पांचव्या शतकांतील असावी. दुसरी बुद्धाची दगडी मूर्ति 'वींग श्री' येथें सांपडली. अनेक बौद्ध स्तूप केदाह नदीच्या मुखापाशीं सांपडले आहेत. येथें बौद्ध शिलालेखहि मिळाले आहेत. यांतील एक शिलालेख चवथ्या शतकांतील असून तो दक्षिण भारतीय लिपींत आहे. दुसरा शिलालेख सहाव्या शतकांतील असून तो संस्कृतांत आहे.

चिनी इतिहासकारांनीं तत्कालीन मलायामधील लोकांचें वर्णन लिहून ठेविलें आहे. "सर्व स्त्री-पुरुष आपले केस पाठीवर मोकळे सोडतात. ते सुती कपडे वापरतात ते आपल्या कपड्यांना 'कन-मन' म्हणतात. या कपड्यांना ते 'हात' शिवत नाहींत. श्रीमंत वर्गांतील पुरुष

या कपड्याशिवाय आणखी एक गुलाबी रंगाचें कापड वापरून आपली पाठ झाकतात. कमरेभोंवती हे सोन्याचा पट्टा लावतात आणि सोन्याचीं कर्णफुलें घालतात. श्रीमंत स्त्रिया हिरेमाणकें लावलेले गळपट्टे घालतात."

चवथ्या व पांचव्या शतकांत येथें आणखी एक राज्य असल्याचा उल्लेख चिनी इतिहासांत सापडतो. हें 'चे-तू' वेल्स्ले प्रांतांत सांपडलेल्या एका शिलालेखांत याचा उल्लेख आढळतो. चिनी इतिहासकार आणखी दोन राज्यांचीं नांवें सांगतात. यांपैकीं एक 'ताम्रलिंग' व दुसरें 'तक्कोल.' ताम्रलिंगाची राजधानी मलायाच्या पूर्वकिनाऱ्यावर 'लीगोर' येथें होती. सहाव्या शतकांतील शिलालेखावरून व पाली वाङमयामध्यें त्याच्या 'तांवलिंगम्' नांवाच्या उल्लेखावरून तें इ. स. च्या दुसऱ्या शतकांत अस्तित्वांत आलें असावें. तक्कोलाचा उल्लेख 'मिलिंदपन्हा' मध्यें आढळतो. तक्कोला म्हणजे आजचें 'ताकुआ-पा' अथवा 'ट्रांग' बंदर असावें.

फुनानची भारतीय संस्कृति बँडॉनच्या उपसागराजवळ वसलेल्या 'पान मान' मधून आली असें 'लीआंग' चा इतिहास सांगतो. फुनान, द्वारावती व मलायांतील राज्याचे सांस्कृतिक संबंध असल्याचें, या सर्व ठिकाणीं ज्या गुप्त छापाच्या मूर्ति सांपडल्या आहेत, त्यावरून सिद्ध होतें.

सातव्या शतकापासून ते बाराव्या शतकापर्यंत दक्षिण सयाम व मलाया, सुमात्राच्या 'श्रीविजय' राज्याच्या वर्चस्वाखालीं होता. श्रीविजयमध्यें महायान बौद्धधर्माची स्थापना झाली होती व तेथें भारतीय संस्कृतीचें वर्चस्व होतें. फुनानचें राज्य 'चेन-ला' च्या ख्मेर लोकांनी नष्ट केलें. फुनानचें राज्य नष्ट झाल्यावर श्रीविजयचें राज्य प्रस्थापित झालें व या राज्यानें आपलें वर्चस्व मलायावर प्रस्थापित केलें. श्रीविजयचें राज्य स्थापन झाल्यापासून एका शतकांत सुमात्रा, पश्चिम जावा व बहुतेक सर्व मलाया एवढ्या सर्व प्रदेशावर श्रीविजयनें अंमल बसविला. मध्यजावामध्ये आठव्या शतकांत शैलेन्द्र

राजघराण्यानें आपलें राज्य स्थापन केलें व बोरोबुदरची अमर कलाकृति निर्माण केली. श्रीविजयचे राजे व शैलेन्द्र राजे यांचे संबंध मित्रत्वाचे होते. नवव्या शतकाच्या मध्यावर मध्यजावाचा शैलेन्द्र राजपुत्र श्रीविजयचा राजा झाला. या घटनेपासून श्रीविजयचें राज्य अधिक बलशाली झालें. अरब व्यापारी याला झबग (जावक) कलह ('क्रा' ची संयोगभूमि) व श्री-बुझ (श्रीविजय) चा राजा मानीत. इ.स. ९९६ मध्यें लिहितांना मसुदी म्हणतो, "या महाराजाचें साम्राज्य इतकें मोठें आहे कीं अतिशय वेगवान जहाज घेऊन त्याच्याभोंवती प्रदक्षिणा घालायला किमान दोन वर्षें तरी लागतील. या राजाजवळ जितकीं सुवासिक अत्तरें व मसाले आहेत, तितके कोणत्याहि राजाकडे नसतील."

श्रीविजयचा व चोल राजांचा संबंध होता. अकराव्या शतकांत हे संबंध बिघडले. राजेन्द्र चोलाने श्रीविजय व कटाह पादाक्रांत केलें. याशिवाय 'मा नक्कवर' (निकोबार) 'ईलंगोका' (लंकसुक) वगैरे प्रदेशहि त्याने जिंकून घेतले. परंतु हा विजय तात्कालिक होता. थोडयाच काळांत श्रीविजयने आपलें स्वातंत्र्य परत मिळविलें.

आठव्या शतकांत मलायामध्यें उत्तर भारतीय लिपीचा व संस्कृतीचा प्रवेश झाला. श्रीविजय व शैलेन्द्र या दोहोंवरहि भारतीय संस्कृतीचें वर्चस्व स्पष्ट दिसतें. येथील बहुसंख्य शिल्पें गुप्त छापाचीं आहेत. येथें हिंदु देवदेवतांच्या मूर्ति देखील सांपडल्या आहेत. लीगोर येथें 'महातात' च्या देवालयांत इ. स. च्या पांचव्या अथवा सहाव्या शतकांतील संस्कृत शिलालेख सांपडला आहे. याची लिपि उत्तर भारतीय आहे.

येथील गुप्त पद्धतीच्या बुद्धमूर्ति द्वारावतीच्या मूर्तींची आठवण करून देतात. ब्राह्मणी मूर्ति मात्र वेगळयाच वाटतात. सयामच्या राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयांत विष्णूची एक २७ इंच उंचीची मूर्ति आहे (आकृति क्र.२५). विष्णूचा मुकुट, कर्ण-भूषणें व त्याचा पोषाख इ. सर्वच गोष्टी फार बोजड वाटतात. त्यांत नाजूकपणा कांहीच नाही. अंगावरच्या या वजनाने तो वाकला कसा नाही याचेंच आश्चर्य वाटतें! येथें सांपडलेल्या हिंदु मूर्तींवर पल्लव छाप दिसतो. 'वींग श्री' येथें विष्णूची

एक ४ फूट १० इंच उंच एवढी मूर्ति सांपडली आहे. ही निश्चित पल्लव पद्धतीची आहे (आकृति क्र. २६). या मूर्तीचा मुकुट उंच टोपीप्रमाणें आहे. अंगावर अलंकार नाहीत कमरेखालील वस्त्र सुती वाटतें.

सातव्या व आठव्या शतकांतील पल्लव पद्धतीची किती तरी शिल्पें येथें सांपडलीं आहेत कांही शिल्पांत भारतीय शिल्पकला व स्थानिक कला यांचें मनोहर मिश्रण झालें आहे. या मूर्तीवर 'पाल' कलेची छाप आहे. बँकॉकच्या राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयांत बोधिसत्व लोकेश्वराची तांब्याची एक काळी मूर्ति आहे (आकृति क्र. २७). तिचा कमरेखालचा भाग व डोक्यावरचा मुकुट तुटला आहे. मुकुट तुटला असला तरी त्याच्या अस्तित्वांत असलेल्या भागावरून तो सुंदर असावा असें वाटतें. ही मूर्ति मोठी सुबक आहे चेहऱ्यावर मंद हास्य आहे. अंगावरच्या अलंकारांमुळें मूर्तीला जास्तच शोभा येते. इतकी सुंदर मूर्ति घडविणारे कलाकार भारतीय अथवा भारतीय संस्कृतीचे असावेत असें रेजिनाल्ड मे यांचें मत आहे. ही मूर्ति म्हणजे खरोखरच शिल्पाचा एक उत्कृष्ट नमुना आहे बँकॉकच्या वस्तुसंग्रहालयांत लोकेश्वराची आणखी एक मूर्ति आहे लोकेश्वर कमलपुष्पावर बसले आहेत. डाव्या पायाची मांडी करून उजवा खालीं कमलपुष्पावर सोडला आहे. डोक्यावर 'जटामुकुट' आहे. डाव्या हातांत कमलपुष्पाचा देठ आहे. अंगावरचे अलंकार कोरून काढल्यासारखे वाटतात. मूर्तीची एकंदर घडण मोठी आकर्षक वाटते. तांब्याच्या घडविलेल्या मूर्ती मध्य व ईशान्य सयाममध्यें बहुधा मिळत नाहींत. मिळतात त्या अगदी लहान आकाराच्या. यांची घडणहि प्राथमिक स्वरूपाची वाटते. याउलट दक्षिण सयाममध्यें तांबें विपुल प्रमाणांत मिळतें व तेथें शिल्पकला फार प्रगत असल्याचें आढळतें मलायांत कथिल हवें तेवढें मिळतें व तांबें व कथिल मिळून मूर्ति घडवीत असत. दुसरें असें कीं मलायामध्यें भारतीयांच्या वसाहती अगोदर झाल्या व त्यामुळें येथें शिल्पकलेचा प्रवेश अगोदर झाला.

बँकॉकच्या वस्तुसंग्रहालयांत ४ फूट उंचीची बुद्धाची एक तांब्याची मूर्ति आहे. या मूर्तीतील बुद्ध एका प्रचंड नागावर बसला आहे. वरची

बुद्धमूर्ति व खालचा नाग वेगळे वेगळे घडविले आहेत. नागाच्या खालीं एक लेख कोरला आहे. याची लिपि जुनी ख्मेर पण भाषा कंबोडियन आहे. लेख असा आहे: "काम्रतेन् अन् महाराजाश्रीमत् यांच्या आज्ञेप्रमाणें या प्रदेशाचे अधिराजे महासेनापति गलन यांनी म्रतेन श्री ननो यांना ही मूर्ति घडविण्याची विनंती केली व त्याप्रमाणें ही मूर्ति त्यांनी ११०५ च्या ज्येष्ठ महिन्यांत अमावस्येच्या तिसऱ्या दिवशीं बुधवारीं पूर्ण केली. या मूर्तीचें वजन १ भार व २ तोळे आहे. मूर्तीची शोभा वाढविण्याकरितां १० तामलिंग किंमतीचें सोनें वापरलें आहे. भक्तांना पूजाअर्चा करतां यावी म्हणून ही मूर्ति घडविली आहे."

११०५ हें वर्ष महा-सकरातचें धरलें तर ही मूर्ति ११८३ सालीं पूर्ण झाली असावी असें मानावयास हरकत नाहीं. या सुमारास ख्मेर लोकांनीं मध्यसयामवर आपलें वर्चस्व प्रस्थापित केलें होतें. कोडेझ या फ्रेंच इतिहासकाराच्या मतें या लेखामध्यें उल्लेखलेला राजा ख्मेर काळांत झालाच नाही. कदाचित् ख्मेर राजसत्ता मलायामध्यें त्या काळांत प्रस्थापित झाली नसावी. परंतु ख्मेर भाषेचा व संस्कृतीचा परिणाम मलायावर निश्चितपणेंच होत होता. तेराव्या शतकांत सयामच्या 'ताय' घराण्यानें आपलें वर्चस्व मलायामध्यें प्रस्थापित केलें होतें. हें इ. स. १२९२ च्या 'सुकोताओ' च्या लेखावरून स्पष्ट होतें. मलाया हा श्रीविजयचा भाग होता. तेराव्या शतकांत सयामचे ताय राजे व जावामधील नवे राजे यांनीं श्रीविजयचें राज्य नष्ट केलें व मलायाच्या इतिहासांतील हें महत्त्वाचें पर्व संपलें.

# मध्य व पूर्व जावामधील स्थापत्य

मध्य व पूर्व जावामध्यें हिंदु व बौद्ध देवालयें जागोजागीं दिसून येतात. हिंदूंची देवालयें प्रामुख्यानें डीअंगचा पठार व त्याच्या जवळ-पासचा भाग व प्रांबाननच्या दरींत आढळतात. बौद्ध देवालयें प्रांबा-ननची दरी व केडूच्या सपाट प्रदेशांत दिसतात. यांत कांही देवालयें शैलेन्द्र कालांतील, कांही सिघसरी काळांतील, कांही मजपहित काळां-तील व कांही उत्तरमजपहित काळांतील आहेत. या देवालयांच्या स्थापत्यात बरींच समान वैशिष्टचें आढळतात.

जावामध्यें देवालयांना 'चंडी' म्हणतात. चंडी हा शब्द मृताच्या अस्थीवर बांधलेल्या कोणत्याहि स्मारकास उद्देशून वापरतात. क्रोमच्या मतें हा शब्द दुर्गेच्या 'चंडिका' या नांवावरून आलेला असावा. चंडिकेचा मृतांशीं फार जवळचा संबंध आहे, तेव्हां क्रोमचें म्हणणें सयुक्तिक दिसतें. आजहि बालीमध्यें स्मशानांत दुर्गेचें देवालय बांधण्याचा प्रघात आहे. कालांतराने कोणत्याहि देवालयाला 'चंडी' म्हणण्याचा प्रघात पडला असावा.

देवालयांचा अभ्यास करण्याच्या दृष्टीनें त्याचे तीन प्रमुख भाग लक्षांत येतात : (१) देवालयाचा जोता अथवा पाया, (२) विमन अथवा मुख्य देवालय व (३) शिखर.

जावामधील जोत्यांचा अभ्यास करतांना त्याचे वेगवेगळे विभाग चटकन् नजरेंत भरतात. प्रथम जमिनीजवळचा पाया. याच्यावर जो दुसरा भाग दिसतो तो नागमोडी वळणें घेत वर जातो. जोत्याच्या वरच्या या भागामुळें देवालयाला शोभा येते. हा भाग व वरील कंगोऱ्याचा भाग यामध्यें दगडांत कोरलेल्या माळांचा पट्टा येतो. जोत्यावर जो सपाट पट्टा दिसतो त्याच्यावर शिल्पें कोरलेलीं असतात अथवा कोरीव नक्षीकाम केलेलें असतें.

जोत्यावर उभें असलेलें विमन अथवा मुख्य देवालय चौकोनी अथवा लंबचौकोनी असतें. देवालयाच्या समोर द्वारमंडप बांधावयाचा

व बाकीच्या बाजूंचा मधलाच भाग पुढें आणून ठेवायचा, अशी पद्धत रूढ दिसते देवालयांत एकच प्रवेशद्वार ठेवण्याची पद्धत दिसते व या द्वारमंडपांतून गर्भगृहाकडे जातां येतें. देवालयाच्या तीनहि बाजूंच्या भिंतींत अर्धस्तंभ कोरून शिल्पपट केलेले आढळतात. मध्येंच एखादा भाग जास्त पुढें आल्याचें आढळते व या भागावर शिल्प कोरलेलें आढळतें.

देवालयाचें शिखर वर निमूळतें होत जातें. एकावर एक मजले बांधल्यावर इमारत जशी दिसते, तसें याचें स्वरूप दिसतें. शिखरावर लहान लहान देवालयें कोरलेलीं दिसतात. कांही देवालयांचीं शिखरें अष्टकोनी आहेत. या शिखरांवर कळस असतात. आज मात्र कळस तुटलेले असल्याने त्याखालील 'वितान' (cushion) तेवढें दिसतें. बौद्ध मंदिरांच्या शिखरबांधणीत वितानाच्यावर घंटेच्या आकाराच्या स्तूपावर कळस उभारीत.

मुख्य मंदिरांचा आकार चौकोनी असून मंदिराच्या भिंती कांही एका विशिष्ट उंचीपर्यंत सरळ उभ्या आहेत. येथपासून शिखराचा भाग सुरू होतो. भिंती दगडाच्या रांगांनीं तयार केल्या आहेत. पण या उंचीपर्यंत हे दगड एकावर एक रचलेले आहेत. शिखर सुरू झाल्यावर मात्र दगडांची प्रत्येक रांग थोडीशी आंत दुमडलेली दिसते. वरच्या रांगा अशाच प्रकारें आंत घेतल्यामुळें छपराचा भाग निमुळता होत गेला आहे. हा प्रत्यक्ष शिखराचा भाग. शिखर बाहेरून व आंतून निमुळतें होत जातें. याच्यावर बहुधा चुन्याचा थर व रंग लावतात. बहुतेक देवालयांवर वेलबुट्टी, फुलांचे हार, गुलाबाकृति, फुलांचे गुच्छ इत्यादि विविध नक्षीकाम केलेलें आढळतें. सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे अशी कीं येथील देवालयावर जीं फुलें व जे प्राणी कोरलेले आढळतात ते जावामधील नसून भारतामधील आहेत !

जावाच्या देवालयांतील शिल्पांत नेहमीं आढळणारा प्राणी म्हणजे 'कालमकर !' पुष्कळ ठिकाणी काल आणि मकर यांच्या आकृति वेगवेगळ्या आहेत. या कालाचें मुख भयानक असतें. शिवाच्या रुद्र रूपाचें तें प्रतीक आहे. डॉ. कुमारस्वामींच्या मतें हें 'काल-मुख' नसून

'कीर्ति-मुख' आहे. हें मुख सिंहाचें असून त्याचे डोळे बाहेर आलेले, नाक फेंदारलेले, जाड ओठांतून दोन अक्राळविक्राळ सुळे बाहेर आलेले आहेत. 'मकर' हा प्राणी भारतीय शिल्पांत सर्व ठिकाणीं आढळतो. हा काल्पनिक प्राणी आहे. त्याचा कांही भाग मगराचा, कांही हत्तीचा व कांहीं सर्पाचा दाखविण्याचा प्रघात आहे. जावामधील मकराचें शरीर माशा-प्रमाणें दाखवितात. त्याचें मुख मात्र हत्तीचें दाखवितात. हें काल-मुख बहुधा देवालयाच्या दरवाजावर मध्यभागीं कोरलेलें आढळून येतें. कमान कोरली तर तिच्या वरच्या बाजूला मध्यावर तें कोरतात. कांही वेळां तें दरवाज्याच्या चौकटीच्या खालच्या भागावर देखील कोरलेलें आढळतें, तर कांही वेळेला सोपानाच्या वरच्या भागाला कोरलेलें दिसतें.

मध्यजावामधील देवालयांचा एक उल्लेखनीय गुण असा कीं जैन मंदि-राप्रमाणें यांत शिल्पांची गर्दी नाही अथवा नक्षीकामाची रेलचेल नाही. त्यामुळें स्थापत्य गुंतागुंतीचें वाटत नाहीं. या देवालयांचें दुसरें वैशिष्ट्य म्हणजे हे कीं त्यांना स्तंभ नाहीत. इमारतीच्या कमानी सरळ भिंतीवर घेतल्यामुळें त्यांचा आकार फारसा भव्य नसतो. त्यामुळें भव्य देवालयें बांधतां येत नसत. यांतूनहि देवालय भव्य करण्याचा एक मार्ग होता. तो म्हणजे मुख्य देवालयाच्या भोवतीं लहान लहान ओवऱ्या बांधून त्यावर शिखरें बांधावयाचीं अथवा मुख्य देवालयांभोवतीं बरीचशीं लहान लहान देवालयें बांधावयाचीं मग या सर्व देवालयांभोवतीं एक मोठी भिंत बांधून तिच्यातच दक्षिण भारतीय पद्धतीचें गोपुर बांधावयाचें. मध्यजावामध्यें अशा प्रकारचीं गोपुरें असल्याचा पुरावा मिळालेला नाही. परन्तु पूर्व जावामध्यें मात्र अशीं प्रवेशद्वारें बांधीत असत.

## डीऍंगच्या पठारावरचीं हिंदु देवालयें

डीऍंगच्या पठाराची उंची ६५०० फूट आहे. पठाराच्या मध्यावर दक्षिणोत्तर अशा एका ओळींत चार देवालयें आहेत. चंडी अर्जुन, चंडी श्रीखंडी, चंडी पुंतदेव व चंडी सेंबद्र. हीं चारहि देवालयें पश्चिमाभि-मुख आहेत. पांचवें देवालय चंडी सेमार, चंडी अर्जुनाच्या समोर असून

पूर्वाभिमुख आहे. या सर्व देवालयांशिवाय या पठारावर चंडी द्वारावती, चंडी घटोत्कच आणि चंडी भीम अशीं तीन देवालयें आहेत. परीक्षित व चंडी नकुल-सहदेव या दोन देवालयांचे आतां अवशेष तेवढे दिसतात. या सर्व देवालयांचीं नांवें महाभारतांतून घेतलीं आहेत. युधिष्ठिराचें जावामध्यें रूढ असलेलें नाव पुंतदेव. याच्या देवालयाचें नक्षीकाम इतर देवालयापेक्षां निश्चितच सरस आहे. याच्या जोत्यावरचें व भिंतीवरचें नक्षीकाम मोठें प्रेक्षणीय आहे. प्रत्येक बाजूच्या भिंतीच्या मध्यभागीं कोनाडे आहेत. कोनाड्यांच्या चारहि बाजूंवर नक्षीकाम केलेलें आहे. या कोनाड्यांच्या वरच्या बाजूला अशाच प्रकारचे दुसरें कोनाडे कोरले असून त्यांच्या खालील बाजूस भिंतीने नागमोडी वळण घेतलें आहे. कोनाड्यांचा खालची बाजू व ही नागमोडी वळणांची दगडांची रांग यांच्यामध्यें भिंतीवर जी दगडांची रांग आहे ती तक्क्यासारखी आहे. भिंतींवर कोरलेल्या अर्धस्तंभावरील कलाकुसर कमनीय आहे.

या देवालयांत चंडी भीम 'आगळें' च आहे. याचा जोता साधारणतः चौकोनी आहे. याच्या तीनहि भिंतींचा मधला भाग मुद्दाम पुढें काढला आहे. देवालयाचा द्वारमंडप मोठा आहे. तो ११½ फूट रुंद आहे. एका भिंतीवरील कोनाड्यावर कालमकर आहे. बाकीच्या तिन्हीहि भिंतीवर कांहींहि नक्षीकाम नाही. याच्या वरच्या बाजूला फुलांच्या हारांचें नक्षीकाम आहे व त्याच्यावर दगडाच्या आडव्या तुळया कोरल्या आहेत. याच्यावर कंगोरा आहे. या देवालयाचें शिखर वैशिष्ट्यपूर्ण आहे. नागमोडी वळणावर कमळांचें नक्षीकाम आहे.याच्या वरच्या कंगोऱ्यावर एक समांतर बंध आहे व त्यावर पुन्हां कमळाचीं फुलें कोरलीं आहेत. याच्यावर कोनाडे आहेत. बाजूचे दोन कोनाडे मागच्या रांगेंत असून मधला कोनाडा पुढें आलेला आहे. कोनाड्याच्या वरच्या भागांत कमान आहे. यांतील दोन बाजूंना जे कोनाडे आहेत ते कोपऱ्यावरील स्तंभांत बसविले आहेत. हे स्तंभ आकाराने लहान आहेत. त्यांच्या वरचा भाग 'आमलका' प्रमाणें आहे. आमलकाच्या खालच्या बाजूला फुलांचे हार कोरलेले आहेत. या दोन कोनाड्यांमधील कोनाडा मोठा असून त्याच्या-

वर आणखी तीन लहान लहान होत गेलेले कोनाडे आहेत. कोनाड्यांत शिल्पें आहेत. शिखराचा वरचा भाग तुटून गेलेला आहे. या देवालयाचें शिखर इतर देवालयापेक्षां अगदी वेगळें आहे.

हीं सर्व देवालयें आकारानें लहान आहेत. देवालयांवर विशेष नक्षीकाम नाही, पण त्यांच्या साधेपणांतच त्यांचें सौंदर्य आहे. देवालयाच्या भिंतींवर विशेष नक्षीकाम नाहीं. तथापि जें नक्षीकाम आहे, तें डोळ्यांत भरण्यासारखें आहे.

हीं सर्व हिंदु देवालयें आहेत. शिव, दुर्गा, गणेश, ब्रह्मा, विष्णु यांचीं बरींच शिल्पें येथें आढळतात. या शिल्पांमध्यें शिवकुटुंबाचें प्राबल्य दिसतें. त्यांतील देवांचीं सर्व वाहनें मानव रूपांत साकार झालीं आहेत. त्यांच्या तोंडवळ्यावरूनच त्यांना ओळखतां येतें.

या देवालयांच्या आसपास वस्तीचे अवशेष दिसत नाहींत. देवळाचे पुजारी व इतर नोकर मंडळी येथेंच राहात असावींत. हें जावामधील यात्रेचें ठिकाण असावें.

डीॲेग पठाराच्या दक्षिणेला व पूर्वेला नवव्या शतकांतील देवालयाचे बरेच अवशेष आढळतात. याशिवाय डंगरन पर्वतांवर 'गेडोंग संग' नांवाचीं देवालयें आहेत. हीं सर्व शिवमंदिरें आहेत. क्वचित् विष्णुमंदिरहि आढळतें.

## प्रांबाननच्या दरीमधील हिंदु देवालयें

प्रांबाननच्या दरीमधील मुख्य देवालयांचा समूह म्हणजे लारा–जोंग्रांगचा या एकाच ठिकाणीं १५६ लहान लहान देवालयें बांधलीं आहेत. हीं दहाव्या शतकांतील आहेत. येथील एका लहान मंदिरांत दुर्गेची एक सुंदर मूर्ति आहे. या मूर्तींतील दुर्गा अगदीं सडपातळ पण पुष्ट आहे. जावामध्यें सडपातळ तरुणीला 'लारा–जोंग्रांग' असें म्हणतात. यासंबंधीं जावामध्यें एक सुंदर आख्यायिका आहे. ही आख्यायिका एका राजकन्येविषयीची आहे. एके दिवशीं आपल्या महालांत ही तरुण,

लावण्यवती राजकन्या निद्रासुख अनुभवीत होती. तिच्यावर अनुरक्त झालेल्या तरुणाने प्रेमयाचनेसाठीं एक अपूर्व साहस केलें. तो तिच्या महालांत ऐन रात्रीं गेला. आपल्या महालांत आणि अशा एकांतांत एक साहसी तरुण येऊन आपल्यासमोर उभा राहिला आहे हें तिच्या लक्षांत येतांच ती भयभीत झाली. तशांत या साहसी तरुणाने तिला मागणी घातली. तेव्हां तर ती चकितच झाली. तिच्या तोंडून शब्दच फुटेना. मग तिने धीर करून विचारलें, "हे तरुण पुरुषा, तुझी मागणी मी मान्य करीन पण माझी एक अट आहे." तिची अट विलक्षण होती. एका रात्रींत सहा देवालयें जर या तरुणानें निर्मिलीं तर आपण त्याच्याशीं विवाहबद्ध होऊं, असा तिने मनोदय व्यक्त केला. या तरुणाने तिच्या अटीप्रमाणें कार्य सुरू केलें. पण या राजकन्येने पुनः कांहीं क्लृप्ति योजून त्याच्या मार्गांत विघ्न उपस्थित करण्याचें ठरविलें. ही तिची योजना लक्षांत येतांच त्या तरुणाला विलक्षण राग आला व रागाच्या भरांत त्याने तिला शाप दिला. या शापामुळें राजकन्येचें रूपांतर दगडाच्या मूर्तींत झालें. जावांतील जनता आजहि या मूर्तीची पूजा करते.

लारा जोंग्रांगचीं १५० हून अधिक देवालयें मधल्या ८ देवालयां-भोवतीं बांधलेलीं आहेत. अगदी मध्यभागीं हीं आठ देवालयें आहेत. या भोंवतालीं तट आहे. याच्याबाहेर आणखी लहान लहान देवालयें आहेत व याभोंवती परत दुसरा तट आहे. आणखी एका तटाचे अवशेष दिसतात. हीं लहान लहान देवालयें तीन ओळींत आहेत. प्रत्येक बाजूला १६ अशा तीन रांगा आहेत. सर्व बाजूंना मिळून १५६ देवालयें आहेत. याशिवाय देवळांची आणखी एक चवथी रांग आहे. पूर्वीं या भोंवतालीं भिंतीचा प्रचंड कोट होता. त्याची प्रत्येक बाजू ८५५ फूट लांब होती. सध्यां हा भिंतीचा कोट पडीक अवस्थेंत आहे.

मध्यभागीं जीं आठ देवालयें आहेत त्यापैकीं सहा देवालयें दोन रांगांमध्यें आहेत. या रांगा दक्षिणोत्तर आहेत. राहिलेलीं दोन देवालयें या दोन रांगांच्या मध्यें आहेत. पश्चिमेच्या रांगेंत जीं तीन देवालयें

आहेत तीं सर्वांत मोठीं आहेत. हीं पूर्वाभिमुख आहेत. पूर्वेकडील तीन देवालयें पश्चिमाभिमुख आहेत. पश्चिमेच्या रांगेतील मधलें देवालय सर्वांत मोठें आहे. याच्या गर्भगृहांत शिवमूर्ति आहे. उत्तरेकडील देवालयांत विष्णुमूर्ति आहे व दक्षिणेकडील देवालयांत ब्रह्माची मूर्ति आहे. त्यांच्या समोरील देवालयांत त्यांचीं वाहनें आहेत.

शिवदेवालयाची लांबी ९० फूट आहे (आकृति क्र. २८). याच्या मुखाकडील ६६ फूट भाग मुद्दाम पुढें काढलेला आहे. यांतील १८ फुटांच्या भाग जिन्यानें व्यापला आहे. जिन्याच्या खालीं लहान देवळें आहेत. देवालयाच्या बाजूच्या भिंतींत पण कांही भाग मुद्दाम पुढें काढलेला आहे. भिंतीचा कोपऱ्यापासूनचा भाग एका रांगेंत असून फक्त मधला भाग तेवढा पुढें आल्याचें दिसते! जोत्याची उंची १० फूट आहे. या जोत्यावर सज्जा आहे. मंदिराच्या चारहि बाजूला ७ फूट रुंद जागा प्रदक्षिणापथाकरितां ठेवली आहे. या सज्जाच्या कठड्याच्या दोनहि बाजूंना नक्षीकाम असून तेथें शिल्पें कोरलेली आहेत. कठड्यांच्या बाहेरच्या बाजूला पुढें आलेले कोनाडे व आंत गेलेले शिल्पपट आहेत. प्रत्येक कोनाड्यांत तीन शिल्पें कोरलेलीं आहेत. तीन पुरुष, तीन स्त्रिया अथवा मध्यें एक पुरुष व बाजूला दोन स्त्रिया अशीं शिल्पें यांत कोरलेलीं आहेत. हे सर्व स्त्रीपुरुष एकमेकांना अगदी खेटून उभे आहेत. त्यांच्या दोनहि बाजूला अर्धस्तंभ आहेत. या अर्धस्तंभावर दोन सिंह असून त्यांच्या मध्यें काल-मकर आहे. या कालमकरांच्या मूर्ति अत्यंत तेजस्वी आहेत. काल-मकराच्या दोन बाजूंस आणखी दोन मकर आहेत. त्यांची मुखें एकमेकांकडे आहेत. या दोन मकराकृतींमध्यें कमळ वेल आहे. ही वेल मकर-मुखांतून आली आहे. या वेलीवर तीन घंटा टांगलेल्या दिसतात कोनाड्यांतील शिल्पें देवदेवतांचीं आहेत. अर्धस्तंभावर मात्र गंधर्वमिथुनें कोरलीं आहेत. जावांतील या शिल्पांचें सौंदर्य वाखनकशी आहे यांत शंका नाहीं. कठड्याच्या आंतील बाजूला रामायण खोदलेलें आहे. रामायणांतील आरंभीच्या दृश्यापासून ते रामाच्या लंकायुद्धापर्यंत सर्व दृश्यें येथें खोदलेलीं आहेत. मात्र हें रामायण ब्रह्माच्या देवालयावरील कठड्यावर पूर्ण केलें आहे.

या शिवमंदिराची संपूर्ण घडण यज्ञवेदीसारखी आहे. या देवतांच्या जोत्यावर एक सपाट पट्टा आहे.या पट्ट्याच्या वरच्या भागावर नक्षीकाम केलेले शिल्पपट आहेत. यामध्यें कमळपत्रें कोरलेलीं आहेत. या जोत्यावरील कंगोरा (cornice) नागमोडी वळणाचा आहे व त्याच्यावर सुंदर नक्षीकाम आहे. कंगोऱ्याच्या खालीं एक पट्टा आहे व त्यावर फूलहार वगैरे खोदलेले आहेत. प्रत्येक कंगोऱ्याच्या टोकाला एक राक्षसाचें तोंड आहे. यावर जी भिंत आहे ती ९ फूट लांब आहे. भिंतीच्या मधल्या भागांत २४ शिल्पें आहेत. हीं शिल्पें कठडयावरील शिल्पाप्रमाणेंच कोनाडयामध्यें खोदलेलीं असून, अशा दोन शिल्पांमध्यें मागे गेलेले शिल्पपट आहेत.

लारा जोंग्रांगचीं सर्व देवालयें हिंदु आहेत. हिंदु त्रिमूर्तीमध्यें शिवाचें माहात्म्य अधिक आहे व म्हणूनच त्याचें देवालय अगदी मध्यभागीं आहे व शिवकुटुंबाचें येथें प्राबल्य आहे.

हीं देवालयें दहाव्या शतकांतील आहेत.] रौफर यांच्या मतें हीं देवालयें इ. स. ९१५ मध्यें दक्ष राजानें बांधावयास सुरवात केली. हीं देवालयें एकाच काळांतील आहेत. सर्वांची बांधणी एकाच घाटाची आहे.

### प्रांबाननच्या दरींतील बौद्ध देवालयें

प्रांबाननच्या पूर्वेला डोंगरांची एक रांग आहे. येथें उत्तरेकडून दक्षिणेकडे ओपक नदी वाहते.या डोंगरापासून आणखी एक छोटीशी नदी वाहते. या भागांत बरीचशीं बौद्ध व हिंदु देवालयें आहेत. हा प्रदेश म्हणजे हल्लीचा जोगजकार्ता व सुरकर्ता या दोहोंमधील प्रदेश. या भागांत 'चंडी कलशन ' नांवाचें एक देवालय आहे. या देवालयावर एक शिलालेख आहे. यावर हे देवालय शैलेन्द्र राजा पनंकरण याने बुद्धदेवता तारा हिच्याकरितां बांधलें असें लिहिलें आहे. हा शिलालेख इ. स. ७७८ चा आहे. देवालयाच्या चरितार्थाकरितां राजानें कलश नावाचें खेडें दान केलें असें या शिलालेखांत म्हटलें आहे. या देवालयाजवळ कलशन् नांवाचें

खेडें आजहि अस्तित्वांत आहे. हें तारेचें मंदिर चौकोनी आहे. मंदिराच्या चारहि बाजूला प्रदक्षिणापथ आहे. देवाल्याच्या भिंतींचा मधील भाग पुढे काढलेला आहे. या भागांत लहान देवळें आहेत. देवालयाच्या प्रवेशद्वारावर एक मोठें काल-मकर आहे. हें मकर-मुख थेट छतरापर्यंत पसरलें आहे. काल-मकराच्या मुखांतून पांच कमल-पुष्पें बाहेर आलीं आहेत. प्रवेशद्वार कोनाड्यासारखें दिसतें. प्रवेशद्वाराच्या बाजूंच्या दोन स्तंभावर दोन शिवगण-मूर्ति खोदलेल्या आहेत

शिखरावर कोनाड्यामध्यें ध्यानस्थ बुद्ध अक्षोभ्य, रत्नसंभव, अमिताभ व अमोघसिद्धी यांच्या मूर्ति खोदलेल्या आहेत. शिखर-माथ्यावर घंटीच्या आकाराचा मोठा स्तूप असून त्यावर कळस आहे.

चंडी कलशनच्या उत्तरेला चंडी सरी आहे याचा आकार लंबचौकोनी आहे. हें देवालय ५७ फूट लांब व ३३ फूट रुंद आहे. मुख्य प्रवेशद्वार पूर्वेकडे आहे. हें देवालय दुमजली आहे. याचा दुसरा मजला पहिल्या मजल्यापेक्षां आकारानें लहान आहे. मुख्य प्रवेशद्वारावर काल-मकर आहे. काल-मकर हत्तींवर आरूढ झालेले आहेत. हत्ती गुडघे टेकून बसले आहेत. त्यांच्या मुखांत पक्षी दिसत असल्याचेंहि आढळते. एका बाजूला खिडकी आहे. खिडकीच्या बाजूला किन्नर आहेत व वर नक्षीकाम आहे. पहिल्या मजल्यावर गर्भगृह आहे. दुसऱ्या मजल्याचा उपयोग मात्र राहण्याकरितां करीत असावेत. चंडी सरी हें देवालय व सघाराम असावें

### केडूच्या सपाट भूमींतील देवालयें

ज्या वेळेस प्रांबाननच्या दरींत हिंदु व बौद्ध देवालयें बांधलीं जात होतीं त्याच सुमारास अथवा कांहीं थोड्या कालावधीनंतर केडूच्या सपाट भूप्रदेशावर भव्य मंदिरें उभारली जात होतीं यांतील सर्वांत प्रमुख म्हणजे बोरोबुदर. येथील दुसरीं उल्लेखनीय देवालयें म्हणजे चंडी पवोन व चंडी मेंदोत

चंडी मेंदोत आतां परत बांधून काढलें आहे. या मंदिराचा जोता ९०′ × ८१′ आहे. जोत्याची उंची १२ फूट आहे. जोत्याला सुरुवातीला

नागमोडी वळणाची रांग आहे. तिच्यावर दांताचा पट्टा व वर वळकटी-प्रमाणें दिसणारी दगडाची रांग व लहान लहान अर्धस्तंभ कोरून शिल्प-पट तयार केले आहेत व यामध्यें सुंदर नक्षीकाम केलें आहे.

या जोत्यावर मुख्य देवालय आहे. याच्या चारहि बाजूला ८ फूट जागा प्रदक्षिणापथाकरितां सोडली आहे. येथें तयार झालेल्या सज्जाला दगडी कठडा आहे व यावर शिल्पपट कोरलेले आहेत. या कठड्याला (आंतील पाणी वाहून नेण्याकरितां) १२ मकर-मुखें कोरलीं आहेत या सज्जावरचें पाणी या मकर-मुखांतून बाहेर पडतें. मुख्य मंदिर ४५ चौरस फूट आहे. पुढच्या बाजूला द्वारमंडप आहे. मंदिराच्या तीन भिंतींचा मधील भाग मुद्दाम पुढें काढलेला आहे. देवालयाचा खालील भाग नागमोडी वळणाचा आहे. वर उभा जोता असून त्यावर चौकोनी शिल्पपट आहेत. यामध्यें पक्षी कोरले आहेत, तसेंच नक्षीकाम आहे. यावरील भिंतीच्या मधील भाग पुढें आलेला असल्यामुळें तीचे आपोआपच तीन भाग पडले आहेत. बाजूच्या दोन भागांत खालच्या भागाला शिल्पें आहेत. तीं फार कुशलतेने काढलेलीं आहेत. ईशान्य दिशेला भिंतीला अष्टभुजेचें एक सुंदर शिल्प आहे. ही देवता कमलासनावर अधिष्ठित झाली आहे व दागिन्यांनी सजलेली आहे. देवीच्या दोनहि बाजूला सेवक उभे आहेत. देवीच्या उजव्या हातांत शंख, वज्र, चक्र व अक्षमाला आहे. डाव्या हातांत एक गोलाकार वस्तु, कुऱ्हाड, अंकुश व पुस्तक आहे. वर आकाशांत गंधर्व विहार करतांना दिसतात.

देवालयाच्या मागच्या भिंतीवर बोधिसत्त्व अवलोकितेश्वराचें शिल्प आहे. देवालयाच्या भिंतीवर सर्वनिवारण विस्कांभी, मैत्रेय, समंतभद्र, क्षितिगर्भ, वज्रपाणी, मंजुश्री, खगर्भ आणि पद्मपाणि यांचीं शिल्पें आहेत.

देवालयाच्या छताजवळ नक्षीकामाचा एक पट्टा आहे यावर कंगोरा आहे. नक्षीकाम केलेल्या पट्टयावर पक्षी आहेत व फुलांचे हार आहेत. कंगोऱ्यात व इतर ठिकाणीं पल्लवीमधून मधूनच काल-मकर डोकावतांना दिसतात.

शिखराचा अर्धा भागच शिल्लक आहे. शिखराच्या चारहि बाजूला मध्यभागीं कमानीच्या आकारचे कोनाडे कोरले आहेत. बाजूला चारहि बाजूला स्तूप आहेत. या स्तूपांना कमलाचें अधिष्ठान आहे. मध्यभागीं पण असाच मोठा स्तूप कमलावर अधिष्ठित झालेला होता पण तो आतां तुटला आहे.

या भागांतील दुसरें देवालय चंडी पवोन. हें चंडी मेंदोतपासून १२५७ यार्ड दूर आहे व येथून ७०० यार्डांवर बोरोबुदरचा स्तूप आहे. मेंदोत, पवोन व बोरोबुदर हें तीनहि पूर्वी एका रस्त्याने जोडलेलीं होतीं. पवोनचें देवालय लहान असून त्याच्या जोत्याला नागमोडी वळणें आहेत. देवालयाच्या चारहि बाजूला प्रदक्षिणापथ आहे. देवालयाच्या भिंतींचा मधला भाग मुद्दाम पुढें काढलेला आहे. या पुढें आलेल्या भागावर व मागे राहिलेल्या भिंतींवर सुन्दर शिल्पें कोरलीं आहेत. हीं बाजूचीं शिल्पें महिरपीमध्यें कोरलीं आहेत. यामध्यें एका बाजूला स्त्री व दुसऱ्या बाजूला पुरुष आहे. दोहोंच्याहि डोक्यामागें तेजोवलय आहे. मधल्या भागांत दोन निरनिराळीं शिल्पें खोदलेलीं आहेत. वरच्या भागांत दोन बाजूला दोन लंबचौकोनी गवाक्षें असून मध्यें कमलफुलावर पुष्पपात्र आहे. याच्या खालच्या भागांत मध्यावर कल्पवृक्ष असून याच्या खालीं किन्नर आहेत व वरच्या भागांत गंधर्व-मिथुनें आहेत.

शिखराच्या चार कोपऱ्यांवर स्तूप आहेत. प्रत्येक दोन स्तूपांमध्यें एक छोटा स्तूप आहे. मध्यभागीं मोठा स्तूप आहे. एकंदरींत पवोनचें देवालय मोठे प्रेक्षणीय आहे.

### बोरोबुदर

बोरोबुदर म्हणजे जावांतील स्थापत्यकलेचा उच्चांक होय (आ.क्र.३०ते ३८).जावाचा हा प्रचंड स्तूप पाहिला कीं मन भारावून जातें.बोरोबुदरच्या नांवाबद्दल विद्वानांमध्यें वाद आहे. क्रोमच्या मतें हें या प्रदेशाचें नांव आहे. बोरोबुदरच्या मूळच्या जोत्यावर असलेल्या शिलालेखाच्या लिपी-

वरून कर्नने त्याचा काळ इ. स. ८५० ठरविला आहे. ही लिपि इ. स. ७५० ची आहे असें क्रोमचें मत आहे.

बोरोबुदरचा स्तूप डोंगरमाथ्यावर वसला आहे. येथून आजूबाजूला नजर टाकली तर हिरवीगार शेतें दिसतात व मन प्रसन्न होतें. येथील वातावरण मोठें रम्य आहे. ही जागा निवडण्यांत तत्कालीन स्थापत्यशास्त्रज्ञांनी मोठी कल्पकता दाखविली आहे. या डोंगरमाथ्यावर मध्यभागीं एक मोठा खडक होता. आज जो स्तूप दिसतो तो या खडकांत कोरलेला आहे.

या स्तूपाला एकावर एक असे ९ सज्जे आहेत. वर जातांना प्रत्येक सज्जा खालच्या सज्जापेक्षां लहान होत जातो. अगदी शेवटच्या म्हणजे नवव्या सज्जावर मध्यभागीं घंटेच्या आकाराचा स्तूप आहे या ९ सज्जापैकीं खालचे ६ चौकोनी आकाराचे आहेत व वरचे ३ गोलाकार आहेत. खालच्या ६ सज्जांपैकीं ४ सज्जांचे दोन भाग पुढें आलेले आहेत. वरच्या दोहोंचा एकच भाग पुढें आलेला आहे. सर्वांत खालचा सज्जा ३९२ फूट लांब आहे. सर्वांत वरच्या सज्जाचा व्यास ९० फूट आहे. खालच्या ६ सज्जांना दगडी कठडे आहेत. वरच्या तीन गोलाकार सज्जांच्या आजूबाजूस स्तूप आहेत. प्रत्येक स्तूपावर बुद्धमूर्ति आहे. नवव्या सज्जावर असलेल्या गोलाकार पायऱ्या मधील मुख्य स्तूपापर्यंत आहेत. हा स्तूप घंटीच्या आकाराचा आहे. प्रत्येक सज्जाला चारहि बाजूला मध्यभागीं वरच्या सज्जावर जाण्याकरितां जिने आहेत.

बोरोबुदरचा पहिला जोता सध्याच्या जोत्यापेक्षां लहान होता. परंतु वरची इमारत बरीच भव्य झाल्यामुळें मागाहून खालचा पाया मोठा करावा लागला. सध्यां खालीं जो दगडाचा बांध आहे, तो १२ फूट उंच आहे व ३६० फूट लांब आहे. हा जोता मोठा प्रेक्षणीय आहे. सुमारें चार फुटांवरचा जो भाग आहे तो मुद्दाम पुढे काढला आहे. जोत्याच्या वरच्या भागाला नक्षीचा एक पट्टा कोरला आहे. याच्याखालीं वळकटी-सारखी दगडाची रांग असून वर कंगोरा आहे. जोत्यावरील पट्ट्यावर

तीन शिल्पपट मिळून एक, अशीं अनेक शिल्पें कोरलीं आहेत. असे तीन शिल्पपट झाल्यावर एक तुटक असें शिल्प कोरलेलें आढळतें. या शिल्पांतील मानवी आकृति बसलेली अथवा गुडघ्यावर टेकलेली दिसते. ही शिल्पें दोन छोट्या अर्धस्तंभामध्यें कोरलेलीं आहेत. हे दोन अर्धस्तंभ काल-मकर असलेल्या गणेशपट्टीनें जोडलेले आढळतात. येथें जीं समूह-शिल्पें आहेत त्यांमध्यें, एक मनुष्य व राक्षस अथवा दोन माणसांमध्यें एक नाग कोरलेला दिसतो. या नक्षीच्या पट्ट्याच्या वरच्या भागाला कंगोरा आहे. याच्यावर कठडा आहे. हा कठडा दगडी असून त्याच्यावर अर्धवर्तुळाकृती कमानी असलेले कोनाडे खोदलेले आहेत. सर्वांत खालच्या सज्जाच्या कठड्यावर या वर्तुळाकार कमानी एकमेकाला शेवटपर्यंत लागून आहेत. कमानीच्या मध्यें पत्रपल्लवी व फुलांचें कोरीव काम आहे. बाकीच्या कठड्यावरील कमानीवर काल-मकर आहेत. या कठड्यांवर जे कोनाडे खोदलेले आहेत त्यांच्या खालील बाजूस दोन अर्धस्तंभ खोदून त्यावर हत्ती कोरलेले आहेत. कोनाड्याच्या दोनहि बाजूस अर्धस्तंभ आहेत. कोनड्यावर व या अर्धस्तंभावर शिखराकृति आहेत. या कोनाड्यांतून अनेक बुद्धमूर्ति डोकावतांना दिसतात. बोरोबुदरच्या कठड्यामधील या कोनाड्यांत ध्यानस्थबुद्धाच्या ४३२ मूर्ति खोदलेल्या आहेत. या ध्यानस्थ अक्षोभ्य, रत्नसंभव, अमिताभ आणि अमोघसिध्धी याचीं शिल्पें अनुक्रमें पूर्व, दक्षिण, पश्चिम व उत्तर दिशांच्या कठड्यांवर कोरलेलीं आहेत. पांचव्या सज्जावरील कोनाड्यांत मात्र चारहि बाजूला वैरोचन मूर्ति कोरलेल्या आहेत.

सज्जाच्या एका बाजूला कठडा आहे व दुसऱ्या बाजूला स्तूपाची भिंत आहे. या भिंतीवर अनेक शिल्पें कोरलेलीं आहेत. भिंतीच्या खालच्या भागाला शिल्पपट आहेत व यावरील भिंतीचा भाग मुद्दाम बाहेर काढलेला आहे. यावर एक रुंद कंगोरा आहे. यावर हार व पुष्पाचें नक्षीकाम आहे. भिंतीवरील शिल्पपट एकमेकांपासून वेगळे करण्याकरितां निरनिराळ्या सज्जावरील भिंतीत निरनिराळे प्रकार अवलंबिले आहेत. पहिल्या सज्जांत भिंतीवर शिल्पपटांच्या समांतर अशा दोन

रांगा आहेत. या एकमेकांपासून पत्रपल्लवी व फुलांच्या एका समांतर पट्टयानें वेगळ्या केल्या आहेत. वरच्या बाजूचीं शिल्पें एकमेकांपासून एका साध्या व सपाट अर्धस्तंभानें विलग केलीं आहेत तर खालील शिल्पें कोरीव नक्षीकाम केलेल्या अर्धस्तंभाने विलग केलेलीं आहेत. इतर सर्व सज्जांवरील भिंतीवर शिल्पांची एकच रांग आहे.

कठड्याच्या आंतल्या भागावर देखील शिल्पें व नक्षीकाम आहे. कोनाड्यांत शिल्पें कोरलीं आहेत. याच्या खालचा व वरचा भाग मुद्दाम पुढें काढलेला आहे. दोन शिल्पामधील जागेंत कल्पवृक्ष अथवा किन्नर कोरलेलें आहेत. हे सर्व सज्जे ६½ फूट रुंद आहेत. एक सज्जा व दुसरा सज्जा यामध्यें साधारणपणें ८ ते १२½ फुट इतकें अंतर आहे. या सज्जांना चारहि बाजूला वरच्या सज्जांत जाण्याकरितां जिने आहेत. या पायऱ्यांच्या वर प्रवेशद्वार आहे. यावर जी कमान आहे तिच्यावर सुन्दर नक्षीकाम केलेलें आहे. ही कमान एकावर एक दगड रचून तयार केली आहे. कमानीच्या मध्यावर काल-मकर असून त्याच्या मुखांतून दोन फुलाचे वेल निघून ते कमानीच्या दोनहि बाजूंना आले आहेत हे वेल कमानीच्या दोन्ही बाजूंना जेथें संपतात, तेथें दोन मकर कोरलेले आहेत. प्रवेशद्वाराच्या कमानीवर लहानसें शिखर आहे. प्रत्येक सज्जावर पाणी वाहून जाण्याकरितां राक्षसमुखें आहेत

वरील तीन सज्जे खालच्या सहा सज्जांपेक्षां वेगळे वाटतात. याला दोन कारणें आहेत. एक तर त्यांचा गोलाकार व दुसरें म्हणजे येथें कोणत्याहि प्रकारचें नक्षीकाम नाहीं. यापैकीं पहिल्या सज्जाचा व्यास ८५½ फूट आहे, दुसऱ्याचा ६३ फूट आहें व तिसऱ्याचा ४५ फूट आहे व त्यांच्यावर अनुक्रमें ३४ २४ व १६ असे स्तूप आहेत. या स्तूपांची रचना सरसकट सारखी आहे. प्रथम गोल जोता व त्यावर गोलाकार पट्टी मग वर गोल कमलाकृति व त्याच्यावर घंटेच्या आकाराचा स्तूप व त्यावर सपाट वितान. यावर टोंकदार होत जाणारा सुळका. खालच्या दोन सज्जांमधील स्तूपांमध्यें हिऱ्याच्या आकाराचीं भोकें आहेत व वरच्या सज्जावरील स्तूपांना चौकोनी आकाराचीं भोकें

आहेत. हे सर्व स्तूप आंतून पोकळ आहेत व त्यामध्यें बैठ्या बुद्धमूर्ति आहेत. या मूर्ति बहुधा सहावा ध्यानस्थबुद्ध वज्रसत्त्व याच्या असाव्यात. शेवटच्या सज्जावरील मधला मोठा स्तूप गोलाकार असून तो कमलासनावर अधिष्ठित झाला आहे. याच्या भोंवतालीं मध्यभागावर एक नक्षीदार पट्टा आहे व याच्या भोंवतालीं फुलांचा हार लोंबकळतांना दिसतो. स्तूपावरचा सुळका अष्टकोनी आकाराचा आहे. हा सुळका दुहेरी वितानावर अधिष्ठित आहे. या सुळक्याची उंची सुमारें २३ फूट आहे. हा स्तूप पण आंतून पोकळ आहे. याच्या आतील भागास एकावर एक अशा दोन खोल्या आहेत.

बोरोबुदरच्या भिंतीवर नानाप्रकारची शिल्पें आहेत. दैनंदिन जीवनांतील कितीतरी दृश्यें येथें कोरलेलीं आहेत. खून, मारामाऱ्या, जनावरांची शिकार वगैरे भय उत्पन्न करणारी दृश्यें व स्वर्गांमधील आल्हाददायक दृश्यें येथें खोदलेलीं आहेत.

पहिल्या सज्जावरील वरच्या रांगेंतील शिल्पें संस्कृत 'ललितविस्तार' वरून घेतलेली आहेत असें दिसतें. यामध्यें बुद्धाच्या जीवनांतील प्रसंग कोरलेले आहेत. खालच्या रांगेत जातककथा व अवदानें कोरलेलीं आहेत. पहिल्या सज्जावरील कठड्यावर व दुसऱ्या सज्ज्यावरील कठड्यावरील एक रांग जातककथांनींच भरलेली आहे. यांतील १३५ शिल्पें अगदीं जातकमालेप्रमाणें आहेत. कांहीं शिल्पपटांची कथानकें अवदानशतक व दिव्यावदानांतून घेतलेली आहेत.

दुसऱ्या सज्ज्याच्या भिंतीवरील शिल्पें 'गंध–व्यूहा' तून घेतलेली आहेत. या शिल्पटांत सुधनकुमाराची गोष्ट ग्रथित केलेली आहे. सुधनकुमाराने ज्ञानप्राप्तीकरितां केलेले ६४ गुरु व १०० साधना यांनीं त्याला ज्ञानप्राप्ति कशी झाली नाहीं व शेवटीं तो मंजुश्रीला शरण गेल्यावर त्याला ज्ञानप्राप्ति कशी झाली ही कथा या शिल्पांत साकार होते.

तिसऱ्या व चवथ्या सज्जामधील भिंतीवरील शिल्पपटांत देखील सुधनकुमाराचीच कथा चित्रित केली आहे, असें डॉक्टर बॉश यांचें

म्हणणें आहे. सुधनकुमाराने मैत्रेय व समंतभद्र यांना दिलेल्या भेटीचें चित्रण या शिल्पपटांत केलें आहे असें ते म्हणतात. तिसऱ्या व चवथ्या सज्जाच्या कठड्यावरील शिल्पांत सर्व ठिकाणीं मैत्रेय आढळतो.

बोरोबुदर हें जावाचें सर्वश्रेष्ठ स्मारक आहे. हॅवेलच्या मतें बोरोबुदरचा स्तूप हा सांची व भाऱ्हुत या स्तूपामध्यें कांहीच साम्य नाही. बोरोबुदरचें स्थापत्य, त्याची एकंदर रचना पाहिल्यावर हें चटकन् ध्यानांत येतें. हॅवेल म्हणतो कीं बोरोबुदर हें आशियाचें पार्थेनॉन आहे. ही उपाधि सांची अथवा भाऱ्हुतला लावतां येण्यासारखी नाही. परंतु याबद्दल वाद आहे; व्होगेल म्हणतो कीं ही उपाधि फक्त अंकोर वाटच्या देवालयालाच लावतां येईल. याचें कारणहि स्पष्ट आहे. अंकोर वाट हिंदु आहे व बोरोबुदर बौद्ध आहे ! या दोन तत्त्वज्ञानांतील फरक त्यांच्या स्थापत्यांत व शिल्पांत उतरणें अपरिहार्य आहे. बौद्धधर्माचें पहिलेंच आर्यसत्य जीवन हें दुःखमय आहे हें आहे. मग या दुःखमय जीवनांत बौद्धांना रस वाटण्याचें कांहीच कारण नव्हतें. सर्व बुद्धि, सर्व ध्यान केन्द्रित करावयाचें तें निर्वाणाकरितां. या तत्त्वज्ञानाचा परिणाम बोरोबुदरवर झाला नाही तरच आश्चर्य! बोरोबुदर प्रचंड आहे, डोळे दिपवून टाकणारा आहे. नितांत सुंदर आहे, पण येथें अंकोर वाटचें चैतन्य जाणवत नाही, येथें आहे निर्वाणाची शांतता ! कारण अंकोर वाटच्या देवळातील शिल्पांत जें चैतन्य आहे, जो रसरशीतपणा आहे, तें चैतन्य किंवा तो रसरशीतपणा बोरोबुदरच्या शिल्पांत आढळत नाहीं.

# जावाचें वाङ्मय

भारतीय संस्कृतीचा जावामधील एकंदर जीवनावर फार खोलवर परिणाम घडून आला. जावामधील जीवनाचें असें एक अंग राहिलें नाहीं कीं ज्याच्यावर भारतीय संस्कार झाले नाहीत. कोणत्याहि संस्कृतीचें दर्शन तिच्या जीवनाच्या विविध अंगांत आढळून येतें. कोणत्याहि राष्ट्राचें दर्शन तेथील लोकांच्या वाङमयांत, कलेंत व सामाजिक जीवनांत दिसून येतें.

जावामधील तत्कालीन वाङमय बघितल्यावर जावावर झालेले भारतीय संस्कार किती खोलवर गेले होते याची कल्पना येते. जावामधील सर्वांत जुना ग्रंथ 'अमरमाला.' हा ग्रंथ संस्कृतमधील 'अमरकोश' वरून स्फुरलेला दिसतो. यांत देवादिकांचीं विविध नांवें दिलीं आहेत. हा ग्रंथ शैलेन्द्र घराण्यांतील जितेंद्र राजाच्या कारकीर्दींत लिहिला गेला. याच काळांतील दुसरा महत्त्वाचा ग्रंथ ' सँग हीआँग कमहायनीकन् ' हा ग्रंथ महायान धर्मीयांनी लिहिला. परंतु या काळांतील सर्वांत मोठा व महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे ' रामायण.' या रामायणांतील प्रसंग मूळ रामायणांतील प्रसंगांशीं बऱ्हंशीं जुळतात. आहेत. परंतु याचा शेवट मात्र मूळ रामायणापेक्षां वेगळा आहे. अग्निदिव्यांतून पार पडलेल्या सीतेशीं रामाची युति होते व तेथेंच जावाचें रामायण संपतें. त्यांत मूळ रामायणांतील सीतात्यागाची कथा व पुढचे सर्व प्रसंग वगळले आहेत. हें रामायण भाषांतरित नाहीं. रामायणांतील सर्व प्रसंग येथील लोकांच्या परिचयाचे होते. यावरून ही कथा काव्यांत रचली गेली. बाली, मलाया या सर्व ठिकाणीं रामायणें उपलब्ध आहेत. बालीमध्यें त्याला ' रामकिटुंग ' म्हणतात तर मलायामध्यें याला ' सेरी राम ' म्हणतात दोन्ही रामायणेंच कर्नच्या मतें जावामध्यें तेराव्या शतकांत रामायण रचिलें गेलें तर कांही विद्वानांच्या मतें तें इ. स. १०९४ मध्यें ' पु योगीश्वर ' यानें रचिलें

राजा जयभय याचा काळ (इ. स. ११३५ ते ११५७) हा येथील

वाङ्मयाचा उत्कर्षाचा काळ आहे. याच्या काळांत जावामधील वाङ्मयांत ललामभूत ठरलेली कलाकृति निर्माण झाली. ती म्हणजे 'भारत युद्ध.' महाभारतावर आधारलेल्या या अमरकाव्याला जावाच्या वाङ्मयांत फार मोठें स्थान आहे. याची तुलना ग्रीक महाकाव्याबरोबर करण्यांत आली आहे हें काव्य इ. स. ११५७ मध्यें 'पु सेदाह' याने रचिलें. रामायणाप्रमाणें यामध्येंदेखील कवीने आपल्या कल्पनेने मूळ काव्यांत नसलेले बरेच नवीन प्रसंग रंगविले आहेत. याची नवी आवृत्ति 'व्रतजुद' या नांवाने प्रसिद्ध आहे.

पु सेदाहने भारतयुद्ध पूर्ण केलें नाही. तेव्हां राजा जयभयाने 'पु पुनुलु' या कवीला तें पुरें करावयास सांगितलें. राजाज्ञेप्रमाणें त्याने तें पुरें केलें. पुनुलूने 'हरिवंश' नांवाचें दुसरें काव्य लिहिलें. या काव्यांत त्याने 'रुक्मिणीस्वयंवराची' कथा गुंफिली आहे याच कवीने 'घटोत्कचाश्रय' नांवाचेंहि काव्य लिहिलें आहे. या काव्यांत अर्जुन-पुत्र अभिमन्यु व लक्ष्मण-कुमार या दोघांचें क्षितीसुंदरी नांवाच्या स्त्री करितां झालेलें युद्ध रंगविलें आहे. या युद्धांत घटोत्कच अभिमन्यूला मदत करून त्याला सुंदरी मिळवून देतो अशी कथा गोवली आहे. या काव्यावरून जावा व मलायाच्या वाङ्मयांत बऱ्याच कथा जन्म पावल्या आहेत.

दुसऱ्या कामेश्वराचऱ्या कारकीर्दींत 'स्मार-दहन' हें काव्य लिहिलें गेलें. कालिदासाच्या कुमार-संभवाने याला स्फूर्ति दिलेली आहे. स्मार म्हणजे मदन. मदन म्हणजे दुसरा कामेश्वर. त्याची पत्नी म्हणजे रति. ही गोष्ट स्कंद-पुराणांतून घेतली आहे. हें काव्य 'धर्माय' याने बाराव्या शतकांत रचिलें आहे. हा 'धर्माय' व दुसरा कवि 'तनकुंग' हे दोघे रामायणाचा कर्ता योगीश्वर याचे पुत्र होत. तनकुंग याने 'लुब्धक' व 'वृत्त-संचय' हीं दोन काव्यें लिहिलीं. वृत्तसंचयांत त्याने छन्दाविषयीचे नियम सांगितले आहेत. 'लुब्धक' या काव्यांत यम व शिवगण यांच्या युद्धाचा प्रसंग रंगविला आहे. त्यांतील प्रसंग असा आहे. एका शिवरात्री एक निषाद थकून भागून एका बिल्व-वृक्षावर

झोंपतो. पडल्या पडल्या खाली असलेल्या शिवलिंगावर तो एक पान टाकतो. निषाद मृत्यु पावल्यावर यमदूत त्याला नेण्यासाठीं येतात. यमदूतांना शिवगण विरोध करतात व दोघांमध्यें युद्ध होतें. कामेश्वराच्या काळांतील दुसरें काव्य म्हणजे 'भीमकाव्य.' या काव्यांत इन्द्र व पृथ्वी-पुत्र भीम यांचें युद्ध चित्रित केलेलें आहे. यांत भीमानें इन्द्राचा पराभव केल्याचा उल्लेख आहे. तेराव्या शतकांत संघसरी राजांच्या काळांत तनकुंगच्या लुब्धक काव्यांशिवाय 'राजपति-गुंडल' हा ग्रंथ लिहिला गेला. या काळांतील दुसरें काव्य 'ककविन् कृष्णान्तक.' श्रीकृष्णाचा अंत व यादव घराण्याचा शेवट या काव्यांत निवेदिला आहे.

मजपहित काळांतील मोठें काव्य म्हणजे या वंशांतील पराक्रमी राजा 'हयम वुरूक' याच्या जीवनावर आधारलेलें 'नगरकृतगम' हे होय. हें काव्य इ. स. १३६५ मध्यें लिहिलें गेलें.याच काळांत बुद्धधर्मीय 'पु तंनुलर' याने 'अर्जुनविजय' नांवाचें काव्य रचिलें. या काव्यांत त्याने रामायणांतील उत्तरकांडांतील एक प्रसंग रंगविला आहे. तो म्हणजे रावणाचा अर्जुनाकडून झालेला पराजय. नव्या जावामधील अर्जुन सस्रवाहू हें काव्य यावरून घेतलें आहे. पु तंनुलर याने सुतसोम व राक्षस–राजा पुरुसाद यांचें युद्ध रंगविणारें आणखी एक काव्य लिहिलें आहे. जावामधील हिंदु व बौद्धधर्मीय हे मनाने किती एकरूप झाले होते याचें अर्जुनविजय हें निदर्शक आहे. जावामध्यें काव्याला ककविन् असें म्हणतात. हीं सर्व काव्यें जावाच्या तत्कालीन भाषेंत लिहिलीं असून तीं भारतीय महाकाव्यांवर आधारलेलीं आहेत.

याशिवायहि जावामध्यें बरींच काव्यें जन्माला आलीं : १) **इन्द्र-विजय** – या काव्यांत इन्द्राने वृत्राचा वध कसा केला, याविषयींची कथा सांगितली आहे. २) **पार्थयज्ञ** – यांत अर्जुनाने किराताकडून मिळविलेल्या पाशुपत अस्त्राची कथा गुंफिली आहे. ३) **विघ्नोत्सव** – यामध्यें यक्ष-राजा विघ्नोत्सव याची कथा सांगितली आहे. ४) **हरिश्रय** – लंकेचा राजा मल्यवान् व देव यांचें युद्ध होतें. यांत देवांचा पराजय होतो. देव प्रथम शिव व नंतर विष्णूला शरण जातात. विष्णु मल्यवानाचा

वध करतो व मेलेल्या देवांना जीवन्त करतो, ही कथा यांत सांगितली आहे ५) **हरिविजय** – यांत अमृतमंथनाची कथा गुंफिली आहे. ६) **कालयवनान्तक** – ही गोष्ट विष्णुपुराणांतून घेतली आहे. कंसाच्या मृत्यूचा सूड घेण्याकरितां कालयवन द्वारकेंत प्रवेश करतो. कृष्ण धावरून मुच्छकुंड ऋषीचा आश्रय घेतो. मुच्छकुंड कालयवनाचें भस्म करतात. या कथेशिवाय सुभद्राहरणाची कथा पण यांत सांगितली आहे. ७) **रामविजय** – परशुरामानें सहस्रबाहूंच्या अर्जुनाचा पराभव केल्याची कथा यांत सांगितली आहे. ८) **रत्नविजय** – तिलोत्तमेकरितां सुन्द आणि उपसुन्द यांनी केलेलें युद्ध यांत वर्णिलें आहे. ९) **पार्थविजय** – महाभारतावरील एका कथेवर हें आधारलेलें आहे. १०) एका अपूर्ण काव्यांत राजा उदयन व वासवदत्ता यांची कथा गुंफिली आहे.

जावामध्यें जी वाङ्मयनिर्मिति झाली ती प्रामुख्यानें काव्यबद्ध असली तरी तात्त्विक चिंतनाचें तिला अगदीच वावडें नव्हतें 'धर्मसविता' सारख्या ग्रंथामध्यें तात्त्विक चिंतन आढळतें. ' लंवंग सलुकत ' मध्यें प्रणयवर्णनें आहेत. छन्दावर छन्दकिरण, वृत्तसंचय, वृत्तायन वगैरे सारखें कोश तयार झाले होते. मजपहित काळामध्ये ' नीतिशास्त्र कविन् ' नांवाचें काव्य लिहिलें गेलें होतें.

जावामध्यें भारतीय महाकाव्याच्या आधारें ग्रंथरचनादेखील झालेली आढळते. 'कोरवाश्रम' या ग्रंथांत कौरवांच्या पराभवानंतर त्यांना व्यासमुनिनीं परत जीवंत केलें व या कौरवांना पितामह भीष्मांनीं पांडवांचा सूड घेण्याकरितां खूप तपश्चर्या करण्याचा उपदेश केला, असें लिहून, मूळ महाभारतांतच बदल केलेला आढळतो. यांत बदल फक्त कथेंत होत नाही तर व्यक्तिचित्रणांतदेखील होतो. महाभारतांतील का ी पर्वांचीं भाषांतरें झालीं. अनुशासनपर्वावरून 'सारसमुच्चय' हा ग्रंथ तयार झाला. नवऋषी या ग्रथांतला भीम दोन भयानक नाग व इन्द्रबाहु यांचें पारिपत्य करतो, गुरु द्रोणाचार्यांना अवऋषींच्या क्रोधापासून वांचवितो, तपस्या करतो व आपल्या भावांना इन्द्रप्रस्थ वाचविण्याकरितां मदत करतो. रामायणाच्या उत्तरकांडाचें भाषांतरदेखील येथें झालें आहे.

ब्रह्मांडपुराणाचें भाषांतर देखील येथें झालें आहे. प्रथम सृष्टीच्या निर्मितीची चर्चा आहे. ब्रह्माने अंड निर्मिलें. यांतून चार ऋषी, नऊ देवर्षी आणि परमेश्वर हे निर्माण झाले. देव,असुर,पितृ व मानव जन्माला आले. जाति निर्माण झाल्या. शतरूपा आणि स्वयंभू मनु निर्माण झाला. येथपासून सुरुवात होऊन वेणाचा मृत्यु, पृथु राजा वगैरे सर्व गोष्टींचें वर्णन मूळ पुराणाप्रमाणें आहे. या पुराणाच्या बऱ्याच प्रती बालीमध्यें उपलब्ध आहेत. जावामधील 'अगस्त्यपर्वा'त बऱ्याच हिंदु देवदेवतांची जत्री आली आहे. हिंदु देवतांविषयींची जावामध्यें उपलब्ध असणारी माहिती प्रचंड आहे. आदिपुराण, भुवनपुराण वगैरे पुराणांमध्यें विश्वोत्पत्तीपासून ते वर्णाश्रम, आश्रमधर्म वगैरेंची सविस्तर चर्चा केलेली आहे. जावामध्यें हें धर्म प्रचलित होते याचा हा लेखी पुरावाच आहे.

जावामध्यें निर्माण झालेलें धार्मिक वाङमय सोडल्यास इतर प्रकारचें साहित्यहि निर्माण झालेलें आहे. 'कलीन अरंग' हा अशा प्रकारचाच एक ग्रंथ आहे.या ग्रथामध्यें राजा ऐरलंग याची व त्याच्या पुत्राची कथा गुंफिली आहे. याशिवाय 'आदिश्वर', 'एकलव्य' 'कृतवश' व 'चंतकपर्व' वगैरे कोश देखील लिहिलेलें आढळतात. यांत इन्द्र, अग्नि, वायु, काम, चन्द्र, यम व बृहस्पति यांचीं अनेक नावें व प्रतिशब्द दिलेले आहेत. 'अंड' व 'उसद' हें वैद्यकीय ग्रथ, 'स्मरतंग', 'अंगुलीप्रवेश', 'स्मररचन' वगैरे प्रणयासंबंधीचे शृंगारिक ग्रथ व 'संगीत', 'पक्षीदर्शन', वगैरेसंबंधीचे ग्रंथ जावामध्यें उपलब्ध होते.

नंतरच्या बालीनिर्मित वाङमयावरदेखील भारतीय संस्कृतीची दाट छाया पडलेली दिसते. या काळांत लिहिलेल्या 'पररतोन'च्या ग्रंथांत जावाच्या ३०० वर्षांच्या इतिहासाची माहिती मिळते. या काळांत जावामध्ये सिंघसरी व मजपहित या दोन राजघराण्यांनीं राज्य केलें. 'उसन जावा' या ग्रंथांत बालीच्या इतिहासासंबधीच्या कथा सांपडतात. परंतु या काळांत सर्वांत अधिक लोकप्रिय झालेला ग्रथ

म्हणजे पंजीच्या कथा. मलायाच्या सर्व द्वीपसमूहांत 'पंजी' एवढी लोकप्रियता कोणालाच लाभली नाहीं. राजपुत्र पंजी हा आपली प्रेयसी चंद्रकिरण हिच्या प्राप्तीकरितां जीवाचें रान करतो. तिच्यावर प्रेमानें व्याकुळ होऊन हिंडत असतांना त्याच्या वाटेंत येणाऱ्या प्रत्येक सुन्दर मुलीवरहि तो प्रेम करतो ! पंजीच्या रोमांचकारी कथा जावा, सुमात्रा, बाली, बोर्निओ, सेलीबीस, मलाया, इंडो-चीन वगैरे सर्व ठिकाणीं अत्यंत लोकप्रिय झाल्या आहेत. या कथांचा मूळचा नायक पहिला कामेश्वर व नायिका त्याची पत्नी श्री-करण-रतू असावी असें कांही विद्वानांचें मत आहे.

हितोपदेश व पंचतंत्र यावर आधारित असलेली 'तंगी केदिरी' 'तंगी डेमुंग' वगैरेसारखीं काव्यें पण येथें जन्माला आलीं. 'भीम-स्वर्गा' मध्यें भीम आपला पिता पंडु याची नरकांतून सुटका करतो याचें वर्णन आहे. नकुल-सहदेव यांच्या मुलामुलींच्या कथादेखील 'श्री तंजुंग' या ग्रंथांत गुंफिलेल्या आहेत. 'किटुंग कुंती' मध्यें पांडवांचे पराक्रम कथित केले आहेत.

मलायामधील वाङमयांत लव-कुश यांची कथा, सीतेचें अग्निदिव्य, इन्द्रजितचा मृत्यु, जटायूचा वध वगैरे कथा आढळतात. महाभारतावर आधारलेली 'पांडव लीमा, पांडव जय' वगैरे काव्यें येथें निर्माण झालीं. मलायाच्या वाङमयांत किती तरी भारतीय कथा गोवलेल्या आहेत. मलायांतील प्रेमकाव्याच्या नायक-नायिकांचीं नांवेंदेखील भारतीय आहेत.

## जावामधील बौद्धवाङमय

जावामधील वाङमयनिर्मितीचा आढावा बौद्धवाङमयाचा निर्देश केल्याशिवाय पुरा होऊं शकत नाही. जावामधील सर्वांत जुनें बौद्ध ग्रंथ म्हणजे 'संग हिआंग कमहायानन मत्रनय' व 'संग हिआग कमहाया-नीकन्'. हे दोनहि ग्रंथ महायान धर्मीयांचे आहेत. यांतील प्रथम नमूद केलेल्या ग्रंथांत प्रथम संस्कृत श्लोक देऊन नंतर त्याचें स्थानिक भाषेंत

भाषांतर केलें आहे. दुसऱ्या ग्रंथांत संस्कृत श्लोक आहेत. परंतु ते मध्यें मध्ये उद्धृत केले आहेत. 'सग हिआंग कमहायानीकन्' या ग्रंथांत जावामध्यें रूढ झालेल्या तत्त्वज्ञानाची माहिती मिळते. अगदी सुरुवातीलाच तपस्येला विरोध दर्शविला आहे. मनुष्यानें आपल्या शरीराची काळजी घेतली पाहिजे. कारण प्रकृति निकोप राहिली तर मन स्थिर राहतें व मन स्थिर राहिलें तर समाधि प्राप्त होते व समाधींतून मनुष्य निर्वाणाप्रत जातो. थोडक्यांत निकोप प्रकृतीच्या माणसाला निर्वाणाप्रत लौकर जातां येतें. मनुष्याने काम, क्रोध, लोभ, मोह व मत्सर वगैरे षड्-रिपूंवर विजय मिळविला पाहिजे. त्याने षड्-पारमिता (दान, शील, शान्ति, वीर्य, ध्यान व प्रज्ञा हे सहा गुण) संपादिल्या पाहिजेत त्याने मैत्री, करुणा, मुदिता व उपेक्षा हे चार गुण अंगीं बाणविले पाहिजेत. षड्-पारमितांची साक्षात् देवता म्हणजे 'वज्रधात्वीश्वरी.' बाकीचे चार गुण लोचना, मामकी, पांधरवाशिनी आणि तारा यांच्या स्वरूपांत प्रकट झाले आहेत.

जावांतील बौद्ध तत्त्वज्ञानांत योगाचे चार प्रकार मानले आहेत. चार भावना व चार आर्यसत्यें. यांच्यामार्गें योगसाधना करावयाची. योग म्हणजे महादेव हा सर्व आकाश, शरीर व शून्यमंडळांत भरून उरल्याचा विश्वास. यासाठीं काम, क्रोध, इ. विकारांवर विजय मिळवणें आवश्यक आहे.

दुःख सत्य, निरोध सत्य, समुदय सत्य व मार्ग सत्य हीं चार आर्यसत्यें, दहा पारमिता, योग आणि भावना मिळून 'महा-गुह्य' बनतें. याहून निराळें म्हणजे 'परम-गुह्य.' अद्वय व अद्वयज्ञान या दोहोंच्या युतींतून दिव्यरूप निर्माण होतें यांतून भतार बुद्ध व यांतून साक्यमुनी निर्माण होतो. याच्या उजव्या बाजूपासून अवलोकितेश्वर व डाव्या बाजूपासून वज्रपाणि. हे तीन मिळून रत्नत्रय निर्माण होतें. बुद्ध-धर्म व संघ यांच्या तिघांच्या मुद्रा व्रज, ध्यान व भूस्पर्श

साक्यमुनीच्या मुखांतून वैरोचन येतो. अवलोकितेश्वरापासून अक्षोभ्य व रत्नसंभव. वज्रपाणीपासून अमिताभ व अमोघसिद्धि.

वैरोचनाच्या शाश्वत-ज्ञानापासून ईश्वर, ब्रह्मा व विष्णु. वैरोचनाच्या आज्ञेवरून ते स्वर्ग, मृत्यु व पाताळ निर्माण करतात.

यानंतर बौद्धांच्या कल्पनेचें तात्त्विक विवेचन केलें आहे. रूप, वेदना, संज्ञा, संस्कार व विज्ञान हे पांच स्कंध; ओम्, हम्, त्रम्, हरिह, अह् हे पांच विजाक्षर; राग, द्वेष, मोह हे त्रिखल, अर्थ, काम व शब्द ही त्रिमाला; काया, वाक् व चित्त ही त्रिकाया; असोह्, पुण्य आणि भक्ति हे त्रिपदार्थ; पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश हे पंचधातु; कलल, अर्वुद, घाण, पेशी आणि प्रशाख हे पंचरूपस्कंध; निष्प्रपंच किंवा शाश्वत, प्रभास्वर किंवा अदर्शन, ग्राह्य-ग्राहकरहित किंवा आकाशमत, सर्व्वधर्म-नैरात्म्य किंवा प्रत्यवेक्षण आणि कृत्यानुस्थानज्ञान हे पंचज्ञान. या सर्वाचें विवेचन केलें आहे.

या ग्रंथाच्या शेवटीं बुद्धांच्या शक्तींचीं नांवें दिलीं आहेत. धातिश्वरी, लोचना, मामकी, पांढरवाशिनी आणि तारा या अनुक्रमें वैरोचन, अक्षोभ्य, रत्नसंभव, अमिताभ व अमोघसिद्धि यांच्या शक्ति आहेत.

जावामधील महायान तांत्रिक पूजेची परिणति 'कमहायानन मंत्रनय' या ग्रंथांत झालेली सांपडते. यामध्यें वज्रयान अथवा तंत्रयान पंथीयांचीं तत्त्वें प्रतिपादलेली आहेत.

"नास्ति किंचिदकर्तव्यं प्रज्ञोपायेन चेतसा ।
निर्विशंकः सदा भूत्वा प्रभुरङ्क्ष्व कामपञ्चकम् ।।"

"ज्या भक्ताने प्रज्ञा प्राप्त केली आहे त्याने अगदी निर्धास्तपणें पांच सुखांचा उपभोग घ्यावा. हीं पांच सुखें म्हणजे पंचमकर. तंत्रयानांची चक्रपूजा (मद्य, मांस, मुद्रा, मत्स्य व मैथुन).

जावा व मलायामधील वाङमयनिर्मितीच्या या आढाव्यावरून येथें भारतीय संस्कृतीचा केवढा परिणाम झाला होता हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. या काळांतील जावा आचारविचाराने संपूर्णपणें भारतीय बनला होता. तेथील लोकांचा धर्म, कला, वाङमय, सामाजिक चालीरीति, इ. वर 'भारतीयत्वा' ची छाप दिसत होती. अशा रीतीनें बौद्ध जावा 'हिंदु' झाला होता हेंहि यावरून लक्षांत येईल.

## (जावा, बाली, सुमात्रा व मलाया)

जावामधील उपलब्ध वाङ्मयावरून तत्कालीन धर्माची कल्पना येते. कारण वाङ्मयांत धर्माचें प्रतिबिंब पडलें आहे. या वाङ्मयाचा विचार करतां येथें हिंदुधर्माचा पगडा जास्त होता असें दिसतें. या धर्माचा प्रसार चवथ्या व पांचव्या शतकांपासून झाला असावा. बुद्धधर्माचा प्रसार देखील येथें याच सुमारास झाला असावा. पण येथील बहुसंख्य लोक हिंदुधर्मीय झाले असे दिसतें. सातव्या-आठव्या शतकांपासून बौद्धधर्माला राजाश्रय मिळाल्यावर त्याचा अधिक प्रसार झाला. परंतु हा बौद्धधर्म हिंदुधर्मापेक्षां वेगळा नव्हता. श्रीविजयच्या व नंतर सिंघसरी अथवा मजपहित काळांत देवाबद्दलची जी कल्पना मान्यता पावली ती शिवबुद्धाची. या काळांमधील बौद्धधर्म तांत्रिक पूजेच्या संपूर्णपणें आहारीं गेला होता. या तंत्रयान बुद्धधर्मांत व हिंदु तांत्रिक पूजेंत कांहीच फरक नव्हता. म्हणूनच येथें हिंदु व बौद्ध मोठ्या गुण्यागोविंदाने राहत असत. शिवाय या दोनहि धर्मांत जावामधील पुरातन धर्माच्या कांही जुन्या रूढी शिरल्या होत्या. याचें प्रतिबिंब तेथील देवराजपंथांत दिसून येतें.

साधारणपणें आठव्या शतकाच्या सुमारास जावामधील बहुसंख्य लोक हिंदुधर्मीय झाले होते. ब्रह्मा-विष्णु-महेश या त्रिमूर्तींची निश्चितपणें स्थापना झाली होती. त्रिमूर्तींच्या बरोबर त्यांच्या शक्ति व इतर छोट्या-मोठ्या देव-देवता आल्या. त्यांचा प्रसार चवथ्या व पांचव्या शतकांपासून होत होता. याचा पुरावा तत्कालीन शिलालेख, देवालयें, शिल्पें, सुट्या मूर्ति व वाङ्मय यांमध्यें सांपडतो.

हिंदु त्रिमूर्तींचें पहिलें वर्णन राजा संजय याच्या इ. स. ७३२ च्या 'चंगल' शिलालेखांत आढळतें. यापूर्वी त्याने एका डोंगरमाथ्यावर शिवलिंगाची स्थापना केली. या शिलालेखांत शिव, ब्रह्मा व विष्णु यांची स्तुति केलेली आढळते. पहिल्या तीन श्लोकांत शिवाची स्तुति केलेली आहे. तो त्रिनेत्र आहे, त्याच्या जटामध्यें गंगा आहे, तो चन्द्रशेखर आहे, त्याच्या अंगाला राख फासलेली आहे, त्याच्या गळ्यांत सर्पमाला आहे असें शिवाचें वर्णन केलें आहे. तो ऐश्वर्यसंपन्न असला तरी संन्यस्त-

वृत्तीचा आहे. सर्व देव त्याला भजतात, तो भूतपति आहे व चराचर सृष्टीचें आपल्या विविध रूपांनी पालन करतो, असेहि त्याचें वर्णन केलें आहे. पांचव्या श्लोकांत ब्रह्मा सुवर्णरंगाचा आहे, जगद्गुरु आहे, संन्यासी व देव त्याची पूजा करतात, तो धर्म, अर्थ व काम यांचा आधार आहे, तो वेदांप्रमाणें समाजाला सांभाळतो असें त्याचें वर्णन आहे. विष्णु आपल्या पत्नीसमवेत सर्पराज अनंतावर पहुडला आहे. तो ध्यानांत मग्न आहे असें म्हटलें आहे. तो ईश्वराचा त्राता आहे, असेंहि पुढें म्हटलें आहे.

या लेखांवरून शिवपूजेचें जावामध्यें प्रस्थापित झालेलें माहात्म्य चट्कन् लक्षांत येतें. जावामधील शिलालेखादि वाङ्मय व देवालयें या विधानाला पुष्टि देतात. राजा ऐरलंग याच्या इतिहासांत तीन मुख्य पंथांचा उल्लेख आला आहे. हे तीन पंथ शैव, बौद्ध व महाब्राह्मण असे आहेत. जावामधील बहुतेक देवालयें शिवाचीं आहेत. आतांपर्यंत जो वेग-वेगळीं शिल्पें सांपडलीं आहेत तीं पण शिवाचीं व शिवकुटुंबाचीं आहेत.

जावामधील ' अमरमाला ' या अगदी पहिल्या वाङ्मयीन कृतींत प्रथम शिवाचा उल्लेख आहे. त्याला गुरु व ईश्वर संबोधिलें आहे. 'लाराजोंग्रांग ' च्या देवालयसमूहांत प्रमुख देवालय शिवाचें आहे. त्याच्या बाजूला असलेली ब्रह्मा व विष्णु यांचीं देवालयें लहान आहेत. शिव हा पालनकर्ता व संहारकर्ता या दोनहि रूपांत दाखविलेला आढ-ळतो. महादेव हा पालनकर्ता तर भैरव अथवा महाकाल या रूपांत तो संहारकर्ता होतो. महादेव एकमुखी असतो. त्याच्या कपाळावर तिसरा नेत्र, जटेमध्यें चन्द्र व कवटी असते व त्याचें यज्ञोपवीत सर्पाचें असतें. हात बहुधा चार, क्वचित् दोन असतात. यांत तो चामर, अक्षमाला, पुस्तक, कमल, कलश व त्रिशूळ धारण करतो. भैरव हा संहारकर्ता असल्यामुळें त्याचा चेहरा व एकंदर अवतार या रूपाला साजेसा भयानक असतो. गळ्यांत कवट्यांची माळा, हातामध्यें (दोन किंवा चार) गदा, खड्ग, पाश, सर्प, खंजीर व शिवाय चामर, त्रिशूळ, अक्षमाला वगैरे तो धारण करतो. शिवमूर्तीचा आणखी एक प्रकार जावामध्यें सापडतो. या मूर्तीला ' चक्रचक्र ' म्हटलें आहे. यांत शिव कोल्ह्यावर आरूढ

झालेला दाखविला आहे. त्याच्या बैठकीभोंवतीं कवटचा पसरलेल्या आहेत. त्याचीं कर्णकुंडलें, कंठमाला, कंकणें वगैरे सर्व भूषणें कवटचांचीं बनविलीं आहेत. यज्ञोपवीत पण कवटीचेंच बनलें आहे. त्याच्या कमर-पट्टयांत घंटिका असून त्याच्या चार हातांत त्रिशूळ, डमरू, खंजीर व कवटी आहे.

महादेवाची शक्ति देवी, महादेवी, पार्वती अथवा उमा. आपल्या चार हातांत ती कमल, चामर, अक्षमाला, पुष्प, सर्प, त्रिशूळ अथवा पुस्तक धारण करतें. तिचें 'रूपांतर' जेव्हां दुर्गेंत होतें त्या वेळीं तिला सहा, आठ, दहा अथवा बारा हात असल्याचें दाखवितात. हा अवतार धारण करून ती महिषासुराला मारते. महाकालाची शक्ति महाकाली अथवा भैरवी. ती शवावर आरूढ होते. ती कवटचांचें यज्ञोपवीत, कवटचांचें शिरोभूषण व कवटचांची कंठमाला धारण करते. आपल्या दोन हातांत ती त्रिशूळ व वाटी धरते.

शिवाची अर्धनारीनटेश्वर या रूपांतली मूर्तिदेखील जावामध्यें आढळते. उजवी बाजू शिवाची व डावी उमेची. गणेशमूर्ति तर जावा-मध्यें बहुधा सर्व ठिकाणीं सांपडते. हिचें स्वरूप पूर्णपणें भारतीय आहे. गणेश हा दुःखहर्ता व सुखकर्ता. ज्ञानाचें व शहाणपणाचें दैवत. शिवपुत्र कार्तिकेय देखील ठिकठिकाणीं आढळतो. हा मोरावर स्वार होऊन बसलेला आढळतो. क्वचित् त्याला सहा तोंडें व बारा हात असल्याचें दाखविलें आहे. शिवलिंगाची पूजा तर सर्वत्रच रूढ होती.

जावामध्यें शिवाइतका मान विष्णूला कधींच मिळाला नाही. विष्णूच्या चार हातांत शंख, चक्र, गदा व पद्म हीं भूषणें आढळतात. याची शक्ति 'श्री' आपल्या चार हातांत कमल, कर्ण, चामर व अक्ष-माला धारण करते येथें विष्णूचें वाहन (गरुड) नेहमींच मानवस्वरूपांत दाखवितात. क्वचित् प्रसंगीं त्याला त्याचें मूळ रूप पण दिलेलें दिसतें. विष्णूची मूर्ति बहुधा अनंतशयनांतच सांपडते. विष्णूचे कृष्ण, राम, मत्स्य, वराह व नरसिंह हे अवतारदेखील येथें आढळतात. कांही विष्णुमूर्तींच्या दोनहि बाजूस स्त्रिया दिसतात. यांना बालीमध्यें लक्ष्मी

भगुक्र ३... ...... ....... .. दिः ....... ......
क्रमांक ...................... चों दि........

व सत्यवान् म्हणतात. सत्यवान् म्हणजे सत्यभामा असें समीकरण केल्यास दुसरी 'रुक्मिणी' होईल व विष्णू 'कृष्ण' होईल.

ब्रह्मा हें हिंदु त्रिमूर्तींमधलें सर्वांत कमी लोकप्रिय दैवत. भारतामध्येंदेखील याची फारशी उपासना झाली नाहीं. याचा परिणाम जावामध्येंहि झालेला दिसतो. येथें ब्रह्माच्या मूर्ति फारच थोडया प्रमाणांत आढळतात. आपल्या चार हातांत तो अक्षमाला, चामर, कमल व कलश धारण करतो. त्याचे वाहन हंस कांहीं वेळां मानवरूपांत तर कांही वेळां आपल्या मूळ स्वरूपांत दाखविलेलें आढळतें. त्याला मानव रूप दिल्यास त्यास हंसाचें तोंड असल्याचें दाखवितात. ब्रह्माची शक्ति सरस्वती ही आपलें वाहन मोर यावर आरूढ झालेली आढळते. हिला दोन अथवा चार हात असल्याचें दाखविलें आहे.

ब्रह्मा–विष्णु–महेश ही त्रिमूर्ति जावामध्यें सर्वांच्या परिचयाची होती. क्वचित् मधील मूर्तीच्या मुकुटावर चन्द्र आढळतो. त्रिमूर्तीच्या चार हातांत अक्षमाला, चामर, कमल, पुस्तक आणि कलश असतो.

जावामध्यें आणखी एक मूर्ति बऱ्याच ठिकाणीं आढळते. या मूर्तीला दोन हात असून तिचें पोट कुबेराप्रमाणें असतें (आकृति क्र. ३९). ती उभी असून तिला दाढीमिशा असल्याचें दाखवितात. या मूर्तीच्या हातांत त्रिशूळ, कलश, अक्षमाला व चामर असल्यामुळें हिला शिवमूर्ति मानतात. पोरबट्जरक यांच्या मतें ही मूर्ति शिवाची नसून अगस्ति मुनीची आहे. मलाया द्वीपसमूहांतील अगस्ति मुनींची लोकप्रियता लक्षांत घेतली असतां या मताला पुष्टि मिळते यांत शंका नाही. या प्रमुख देवांशिवाय इतर देवदेवतादेखील जावामध्यें आढळतात. अष्टदिक्पालांपैकीं यम, वरुण, इन्द्र, अग्नि, निऋति आणि कुबेर यांचीं शिल्पें येथें आढळतात. यमाचा पाश, वरुणाची गदा, इन्द्राचा वज्र, अग्नीचा रेडा ह्यांवरून त्यांना ओळखतां येतें. मोठें पोट, बाजूला पडलेली नाण्यांची थैली, उजव्या हातांतील लिंबू यांवरून कुबेराची आकृति चटकन् ओळखतां येते. कुबेराची पत्नी हरिती. हिची शिल्पें देखील जावामध्यें आढळतात. सात घोडयांच्या रथांत बसून हातांत कमलपुष्प धारण करणारा सूर्य,

चार अथवा दहा घोड्यांच्या रथांत बसून हातांतील झेंडा फडकवीत जाणारा चंद्र, मकरावर अधिष्ठित होऊन धनुष्यबाण हातांत धरून लक्ष्य वेधणारा कामदेव वगैरे सर्व जावामध्यें आढळतात. भारतीय देवतांपैकीं जवळ जवळ सर्व देवतांचीं शिल्पें जावामध्यें सांपडतात. यावरून येथें हिंदुधर्म किती खोलवर रुजला होता याची कल्पना येते.

जावा व बालीमध्यें हिंदुधर्म व हिंदु धार्मिक विधि सर्वसामान्य जनतेपर्यंत जाऊन पोहोंचलो होती. सूर्यपूजा या दोनहि ठिकाणीं रूढ झाली होती. आजहि बालीमध्यें सूर्यसेवनाची पद्धत रूढ आहे. सूर्य हा शिवाचा अवतार मानीत. देवपूजा करतांना संस्कृत मंत्रच म्हणत. आजहि बालीमध्यें प्रार्थना संस्कृतांतून म्हटली जाते. सूर्यपूजन करतांना हे लोक प्रथम 'तालभेदन' व 'करशोधन' करतात. त्यावेळीं संस्कृत मंत्र म्हणतात. त्यानंतर प्राणायाम करतात व गायत्रीमंत्र म्हणतात. पाणी टाकतांना—

"ओं परमशिवगङ्गाय नमः
ओं ह्रीं ह्रीं परमशिवामृताय नमः ॥"

हा मंत्र म्हणतात. यानंतर सप्त-तीर्थ-मंत्र म्हणून गंगा, सरस्वती, सिंधु विपाशा, कौषिकी, यमुना व सरजू या सप्तनद्यांचें स्मरण करतात. मग धर्म, ज्ञान, वैराग्य आणि ऐश्वर्य यांचें स्मरण करून नवशक्ति मंत्र म्हणतात. शिवतत्त्व, विद्यातत्त्व, आत्मतत्त्व हे त्रितत्त्व मंत्र म्हणतात, मग घंटा वाजवून पुन्हां मंत्रघोष करतात. नंतर शिवस्मरण करून 'मला पापमुक्त कर' अशी प्रार्थना करतात: "पापी हं पापकर्माहं पापात्मा पापसंभवः" वगैरे वगैरे. यानंतर त्रिमूर्तींचें स्मरण करून त्यांना प्रार्थना करतात. गंध, अक्षत, पुष्प, धूप, दीप व पतंगणन यांना नमन करतात. यज्ञोपवीत धारण करतांना—

"भर्गो देवस्य धिमही............" म्हणतात.

ब्राह्मण पुरोहित ध्यान व जप करीत. जपाकरितां १०८ मण्यांची अक्षमाला वापरीत. जपाचें माहात्म्य फार होतें. कारण जपामुळें पोटांत

वास्तव्य करणारा आत्मा डोक्याच्या अगदी वरच्या टोकांत येतो अशी समजूत होती. रिकाम्या झालेल्या शरीरांत शिवाची स्थापना होते अशी कल्पना होती. विष्णूसंबंधांचीं स्तोत्रेंदेखील जावामध्यें उपलब्ध आहेत. विष्णु-स्तवनामध्यें त्याचें वर्णन केलें असून 'विष्णुजंजरा' मध्यें त्याच्या विविध अवतारांविषयीं माहिती दिली आहे.

भारतीय तत्त्वज्ञानाचा प्रसार जावामध्यें सर्वत्र झाला होता. जावामध्यें हें जें वाङमय निर्माण झालें त्याला आध्यात्मिक अधिष्ठान होतें. सांख्यांचा 'प्रधान-पुरुष-संयोग,' योगांतील 'प्राणायाम,' 'त्रिशक्ति,' 'त्रिपुरुष,' 'पंचमहाभूत,' 'पंचतंत्र' वगैरे तात्त्विक कल्पना त्यांच्या परिचयाच्या होत्या. त्या त्यांनी आत्मसात् केल्या होत्या. या प्रकारच्या तात्त्विक बैठकीशिवाय जावामध्यें एवढी प्रचंड वाङमयनिर्मिति होणें शक्यच नव्हतें.

जावामध्यें प्रचलित असलेल्या कथा पाहिल्या तर आपण आपलीं पुराणेंच वाचत आहोंत असें वाटतें. 'तंतू पंगेलरन' या नांवाचा जो ग्रंथ आहे त्यामध्यें किती तरी पौराणिक कथा आहेत. यांत जावामधील धार्मिक कल्पनांचें प्रतिबिंब पाहावयास मिळतें. उदा. मंदार पर्वत अथवा महामेरु प्रथम जांबुद्वीपामध्यें ( भारत ) होता, तो नंतर जावामध्यें कसा गेला याची कथा सांगितली आहे. जगत्प्रमाण व परमेश्वरी हे दोघेहि जांबुद्वीपांतून जावामध्यें गेले. तेथें धिह्यांग ( डीअेंग ) या ठिकाणीं जाऊन त्यांनी योगासन करावयास प्रारंभ केला. जगत्-प्रमाणाच्या आज्ञेप्रमाणें ब्रह्मा व विष्णु यांनी सृष्टि निर्माण केली. ब्रह्माने पुरुष व विष्णूने स्त्रिया निर्माण केल्या. नंतर जगन्नाथाने (जगत्प्रमाणाचें दुसरें नांव) ब्रह्मा, विश्वकर्मा, ईश्वर, विष्णू, महादेव व चित्रगुप्त या सर्वांना बोलावून त्यांना त्यांचीं कामें वांटून दिलीं. ते आपापलीं कामें आटपून स्वर्गात निघून गेले व त्यांचें कार्य पुढें त्यांच्या प्रजेने चालविलें. विष्णु व श्री यांना पांच पुत्र झाले व त्यांनी विविध व्यवसाय करावयास प्रारंभ केला.

प्रजा निर्माण झाली तेव्हां एक नवीनच प्रश्न उपस्थित झाला. जावामध्यें वारंवार धरणीकंप होऊं लागले. तेव्हां महाकारणानें (जगत्कारणाचें दुसरें नांव) सर्व देव, ऋषि, लोकपाल, विद्याधर व गंधर्व यांना बोलविलें व त्यांना मंदार पर्वत जांबुद्वीपांतून उचलून जावामध्यें आणावयास सांगितलें. ही सर्व मंडळी जांबुद्वीपांत आली व त्यांनी पर्वताचा वरचा अर्धा भाग तोडून घेतला. त्यावेळीं समुद्र ओलांडणें आवश्यक होतें. म्हणून ब्रह्मा कासव झाला व त्याने आपल्या पाठीवर मंदार पर्वत घेतला. विष्णूने सर्प होऊन त्याला विळखा घातल्यावर देवादिकांनीं त्यास पाण्यांतून ओढावयास सुरुवात केली. या प्रयत्नानें त्यांना थकवा आला व तहान लागली. तहान भागविण्याकरतां ते पाणी प्यालें परंतु पाण्यांत कालकूट नांवाचें विष असल्यामुळें ते सर्व मरण पावले. परमेश्वराने हें पाहिल्यावर सर्व विष पिऊन टाकलें. विष प्याल्यामुळें त्याचा गळा निळा झाला व तो नीळकंठ झाला. त्याने विषाच्या पाण्याचें अमृत बनविलें व तें सर्व मृत देवांवर शिंपडलें. तेव्हां देव जीवंत झाले मग सर्वांनी मंदार पर्वत जावांत आणला. त्यांनी हा पर्वत पश्चिम जावांत ठेवला पण मंदारच्या वजनाने पश्चिम जावा खालीं जाऊन पूर्व जावा वर येऊं लागला. मग मंदार पर्वत पुन्हां तेथून उचलणें भाग पडलें. पर्वत उचलतांना खालचा भाग पश्चिम जावांतच राहिला व तो पूर्वेला आणतांना त्यांतील तुकडे सर्व मार्गावर पडले. त्यांतून कटोंग, बालीस, कंजुद, कवि, अर्ज्जुन आणि कुमकुरू या टेकड्या निर्माण झाल्या व यामुळें जावामध्यें धरणीकंप व्हावयाचें थांबलें. या ग्रंथांमध्यें गोंवलेल्या पौराणिक कथा भारतीयांच्या परिचयाच्या आहेत कारण त्या भारतीयच आहेत.

## जावामधील बुद्धधर्म

जावामध्यें हीनयान बुद्धधर्माचा प्रसार सातव्या शतकापर्यंत सर्वत्र झाला होता. हीनयान धर्माचा जावामध्यें प्रसार होऊन कांही शतकें लोटलीं होतीं. परंतु शैलेन्द्र राजांच्या काळांत महायान धर्माला राजाश्रय

मिळाल्यामुळें जावा व सुमात्रा महायानधर्मीय झाले. याचा एक चांगला परिणाम झाला. हीनयान धर्माला मूर्तिपूजा मान्य नसल्यामुळें हीनयान काळांत बौद्ध कलेला कांहींच वाव मिळाला नाही. परंतु महायान धर्माचा प्रादुर्भाव होऊन त्याचा प्रसार झाल्याबरोबर मात्र बोरोबुदर निर्माण झालें.इतर अनेक चंडी जन्म पावल्या. चंडी 'जागो'च्या आसमंतांत किती तरी बौद्ध देवालयें पसरलेलीं आहेत. या काळांत बुद्धधर्माचा जो प्रसार झाला त्याचें प्रमुख श्रेय बंगालमधून आलेल्या बुद्ध भिक्षूंना दिलें पाहिजे. सातव्या शतकांत नालंद विद्यापीठाचा एक नामवंत प्राध्यापक जावामध्यें गेला व त्यानें बऱ्याच लोकांना महायान बुद्धधर्माची दीक्षा दिली.

जावामधील बौद्धदेवता व भारतामधील बौद्धदेवता यांमध्यें फरक नाही. शाक्यमुनि गौतम, त्याचें बोधिसत्त्व व तारा वगैरे सर्व मंडळी दोनहि ठिकाणीं आढळतात. श्यामतारा व लोचना या दोहोंमध्यें तेवढा थोडासा फरक दिसून येतो. भारतामधील श्यामतारा उजवा हात वरमुद्रेंत धरते व डाव्या हातांत कमलपुष्प धारण करते तर जावामध्यें ती धर्मचक्रमुद्रेंत असते. हिला येथें 'मामखी' म्हणतात. भारतामधील लोचना ही अक्षोभ्याची शक्ति मानली आहे, जावामध्यें ती वैरोचनाची शक्ति समजली जाते.

कालांतरानें महायान धर्माचा कायापालट झाला. हिंदु धर्मातील बऱ्याच देवांना बौद्धांनी आपल्यांत सामावून घेतलें. ब्रह्मा, विष्णु, महेश, गणेश, इन्द्र वगैरे सर्व देव बौद्ध झाले अर्थात् या हिंदु देवतांना बौद्ध-धर्मांत गौण व अपमानास्पद स्थान मिळालें. महायान देव त्रैलोक्य-विजय हा आपल्या पायाखालीं शिव-गौरीला तुडवीत असल्याचा उल्लेख आढळतो महायान धर्मांत या सुमारास हिंदु तंत्रपूजेचा प्रवेश झाला होता. सातव्या व आठव्या शतकांत बंगाल व नालंदचें विद्यापीठ येथें तंत्रयान बुद्धधर्माचा प्रसार झाला होता. तंत्रयान बुद्धपूजा सर्व बाबतींत हिंदु तंत्रपूजेप्रमाणें होती. तत्रयान पूजेचा महत्त्वाचा भाग म्हणजे पंचम-कार. ही चक्रपूजा वज्रयान बुद्धधर्मानें मान्य केली होती. या तांत्रिक

कर्माचारानें बुद्धधर्माचें स्वरूप अगदी हिडीस झालें. धर्माच्या नांवाखालीं नैतिक अराजक माजलें. त्रैलोक्यविजय व हेरूक हे देव या संस्कृतीचे निदर्शक होते. जशी प्रजा तशाच तिच्या देवता. हे सर्व होत असतांना शिवपंथीय व विष्णुपंथीय मात्र जवळ येत होते. याचे मूर्त स्वरूप म्हणजे या काळांतील हरिहराच्या मूर्ति. वैष्णवांनीं बुद्धाला विष्णूचा अवतार मानून बुद्धधर्माशीं सलोखा केला.

जावामध्यें शिव, विष्णु व बुद्ध यांमध्यें पुष्कळ वेळां फरकच केलेला आढळत नाहीं. 'कुंजरकर्ण' व 'सुतसोम' सारख्या ग्रंथांत तर शिव व बुद्ध यांना एकच मानलें आहे. बालीमध्यें तर बुद्धाला शिवाचा धाकटा भाऊ मानतात. जावामध्यें तर पुढें पुढें शिव-बुद्धाचा पंथच निर्माण झाला.

**बाली**

मलायाच्या द्वीपकल्पांतील बाली हें एकमेव हिंदुधर्मीय द्वीपकल्प. पांचव्या, सहाव्या शतकांपासून ते आजपर्यंत ते हिंदुधर्मीयच राहिले आहे. जावामधील हिंदुधर्मीय संस्कृति जशीच्या तशी बालीत सांपडते. तेराव्या शतकांत जावाचे मजपहित राजे बालींत गेले. तेराव्या शतकापासून जावामध्यें इस्लामचा प्रसार होऊं लागला. तेव्हां तेथील राजे जावा सोडून बालीमध्यें आले. त्यांच्याबरोबर त्यांचे बरेच अनुयायीदेखील आले बालीमध्यें हिंदुधर्म गेला तो जावामधून नाही. भारतीयांच्या वसाहती बालीमध्यें पांचव्या व सहाव्या शतकात झाल्या होत्या व तेथपासून बालीमध्यें हिंदुधर्माचा प्रसार झाला होता. मजपहित राजे येथें आल्यावर येथील भारतीय संस्कृतीवर जावाच्या संस्कृतीचा प्रभाव पडला.

बालीमध्यें बुद्धधर्म सहाव्या शतकांत आला. परंतु येथें बुद्धधर्माला कधींच लोकप्रियता मिळाली नाहीं. येथले लोक शैवपंथीयच राहिले. कांहीं जण बौद्धधर्मीय व हिंदुधर्मीय झाले. पण तेहि शिव-बुद्धाचे उपासक बनले. येथील बुद्धधर्मीय व हिंदुधर्मीय यांमध्यें विशेष फरकच नाही. आजच्या बालीमध्यें दोनहि धर्म अगदी गुण्यागोविंदाने

नांदतात. दोघेहि आपले धार्मिक विधि एकत्र येऊन करतात. कोणताहि धार्मिक विधि करावयाकरितां चार शैव धर्मगुरु व एक बौद्ध धर्मगुरु बोलावण्याची पद्धत आहे. 'य शिव, य बुद्ध,' जो शिव तोच बुद्ध होय.

ज्याप्रमाणें हिंदुधर्मामध्यें शिवपूजेला महत्त्वाचें स्थान कालांतराने प्राप्त झालें त्याचप्रमाणें बालीमध्येंदेखील शिवाचें महत्त्व वाढलें. ब्रह्मा, विष्णू, महेश या तीघांमध्यें शिवाची योग्यता सर्वांत मोठी. यांच्याबरोबर यांच्या शक्तींची पूजाअर्चा होणें साहजिकच होतें. शिवाची शक्ति उमा, पार्वती, दुर्गा अथवा काली, विष्णूची श्री अथवा लक्ष्मी, ब्रह्माची सरस्वती. या सर्वांची आराधना येथें केली जाते. याशिवाय इन्द्र, यम, वरुण, कुबेर, कामदेव, वासुकी, सूर्य, चंद्र, राहु या दैवतांचीहि पूजा करतात. शिवकुटुंबातलें सर्वांत लोकप्रिय दैवत म्हणजे गणेश. याची पूजा सर्वत्र केली जाते.

बालीमध्यें घरोघर ( सूर्यसेवन ) सूर्यपूजा केली जाते. सूर्य म्हणजे शिवाचेंच एक रूप मानतात. बालीमध्यें हिंदु गृह्यसूत्रांतले सर्व विधि मोठ्या थाटामाटाने केले जातात. वयांत आल्याचा विधि, लग्नाचा सोहळा, गर्भधान विधि, नाळ कापण्याचा विधि, नामकरण विधि, कान टोचण्याचा विधि वगैरे सर्व विधि मोठ्या इतमामानें केले जातात.

बालीमध्यें बरीच देवालयें आहेत. त्यातले प्रमुख देवालय म्हणजे ' गुनुंग–अगुंग ' टेकडीच्या पायथ्याशीं ' वसुकी ' येथें आहे बालीमध्यें देवालयाला ' पुर ' म्हणतात पुर बतुर, पुर लेंजुजंग, पुर बतू–कानू, पुर जेझेरोक, पुर जुगल बतू, पुर गुआ ललवह, पुर अकिमन आणि पुर पेजेंग ही बालीची प्रमुख देवालयें.

बालीमध्यें पुरोहिताला 'पदंद' म्हणतात. हा देवालयांतील सर्वांत मोठा धर्मगुरु. देवालयांतील दुसरा अधिकारी म्हणजे 'पमंकु' किंवा 'मंकू.' पदंधाच्या अनुपस्थितींत सर्व धार्मिक विधि हा करतो.

बालीमधले लोक फार उत्सवप्रिय आहेत. बालीमध्यें अन्नधान्य व फळफळावळ यांची विपुलता असल्यामुळें लोकांमध्यें या बाबतींत फार उत्साह दिसून येतो. भूतपिशाचांना हाकलून देण्याचा 'मैजीजी' चा उत्सव, शेतकीची देवता 'श्री' हिचा 'उसावा' चा उत्सव, सरस्वतीला पुस्तकें अर्पण करण्याचा 'सर-सेवती' उत्सव, हत्यारें देवीला अर्पण करण्याचा 'तुपेक लदेव' उत्सव वगैरे सर्व उत्सव येथें मोठ्या उत्साहानें साजरे केले जातात.

**सुमात्रा**

सुमात्रामध्यें हिंदु व बौद्धधर्मीयांचे बरेच अवशेष उपलब्ध आहेत. जावामधील सर्व हिंदु व बौद्ध वाङमय येथें पण पोहोंचलें होतें पदंग, तपनुली, पालेंबांग व जंबी या ठिकाणीं बुद्ध, बोधिसत्त्वें, हेरूक यांच्या दगडाच्या मूर्ति, बुद्ध व लोकनाथ यांच्या तांब्याच्या मूर्ति, शिव, गणेश, नंदी, ब्रह्मा यांच्या दगडाच्या मूर्ति, व गणेश व कुबेर यांच्या तांब्याच्या मूर्ति सांपडल्या आहेत येथील धर्मव्यवस्था जावाप्रमाणेंच होती.

**मलाया**

मलायामध्यें सांपडलेल्या अवशेषांवरून येथें सातव्या शतकापासून बौद्ध व हिंदु हे दोनहि धर्म अस्तित्वांत असल्याचा पुरावा मिळतो. इ स.७७५ च्या लीगोरच्या शिलालेखावरून त्या भागांत या सुमारास बौद्ध धर्माचें प्राबल्य दिसून येतें. येथून जवळच 'वट महेयोंग' येथें एक संस्कृत शिलालेख सांपडला आहे. हा देखील महायान बौद्धांचा आहे. दुसऱ्या एका शिलालेखामध्यें महायान धर्माचा स्पष्टच उल्लेख आहे. याच काळांतील एका बौद्ध हस्तलिखितामध्यें अवलोकितेश्वराची दोन लहान चित्रें मिळाली आहेत. येथें मातीच्या बऱ्याच चकत्या सांपडल्या आहेत. या चकत्यांवर एका बाजूला बौद्धांचा मंत्र 'ये धर्मा हेतू' कोरलेला आहे. दुसऱ्या बाजूला बुद्ध अथवा बोधिसत्वांच्या आकृति कोरलेल्या आहेत. त्यांतील लिपि उत्तर भारतीय नागरी आहे.

वॅडोनच्या उपसागराच्या उत्तरेला विटांचें एक पडीक देवालय आहे. या देवालयांतील शिल्पें हिंदु व बौद्ध आहेत. लजोंक्वीर यांच्या

मतें या देवालयांतील प्रमुख देव शिव अथवा विष्णु असावा. हिंदुधर्मा-मध्यें अर्थातच बुद्धाला दुय्यम स्थान आहे. याच ठिकाणीं बुद्धाच्या दोन मूर्ति सांपडल्या आहेत. या बाराव्या अथवा तेराव्याशतकां तील असाव्यात. येथून दक्षिणेला ५० मैलावर विष्णूची मूर्ति असलेले एक देवालय आहे. तेथून जवळच बुद्धमूर्ति असलेला एक विहार आहे. पण येथील सर्वांत महत्त्वाचा अवशेष म्हणजे लीगोर येथील 'नरवोन् श्री थमरात.' भगवान् बुद्धाचें निर्वाण झाल्यावर तो येथें प्रकट झाला होता अशी समजूत आहे. त्यामुळें या जागेला फार महत्त्व प्राप्त झालें आहे. या देवालयाजवळ हिंदु देवालयेंहि आहेत. त्यांपैकीं 'ह्रो फ ईसोन' च्या देवालयांत हिंदु देवतांच्या तांब्याच्या सुंदर मूर्ति सांपडल्या आहेत. येथील गणेशमूर्तीवर दक्षिण भारतीय लिपीमध्यें लेख कोरला आहे. येथील सर्वांत सुंदर मूर्ति नटराजाची आहे.

मलायामधील अवशेषाची गोळाबेरीज करूं पाहतां बौद्ध व वैदिक संस्कृति येथें सुखासमाधानाने नांदत होत्या असें दिसून येतें. 'ताय' ने मलायावर विजय मिळविला, तेव्हां पर्यंत हे दोन धर्म अत्यंत मित्रत्वाच्या नात्याने मलायामध्यें नांदत होते.

संपूर्ण मलाया द्वीपकल्पाचें हें वैशिष्टय होतें.

# उपसंहार

बृहत्तर भारताच्या या इतिहासाचीं सोनेरीं पानें काळाच्या उदरांत दडपल्यासारखीं झालीं होतीं. हिंदुधर्माच्या या परदेशपर्यटणाची भारतीयांना माहिती नव्हती. हिंदुधर्माविषयींच्या गैरसमजुतीमुळें भारतीय इतिहासाच्या या अंगाचा लोकांना परिचय झाला नव्हता.

अशा प्रकारचा समज होण्यामागें दोन कारणें होतीं. एक म्हणजे बौधायन, मनु वगैरेंच्या लिखाणामुळें हिंदुधर्म समुद्रपर्यटणास निषिद्ध मानतो ही कल्पना प्रसृत झाली होती. हिंदुधर्माची वृत्ति धर्मप्रचाराला अनुकूल नसल्यामुळें या समजाला दुजोरा मिळाल्यासारखा झाला. इतिहासपूर्वकाळापासून या भारतभूमींत जी एक आगळी अशी संस्कृति निर्माण होत होती तिच्यावर इतर संस्कृतींचा प्रभाव पडला नाहीं व भारतीय संस्कृतीचा प्रभावहि इतर संस्कृतीवर पडला नाहीं अशी कल्पना यामुळें प्रसृत झाली. बौधायन, मनू इ. शास्त्रकारांनी समुद्रपर्यटण निषिद्ध मानलें होतें. समुद्रपर्यटण करणाऱ्या ब्राह्मणाला धर्मानें प्रायश्चित्त सांगितलें होतें. या दंडकामुळें हिंदुधर्मीयांनीं भारताबाहेर पाऊल टाकलेंच नाहीं असें इतिहास सांगूं लागला.

यांसबंधीं दोन गोष्टी लक्षांत घेणें आवश्यक होतें. एक तर या निर्बंधाचा काळ व दुसरें म्हणजे या निर्बंधाचें स्वरूप. डॉ. केतकर यांच्या मतें मनुस्मृतीचा काळ इ. स. २२७ ते ३२० या दरम्यानचा आहे. या काळापर्यंत हिंदुधर्मीयांच्या फुनान, मलाया वगैरे ठिकाणीं वसाहती स्थापन होऊन दोन तीन शतकें लोटलीं होतीं. फुनानचें राज्य ब्राह्मण कौण्डीण्यानें इ. स. च्या पहिल्या शतकांत स्थापन केलें. मलायामध्यें हिंदुधर्मीयांच्या वसाहती याच सुमारास स्थापन झाल्या होत्या.

बौधायन, मनु यांनी समुद्रपर्यटण निषिद्ध मानलें होतें हें खरें. पण त्यांच्या या निर्बंधाचें स्वरूप मर्यादित आहे. श्राद्धकर्मासाठीं आयोजित केलेल्या भोजनप्रसंगीं कोणत्या ब्राह्मणांना आमंत्रित करूं नये याची

एक विस्तृत यादी मनुस्मृतींत आढळते. अगारदाही गरदः कुण्डाशी सोमविक्रया। **समुद्रयायी** वन्दी च तैलिकः कूटकारकः।। ३·१५८ यांत '**समुद्रयायी**' (समुद्रपर्यटण करणारे) ब्राह्मणांना आमंत्रण देऊं नये असा उल्लेख आहे. यांत स्मृतिकारांचा विरोध किती मर्यादित स्वरूपाचा होता हें तर लक्षांत येतेंच पण आणखीहि एक गोष्ट लक्षांत येते. ती म्हणजे अशा प्रकारचा निर्वंध घालण्यासारखी परिस्थिति इ. स. च्या तिसऱ्या अथवा चौथ्या शतकांत निर्माण झाली होती व याचें कारण म्हणजे स्मृतिपूर्व काळांत वरेच ब्राह्मण परदेशपर्यटण करीत होते हेंच होय.

वेदकाळापासून भारताचा इतिहास पाहिला तर समुद्रपर्यटणाविषयींची ही स्मृतिप्रणीत दृष्टि चूक होती हें लक्षांत येईल. भारतामधील जहाजांसंबंधीं लिहिलेल्या 'युक्ती कल्पतरू' या प्राचीन ग्रंथांत जहाजांचा आकार, त्यांची बांधणी वगैरे सर्व गोष्टींची सांगोपांग चर्चा केली आहे. यासंबंधीं भोजानें लिहिलें आहे कीं मोठीं जहाजें बांधण्यासाठीं क्षत्रिय जातीचें लाकूड वापरावें

"क्षत्रियकाष्ठैर्धरिता भोजमते सुखसम्पदं नौका ।
अन्ये लघुभिः सुदृढैर्विदधति जलदुष्पदं नोकाम् ।।"

विशेषतः दूरच्या व अवघड प्रवासासाठीं या लाकडाचीं जहाजें उपयुक्त ठरतात.

'महामति' सहदेवानें समुद्रपर्यटण करून अनेक द्वीपकल्पांतील म्लेंच्छ राजे, निषाद व नरमांसभक्षकांचा पराभव करून त्यांना आपलें सार्वभौमत्व मान्य करावयास लावलें असा उल्लेख महाभारताच्या सभापर्वांत आहे.

"सागरद्वीपवासांश्च नृपतीन् म्लेंच्छयोनिजान् ।
निषादान् पुरुषादांश्च कर्णप्रावरणानपि
द्वीपं ताम्राव्हयञ्चैव स नृपं वशे कृत्वा महामतिः ।।"

रामायणाच्या किष्किंधा कांडांत ( ४०·२३ ) सुग्रीवाने आपल्या अनुयायांना सीताशोधार्थ सर्व दिशेला पाठविलें आहे असा उल्लेख आहे. त्याने कांहीं अनुयायांना द्वीपकल्पांतील नगरांत पाठविलें आहे.

( समुद्रमवगाढांश्च पर्व्वतान् पतनानि च । ४०·२५ ). महाभारताच्या आदिपर्वांत व रामायणांतील अयोध्याकांडांत जहाजाविषयींचे उल्लेख आढळतात. पुराणांनी तर समुद्र पवित्र मानला आहे.

सर्वं पुण्यं हिमवतो गङ्गा पुण्या च सर्वतः ।
समुद्रगाः समुद्राश्च सर्वे पुण्याः समन्ततः ॥

( वायु पुराण. ७७·११७ )

सर्वत्र हिमवान् पुण्यो गङ्गा.........न्ततः ।
नद्यः समुद्रगाः पुण्याः समुद्रश्च विशेषतः ॥

( कूर्मपुराण· ३७·४९·५० )

वायु व कूर्मपुराणें हिमालय, गंगा, समुद्राला मिळणाऱ्या सर्व नद्या यांचें पावित्र्य मानतात. कूर्मपुराणांत तर 'समुद्रश्च विशेषतः' असा समुद्राचा गौरव केला आहे. समुद्राचें पावित्र्य मानावें आणि समुद्रपर्यटण निषिद्ध मानावें यांत विसंगति दिसते. भारताचा परदेशाशीं संबध अतिप्राचीन काळापासून आला आहे. फोनीशियन, ज्यू, ॲसीरियन, ग्रीक्, इजिप्त व रोम या सर्वांशीं भारताचे व्यापार विषयक संबध होते. अगदी प्राचीन काळापासून भारतीय सर्वत्र निःसंकोचपणें संचार करीत होते. इ. स. च्या पहिल्या शतकापासून किंवा तत्पूर्वी भारतीय आग्नेय आशियांतील देशांत जावयास लागले होते. आग्नेय आशियांतील या वसाहतीनंतरच समुद्रपर्यटणविरोधी लाट उसळली. स्टटरहीम, कोडेज्ञ यांच्या मतें तर भारतांतील ब्राह्मण भारताबाहेरच्या प्रदेशांत तेथील मुलींशीं लग्न करून स्थायिक होत असत असें आहे. आपलें रक्त शुद्ध ठेवण्याचा प्रयत्न त्यांनीं अजिबात केला नाही व याबद्दलचाच तीव्र निषेध स्मृतींत प्रतिबिंबित झालेला आहे.

भारतीय वसाहती फुनान, कंबुज, चंपा, द्वारावती, मलाया, जावा, सुमात्रा, बाली, बोर्निओ या ठिकाणीं होत्या. पण या भारताबाहेरच्या वसाहतीचा उल्लेख भारतीय इतिहासांत नमूद होऊं नये याचें सखेदा-

अनुक्रम १४५ 2-3715
क्रमांक 216

श्चर्य वाटतें. भारतीय लोकांना भारताबाहेरच्या [illegible] चांगला परिचय होता. संस्कृत वाङ्मयांत समुद्रपर्यटणासंबंधी कितीतरी सरस कथा आढळतात. वृहत्कथेवर आधारलेल्या या कथांतून सुवर्णद्वीप व सुवर्णभूमीशीं व्यापारी संबंध असल्याचे उल्लेख आहेत. बौद्ध जातकें, 'समराइच्छ-कहा' या जैनग्रंथांत असेच उल्लेख आहेत. कथाकोशांत नागदत्त ५०० जहाजें घेऊन सुवर्णद्वीपांत संपत्तिसाधनेसाठीं गेल्याची कथा आहे. 'मिलिंदपन्ह' व 'निद्देश' मध्यें भारतीय जहाजें सुवर्णभूमीकडे जात असत असा उल्लेख आहे. मलायाच्या द्वीपसमूहांतील हीं द्वीपकल्पें निसर्गतःच इतकीं समृद्ध आहेत कीं त्यांना पुरातन काळापासून सुवर्णद्वीप असें सार्थ नांव मिळालें आहे. भारतीय व्यापारी या सुवर्णद्वीपांत आपल्या व्यवसायानिमित्त गेले. त्यांच्या मागोमाग क्षत्रिय गेले. यांतील कांही नशीब काढण्याकरितां गेले, कांही युद्धांत पराभूत झाल्यामुळें गेले तर कांही भारतामधून हकालपट्टी झाल्यामुळें नाइलाजाने गेले. बंगालचा राजा सिंहव याचा पुत्र विजय याने बंगालमध्यें खूप घुमाकूळ माजविला म्हणून राजा सिंहवने राजपुत्र विजयला हद्दपार केलें. एका मोठ्या जहाजांत राजपुत्र व त्याचे ७०० अनुयायी यांना ठेवून तें जहाज समुद्रांत सोडून दिलें. राजपुत्र विजय सिलोनला गेला व तेथें त्यानें आपलें राज्य स्थापन केलें. नंतर त्यानें पांड्य राजाला त्याची कन्या व ७०० स्त्रिया यांना पाठवून देण्याची विनंती केली. पांड्य राजाने आपली कन्या व ८०० स्त्रिया यांसह तिची जहाजांतून विजय राजाकडे रवानगी केली. जातककथांतून भारतांतून हद्दपार झालेल्या अनेक क्षत्रियांनी दैव अजमावून पाहण्यासाठीं अन्यत्र वसाहती केल्याचे उल्लेख आहेत. एका शिलालेखांत अशी नोंद आहे कीं ईश्वरी संकेतानुसार कौण्डिण्यानें भारत सोडला व फुनान व कंबुजदेश येथें राज्यें स्थापन केलीं. धर्मप्रसारासाठीं जाणाऱ्या भारतीयांचेदेखील उल्लेख आढळतात. भारतीय व्यापारी व्यवसायाच्या निमित्तानें समुद्रमार्गानें चीनला जात. वाटेंत मलाया द्वीपकल्प असल्याने तेथील लोकांचा व त्यांचा संबंध येणें अपरिहार्यच होतें. भारतांत पुनः आल्यावर हे

व्यापारी आपलें प्रवासवृत्त कथन करीत. सुवर्णद्वीपांतील समृद्धीचें रसभरित वर्णन करीत. यामुळें भारतीय जास्त मोठ्या संख्येने सुवर्णद्वीपाकडे जात. त्यांच्याबरोबर अन्य व्यवसाय करणारे भारतीयदेखील गेले असावेत. कारण त्याशिवाय भारतीय संस्कृतीचा एवढ्या प्रमाणावर प्रसार होणें शक्यच नव्हतें.

भारतीय संस्कृति या वेळीं संपन्नतेच्या शिखरावर होती. सुवर्णद्वीपांतील लोक संस्कृतिहीन होते असें नाही. येथील लोकांना शेती, धातूचा उपयोग, नौकानयन इत्यादींचा चांगला परिचय होता. त्यांच्या समाजांत स्त्रियांना मान होता. मातृप्रधान समाजव्यवस्था असल्याने वारसा मातेकडून मिळत असे. पूर्वजपूजा, भूमिपूजा, श्वापदपूजा प्रचलित होत्या. मात्र तरीहि संस्कृति भारतीय संस्कृतीपेक्षा कनिष्ठ होती यांत संशय नाहीं.

वैदिककाळापासून भारतीय संस्कृति समृद्ध, संपन्न बनत चालली होती. धर्म, शास्त्र, वाङमय, कला वगैरे सर्व क्षेत्रांत भारतीय अग्रेसर होते. त्यामुळें भारतीयांच्या वरिष्ठ संस्कृतीचा प्रभाव येथील द्वीपस्थ संस्कृतीवर पडला. वैद्यकज्ञान व इतर भौतिकज्ञान यांच्या तेजाने भारतीयांनी येथील लोकांना दिपवून टाकलें. आपण राजघराण्यांतील आहोंत, संपत्तिमान् आहोंत असें भासवून अनेक भारतीयांनी येथील प्रमुख घराण्यांतील मुलींशीं शरीरसंबंध जोडला आणि अशा तऱ्हेने एतद्देशियांत भारतीय संस्कृतीचा प्रसार होऊं लागला. भारतीयांचा किनाऱ्यावरील गांवांशीं प्रथम परिचय होई. दोन्ही संस्कृतींची सरमिसळ होई. यामुळें कधीं येथील स्थानिक राजा हिंदुधर्माचा स्वीकार करी किंवा एखादा हिंदु येथील जमातीचें राजपद हस्तगत करी.

पुरातन काळापासून वैदिक संस्कृतीचा प्रवास उत्तरेकडून दक्षिणेकडे अव्याहतपणें चालला आहे. आर्यधर्म अगोदर उत्तर भारतांत आला व तेथून दक्षिणेंत पसरला. आर्यधर्माच्या या दक्षिणेकडील प्रवासांत अगस्ति ऋषीचें स्थान अत्यंत महत्त्वाचें आहे. आर्य संस्कृतीचा आग्नेय आशियांतील प्रसार हा आर्य धर्माच्या दक्षिणेकडील प्रवासाचें

एक अंग आहे. अगस्ति ऋषींचीं देवालयें सबंध मलायाच्या द्वीपकल्पांत पसरलेलीं आहेत हींच गोष्ट अगस्तिमाहात्म्य सिद्ध करण्यास पुरेशी आहे.

आग्नेय आशियांतील संस्कृति पूर्णतः भारतीय झाली. तेथील लोकांचीं नावें, ग्रामनामें, कायदे, लिपि, भाषा, सामाजिक व आर्थिक व्यवस्था, शासनपद्धति वगैरे सर्व पूर्णपणें भारतीय होती. एवढेंच नव्हे तर भारताप्रमाणें येथें जातिसंस्था निर्माण झाली. त्रिवेद, धर्मशास्त्र, सूत्रवाङ्मय, उपनिषदें, उपवेद, वेदांगें, पुराणें वगैरे सर्वांचा येथें प्रसार झाला. संस्कृत ही त्यांची बोधभाषा होती. शैवपंथ, बुद्धधर्म इत्यादींचे विचार येथें रूढ झाले. भारतीय संस्कृतीच्या प्रभावाने येथील जीवन उजळून निघालें. मग तेराव्या शतकानंतर हा प्रभाव नष्ट झाला तरी कसा? क्रोमच्या मतें हिंदु व बौद्ध या दोन्हीं धर्मांचा जावामध्यें प्रसार झाला होता. या धर्मांची जनमनावरील पकड ढिली झाली होती कीं नाहीं याविषयीं अनेक मत-मतांतरें आढळतात. तेव्हां हा स्वातंत्र संशोधनाचा विषय आहे, यांत शंका नाहीं. स्टटरहीम जें आजच्या बालीविषयीं म्हणतो तें जावाच्या बाबतींतहि खरें असावें. स्टटर-हीमच्या मतें बालीमधला वरचा समाज हिंदु आहे व खालचा वर्ग हिंदुधर्म मान्य करीत असला तरी त्याची पुरातन पूर्वजपूजा, श्वापदपूजा चालूच आहे. कंबुजदेशांत वरचा श्रीमंत सरदारवर्ग तेवढाच हिंदु होता. या वरिष्ठ वर्गाची सत्ता नष्ट होताच धर्माचें उच्चाटन झालें. एक गोष्ट मात्र खरी कीं येथून ज्या बुद्धधर्माचें उच्चाटन झालें तो तंत्रयान बुद्धधर्म. बाराव्या व तेराव्या शतकांत सिलोनमधून हीनयान बुद्धधर्माचा प्रसार ब्रह्मदेश, सयाम व कंबोडिया येथें झाला व तेथें अजूनहि बुद्धधर्मीय लोक आहेत.

तेराव्या शतकानंतर सुवर्णद्वीपांत इस्लामचा प्रसार झाला. पण भारतीय संस्कृतीचा प्रभाव त्यामुळें क्षीण होऊं शकला नाही. सयाम, लाओस, कंबोडिया, ब्रह्मदेश या भागांत आजहि बुद्धधर्माचें प्राबल्य आहे. मलायांत भारतीय धर्माचें अस्तित्व नाही तथापि तेथील वाङ्मयावर

भारतीय वाङ्मयाची छाया पडली आहे हें मान्यच करावें लागेल. या भागांत जें वाङ्मय निर्माण झालें त्याचें स्फूर्तिस्थान रामायण, महाभारत, हरिवंश, हिंदु पुराणें, जातककथा इ. भारतीय ग्रंथांतच आढळतें. इंडोचीन, मलाया व जावा येथील नाट्यकला व नाट्यवाङ्मय यांचें परिशीलन केलें तर भारतीय संस्कृतीचा प्रभाव चटकन् ध्यानांत येईल. नाट्यकथा, छायानाट्य, नृत्य, कळसूत्री बाहुल्यांचे खेळ, इ. सर्व प्रकार भारतीय संस्कृतीच्या छायेखालीं वाढले आहेत.

बृहत्तर भारतांतील जीवनाला अर्थ प्राप्त झाला आहे तो भारतीय संस्कृतीमुळेंच होय. बृहत्तर भारतांतील वाङ्मय, विज्ञान, शिल्प, स्थापत्य, इ. चें स्वरूप अवलोकन केलें तर त्यांतून भारतीय संस्कृतीचीं स्पंदनेंच जाणवावींत. येथील राजनीति व कायदेविषयक विचार पाहिला तर त्यांत कौटिल्य, मनु इ. राजनीति व धर्मशास्त्रज्ञांची विचारशक्ति अधिक असल्याची साक्ष पटेल. जावामधील 'बोरोबुदर' व कंबोडियामधील 'अंकोरवाट' हीं भारतीय स्थापत्याचीं व शिल्पकलेचीं अमर स्मारकें आहेत. भारतीय संस्कृति कधींच आक्रमक नव्हती. तिचें तेज इतकें अपूर्व होतें कीं अन्य संस्कृति दिपून जाव्यात. भारतीय संस्कृतींतील विचारधारा बृहत्तर भारतांत पसरली. तिनें बृहत्तर भारताच्या जीवनांतील सर्व अंगोपांगांना एक तेजस्वी वळण दिलें. भारतीय संस्कृतीचें श्रेष्ठत्व तें हेंच ! म्हणून युगमान बदललें. नवें विज्ञान वाढलें, नवे विचार वळावले तरी भारतीय संस्कृति आपल्या आगळ्याच सामर्थ्यानें जगाच्या कौतुकाचा विषय झाली आहे. 'कृण्वन्तो विश्वमार्यम्' अशी तिची प्रतिज्ञा होती. तिच्या प्रतिज्ञेच्या साफल्याचा 'सोनियाचा दिवस' उजाडण्यास आतां फारसा कालविधि लागेल, असें वाटत नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे स्थळप्रत.
अनुक्रमांक 22375 वि. ...
क्रमांक ... नों. दि. ...

# संदर्भ ग्रंथ


(1) **Dr. R. C. Majumdar :**

i ) Suvarnadvipa ( Vol. I)

ii) ,, ( Vol. II )

iii) Champa

iv) Indian Colonies in South East Asia.

(2) **Dr. Reginald le May :**

i ) The Culture of South East Asia

ii) The Buddhist Art of Siam

(3) **Prof. K. A. N. Sastri :**

i ) Srivijaya.

(4) **D. G. E. Hall :**

i ) A History of South East Asia.

(5) **H. G. Quaritch Wales :**

The Making of Greater India.

(6) **R. K. Mookerjee :**

A History of Indian Shipping.

(7) **U. N. Ghoshal :**

Progress of Greater Indian Research


क्रमांक ... नों: दि: ...

आकृति क्र. २
हरिहर, फूनान







आकृति क्र. १
हरिहर, फूनान



आकृतिक्र. ४
खरोद येथील
गुप्त देवालय.

आकृति क्र. ३
लोपबुरी (कन्नुज-देश)
येथील ख्मेर देवालय.






आकृति क्र. ५ 'बांटी श्री' (कंबुज–देश) देवालयांतील त्रिकोणी पर्णाकृतीमध्यें तिलोत्तमा व बाजूला सुंद व उपसुंद दिसताहेत.




आकृति क्र. ६
वांटो श्री मधील
पर्णाकृतींतील
सुंदांचें युद्ध.




आकृति क्र. ११
बुद्धमूर्ति (बँकॉक).




आकृति क्र. ७ अंकोर वाट (कंबुज-देश).



आकृति क्र. ८ अमृत–मंथन (अंकोर–वाट).



आकृति क्र. ९ अंकोर-वाटमधील अप्सरा.




आकृति क्र. १० बयोन देवालय. पृष्ठ २३ (अंकोर–टोम)



आकृति क्र. १२. लोपबुरी येथील बुद्ध-मूर्ति.



आकृति क्र. १३. कोरात येथील बुद्ध-मूर्ति.



आकृति क्र. १४ 'हालींग्यी' येथील मूर्ति. वरचा भाग तुटला आहे.




अ. क्र. १५ सोन्याची बुद्ध मूर्ति, ब्रह्मदेश.




आकृति क्र. १७. थातोनची तांब्याची बुद्धमूर्ति.



आकृति क्र १६. खीनबाचा चांदीचा द्वारपाल



आकृति क्र. १८. अनव्रथानें बांधलेला श्वेसंदाचा स्तूप.



आकृति क्र. १९. क्यांझीथ्यानें बांधलेलें आनंद देवालय (ब्रह्मदेश).



आकृति क्र. २३.
विष्णु–मुर्ति (चंडी बेलहन, जावा)

आकृति क्र.२०
क्यांझीथ्या,
आनंद देवालय.
(ब्रह्मदेश)



आकृति क्र २२. पाल छापाची पगानची बुद्धमूर्ति.





आकृति क्र. २१. पाल बुद्धमूर्ति. नालंद (बिहार).

आकृति क्र. २५.
विष्णु (द. सयाम)






आकृति क्र २४
हरिहर

आकृति क्र २७.
लोकेश्वराची तांब्याची
मूर्ति (द. सयाम).







आकृति क्र. २६.
विष्णु (द. सयाम)




आकृति क २८ लारा जोंग्रांगचें शिवमंदिर.




आकृति क. ३३. बोरोबदरचे स्तूप असलेले गोलाकार मजले (जावा).



आकृति क्र. ३० बोरोबुदरचा स्तूप शैलेन्द्र काळ (जावा).




आकृति क्र. ३१. बोरोबुदरचा सज्जा.



आकृति क्र. ३२. बोरोबुदरच्या सज्ज्यांतील प्रवेशद्वार





आकृति क्र ३४ व ३५ वर बुद्ध व त्याचे पांच शिष्य; खालीं राजा बिंबिसाराची बुद्धभेट (बोरोबुदर.)



आकृति क्र. ३६. सुधानकुमाराची कथा (बोरोबुदर).



आकृति क्र. ३७. नृत्य (बोरोबुदर).



आकृति क्र. ३८. दरबार (बोरोबुदर).



आकृति क्र. २९. लारा जोंग्रांगचा महादेव (जावा). पृष्ठ ११२

क्रमांक ............ वि: ............
............ नों: दि: ............



REFBK-0011406

आकृति क्र. ३९. शिव (?)